
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.



REFBK-0019261

# माझ्या आठवणी

१८२५१



क्र. क्र. १९२८५१

वत्सला साहित्य प्रकाशन : पुष्प २५ वें

# माझ्या आठवणी

# व

# अनुभव

( कर्मवीर विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांचें आत्मचरित्र. )

## भाग दुसरा

REFBK-0019261

किंमत ४ रुपये

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें.

प्रकाशक :—
जयवन्त बाबूराव जगताप, बी.ए. ( ऑनर्स ), बी.टी.
संचालक, ' वत्सला साहित्य प्रकाशन '
१२४८ शुक्रवार पेठ, पुणें शहर.

माझ्या आठवणी व अनुभव

भाग तिसरा

लौकरच प्रसिद्ध होईल.

मुद्रक:—
श्री. अमृतराव केशवराव ढेरे,
श्रीशिवाजी प्रिंटिंग वर्क्स,
४९५ शनिवार पेठ, पुणें २.

# 'आठवणी'–साठीं

सुमारें ४ वर्षांपूर्वी वत्सला साहित्य प्रकाशन मालेचें सहावें पुष्प म्हणून "माझ्या आठवणी व अनुभव" हें महर्षि कर्मवीर वि. रा. शिंदे यांचें आत्मचरित्र भाग पहिला या रूपानें मीं प्रसिद्ध केलें होतें. कर्मवीरांचा त्याग व कार्य उज्ज्वल असल्यानें सदर पुस्तकाचा बोलबाला बराच झाला. याच पुस्तकाचा पुढील संपूर्ण भाग तयार व्हावा, म्हणून माझे परम स्नेही व कर्मवीरांचे द्वितीय चिरंजीव श्री. रवींद्रराव यांनीं स्वतः बरीच खटपट करून आत्मचरित्र पुरें केलें.

मृत्यूपूर्वी ३।४ वर्षें कर्मवीर अर्धांगवायूनें अंथरुणाला खिळूनच होते. हात कंपवातानें लिहिण्याच्या परिस्थितींत नव्हते. अर्धा-पाऊण तास शांत मनानें एखादा मजकूर सांगेन म्हटलें तर तें त्यांना प्रकृतिक्षीणतेमुळें शक्य नव्हतें. मजकुराची जुळवाजुळव करतांना अवश्य असणारें वाचन अंधते-मुळें झालें नाहीं. अर्थातच कर्मवीरांना आपली सारी भिस्त स्मृतीवर ठेवावी लागली. कर्मवीरांची स्मृति वृद्धापकाळांतील दारुण स्थितींतही भयंकर जागृत असलेली पाहून मात्र मोठा आचंबा वाटतो. स्मृतीनें बाजू राखली म्हणून तर आज 'आठवणी' हातीं लागल्या. नाहींतर एवढ्या मोठ्या स्वार्थत्यागी देशसेवकाचें आत्मचरित्र आमच्या देशबांधवांच्या वाचनांत कसें आलें असतें ?

वास्तविक पाहातां कर्मवीरांचीं लहानमोठीं अनेक चरित्रें प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतीं. ज्या दलित बांधवांसाठीं कर्मवीरांनीं आपलें संपूर्ण

आयुष्य खर्ची पाडलें त्यांपैकीं एकाही सुशिक्षित बांधवाऱ्याकडून हें कार्य या वेळेपर्वितों झालें नाहीं. ज्या समाजांत कर्मवीरांचा जन्म झाला त्या मराठा समाजानें मृत्यूनंतर त्यांचे गोडवे स्मशानभूमींतच तारस्वरानें गायले. ज्या पुढारलेल्या जातीशीं कर्मवीरांनीं सुरवातीपासूनच प्रेमळ घरोबा ठेवला होता त्यांनीं त्यांचें चरित्र लिहिण्याचें पवित्र कार्य अद्यापि मनावर घेत-ल्याचें दिसत नाहीं. ज्या कालांत बुद्धुक व्यक्तींचीं भरमसाट चरित्रें लठ्ठलठ्ठ पुस्तकरूपानें प्रतिदिनीं प्रसिद्ध होतात त्याच कालांत एका महान् व्यक्तीचें साधेंसुधें चरित्र एकाही व्यक्तीनें प्रकाशित करूं नये या घटनेला काय म्हणावें हेंच समजत नाहीं. स्वावलंबनाचा धडा चरित्राचे बाबतींतही कर्म-वीरांनाच घालून द्यावा लागावा ना !

अत्यंत बिकट परिस्थितीमध्यें सदर आत्मचरित्र श्री. रवींद्रराव शिंदे यांनीं तीर्थरूपांकडून लिहवून घेतलें. ज्या दिवशीं आत्मचरित्र पुरें झालें त्या दिवशीं कर्मवीर कित्येक तास बेशुद्ध व निपचित पडले होते. केवढा तरी मानसिक त्रास त्यांना तें संपूर्ण लिखाण होईपर्यंत सहन करावा लागला आणि तरीही शेवटीं तें त्यांनीं पुरें केलेंच. " मी एका मोठ्या जबाबदारींतून मुक्त झालों " असें कर्मवीर आत्मचरित्राचें शेवटचें वाक्य सांगत असतांना उद्गारले.

—आणि एवढ्या मोठ्या व्यक्तीचें आत्मचरित्र इतक्या प्रतिकूल परि-स्थितींत पूर्ण झालें असतां दुर्दैवानें संपूर्णतः वाचकांना तें देतां येत नाहीं. कागदाची टंचाई, महर्गता यामुळें ग्रंथप्रकाशन किती कष्टप्रद झालें आहे याची कल्पना आज सर्वांना आहेच. आत्मचरित्राचा उर्वरित भाग सुमारें ५०० पानांचा झाला असता. या भागाच्या छपाईस लागणारी रक्कम कर्मवीरांच्या चहात्यांकडून अंशतः मिळावी म्हणून सर्व नियतकालिकांतून तशी जाहीर विनंति केली. पण कर्मवीरांचीं स्तुतिस्तोत्रें त्यांच्या मृत्यूनंतर गाणाऱ्या

महाराष्ट्रांतील वाचीवीरांना मदत करणें शक्य झालेलें दिसत नाहींसें वाटतें. कर्मवीरांना आपलें आत्मचरित्र आपल्या हयातींत प्रसिद्ध झाल्याचें पाहणें नशिबीं नव्हतें. मृत्यूनंतर तरी ती गोष्ट त्वरित व्हावी या एकाच प्रेरणेनें ऐपत नसतांही व्यक्ती या नात्यानें मीं हें कार्य हातीं घेतलें, तों कागद काटकसर हुकूमनामा पुढें दत्त! तेव्हां जेवढीं पानें छापलीं तेवढ्याचा हा 'भाग दुसरा' म्हणून प्रसिद्ध करणें भाग पडलें.

परिस्थिति सुधारतांच व पैशाची योग्य ती मदत मिळतांच कर्मवीरांच्या आत्मचरित्राचा तिसरा भाग प्रसिद्ध करीनच. पण त्याहीबरोबर कर्मवीरांचें इतर वाङ्मय खंडरूपानें प्रसिद्ध करीन हें आश्वासन मी देत आहें. कर्मवीरांचें कृपाछत्र मजवर असतांना या कामीं परमेश्वर मला साहाय्य करणार नाहीं असें होणारच नाहीं. कर्मवीरांच्या पवित्र आत्म्याला प्रणाम करून तूर्त रजा घेतों.

—ज. बा. जगताप.

## जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें

१ मराठी भाषा कशी शिकवावी ?
२ माझी शाळा.
३ अध्यापनाचा परिचय.
४ शाळा कशी चालवावी ?
५ शिक्षणविषयक लेखसंग्रह.
६ जुईच्या कळ्या.
७ टालस्टॉयच्या आठ गोष्टी.
८ माझ्या आठवणी व अनुभव ( भाग १ ला ).
९ प्रौढांचें शिक्षण व साक्षरता प्रसार.
१० शेक्स्पिअरच्या नाट्यकथा.
११ सुरवात.
१२ खरी दिवाळी.
१३ History of English Literature (Guide)
१४ सिंधच्या नवलकथा.
१५ मुंबई ते कलकत्ता.
१६ प्रसाद
१७ मराठमोळा.
१८ गुंतागुंत.
१९ अधःपात आणि इतर गोष्टी.
२० गेलीं पंचवीस अधिवेशनें.
२१ संतकवि तुकाराम.
२२ भजनसार.
२३ कुंदकळ्या.
२४ जासवंदीचीं फुलें.
२५ **शिक्षक** मासिक.
२६ **भगिनी** मासिक.

१२४८ शुक्रवार पेठ, पुणें शहर.



कर्मवीर महर्षि विठ्ठल रामजी उर्फ आण्णासाहेब शिंदे.



श्रीमंत महाराज सर सयाजीराव गायकवाड

सरकार, संस्थान बडोदे.

कै.

श्रीमंत महाराज

सर सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल, समशेर बहादुर

फर्जंद-इ-खास-दौलत-इ-इंग्लिशिया

जी. सी.आय्. इ.; जी.सी. एस्. आय् ई.; एल्एल्. डी.

सरकार, संस्थान बडोदें

यांच्या पवित्र चरणीं

सादर समर्पण.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | दक्षिण प्रांतांतील दौरा ... ... ... | १ |
| २ | स्थानिक कार्यक्रम ... ... ... ... | १९ |
| ३ | काठेवाडचा दौरा ... ... ... ... | २६ |
| ४ | स्थानिक कार्य ... ... ... ... | ३३ |
| ५ | घरच्या अडचणी ... ... ... ... | ३८ |
| ६ | दक्षिण महाराष्ट्रांतील दौरा ... ... ... | ४२ |
| ७ | स्थानिक समाज ... ... ... ... | ४५ |
| ८ | भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद ... ... ... | ६० |
| ९ | ब्राह्मधर्म सूची ग्रंथ ... ... ... | ९२ |
| १० | विविध प्रयत्न ... ... ... ... | ९७ |
| ११ | भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळाची स्थापना ... | १०९ |
| १२ | सामान्य विचार ... ... ... ... | ११८ |
| १३ | कार्याची सुरवात ... ... ... ... | १२४ |
| १४ | मिशनची घटना ... ... ... ... | १३९ |
| १५ | निधि योजना ... ... ... ... | १४९ |
| १६ | महाराष्ट्र परिषद ... ... ... ... | १५५ |
| १७ | अंतर्बाह्य खळबळ ... ... ... ... | १६५ |

१०८२३
१८२५७

# माझ्या आठवणी व अनुभव

## ( उत्तरार्ध )

## भाग पहिला : ब्राह्म आणि प्रार्थना समाजाचें प्रचारकार्य

### प्रकरण १ लें

### दक्षिण प्रांतांतील दौरा

**माझी मनोरचना**

माझ्या सार्वजनिक कामाच्या आठवणी आणि अनुभव देण्यापूर्वी माझीं ध्येयें आणि मनोरचना याविषयीं थोडासा सामान्य विचार करणें जरूर आहे. त्याशिवाय पुढील आयुष्यामध्यें ज्या क्रांत्या आणि वळसे पडले त्यांची वाचकांना नीटशी कल्पना येणार नाहीं. कोणाहि व्यक्तीच्या सार्वजनिक जीविताचा जो परिपोष होतो त्याचे दोन अगदीं भिन्न प्रकार आहेत. एकाचा उदय विश्वात्मकतेमध्यें होऊन हळूहळू स्थानिक प्रश्नाकडे उतरत असतो; तर दुसऱ्याचा उदय अगदींच स्थानिक प्रयत्नांत होऊन त्यांचें वलय विश्वात्मकतेकडे विस्तृत होऊं लागतें. उदाहरणार्थ, एखादा आपल्या जातीच्या सुधारणेकडे लक्ष्य घालून किंवा जातिभेदावर त्याचा मुळींच

विश्वास नसला तर त्याच्या नागरिकसेवेंत तो लक्ष्य घालून हळूहळू राष्ट्राकडे आणि अखेरीस विश्वाकडेहि त्याचा लय लागतो. याच्या उलट दुसरी व्यक्ति एकदम धर्मसुधारणेकडे म्हणजे विश्वधर्मापासून सुरवात करून त्याचीं भिन्न भिन्न प्रतीकें, समाजसुधारणा, समाजसेवा, राष्ट्रोद्धार, त्यांतील निरनिराळ्या वर्गांची उन्नति, किंबहुना अखेरीस आपल्या स्वतःच्या कुटुंबांतील आप्तांची काळजी, इकडे उतरूं लागते. माझा जीवितविकास यांपैकीं दुसऱ्या प्रकारें घडला.

पूर्वार्धात माझ्या मनोविकासाचें वर्णन करीत असतां मीं म्हटलें आहे कीं, मी ब्राह्मसमाजांत गेल्यानें सुधारक झालों असें नसून मी सुधारक होतों म्हणून ब्राह्मसमाजांत गेलों. माझ्या उदार ध्येयामुळें मीं मनामध्यें जीं वेळोवेळीं मानवी आयुष्याचीं चित्रें रेखाटलीं तिला तंतोतंत जुळेल अशी ब्राह्मसमाजाची ठेवण मला दिसली. त्यामुळें मी एकदम ब्राह्मसमाजांत (मुंबई प्रार्थनासमाजांत) शिरलों. एवढेंच नव्हे तर लवकरच त्याच्याशीं इतका तादात्म्य पावलों कीं, स्वतःला पूर्णतः वाहून घेऊन त्याचें प्रचार-कार्य करावें ही तळमळ लागली.

**दोन पक्ष**

त्यावेळीं हिंदुस्थानांत, विशेषतः महाराष्ट्रांत, सार्वजनिक चळवळ करणाऱ्यांचे दोन भिन्न पक्ष होते. एक स्वतःला राष्ट्रीय ऊर्फ जहाल म्हणवीत असे; तर दुसरा स्वतःला प्रागतिक ऊर्फ उदार म्हणवीत असे. पण एकाचा जहालपणा आणि दुसऱ्याचा उदारपणा प्रतिपक्ष्याच्या कार्यांत मात्र दिसून येत नसे. म्हणून हे एकमेकांच्या कार्याचा हेवादावा आणि वेळप्रसंगीं एकमेकांस उघडउघड विरोध करण्यासहि कचरत नसत. त्यामुळें त्यावेळच्या माझ्यासारख्या तरुणांची फार ओढाताण होत असे. अर्थातच सार्वजनिक सेवेंत पदार्पण करण्याची जेव्हां वेळ आली तेव्हां प्रत्यक्ष

काम चालविण्यास मला फार जड जाऊं लागलें. उदाहरणार्थ, सर डॉ. भांडारकर व नामदार गोखले हे दोघेहि प्रागतिक पक्षाचे मेरुमणी होते ना ? पण डॉ. भांडारकरांचा आपले सर्व प्रयत्न धर्माच्या पायावर करण्याचा अट्टाहास; तर गोखल्यांना धर्माबद्दल पूर्ण औदासिन्य असून राजकारणाचा जेथें तेथें मोह पडत असे. विलायतेहून परत आल्यावर एकदां नामदार गोखले यांनीं, " आपण आस्तिक झालेले बरें " असे उद्गार मजजवळ काढले. उलटपक्षीं मी प्रार्थनासमाजाचा प्रचारक असूनहि वेळोवेळीं राजकारणांत डोकावतो हें पाहून डॉ. भांडारकर मला प्रेमानें आणि विनोदानें टोमणा मारीत कीं, " अरे, तूं कांहीं झालें तरी गोखल्यांचाच शिष्य. " मीहि मग तितक्याच विनोदानें उत्तर देत असें कीं, " दादासाहेब, नामदार गोखले आपले शिष्य; मग मी आपला नातशिष्य ठरत नाहीं काय ? "

भांडारकर व गोखले यांच्यामध्यें जर अशी तेढ तर चंदावरकर आणि टिळक यांच्यामध्यें किती सलोखा असावा ह्याची कल्पनाच केलेली बरी. आणि मला तर माझ्या कामासाठीं या दोघांशींहि जोड राखावी लागत असे. पण ही ओढाताण अखेरपर्यंत राहिली नाहीं. भारतीय चळवळीचा विकास होऊन आज ही ओढाताण महात्मा गांधींच्या अष्टपैलुत्वामुळें बरीच कमी झाली आहे.

गंगा व यमुना ह्या दोन्ही नद्यांचा उगम हिमालयांत आहे. पण त्या बऱ्याच प्रदेशांवरून एकमेकींपासून अलग वहात येऊन प्रयाग येथें पुन्हां एकत्र होतात. तोच प्रकार आमच्या भारतीय चळवळीचा झाला आहे. ह्या दृष्टीनें पहातां राजा राममोहन राय हा हिमाचलाप्रमाणें आणि महात्मा गांधी प्रयागाप्रमाणें भारतीय इतिहासांत अखंड शोभत राहतील. राष्ट्रीयतेची यमुना आणि प्रागतिकतेची गंगा ही राजा राममोहन रायच्या चरणा-

पासून निघून महात्माजींच्या अंगुलीमध्यें पुन्हां एक झाल्या आहेत हें किती गोड दृश्य! पण हें दृश्य मला माझ्या कार्याच्या सुरुवातीला दिसण्यासारखें नव्हतें; कारण ह्या गंगा व यमुना त्यावेळीं एकत्र झाल्या नव्हत्या. म्हणून वाजवीपेक्षां अधिक त्रासाला मला तोंड द्यावें लागलें.

१९०३ च्या नोव्हेंबरमध्यें मुंबई प्रार्थना समाजानें एकमतानें ठराव करून मला आपला प्रचारक नेमलें. अल्लड

**प्रयोगाचें नावीन्य**

तरुण असतांना ज्या मुंबई प्रार्थना समाजाला मी वरवर पाहून इतरेजनांप्रमाणें नांवें ठेवित होतों त्याचाच मी आतां एकनिष्ठ सेवक झालों. त्यावरून अंगांत थोडासा पोक्तपणा येऊं लागला असा अंदाज करण्यास हरकत नाहीं. प्रार्थना समाजाचें प्रचारकार्य हा एक त्यावेळीं अननुभूत प्रयोग होता. माझ्या-पूर्वी श्री. सदाशिवराव केळकर व श्री. शिवरामपंत गोखले ह्या दोघांनीं हें प्रचारकार्य केलें होतें. तथापि ह्या प्रचाराची घटना माझ्यावेळीं अगदीं नवीन होती असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रचारकार्यासाठीं योग्य संस्थे-तून तयार होऊन येणें, आल्यावर तें कार्य जीविताचा एकमेव हेतू म्हणून पत्करणें, आपल्या व कार्याच्या योगक्षेमासाठीं केवळ ईश्वराशिवाय इतरांवर अवलंबून न राहणें, कार्याचा विस्तार जसजसा होईल तसतशी साधन-सामुग्री हातास कशी येते याची प्रचिती घेणें वगैरे गोष्टी अगदीं नवीन होत्या. हिंदु, खिस्ती, मुसलमान, बौद्ध यांचीं तत्त्वें आणि ध्येयें जशीं निरनिराळीं आहेत तशीच त्यांची प्रचारकार्यपद्धतिहि तत्त्वानुसार वेग-वेगळी आहे. ब्राह्मसमाजानें ह्या निरनिराळ्या धर्मतत्त्वांचा व ध्येयांचा जसा समन्वय केला आहे तसा कार्यपद्धतींतहि त्याला समन्वय करणेंच भाग आहे.

मुसलमान पद्धति लोकसत्तात्मक ( Democratic ), तर ख्रिस्ती पद्धति पितृवात्सल्याची मेंढपाळाची ( Pastoral ). हिंदु प्रचारपद्धति भिन्न जाती व वर्गांमध्यें विभागलेली, राजकारणी ( Political ) तर बौद्धांची निस्संग उदासीन वृत्तीची ( Supreme Indifference ).

**पद्धतीचे भेद**

ब्राह्मसमाजानें ह्या आंवळ्यांची किंवा भोपळ्यांची मोट कशी बांधावी ? बंगाल्यांतील ब्राह्मसमाजाचें कार्य मोठ्या प्रमाणावर चाललें असल्यामुळें राममोहन राय, देवेन्द्रनाथ, केशवचंद्र सेन ह्या विभूतींच्या अवतारकार्यामुळें गेल्या शतकांत त्या प्रांतीं आजीव प्रचारकांची वाण भासली नाहीं. केशवचंद्रांच्या प्रभावळींत घरदार टाकून किंबहुना तें घेऊनहि लहानथोर ताकदीचीं माणसें बेहोप होऊन पडत असत. त्या मानानें गेल्या शतकाच्या शेवटपर्यंत ब्राह्मधर्माचें प्रचारकार्य तेजस्वीपणानें पार पडलें. केशवचंद्रांचे दोन प्रभावी शिष्य पंडित शिवनाथशास्त्री आणि प्रतापचंद्र मुझुमदार यांनीं त्यांच्यामागूनहि प्रचारकांची उणीव भासूं दिली नाहीं. पण बंगालमधील प्रकार वेगळा आणि बंगालबाहेरचा प्रकार वेगळा. बंगाल म्हणजे ब्राह्मधर्माचें सरोवर आहे. त्यांतील पाणी कालव्यानें काढून अखिल भारतावर बागाईत करावयाची आहे. बंगाल बिहार प्रांतांत साक्षात् बौद्ध धर्माचा उदय आणि प्रसार झाला असल्यानें तेथें जातिभेद आणि मूर्तिपूजा यांचें विष इतर प्रांतांप्रमाणें रुजलें नाहीं. हा प्रांत आर्यावर्ताच्या बाहेरचा मोंगली सीमेजवळचा अर्धमोंगली असल्यामुळें ह्याच्यावर आर्यांचे राजकारणी हल्ले दक्षिण दिशेप्रमाणें झाले नाहींत. रामायणाचें कार्यक्षेत्र द्राविड देशांत सताड पसरलें, पण रामानें पूर्वेकडे महाकोसलाची सीमा देखील ओलांडली नाहीं. मध्ययुगांत अळवार नांवाच्या भक्तांनीं वैष्णव धर्म पसरविला. महाराष्ट्रांत वारकऱ्यांनीं वाढविला.

तें काम चैतन्यानें बंगाल्यांत केलें. त्यामुळें ब्राह्मसमाजाची वाढ इतर प्रांतांपेक्षां बंगाल्यांतच अधिक खुली कां झाली त्याचीं वर कारणें दिलीं आहेत. ब्राह्मसमाजाची उपासनापद्धति देवेन्द्रनाथानें घालून दिली. ती ख्रिश्चन पद्धतीप्रमाणें आहे, अशी निंदाव्यंजक टीका होत असते. ती टीका विशेष निरीक्षण करून केली जाते असें नाहीं. देवेन्द्रांचें इंग्रजी शिक्षण विशेषसें न झाल्यानें व हिंदुस्थानाबाहेर प्रवासहि न घडल्यानें त्यांनीं प्रणीत केलेल्या उपासनापद्धतीला वेदोपनिषदांचेंच आवरण फार पडलें. त्यांच्यामागें केशवचंद्र सेनावर चैतन्याच्या भक्तिमार्गाचें दडपण पडल्यानें टाळ, मृदंग आणि पताका यांचा कहर ब्राह्मसमाजांत झाला. तरी टीकाकार म्हणतो कीं ब्रह्मोपासना ख्रिस्ती पद्धतीचीच. उपासनेचें कसेंहि असो प्रचारकपद्धतींत ख्रिस्त्यांचा जोरकसपणा, सहानुभूति आणि व्यावहारिकता हे गुण येतील तितके कमीच म्हणायचे. व्यापार करण्याच्या पद्धतींत जर ख्रिस्त्यांची व्यावहारिकता आम्ही मुकाट्यानें उचलतों तर धर्मप्रचाराबाबत ती कां हेटाळावी ?

**मुंबई प्रार्थना समाज**

मुंबई समाजाची १८६७ सालीं स्थापना झाली. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं मुंबई समाजाची पहिली पिढी कालवश झाली होती. डॉ. आत्माराम पांडुरंग, मामा परमानंद, वासुदेव बाबाजी नवरंगे, वामन आबाजी मोडक, महादेव गोविंद रानडे वगैरे वृद्ध मंडळी धर्मसंस्थापनाच्या दृष्टीनें खरोखर वरच्या दर्जाची होती. म्हणूनच त्यांचे हातून समाजस्थापनेचें महत्कार्य झालें. पण चालू युगाच्या आरंभीं डॉ. भांडारकरांखेरीज आद्यप्रवर्तकांपैकीं कोणी उरला नाहीं. सर नारायण चंदावरकर हे पहिली पिढी व दुसरी पिढी सांधणारे महत्त्वाचा दुवा होते. त्यांची गणना वृद्धापेक्षां तरुणांतच करणें

बरें. भांडारकर पुण्यास येऊन राहिल्यामुळें मुंबई समाजाच्या नेतृत्त्वाचें जूं चंदावरकरांच्याच मानेवर पडलें. त्यांना अनुयायांचा भरणा देखील अगदीं तरुणांचाच मिळाला.

१९०३ सालच्या अखेरीस प्रत्यक्ष कार्यास सुरुवात कशी करावी या बाबतींत आकाश फाटल्याचा अनुभव येऊं लागला. मी जरी एका प्रांतिक समाजाचा प्रचारक होतों तरी मुंबई प्रार्थना समाजाचें कार्य मुंबई शहरापुरतेंच चाललेलें होतें. पुणें, नगर, सातारा ह्या ठिकाणीं जरी समाज होते तरी आर्थिक दृष्ट्या हे समाज मुंबई समाजापासून स्वतंत्र आणि तुटक वागत. परस्पर मदतीची देवघेव होत असली तरी मध्यवर्ती घटना नसे.

**नाताळांतील धामधूम**

ब्राह्मधर्माचें विश्वव्यापी कार्य, या प्रांतीं त्याचें असंघटित क्षेत्र, पहिली सगळी पिढी दिवंगत झालेली आणि मी स्वतः एक सामान्य अननुभवी तरुण, अशी परिस्थिति होती. पण ह्यांत मला अनपेक्षित असें कांहींच नव्हतें. सुरुवातीचे वेळीं डिसेंबर महिना आला होता. त्याचा शेवटचा नाताळचा आठवडा म्हणजे भरतभूमीचा जागृतीचा काळ. नाताळांत ख्रिस्त जन्मला ही गोष्ट ऐतिहासिक असो वा नसो; नाताळ म्हणजे आधुनिक ज्योतिष दृष्ट्या मकरसंक्रमणाचा दिवस असल्यामुळें त्या दिवशीं उत्तरेकडील आकाशांत सूर्य जन्म घेतो ही गोष्ट खरी. ह्या आठवड्यांत भारतीय सभेची धामधूम त्यावेळीं देशभर चालत असे. कॉंग्रेसचा पुढारी असो, सभासद असो, नुसता बघ्या तमासगीर असो, किंबहुना तिला हसणारा किंवा प्रत्यक्ष विरोध करणारा असो, हे सर्व प्राणी त्या अधिवेशनाचे जागीं हमखास जमावयाचेच. ह्या वर्षीची कॉंग्रेस दक्षिणप्रांतीं मद्रास शहरीं भरणार होती. अर्धें युरोप पायाखालीं घालून नुकताच आलेला मीं महाराष्ट्राचे बाहेरील भारत अद्यापि पाहिलेलें नव्हतें.

म्हणून मुंबईंतील स्थानिक कामाच्या जंजाळांत पडण्यापूर्वी भारतीय यात्रा करण्याचा चालून आलेला प्रसंग मीं आनंदानें स्वीकारला आणि प्रवास-खर्चाची तमा न बाळगतां दक्षिणेची वाट धरली. तत्त्वानें बेहोष झालेल्याला तपशीलाची कदर नसते अशांतला मी एक. प्रथम मी बेळगांवला उतरलों. सुबोधपत्रिकेंतल्या माझ्या विलायतेहून लिहिलेल्या पत्रांवरून माझा निदान महाराष्ट्रांत तरी परिचय झाला होता. बेळगांवांतील एका वृद्धांच्या क्लबामार्फत माझें व्याख्यान ठरलें. पण व्याख्यानाचा विषय ठरवितांना वाद माजला. वृद्धांचा क्लब असल्यानें राजकारणावर बहिष्कार होता. धर्मकारण तर सर्वांनाच नावडतें होतें. समाजसुधारणा वादग्रस्त होती. व्याख्यान करवणारांचें एकमत होईना तेव्हां मीं त्यांस सांगितलें कीं, "व्याख्यान करवणारे तुम्ही असला तरी करणारा मी आहें ना ? विषयाचें नांव तुम्ही कांहींहि द्या. वक्ता आपल्याला सांगावयाचें तें सांगितल्याशिवाय राहणार नाहीं." आधुनिक जगांत तौलनिक धर्माच्या अध्ययनानें विचारी जगांत काय काय फरक पडला आहे, हें मीं सप्रमाण व सविस्तर सांगितलें. त्याला म्हणण्यासारखा कोणीं आक्षेप घेतला नाहीं.

**बंगलोर**

कर्नाटकांतून मी पुढें तामीळ प्रदेशीं गेलों. त्या प्रांताची प्रवेशभूमि बंगलोर ही होय. येथें दोन तीन ब्राह्मसमाज होते. येथून मला नवीन सृष्टि निरीक्षण्यास मिळाली. युरोपांत ग्लासगोपासून नेपल्सपर्यंत प्रदेश आक्रमिला तरी भाषेशिवाय भिन्न असें मला कांहींच दिसलें नाहीं. खाणें-पिणें, वस्त्रप्रावरण, वगैरे लहानसहान गोष्टींपासून सामाजिक चालीरीति, राजकारणीय घटना, शेवटीं धर्मासारखी निर्वाणाची गोष्ट ह्या सर्वांत मला एकसूत्रीपणा दिसला. ते देखावे माझ्या डोळ्यापुढें अजूनहि तरंगत होते. तों मी बंगलोरसारख्या शहरांत आल्याबरोबर मला द्राविडी संस्कृतीची ध्वजा

स्पष्ट दिसूं लागली. नुसती भाषाच नव्हे तर सर्वच गोष्टींत पडदा पालटला. आर्यसंस्कृतीहून भिन्न असणारी द्राविडी संस्कृति आणि त्यावर पांघरूण घालणारी पाश्चात्य संस्कृति असें कांहींतरी विचित्र दृश्य माझ्यासमोर दिसूं लागलें. बाजारांत गेलों तर भाजी विकणारी माळीण तुटक्या इंग्रजी शब्दांत बोलते तर एकादा कॉलेजांतील अंडरग्रॅज्युएट तरुण इंग्रजी भाषाच तामीळ स्वरांत बोलतो, पायांत पाटलोण असली तरी अनवाणींच चालतो, गळ्यांत कॉलर, नेक्टाय असतांनाहि डोक्यावर काहींच न घेतां शेंडीचा मोठा बुचडा मानेवर टाकतो. अशीं अनेक दृश्यें पाहून माझ्या निरीक्षण शक्तीवर ताण पडूं लागला.

**मद्रास**

शेवटीं नाताळांत मी मद्रासला पोंचलों. कॉंग्रेसची जय्यत तयारी चालली होती. जॉर्ज टाऊन या भागांत ब्राह्मसमाजाचें मंदिर आहे. ह्याला ब्लॅक टाऊन असेंहि दुसरें नांव आहे. सगळें मद्रास काळें असतांना ह्या भागालाच काळें शहर हें नांव कां दिलें हें समजत नाहीं. मी ब्राह्ममंदिरांत उतरलों. समाजाची स्थिति खालावलेली दिसली. कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या जागीं दुसऱ्या राष्ट्रीय परिषदाहि भरत असत. राष्ट्रीय सामाजिक परिषदेसाठीं सर नारायण चंदावरकर हे आले होते. ब्राह्मसमाजाची एकेश्वरी धर्माची परिषद होणार होती म्हणून तामीळ, तेलगु, मल्याळम् वगैरे प्रांतांतील ब्राह्मबंधूंच्या गांठीभेटी होऊं लागल्या. आंध्र साहित्यसम्राट् वीरेशालिंगम् पतंलु, विद्वद्रत्न डॉ. व्यंकटरत्न नायडू, तिनेवल्लीचे कैलासन् पिल्ले वगैरे धुरीणांच्या गांठीभेटी झाल्या. सामाजिक परिषदेचें अधिवेशन फार चांगलें पार पडलें. विशेषतः चंदावरकर यांचें वक्तव्य आणि पवित्रा फार उठावदार दिसला. प. वा. न्या. मू. रानडे हयात असेपर्यंत सामाजिक परिषदेचें उद्घाटन त्यांच्याच हातून व्हावयाचें.

ती माळ आतां सर नारायणरावांच्या गळ्यांत पडली. ती फार शोभूं लागली. पण मुख्य सभा जी राष्ट्रीय सभा तिला मुहूर्त चांगला लागला नाहीं. सभेच्या दिवशींच जोराची पर्जन्यवृष्टी होऊन विस्तीर्ण सभामंडप जणूं काय वाहूनच गेला. आयतेवेळीं दुसरी व्यवस्थाच करणें अशक्य झाल्यानें सभेचें काम जवळ जवळ बंदच पडलें. ह्या प्रांतांत वळीवाचे पाऊस मोठ्या जोरानें पडल्यानें असा विरस कित्येक काँग्रेसचे वेळीं झाला आहे. मद्रासकडील कार्यच नव्हे तर अखिल भारतांत ब्राह्मसमाजाच्या कामाला विस्कळीतपणा कसा आला होता याची चुणूक मला प्रथम या दक्षिण राजधानींत दिसून आली. आणि माझें प्रथम राष्ट्रकार्य म्हणून मीं एकेश्वरी परिषदेची पुनर्घटना करावी ही प्रेरणा मला येथें झाली. पुढची काँग्रेस कर्मधर्मसंयोगानें मुंबई शहरांत होणार होती म्हणून या प्रेरणेचें पुढें निश्चयांत रूपांतर झालें. मी मद्रासचें काम आटो-पल्यावर परत मुंबईस न येतां बंगालच्या वाटेस लागलों. याचें एक कारण असें होतें कीं, पुढील जानेवारींत कलकत्त्यास माघोत्सव या नांवाचा ब्राह्मसमाजाचा महोत्सवाचा काळ आला होता. म्हणून वाटेवरील आंध्र, ओरिसा या प्रांतांत दौरा काढण्याचा मीं निश्चय केला. वाटेंत नेलोर, बेझवाडा, राजमहेंद्री, कोकोनाडा, पार्लाकिमडी, कटक, जगन्नाथपुरी वगैरे मोठीं व मुख्य शहरें व तेथील ब्राह्मसमाज यांचें मीं निरीक्षण केलें. या दौऱ्यांत प्रवासाची दगदग, खाण्यापिण्याची आबाळ, कामाचा ताण वगैरे अनेक कारणांनीं कलकत्त्यास पोंचण्यापूर्वीं मी बराच थकून गेलों होतों.

**मद्रासचें तिखट** युरोपांत असतांना तेथील तिखट मसाल्याविरहित खाण्याची संवय लागल्यानें आणि परत आल्याबरोबर दक्षिण प्रांतांतल्या तिखटाचा वर्षाव मजवर झाल्यानें माझी अगदींच तारांबळ उडाली. प्रत्येक ठिकाणीं

माझ्यासाठीं बिनतिखटाचा स्वयंपाक करा असें गृहिणीला किती जरी बजावलें तरी तिखटाशिवाय स्वयंपाक करणें म्हणजे जन्मांत मोठी अपकीर्ति करून घेणें, या समजुतीनें तिच्या दृष्टीनें अत्यंत थोडें तिखट घातलें असलें तरी तें मला सात दिवस पुरेल इतकें असें. त्यामुळें मी अर्धपोटी जेवी. त्या अर्ध्या जेवणांतलें अर्धें तिखटहि मला भारी होई. शिवाय या प्रांतींचा हिंवाळा मला युरोपांतल्या उन्हाळ्यापेक्षां कडक भासला. युरोपांतून परत आल्यावर स्वदेशाला चालतील असे नवीन कपडे तयार करण्याचेंहि आर्थिक सामर्थ्य माझ्यांत नसल्यानें तेच युरोपियन कपडे मला कांहीं काळ वापरावे लागले. त्यामुळें वरून जरी मी मोठा साहेब दिसत होतों तरी आंतून नेहमीं पुढच्या प्रवास खर्चाची व प्रकृतीला न मानवण्याऱ्या अन्नाची धास्ती बाळगणारा एक कंगाल फकीर होतों. तामीळनाड व बंगाल यांचे मधील आंध्र प्रांत हा मोठा भावनाशील दिसला. या प्रांतांत खेड्याखेड्यांतून देखील ब्राह्मसमाजाची चळवळ चालू आहे असें मीं ऐकलें. पुढें महात्मा गांधींची बहिष्काराची चळवळसुद्धां याच भावनाशील प्रांतांत विशेष जोराची झाली. परंतु भावनाशीलतेच्या बरोबर प्रयत्नांचा दमदारपणा व टिकाऊपणा नसल्यानें नदीला पूर येऊन गेल्याप्रमाणें या प्रांतांतील चळवळींची लागवड अस्थिर ठरते. आंध्र देशांतील पुढाऱ्यांनीं मागील इतिहासांतहि धाडसाचीं मोठमोठीं कृत्यें केल्याचा पुरावा आहे. इकडील राजांनीं आणि लष्करी पुढाऱ्यांनीं पूर्वेकडे ब्रह्मदेश, सयाम, जावा, सुमात्रा, बाली, वगैरे दूरदूरच्या ठिकाणीं आर्यसंस्कृतीचा फैलाव केला आहे. पण आतां तिचा मागमूसहि उरला नाहीं. ब्राह्मधर्माच्या प्रसाराची तशीच पुनरावृत्ति होणार नाहीं अशी आशा आहे.

**जगन्नाथपुरी**

आंध्र आणि ओरिसा यांच्या शिवेवर जगन्नाथपुरी हें प्रसिद्ध धर्मक्षेत्र आहे. हें बंगाली उपसागरावरील एक महत्त्वाचें बंदर आहे. हिंदु धर्माच्या प्रसारार्थ ह्या वैष्णव क्षेत्रानें मागें किती मोठी कामगिरी केली असेल ती असो, हल्लीं मात्र याचें स्वरूप भेसूर दिसतें. निरीक्षण दृष्ट्या हें स्थळ फार आकर्षक आहे म्हणून मी येथें उतरलों. येथें ब्राह्मसमाज नाहीं. शिवाय ना ओळख ना पाळख. आणि मी तर साहेबी पोशाखांतला एक काळा आदमी. त्यामुळें माझी उतरण्याची फारच आबाळ झाली. जेथें नुसती उतरण्याची सोय लागेना तेथें जेवणाचें काय विचारतां! यात्रेकरूंनीं स्वतःचा स्वयंपाक करूं नये असा दंडक होता. आणि देवळांतील महंत बडवे अत्यंत स्वार्थी, कठोर मनाचे, आणि पैसे उकळण्याचे विद्येत कसलेले. जगन्नाथजीला रोज एक मणाचा भाताचा भोग लागत असे. तोच भात यात्रेकरूंना खापरांतून विकत मिळत असे. पहिल्या दिवसाचा भात आदल्या दिवसाच्याच रांजणांत भरून ठेवल्यामुळें ताजें कोणतें व शिळें कोणतें याचें संशोधन करण्याचे कामीं यश येण्याची फारशी आशा नव्हती. उलट असें संशोधन करणाराच तेथें पापी ठरत असे. आणि अशा पाप्याला पाहुणचार मुळींच मिळत नसे. शोध करतां करतां एक बंगाली बाबू, तेथें एक मोठे सरकारी अधिकारी आहेत असें कळलें. ते ब्राह्मसमाजाचे एक सभासद होते. पण ते एकलकोंडे असल्यानें त्यांच्या अधिकाराच्या मानानें त्यांचा ब्राह्मधर्म प्रसिद्ध नव्हता. अशा मोठ्या क्षेत्राच्या देवळांत यात्रेकरूंची एकसारखीच नेहमी रीघ असे. पण या सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीनें मला या देवळांतील कानेकोपरे आणि मुख्य गाभाऱ्यांतील मूर्ति निरखून पाहण्याची चांगली सोय झाली. देऊळ भव्य, तितकेंच बेढब असून त्यांतील सर्व प्रकार

त्याच सुरांत आणि तालांत दिसत होते. गाभाऱ्यांत देवाची मुख्य मूर्ति तर अत्यंत भेसूर, बायकामुलांच्या अंतःकरणांत धडकी भरविणारी दिसली. ती पाहण्यासाठीं बायका, पुरुष, मुलें, सर्व दर्जाचीं आणि वयाचीं माणसें गर्दी करून एकमेकांशीं इतकीं बिलगत कीं, अलिकडे लंडनमध्यें बॉंब्सच्या भीतीनें तळघरांत शिरलेलीं माणसेंहि तितकीं बिलगत नसतील. गाभाऱ्यांत नेहमींच अंधाराचें साम्राज्य असतें.

दर्शनाचे हे सोहाळे उपभोगून बाहेरील विस्तीर्ण पटांगणांत आल्यावर हायसें वाटलें. मग भूक लागल्याचें स्मरण झालें. आदला दीड दिवस उपोषण घडलें होतें. भोग लागलेला भात फुटक्या मडक्यांत घालून स्वस्त दराची चढाओढ करीत देवळांतील महंताचे दलाल यात्रेकरूंच्या मागें लागत. यात्रेकरूंनीं ह्या प्रसादाशिवाय दुसरें कांहीं खाऊं नये असें शास्त्र सांगे. तो भात घेऊन दोन घांस खातों न खातों तों ह्या प्रसादापेक्षां भूक बरी वाटून यात्रेकरूंच्या हातांतील मडकीं सहजच खालीं गळून पडत. तीं झाडून काढण्याची म्युनिसिपालिटीकडून व्यवस्था नव्हती. या देवळांत कोणत्याहि प्रकारचा जातिभेद न राखतां अस्पृश्यांशिवाय सर्वांना येण्याला सरसकट परवानगी आहे. अंगणाची जमीन फरसबंदीची होती. तिच्यावर उष्टया भाताचीं पुटें पडून कायमची घसरगुंडी झालेली असे. पण देवळांतल्या प्रमाणें अंगणांत अंधार नसल्यामुळें अन्नाची भूक हवेवर भागवून घ्यावी लागली.

ह्या देवळाचें अत्यंत मासलेवाईक वैशिष्टय सांगण्याचें अजून पुढेंच आहे. प्राचीन द्राविड संस्कृति तिच्या नमुनेदार

**अपूर्व तोडगा**

शिल्पकलेविषयीं प्रसिद्ध आहे. मदुरा, त्रिचनापल्ली, श्रीरंगपट्टम् येथील प्रसिद्ध भव्य देवळें त्यांच्या अनाढ्यपणाबद्दलच नव्हे तर नाजुक सौंदर्याविषयीं देखील सर्व जगानें

वाखाणण्यासारखीं आहेत. या सौंदर्याला दृष्ट लागूं नये म्हणून द्राविडांनीं एक अपूर्व तोडगा काढला आहे. दक्षिण देशांत कोठेंहि जा लहानमोठ्या देवळाच्या भिंतीवरच नव्हे तर रथादि वाहनांवरहि अत्यंत बीभत्स चित्रें नजरेंत भरण्यासारख्या ठिकाणीं कोरलेलीं दिसतात. जगन्नाथजीचें मंदिर जरी सुंदर नाहीं तरी दृष्टिदोष घडूं नये म्हणून कानाकोपरांत सर्व भिंतीवर खालपासून वरपर्यंत जेथें म्हणून चित्र कोरण्याला जागा आहे, अशा सर्वच ठिकाणीं बीभत्स चित्रांची लयलूट झाली आहे. ह्या दृष्टिदोषासंबंधीं द्राविडांची कल्पना अशी आहे कीं, कांहीं वाईट माणसांच्या दृष्टींत सुंदर वस्तूंचा भंग करण्याची शक्ति असते. म्हणून त्याच्या दृष्टीची लालसा कुरूप वस्तूंत लय पावून सुंदर वस्तु सुरक्षित रहावी. या समजुतीनेंच भोळ्या आया आपल्या गोऱ्या मुलाला गालबोट लावतात. पण गोऱ्या मुलाबरोबर काळ्या मुलालाहि जसें गालबोट लागतें तशांतलाच प्रकार जगन्नाथपुरींतला आहे. आणि त्यांतील बीभत्सपणाच्या कल्पकतेलाहि ऊत आलेला आहे. कोकशास्त्रांतल्या असंख्य आसनांपेक्षांहि अत्यंत बीभत्स अशीं दहापांच अधिक आसनें पाहणाराला येथें दिसतील. सर्वांत मनोवृत्तीला थक्क करणारें दृश्य म्हणजे हें कीं, ह्या नागड्या स्त्रीपुरुषांच्या संलग्न दंपतीची पूजा करण्यासाठीं तरुण कुमारिका आणि विधवा बाया हळदीकुंकु आणि फुलांच्या परड्या घेऊन, सर्व मूर्तींचा परामर्ष घेण्यांत गुंतलेल्या आढळतात. सारांश, या आधुनिक युगांत हें देऊळ आणि त्यांतले प्रकार अद्याप अखंड चालू आहेत हें एक समाजशास्त्रांतील मोठें कोडें आहे असें म्हणत सुशिक्षित प्रेक्षक खजील होऊन देवळांतून बाहेर पडतो.

### राममोहन रायची आई

मनावर झालेल्या परिणामांच्या परिमार्जनासाठीं मी समुद्रकिनाऱ्यावरील अत्यंत सुंदर व विपुल वाळवंटावर गेलों. बंगालच्या उपसागराच्या लाटा जणु जगन्नाथाच्या दर्शनासाठीं अविश्रांत येत होत्या. पण त्यांना पाहण्यासाठीं यात्रेकरूंपैकीं कोणीच तेथें नसे. जगाचा खरा नाथ

कोठें आणि हा तोतया जगन्नाथ कोठें. पण जगांतील सर्व धर्मांचा समन्वय करणारा राममोहन राय ह्याच्याच आईनें ह्या तोतया जगन्नाथाच्या सेवेंत आपला देह ठेवला हें स्मरण करून मीं माझा आवंढा गिळला. राममोहन राय हे आपल्या आईच्या भेटीला येथें आले होते, तेव्हां त्यांच्या आईनें देवदर्शन घेण्याची त्याला गळ घातली. राममोहन व्यवहारचतुर असल्यानें, " हे माझ्या आईच्या देवा, तुला नमस्कार असो " असें म्हणून त्यांनीं आपल्या आईचें समाधान केलें.

**माघोत्सव**

१९०४ च्या जानेवारीच्या मध्याच्या सुमारास मी कलकत्त्यास पोंचलों. त्यावेळीं तेथील माघोत्सव चालूं होता. सबंध जानेवारी महिना हा उत्सव मोठ्या समारंभानें चालत असतो. ब्राह्मसमाजाचे तीन पक्ष. साधारण ब्राह्मसमाज, नवविधान ब्राह्मसमाज आणि आदि ब्राह्मसमाज. हे तीनहि पक्ष स्वतंत्रपणें हा उत्सव चढाओढीनें करीत असतात. मला हा प्रथमच प्रसंग असल्यानें प्रत्येक लहानसहान गोष्ट मी मोठ्या कौतुकानें निरीक्षण करूं लागलों. बंगाली वर्षाचा माघ महिना हा आमच्याकडील पौष महिन्यांतच येतो. शुद्ध एकादशी दिवशीं ब्राह्मसमाजाच्या स्थापनेचा दिवस पडतो. तो बहुतकरून ता. २४ जानेवारीला येतो. या सुमारास तीन दिवस सरकारी नोकरींतील सर्व ब्राह्मसमाजिस्टांना हक्काची रजा मिळते. बंगाल्यांतील लहानथोर स्थानिक समाजांतुन ब्राह्म कुटुंबें मोठ्या श्रद्धेनें कलकत्त्यास या उत्सवाप्रित्यर्थ येतात. त्यांची उतरण्याची व जेवणाची सोय एका स्वतंत्र नेमलेल्या मंडळाकडून मंदिराच्या आवारांत केलेली असते. पंधरा दिवस सर्व आल्या-गेलेल्यांना दोन वेळां फुकट जेवण व चहा मिळतो. ब्राह्मसमाजाला ही जणूं काय एक निराळी नवीन घटनाच बनल्यामुळें परस्परांचीं ओळख होणें, सामाजिक संबंध दृढ होणें वगैरे

महत्त्वाचे फायदे या उत्सवापासून होतात. रोज सांजसकाळ ब्रह्मोपासना, व्याख्यानें व भजनें असें कांहींना कांहीं मुख्य मंदिरांत चाललेलें असतें. कलकत्ता शहरांतील ब्राह्मबंधू शक्य तितका वेळ आपल्या बायकामुलांना घेऊन मंदिरांत जमत असतात. दिवसभर सारखी गर्दी. मुख्य दिवशीं पहांटे तीन वाजल्यापासून भजनाला सुरुवात होते. टाळमृदंगाचा घोष चालतो. लताफुलांनीं मंदिर सुशोभित करण्याचे आदले दिवसापासूनच चाललेलें असतें. तीन तास भजन झाल्यावर मुख्य आचार्य वेदीवर येऊन बसतात. एक तास उद्बोधन, एक तास प्रार्थना, दोन तास प्रवचन अशी एकंदर सात तास ही मुख्य उपासना चालते. मंदिराच्या दोन्ही मजल्यावर चिक्कार गर्दी असते. ह्यावर्षीं ही उपासना मुख्य आचार्य पं. शिवनाथशास्त्री ह्यांनीं चालविली. उपासनेंत भक्तिरसाचा पूर वहातो. माझ्या मनावर त्याचा फार मोठा परिणाम झाला. शास्त्रीमहाशयांचें वक्तव्य केव्हां केव्हां इतकें प्रभावी होतें कीं, कित्येक मूर्छा येऊन पडतात असें ऐकलें आहे. माझ्या-जवळ प्रसिद्ध ब्राह्म पुढारी, बॅ. आनंदमोहन बोस हे बसले होते. त्यांच्या डोळ्यांतून सतत अश्रुधार चालली होती. श्रोतृसमाजांत बाहेरचे लोक देखील पुष्कळच असत. सकाळीं ६ वाजण्याचे आंत येऊन मंदिरांत जागा न पटकावल्यास समाजिस्टांनाहि जागा मिळेनाशी होते. एकंदरींत प्रसंग अपूर्व खरा.

**महर्षि देवेन्द्रनाथ ठाकूर**

ता. ३० जानेवारी १९०४ रोजीं, तिसरे प्रहरीं पं. शिवनाथशास्त्री ह्यांनीं मला आणि लाहोरचे प्रचारक भाई प्रकाशदेव यांना प्रसिद्ध कवि डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचे वडील महर्षि देवेंद्रनाथ यांचे दर्शनास नेलें. ब्राह्मसमाजांतलि तीन प्रमुख विभूतींपैकीं देवेन्द्र-नाथ हे मधले होते. ते आपल्या घरच्या दुसऱ्या मजल्यावर कोचा-

वर बसले होते. जिन्यांत चढतांना एका तरुणाची तसबीर दिसली. ती त्यांच्या २५ वर्षे वयाच्या नातवाची होती. यावरून देवेंन्द्रनाथांचें वय किती पिकलेलें होतें याची कल्पना होते. आम्ही समोर दिसल्याबरोबर ' यावें शास्त्री महाशय ' असे उद्गार काढून महर्षींनीं स्वागत केलें. पं. शिवनाथशास्त्र्यांनीं माझी गौरवपूर्वक ओळख करुन दिली व मुंबईला राममोहन आश्रमाची उभारणी झाल्याची हकीकत सांगितली. अशा रीतीनें मुंबईकडे नवचैतन्य झाल्याचें ऐकून महर्षींना गहिंवर आला आणि त्यांनीं माझ्या अंगावरून हात फिरविला. ह्या महापुरुषाचे दर्शनानें मला धन्यता वाटली. महर्षि म्हणाले, " मी आतां फार थकून गेलों आहे. शिवनाथ, तूं आमचें कार्य पुढें चालव. " महर्षि मोठे एकांतप्रिय. माघोत्सवाची गडबड त्यांना मानवत नसे. ते त्याला गोलमाल ( गडबड ) असें संबोधीत. दुसरी महत्त्वाची भेट म्हणजे ब्रह्मानंद केशवचंद्र यांचे शिष्य प्रतापचंद्र मुझुमदार यांची होय. ते मंदिरांत उपासनेला बसले होते. शुभ्र लोंकरी शाल त्यावर त्यांची शुभ्र व विपुल दाढी, भव्य कपाळ, पाणीदार डोळे, एकंदर दृश्य मोठें प्रेरक दिसलें. प्रतापबाबूंचें इंग्रजी भाषेवरचें प्रभुत्व अपूर्व होतें. ' Oh God of all nations ' या शब्दानें त्यांनीं आपली गंभीर प्रार्थना इंग्रजींतून सुरू केली. ती आत्म्याला हालवून जागी करणारी होती. हे दोन्ही महापुरुष पुढल्यावर्षींच वारले. त्यांच्या दर्शनाचा लाभ झाला म्हणून मला विशेष समाधान वाटलें.

ह्या सफरींत कलकत्त्यास मीं एक अत्यंत किळसवाणा प्रकार पाहिला.

**कालीमाता**

तो तेथील कालीमातेच्या देवळांतला होता. एके दिवशीं तिसरे प्रहरीं मी कालीमातेचें देऊळ पाहण्यास गेलों. सण वगैरे कांहीं नसतां देवळांत बरीच गर्दी होती. फूलवाल्यांचीं दुकानें देवळाच्या रस्त्यावर रांगेनें बसलीं

होतीं. हजारों फुलांच्या माळा कालीमातेवर वाहून पुजारी पुन्हां त्याच माळा गिऱ्हाइकांस विकत असत. गिऱ्हाईक त्या मुकाट्यानें घेत. इतर ठिकाणीं नारळाचीं दुकानें असतात त्याप्रमाणें येथें लहान लहान कोंकरांचीं दुकानें होतीं. कित्येक दिवस खावयास न मिळाल्यानें हे प्राणी अत्यंत रोडावलेले दिसत. मंदिर हुगळी नदीचे कांठीं आहे. काली-मातेची मूर्ति अत्यंत भेसूर असून तिच्या तोंडांतून भली मोठी जीभ बाहेर आलेली पाहून नवख्याच्या पोटांत धडकी भरे. पुढें विस्तीर्ण अंगण असून मध्यभागीं देवीसमोर दोन मोठ्या खांबाचें वधस्थान आहे. भक्त लोक डोळ्यांत जीव धरलेल्या कोंकराला नदींत बुडवून व आपणहि सचैल स्नान करून वधस्थानीं येत. दोन लांकडांमध्यें त्या बिचाऱ्याची मान घालून पुजारी एका झटक्यासरशीं शीर धडावेगळें करीत. अर्थात पुजारी जातीनें अस्सल ब्राह्मणच असे. गरम गरम रक्ताचा टिळा भक्ताच्या कपाळावर लावून त्याचा नवस पूर्ण करीत असे. असे बली अंगणांतून अस्ताव्यस्त पडलेले मीं जवळ जवळ चाळीस मोजले. त्यांत सुमारे चार रेड्यांचीं प्रेतें होतीं. सबंध अंगणभर रक्तामांसाचा चिखल सांठला होता. त्यांतून जाण्याची मोठी मुष्कील पडे. जगन्नाथाच्या देवळांत वैष्णवशोभा पाहिल्यावर येथील शाक्तांच्या लीला पाहून निरीक्षकाची हृदयपालट चांगली होते! हिंदु धर्माची पुरातन काळापासून होत असलेली ही विटंबना अजून अखंड चाललेली पाहून मन उद्विग्न होतें. सहानुभूतिशून्य परकीयांना हा प्रकार पाहून काय वाटत असेल! हिंदु धर्माचीं उज्ज्वल स्थानें इतरत्र आहेत, नाहीं असें नाहीं. पण प्रमुख क्षेत्रांतील असले भीषण अत्याचार पाहून उज्ज्वल स्थानांचें स्मरण कोणाला होणार? मूर्तिपूजेचा हा महिमा पाहून हिंदु धर्माच्या सुधारणेची प्रेरणा महात्म्यांना होते. पण त्यांस सनातनीयांकडून एकजात विरोधच होतो, हें धर्माचें नशीब!

यापुढें वाटेंत कोठेंहि न थांबतां मी मुंबईस आलों. अनुभवानें मन इतकें भरलें कीं, सर्व भारताची यात्रा होतां होईल तों लवकर आटो-पण्याचा मीं निश्चय केला.

---

# प्रकरण २ रें

## स्थानिक कार्यक्रम

परत आल्यावर मुंबईतील कामाचा कार्यक्रम मी ठरवूं लागलों. धर्मकार्याचीं दोन मुख्य अंगें आहेत. पहिलें आचार्य कार्य; दुसरें प्रसार कार्य. ज्यांनीं धर्माचा स्वीकार करून दीक्षा घेतलेली असते अशांच्या धर्माचरणाची व्यवस्था राखण्यासाठीं प्रयत्न करणें; दर आठवड्याला साप्ताहिक उपासना चालविणें; घरोघरीं भेट देऊन कौटुंबिक धर्माचरणाची निगा ठेवणें; समाजांत जे निराश्रित आणि अपंग असतील त्यांची शुश्रूषा ठेवणें; नामकरण, उपनयन, विवाह, अंत्येष्टि, इत्यादि गृहविधी चालविणें; सभासदांतील परस्पर परिचय वाढवून तो दृढ व्हावा म्हणून वेळोवेळीं स्नेहसंमेलनें करणें इत्यादि इत्यादि. स्त्रियांसाठीं दर शनिवारीं आर्य महिला समाज, मुलांसाठीं रविवारचे धर्म व नीति शिकविण्याचे वर्ग, तरुणांसाठीं तरुण ब्राह्ममंडळ, वृद्धासाठीं संगत-सभा आणि बाहेरच्यांसाठीं व्याख्यानें हा क्रम आठवडाभर चाले. ह्यांत मीं आल्यावर खालील नवीन संस्थांची भर टाकली.

**पोस्टल मिशन**

मी विलायतेंत असतांना तेथील स्त्रियांनीं चालविलेलें युनिटेरियन पोस्टल मिशन हें कार्य निरखून पाहिलें होतें. माझे मित्र वासुदेवराव सुखटणकर यावेळीं पुण्यास होते. त्यांच्याकडून अशाच थाटावर ब्राह्म पोस्टल मिशन

ही घटना मीं स्वदेशीं येण्यापूर्वींच करविली होती. ब्राह्म धर्माच्या तत्त्वावर आणि उपासना पद्धतीवर लहान लहान पुस्तकें छापवून तीं टपालमार्गें लोकांस वाटून त्यावर वाचकांकडून जीं प्रश्नोत्तरें येतील त्याबाबत सतत पत्रव्यवहार ठेवून, सवडीप्रमाणें वाचकांस भेटीस बोलावून, धर्मप्रसार कर-ण्याच्या पद्धतीला पोस्टल मिशन हें नांव आहे. या कामांत युनिटेरियन लोकांकडून त्यांचीं लहानमोठीं पुस्तकें व द्रव्यनिधीचीहि मदत मिळविली. मी स्वदेशीं आल्यावर सुखटणकर माझ्याजागीं विलायतेला गेले. त्यांचें पुण्यांतील हें कार्य मीं मुंबईला आणून तें वाढविलें. ह्या कामीं माझे मित्र व समाजाचे सभासद सय्यद अब्दुल कादर ह्यांची मोठी मदत झाली. ह्या मिशनसंबंधानें पहिल्या सात आठ वर्षांच्या अवधींत एकंदर ३४३८ ब्राह्म धर्मावरील पुस्तकें, १२७०० लहानसहान पत्रकें, ६३३ युनिटेरियन पुस्तकें व ५००० युनिटेरियन पत्रकांचा प्रसार करण्यांत आला. ह्यांतील पुष्कळशीं फुकट वाटण्यांत आलीं व काहींची अल्प किंमत घेण्यांत येत असे. जे कोणी पुस्तकांची मागणी करीत अगर पत्रव्यवहार करीत त्यांचीं नांवें एका पुस्तकांत दाखल करण्यांत येत असत व त्यांच्याशीं पत्रव्यवहार करून उदार धर्मवार्ता त्यांस कळावी अशी व्यवस्था करण्यांत आली होती. मीं दोन वेळां मुंबई इलाख्यांतील कांहीं ठिकाणीं प्रवास करून व्याख्यानें दिलीं. त्या दोन्ही सफरींचा खर्च युनिटेरियन असोसिएशननें त्यावेळीं दिला होता. पुढें प्रार्थनासमाजाशीं धर्मप्रचारक या नात्यानें असलेला माझा संबंध सुटल्यानंतर हें काम बंद पडलें.

**उदार धर्मग्रंथ वाचनवर्ग**

हायस्कुलांतील व कॉलेजांतील तरुण विद्यार्थ्यांना मौलिक धर्मग्रंथांचें वाचन करण्याची संवय लागावी म्हणून हा उदार धर्मग्रंथ वाचनवर्ग ( Liberal Religious Reading Class ) हा वर्ग काढण्यांत आला. ह्या वर्गांत महाराष्ट्रीय, गुजराथी, ख्रिश्चन आणि

मुसलमान अशा भिन्न धर्मांच्या विद्यार्थ्यांचा समावेश होत असे. म्हणून हा वर्ग इंग्रजी पुस्तकांचा इंग्रजींत चालवावा लागे. हा दर बुधवारीं सायंकाळीं प्रार्थनामंदिरांत भरत असे. ह्याच्या प्रसिद्धीसाठीं वेळोवेळीं जाहीर व्याख्यानें करावीं लागत. डॉ. आर्म्सस्ट्रॉंगचे God and Soul, इमर्सनचीं पुस्तकें, प्रो. डॉयसेनचें Philosophy of Upanishad अशा पुस्तकांचें अध्ययन चालत असे. समाजांतील डॉ. भांडारकर फ्री लायब्ररींमधून ह्या वाचनाला पोषक अशीं पुस्तकें विद्यार्थ्यांना वाचण्यास देत असत.

**तरुण ब्राह्म संघ**

इकडील प्रांतीं ब्राह्मधर्माचा स्वीकार आणि प्रसार प्रार्थना समाजाकडून आतांपर्यंत कित्येक वर्षें चालला असला तरी ब्राह्मधर्माच्या तत्त्वाप्रमाणें सभासदांचे गृह्य संस्कार व विधी चालविण्याचें काम त्यामानानें फार चाललेलें असे. तत्त्वाप्रमाणें विधी चालविण्याला अनुष्ठान हें नांव असे. ह्या अनुष्ठानाचा परिणाम ब्राह्म कुटुंबामधील तरुणांपासूनच घडविण्याचा प्रयत्न करणें बरें आणि त्यासाठीं तरुणांनीं ब्राह्मधर्मानुसार उपासना चालविण्यास शिकावें, त्यांनीं परस्परांत स्नेहवर्धन करावें, गृह्यसंस्काराचे वेळीं एकमेकांत मिसळावें, आपल्या घरीं असे संस्कार चालविण्याचा आग्रह धरावा वगैरे हेतु साध्य करण्यासाठीं सन १९०५ सालच्या दसऱ्याच्या दिवशीं मीं तरुण ब्राह्म संघ ( Young Theists Union ) ही महत्त्वाची संस्था स्थापन केली. प्रार्थना समाजांत समाविष्ट झालेल्या तरुणांनीं कट्टर अनुष्ठानाला तयार व्हावें म्हणून मीं ह्या संघाच्या घटनेचे नियम मोठ्या कसोशीनें तयार केले. बाहेरच्या तरुणांनीं हे नियम पाळण्याची प्रतिज्ञा घेतल्यास त्यांनाहि आंत येण्यास वाव असे. या कार्याशिवाय लोकशिक्षण आणि परोपकाराचीं कृत्यें करण्यासाठीं प्रार्थना समाजाच्या इतरहि संस्था होत्या. मजुरांसाठीं रात्रीच्या शाळा मुंबई शहरांत

निरनिराळ्या १०।१२ ठिकाणीं चालत. त्यांतच दोन शाळा अस्पृश्यांसाठीं होत्या. त्यांची देखरेख मला ठेवावी लागे. पंढरपुरांत बालहत्या-प्रतिबंधकगृह म्हणून एक नमुनेदार संस्था समाजाकडून चालविण्यांत येत आहे. समाजाचें मुखपत्र 'सुबोध पत्रिका' मराठी आणि इंग्रजी बाजूनें दर आठवडयास प्रसिद्ध होत आहे. त्यांचाहि मला नेहमीं परामर्ष घ्यावा लागे. अशीं निरनिराळीं स्थानिक कामें चालवून शिवाय मुंबई प्रांत आणि त्याबाहेरहि मला वरचेवर प्रवास करावा लागे.

**घरची स्थिति**

याप्रमाणें समाजाच्या कामाचा आराखडा ठरला पण घरची व्यवस्था अद्याप झाली नव्हती. माझे आईबाप आणि पत्नी सौ. रुक्मिणीबाई माझ्या जन्मभूमीच्या गांवींच रहात असत. तीन बहिणी जनाक्का, तान्याक्का व चंद्राक्का पुण्यास हुजूरपागेंत शिकत होत्या. लहान भाऊ एकनाथ कोल्हापुरांत माझे मित्र गोविंदराव सासने यांचेकडे शिकत होता. त्याची मुलगी सुशीला आणि माझ्या आलगूरच्या मामाची मुलगी मथुरा या दोन मुली जमखिंडीस आमच्याच घरीं राहून शिकत होत्या. माझा पहिला मुलगा लहानपणींच वारल्यामुळें दुसरा मुलगा प्रताप यावेळीं ३।४ वर्षांचा होता. या सर्व विखुरलेल्या कुटुंबाचा पोशिंदा मी एकटाच असल्यानें आणि माझें काम तर देशभर पसरलेलें असल्यानें कुटुंबाची एकत्र राहण्याची सोय कोठें करावी हा मला मोठा पेंच पडला.

**जमखिंडीचा दौरा**

हा विचार ठरविण्यासाठीं माझा पहिला दौरा मीं जमखिंडीकडेच ठरविला. पुण्यास राहणारे वृद्ध ब्राह्म प्रचारक श्री. शिवरामपंत गोखले यांना बरोबर घेतलें. आणि मार्च महिन्याच्या सुमारास जमखिंडीस गेलों. ब्राह्मधर्माचा प्रचार जमखिंडीस अगदीं नवा होता असें

नाहीं. विलायतेस जाण्यापूर्वी दर रविवारीं आमचे घरीं ब्रह्मोपासना होत होत्या. आईबाबांना त्या इतक्या आवडल्या होत्या कीं, मी विलायतेला गेल्यावरहि त्यांनीं त्याचा क्रम चालविला होता, असें त्यांच्याकडून येणाऱ्या पत्रांवरून कळलें. पण नुसत्या उपासना वेगळ्या आणि या नवीन सुधारकी धर्माच्या तत्त्वाची मांडणी जाहीर रीतीनें करणें वेगळें. सुमारें दोन आठवडे राहून प्रार्थना समाजानें पुरस्कारलेल्या सहा मूल तत्त्वांची छाननी करण्यासाठीं सहा निराळीं जाहीर व्याख्यानें मीं दिलीं. ठिकाण पोस्ट ऑफिससमोरच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यांत होतें. नाविन्यामुळें बरीच गर्दी जमे. माझ्यासह आलेले वृद्ध शिवरामपंत ब्राह्मण असूनहि माझ्याकडे राजरोस जेवतात ह्या गोष्टीचा गवगवा गांवभर झाला. त्यामुळें व्याख्यानाची प्रसिद्धि करण्यास हस्तपत्रिकांची निराळी योजना करण्याची जरूरी भासली नाहीं. जमखिंडी हा गांव आगगाडीपासून दूर आणि विचारांत मागासलेला, आचारांत अत्यंत सोंवळा असल्यामुळें ह्या व्याख्यानमालेमुळें त्याच्यावर आकाशांतली कुऱ्हाडच पडली म्हणायाची. ह्यापूर्वीं ह्या गांवचा मी किती जरी लाडका असलों तरी माझीं आत्यंतिक सुधारक तत्त्वें आणि तीं मांडण्याची सडेतोड पद्धति कोणाच्याहि गळीं सहजासहजीं उतरण्यासारखी नव्हती. लोकमत हळू हळू प्रक्षुब्ध होऊं लागलें. त्या आगींत तेल ओतण्याचें श्रेय जमखिंडी हायस्कुलांतील एका उपद्व्यापी शिक्षकानें आपल्याकडे घेतलें. हे सद्गृहस्थ व्याख्यान ऐकावयास स्वतः आपण सर्वांच्या अगोदर आणि पुढें येऊन अगदीं जणूं भाविकपणें माना डोलावीत बसत. पण त्यांनीं अगोदरच नियोजित केलेली वानरसेना रस्त्यांत गोंगाट करण्यास सज्ज असे. सर्वांत शेवटीं ‘जातिभेद’ या विषयावर जेव्हां व्याख्यान सुरू झालें तेव्हां खालील रस्त्यावरील वानर-

सेनेनें गोंगाट करून तृप्त न राहतां दगड आणि कचऱ्याचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. अशा प्रकारें शेवटची आरती होऊन ही माला संपली.

**सामाजिक प्रकोप**

माधवराव गाडगीळ नांवाचे एक सरकारी अधिकारी होते. त्यांना मात्र हीं सर्व तत्त्वें पटलीं. त्यांनीं शिवरामपंत गोखले यांना आपल्या घरीं ब्रह्मोपासनेस जाहीर रीतीनें बोलावून इतर लोकांसहि आमंत्रण केलें. त्यांचें घर भर बाजारांत मारुतीचे देवळाजवळ होतें. उपासनेस इतर कोणी आले नाहीं तरी वरील उपद्व्यापी मास्तर आणि त्यांची वानरसेना हजर राहिली. त्यांनीं आमचा बराच छळ केला. घर भर बाजारांत असल्यानें शौचकूपाची जागा किंचित् लांब होती. बिचाऱ्या वृद्ध शिवरामपंतांना वरचेवर लघवीचा उपद्रव होत असल्यानें त्यांना तेथें जावें लागलें. ते आंत गेल्याबरोबर द्वाड पोरांनीं बाहेरून दरवाज्यास कडी लावली. शिमग्याचे दिवस असल्यानें ह्या पोरट्यांच्या लीला सशब्द होऊं लागल्या. त्या गोंधळांत बिचाऱ्या शिवरामपंतांच्या आरोळ्या आम्हांस ऐकूं येत नव्हत्या. शेवटीं कोणी एकानें गाडगीळांना हा निरोप आणून दिल्यावर त्यांनीं आपल्या अधिकाराच्या जोरावर पंतांची कशीबशी सुटका करून सुखरूप घरीं पोंहोंचविलें. या गोष्टीचा पुकार गांवभर झाल्यानें शिमग्यांतल्या रात्रींच्या दंगलीचा मोर्चा आमच्या राहत्या घरावर होऊं लागला. धुळवडीच्या आदल्या रात्रीं तर असा कहर उडाला कीं, आमच्या बाबांना पोलीसाची मदत घ्यावी लागली. प्रकरण येथपर्यंत आल्यावर आमच्या घरच्या मंडळीनें कोठें रहावें हा प्रश्न आपोआप सुटला. असा सामाजिक प्रकोप होण्याचें आणखी एक कारण असें झालें कीं, जमाखिंडीच्या महारांच्या शाळेंत एक महाराची १० वर्षांची लहान मुलगी होती. तिला मुरळी

सोडण्यांत आलें होतें असें ऐकल्यावरून तिला मीं घरीं बोलावून घेतलें आणि तिच्या पुढील शिक्षणाची चांगली व्यवस्था ठेवण्याबद्दल तिच्या आईबापांस बजावलें. निदान मुरळीचा धंदा चालूं नये अशी ताकीद दिली. सुधारणेची मजल व्याख्यानांतच न आटोपतां ती प्रत्यक्ष कृतींत उतरूं लागलेली पाहून जीर्णमतवादी समाजाला कां चीड येऊं नये ! ज्यांनीं मराठा समाजाचे एक सन्मान्य पुढारी म्हणून जातपंचायतीचे खटले निकालांत काढावयाचे त्यांच्यावरच हा प्रसंग गुदरावा ही घटना विचाराला निर्णयकारक होती. आपल्या लहानशा नोकरीची पेन्शन घेऊन आपलें सारें चंबूगवाळें घेऊन मुंबईस येण्याचें त्यांनीं ठरविलें. मी हें सर्व आतां विनोदानें लिहीत आहें. पण माझ्या मानी बाबांना पिढीजात जन्मभूमि सोडून आपलें सर्व उरलें सुरलेलें खटलें आवरून प्रेमळ मित्रांची व नातलगांची अखेरची रजा घेऊन तडकाफडकी मुंबईची वाट धरावी लागली, त्यावेळीं त्यांना काय वाटलें असेल हें ते आणि देवच जाणो !

शिवरामपंत आणि मी मुधोळास गेलों. हा गांव जमखिंडीचे दक्षिणेस १२ मैलांवर आहे. श्रीमंत घोरपडे यांची ती मराठी राजधानी आहे. पण मागासलेपणांत तिचा नंबर जमखिंडीचे वर लागतो. मायभूमीहून वरील

**मुधोळ**

आहेर घेऊन आलेल्या माझ्यासारख्या वीराचा सत्कार अधिक काय व्हावयाचा ? गांवांत विशेष खळबळ उडाली नाहीं त्याचें एक कारण जाहीर व्याख्यानाची प्रथाच तेथें नवी होती. न जाणो, माझीं व्याख्यानें कळलींहि नसतील. जमखिंडींतील उपद्व्यापी मास्तराप्रमाणें स्वयंस्फूर्तीनें पुढें येण्याइतका तेथें कोणी कळवळ्याचा माणूस नव्हता. माझ्याबरोबर माझ्या दोन बहिणी जनाक्का व चंद्राक्का ह्यांना पुण्यांतील शाळेंत जावयाचें

होतें म्हणून त्याहि बरोबर होत्या. म्हणून मी त्यानंतर दुसरीकडे कोठें दौरा न नेतां पुण्याहून मुंबईस आलों.

---

# प्रकरण ३ रें

## काठेवाडचा दौरा

**ठिकठिकाणचा प्रवास**

१९०६ च्या एप्रिलमध्यें माझे मित्र गुजराथचे नानालाल कवि सादरा येथें सरकारी नोकरींत होते. त्यांना उन्हाळ्याची सुटी पडल्यामुळें माझ्याबरोबर काठेवाडांत समाजाच्या प्रचारकार्यासाठीं दौरा काढण्याचें ठरविलें. मी त्यांच्या घरीं सादरा येथें गेलों. स्टेशनहून सादरा गांव बराच लांब असल्यानें व प्रदेश वाळवंटाचा असल्यामुळें माझी प्रवासाची उंटावरून जाण्याची व्यवस्था केली होती. संवय नसल्यामुळें ह्या प्रवासाचा मला बराच त्रास झाला. अंग फार हालल्यानें दोन दिवस कमरेला ठणका लागला होता. सादऱ्याहून आम्ही दोघे प्रथम अहमदाबाद प्रार्थना समाजांत गेलों. तेथें व्याख्यानें आणि सभासदांशीं परिचय वगैरे करून घेण्यांत दोन दिवस गेले. समाजाचे अध्यक्ष लालशंकर उमीयाशंकर यांची प्रथमच ओळख झाली. त्यांनीं स्थापलेलें मोठें अनाथालय पाहिलें. ह्या समाजाला पैशाचें भरपूर साहाय्य आहे. प्रार्थना मंदिर प्रशस्त आणि सुंदर आहे. सभासदांची संख्या पुष्कळ आहे, पण अनुष्ठानिक सभासद फारच कमी होते. रा. रमणभाई नीलकंठ समाजाचे चिटणीस होते. अहमदाबादहून आम्ही राजकोटला गेलों. प्रसिद्ध विद्वान् ( प. वा. ) शंकर पांडुरंग पंडित, बॅ. सीता-

राम पंडित आणि घनश्याम नारायण पंडित हे तीन पंडित बंधू काठेवाडांत मोठी मान्यता पावलेले राजकोटांत कायमची वस्ती करून राहात असत. आम्ही शंकर पांडुरंग यांचे घरीं उतरलों. रा. शंकर पांडुरंग पंडित हे प्रार्थनासमाजिष्ट होते, आणि दुसरे दोन प्रागतिक ध्येयाचे होते. राजकोटांत राजकुमार कॉलेज व इतर तशाच मोठ्या लोकांच्या मुलांच्या शिक्षणाची मध्यवर्ति संस्था होती. ग्राशिया नांवाचा काठेवाडांतील जमिनदारांचा श्रीमंत वर्ग असे; त्यांचीहि एक शाळा श्रीमंती थाटाची होती. कवाईत करणें, घोड्यावर बसणें व इतर मर्दानी खेळ खेळणें ह्या बाबतींत ह्या कुमारांची फार काळजी घेण्यांत येत असे. आणि हीं कामें ह्या तरुणांना फार आवडतहि असत. क्षत्रियाला शोभणारा पेहेराव, पाणीदार वृत्ति आणि कसलेली शरीरप्रकृति पाहून आनंद झाला. मुंबई इलाख्यांतील राजेरजवाड्यांच्या मुलांची सोय येथें एकत्र केल्यानें परस्पर परिचय होऊन ते पुढें राजपदारूढ झाल्यावरहि तो कायम राहात असे. राजकोटहून आम्ही भावनगरला गेलों. तेथील कॉलेजांत माझें व्याख्यान झालें. सर प्रभाशंकर पट्टणी यांचें या संस्थानांत फार वजन असे, त्यांचीहि ओळख झाली. भावनगरहून आम्ही जुनागडला गेलों. दिवाणांचेकडे उतरलों. व्याख्यानें, भेटी हा ठरीव कार्यक्रम झाल्यावर जवळच असलेल्या गिरनार पर्वतावर जाण्याचा विचार ठरला. दिवाणांच्या ओळखीमुळें गिरनार पर्वतावर आमची राहण्याची व्यवस्था मोठ्या बडदास्तीची झाली.

**गिरनार**

"गढ जुनो गिरनार वादळ थीनुं वातुं करी" ही काठीवाडी म्हण बहुजन समाजांत प्रसिद्ध आहे. तिच्यामुळें हा गड पाहण्याची आम्हांस फार आतुरता लागली होती. मेघाशीं भाषण करणारा हा जुना गड गिरनार जवळ जवळ चार हजार फूट उंच आहे. त्याच्या पायथ्याशीं एका मोठ्या

प्रशस्त दगडावर सम्राट् अशोक राजाचा एक प्रसिद्ध शिलालेख आहे. गिरनारच्या पश्चिमेस गीर नांवाचें प्रसिद्ध जंगल लागूनच आहे. त्यांत पशूंचा राजा सिंह त्याचें साम्राज्य आहे. हिंदुस्थानांत याची पैदास दुसरी कोणीकडे नसल्यानें या जंगलाला मोठें महत्त्व आलेलें आहे. जुनागडच्या प्राणिसंग्रहालयांत सुमारे १०।१२ सिंह आम्हीं पाहिले; त्यावेळीं त्यांच्या घोर गर्जनांनीं प्रदेश निनादून गेला. हें दृश्य मोठें प्रेरणा करणारें होतें. खुर्च्यांवरून आम्हांला गिरनारवर नेण्यांत आलें. संस्थानच्या आतिथ्यालयात आमची थाटाची सोय झाली. शिखरावर प्रसिद्ध आणि प्राचीन अशीं कित्येक सुंदर जैन मंदिरें आहेत. स्वामिनारायण पंथाचींहि कांहीं देवळें आहेत. येथून आसमंतांतला देखावा आत्म्याला जागृत करणारा दिसतो. ह्या पर्वतावर मोठमोठ्या खोल गुहा आहेत. त्यांतील एका गुहेमध्यें आम्ही प्रवेश करून अंधारांतून बरेंच लांबवर आंत गेल्यावर गाभाऱ्यांत कितीतरी निस्संग आणि विरक्त साधू रहात असलेले आम्हीं पाहिले. पेटलेल्या धुनीचा प्रकाश अंधारांत रौद्ररसाची प्रेरणा करीत होता. साधूंच्या मुद्रा गंभीर आणि प्रसन्न, शरीरें धष्टपुष्ट आणि तेजःपुंज, बहुतेक नग्न आणि राखेनें माखलेलीं पाहून फार आश्चर्य वाटलें. ह्या निर्जन प्रदेशांत ह्या साधूंची खाण्यापिण्याची सोय कशी लागते, इतर योगक्षेम कसा चालतो याचें कोडें आम्हांला पडलें. आम्हा प्रापंचिकांच्या मनांत अर्थात् असले खाण्यापिण्याचे विचार अगोदर येणार. साधूंना असले प्रश्न विचारल्यास त्यांनीं नुसतें हंसून आमची बोळवण गेली. गुहेच्या आसपास ठिकाठिकाणीं शुद्धोदकाचीं कित्येक टांकीं दिसलीं. त्यांचा उपयोग हे साधु आणि जंगलांतले व्याघ्रादि वन्य पशू यांच्याशिवाय दुसरे कोण करणार ? हे आळीपाळीनें टाक्यावर येऊन जात असत. त्यांच्या गांठी भेटी झाल्यास काय प्रकार घडत असेल हें कळण्याला मार्ग नव्हता. अशा समागमांत चार दिवस आमचे मोठ्या समाधानाचे, एकांतवासाचे आणि धर्मचिंतनाचे गेले. आणि

परत आम्ही जुनागडास दिवाणांच्या कोठींत आलों. तेथें मियागांवचे ठाकूर बडोदे सरकारचे मांडलिक आमचे सहपाहुणे होते. ठाकूरसाहेबांनीं परत जातांना आपल्या मियागांव या जहागिरीच्या जागीं मीं दोन दिवस राहून जावें म्हणून मोठ्या अगत्याचें आमंत्रण केलें व तें मीं आनंदानें पत्करलें. प्रार्थना समाजाच्या कार्याविषयीं ठाकूरसाहेबांनीं मोठी सहानुभूति प्रकट केली. येथून दुसऱ्या एका लहानशा संस्थानच्या गांवीं आम्ही गेलों. तेथें काठेवाडी जुन्या मताचे शाहीराची भेट झाली. त्याचीं साधीं व परिणामकारी भजनें एकतारीवरचीं ऐकावयाला मिळालीं. त्यांतील तेजाभगत नांवाच्या शाहीराचीं दोन तीन अनुभविक पदें मीं उतरून घेतलीं. पुढें माझ्या कीर्तनांत त्यांचा चांगला उपयोग झाला. दिवस उन्हाळयाचे असल्यामुळें रात्री फार सुखावह गेल्या. तेथें नाथालाल कवीची व माझी ताटातूट झाली. मी एकटाच अहमदाबादेहून मुंबईकडे परतलों.

**मियागांव**

अशा प्रवासांत मला नेहमीं एक स्मरणीय अनुभव येत असे. त्याचा उल्लेख करणें बरें. कधीं श्रीमंतांचे घरीं थाटाचें आदरातिथ्य तर लगेच खाण्यापिण्याचे अत्यंत हाल अशी स्थितीची अलटापालट होऊन माझी चांगली कसोटी लागत असे. उत्तम साळीचा भात खाऊन दुसरे दिवशीं शिळी भाकरहि मिळत नसे. अहमदाबादेस मी परत येताना थोडाच वेळ राहिल्यामुळें गाडी अवेळीं निघाल्यानें मला एक दिवसाचें उपोषण पडलें. बी. बी. सी. आय. रेल्वेवरील मियागांव स्टेशनवर गाडी भर बारा वाजतां मला सोडून पुढें चालती झाली. स्टेशन क्षुद्र असल्यानें तेथें कसलीच सोय नव्हती. दोनचार मिनिटांत गाडी गेल्यावर सर्वत्र सामसूम झाली. स्टेशनमास्तर, पोर्टर कोठें गेले तें कळेना. उन्हांत पिण्याला पाणी मिळेना तर खाण्याची गोष्ट काय ? दीड दिवसाच्या उपोषणानें माझ्या पोटांतील

कावळे आंतडीं कुरतडूं लागले. अर्ध्याच मैलावर एक कुग्राम होता. ट्रंक व बिछाना प्लॅटफॉर्मवरच टाकून मी तेथें भक्ष्यशोधार्थ गेलों. त्या ओसाड खेड्यांत मला नीट माणसेंहि दिसेनात, दारें लागलेलीं व उघडीं असतील तर माणसें नसलेलीं असा प्रकार होता. मी एका ब्राह्मणाच्या घरांत शिरलों. त्याच्या घरीं श्राद्ध होतें असें कळलें. दोन प्रहर उलटून गेले तरी हा यजमान नुकतांच उठून हजामतीला बसला होता. जेवणाची सोय होईल कां विचारतां त्यानें मी ब्राह्मण आहे कां असें विचारलें. नाहीं म्हणतांच त्यानें मला चक्क बाहेर जाण्यास सांगितलें. हताश होऊन शेवटीं एका शिंप्याचे दुकानावर आलों. माझी कठीण अवस्था सांगितली. शिंप्याला पाझर फुटला. आपली पत्नी जवळच्या तळयावर गेली आहे. ती आल्यावर कांहीं उरलेंसुरलें असल्यास मिळेल असा त्यानें धीर दिला. शेवाळलेला घाणेरड्या पाण्याचा घडा डोकीवर घेऊन बाई परत आली. तिनें एका पितळींत कालचा उरलेला उसळीवजा भात व त्याहून शिळी कढी एका वाडग्यांत वाढली. कढींत पाहतों तर चारपांच माशा पडलेल्या होत्या. मुकाट्यानें त्या वेंचून टाकून मीं हें पक्वान्न अधाशासारखें खाल्लें. पण पाणी कांहीं केल्या पिववेना. कसेंबसें आंचवून मी बाहेर ओटीवर शिंप्या-जवळ येऊन एका चटईवर पडलों. श्रमामुळें झोंप लागली. अर्ध्या तासानें उठून चटईवरच पाणी प्यालों. माझ्या जवळच चटईवर एक मुसलमान गृहस्थ बसला होता. त्याची खंती न बाळगतां मी पाणी पितों हें पाहून शिंप्याचे डोळे लाल झाले. त्यानें कांहींच मुर्वत न ठेवतां मला दुकानां-तून खालीं उतरण्यास सांगितलें. यांत मुसलमानाचा अपमान होऊन तोहि खालीं उतरला. तो पोलीस शिपाई होता. मोठ्या मिनतवारीनें मी कोण कोठचा आहें ही चौकशी तो करूं लागला. मी रेल्वेंतला एक उतारू आहें, माझें सामान प्लॅटफॉर्मवर पडलें आहे, जात न पाळणारा एक मराठा

आहे, वगैरे सांगितलें. तो म्हणाला, “ चला, जवळच आमचे फौजदार-साहेबांचें ठाणें आहे. तेहि मराठेच आहेत. तुमचें सामान मी स्वतः डोक्यावर घेऊन तेथें पोंहोंचावितों. तसें त्यानें केलेंहि. फौजदारसाहेब कोल्हा-पूरचे माझे चांगले परिचयाचे निघाले. माझी कहाणी ऐकून ते कळवळले. पडदा पालटला आणि उत्तम सोय लागली. रात्रीं मी ठाण्यावर राहिलों. मियागांव तेथून सुमारें दोन मैलावर होता. एका पोलीसाकडून ठाकुरांस निरोप गेला. त्यांनीं ताबडतोब एक सुंदर गाडी पाठविली. नानालाल कवीनें माझ्या येण्याबद्दलचें ठाकुरसाहेबांना जें पत्र पाठविलें होतें तें चुकून एक दिवस उशीराचें होतें म्हणून हा सर्व त्रास पडला असें सांगून ठाकुरजींनीं माफी मागितली. तेथें एक दिवस राहून थाटाचा पाहुणचार भोगून मुंबईस परत आलों. येणेंप्रमाणें प्रार्थना समाजाच्या आणि पुढील डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कामाकरतां काठेवाड आणि गुजराथ प्रांतीं मी एकंदर चार सफरी केल्या.

**राममोहन आश्रम**

१९०४ च्या पावसाळ्याच्या अंत आमचे बाबा जमखिंडींतील वस्ती कायमची सोडून घरदार आणि कुटुंबांतील सारी मंडळी घेऊन मुंबईस आले. त्यापूर्वींच राममोहन राय आश्रममध्यें आमची राहण्याची सर्व व्यवस्था करण्यांत आली होती. गिरगांवांतील प्रार्थना मंदिराच्या आवारांत या आश्रमाची चार मजली भक्कम इमारत आहे. तळमजल्यांत भांडारकर ग्रंथालय आहे. दुसऱ्या मजल्यावर लाकडाच्या पडद्या लावून निरनिराळ्या खोल्या करून आमची व्यवस्था करण्यांत आली होती. तिसऱ्या मजल्यावर एक मोठें दालन असून त्यांत समाजाचीं संमेलनें वगैरे करण्याची व्यवस्था होती. चवथ्या मजल्यावर पुढें थोडी मोकळी जागा सोडून एक खोली काढ-ण्यांत आली आहे. तेथें खासगी प्रार्थनेची जागा असून बाहेरून आलेल्या मिशनरीची सोय करण्यांत येते. मुख्य इमारतीपासून स्वयंपाकाकरितां

खोल्यांची अलग सोय असून स्नानासाठीं तुटक खोल्या आहेत. एकंदर सोय चांगली आहे. माझ्या कुटुंबांत एकूण दहाबारा माणसें होतीं. समाजाचा प्रचारक या नात्यानें माझी नेमणूक झाली तेव्हां माझ्या खर्चासाठीं दरमहा ६० रु. ची व्यवस्था करण्यांत आली. शिवाय प्रवासाचा वगैरे सर्व खर्च माझा मींच पाहून घ्यावा लागत असे. इतकेंच नव्हे तर समाजाचीं व तदनुषंगिक इतर कामें मीं काढल्यास त्याच्याहि खर्चाची जबाबदारी मजवरच पडे. सात वर्षें मीं हें काम केलें तरी माझ्या ह्या नेमणुकींत कांहीं वाढ झाली नाहीं, आणि ती मागावी असेंहि मला कधीं वाटलें नाहीं. मुंबई हा मुख्य राजधानीचा गांव. राममोहन आश्रमाची सोय झाल्यामुळें आणि त्याच्या पूर्वीपासूनहि पाहुण्यांची ये जा फार असे. समाजाचे सभासदच नव्हेत तर इतरहि प्रागतिक मताचे सन्माननीय पाहुणे नेहमीं येऊन आश्रमांत उतरत. त्यांतील कांहीं युरोप वगैरे बाहेर-देशीं जाणारे व तिकडून येणारे प्रतिष्ठित गृहस्थ असत. त्यांच्याहि सरब-राईचा बोजा आम्हांवर पडे. खर्चाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी पाहुण-चाराची दगदग आमच्या घरच्या कुटुंबियांवर नेहमीं पडे, आणि ही कळ बोलून दाखविण्यासारखीहि नव्हती. गृहमेधाचें कठीण दिव्य मुकाट्यानें चालवावें लागे. घरचें सर्व देखरेखीचें काम बाबांकडे होतें. भावंडें शाळेंत जात असत. तीं मोठीं झाल्यावर माझ्या कामांत सामील झालीं. वृद्ध आईबाबाहि माझ्याच नादीं लागलीं. माझ्या कार्याशीं मी इतका तादात्म्य झालों होतों कीं, माझें हें करणें न्यायाचें कीं अन्यायाचें होतें, सत्य होतें कीं असत्य होतें ह्याचा विचार त्यावेळीं माझ्या ध्यानांतहि नव्हता आणि घरच्या मंडळींची मनोरचना तक्रार करण्यासारखी तर कधींच नव्हती. असा हा आमच्या प्रपंचाचा अह्लारखी गाडा चालला होता.

---

क्र. १०८७२

# प्रकरण ४ थें

## स्थानिक कार्य

**प्रेमळ गोतावळा**

वर आंखलेल्या आराखड्याप्रमाणें मी स्थानिक कामाला लागलों. दिवसाचीं कामें आटोपल्यावर रात्रीं सभासदांच्या घरीं भेटी घेणें, रात्रींच्या शाळांची देखरेख करणें वगैरे कामें आटोपून घरीं येण्यास रात्रीचे ११।१२ वाजत. मुंबईसारख्या अफाट वस्तींत सभासदांचीं घरें १०।१२ मैल लांबवर पसरलेलीं असत व शाळाहि दूर दूर असत म्हणून इतका वेळ लागे. त्यामुळें कामांत वक्तशीरपणा राखण्यास फारच जड जाई. प्रथम प्रथम संघटना होणें कठीण गेलें. समाजांत तरुणांचा उत्साह वाढत होता. त्यांचें साहाय्य आनंदानें मिळूं लागलें; पण अनियमितपणाबद्दल टीका कांहीं-जणांकडून प्रथमपासूनच चालत असे. अद्यापि ती प्रेममूलक होती; त्यामुळें दुःसह होत नसे. समाजाच्या बाहेरची मंडळी मला माझ्या कामांत कितपत यश मिळेल याबद्दल साशंक नजरेनें पाहात असत; तर कांहीं कौतुकानें पाहात असत. या भिन्न प्रवृत्तींमुळें माझी मी करमणूकच करून घेत असें. आमच्या घरची मंडळी साध्या रहाणीची व खेडवळ प्रांतांतून आलेली. त्यांना ह्या मुंबईसारख्या नवीन नवीन ढंगाच्या समाजामध्यें आपलें बस्तान बसविण्यास प्रथम प्रथम कठीण गेलें. प्रार्थना समाजाच्या थोर थोर घराण्यांनीं आमची खरी स्थिति पाहून मोठ्या मान्यतेनें आम्हांस संभाळून घेतलें. भांडारकर, माडगांवकर, चंदावरकर वगैरे घराण्यांतील

स्त्रियांनीं आमच्या वृद्ध आईशीं मिळून मिसळून वागणूक ठेवून मुंबईचा परकेप ा व तुटकपणा भासूं दिला नाहीं. वासुदेव बाबाजी नवरंगे, सदाशिवराव केळकर, द्वारकानाथ वैद्य, सौ. लक्ष्मीबाई रानडे वगैरे घराणीं तर आम्हांस आमच्या घराण्यासारखीं वाटत होतीं. रा. कोरगांवकरांनीं तर प्रथमपासूनच माझ्याबद्दल फार काळजी वाहिली. वामनराव सोहोनी व सय्यद अबदुल कादर हे तर माझ्या कामांत आजीव येऊन मिळाले. डॉ. सुखटणकरांचा माझ्याशीं परदेशांतून कळकळीचा पत्रव्यवहार चालू असे. डॉ. काशीबाई नवरंगे, डॉ. वैकुंठ कामत वगैरे तरुण मंडळी आमच्या घरगुती अडचणी भागविण्याला सदैव तत्पर असत. असा हा गोतावळा भोंवतालीं जमून आल्यामुळें मुंबई शहरांतल्या राहणीच्या आर्थिक तंगीच्या वेदना सहज सह्य झाल्या. जसजसा माझा कामाचा व्याप वाढूं लागला तसतसा हा गोतावळाहि वाढूं लागला.

**क्रांति**

विसाव्या शतकाच्या आरंभापासून वृद्ध पिढी जाऊन नवीन पिढीनें त्यांची जागा घेतल्यामुळें प्रार्थना समाजांत एक प्रकारची क्रांति होऊन तो नवीन वाढीला लागला, असें वर सांगितलेंच आहे. जुन्या संस्थांचा नवीन जोम आणि नवीन संस्थांची भर ह्यामुळें चहूंकडे नवचैतन्य फुलूं लागलें. रा. द्वारकानाथ वैद्यांनीं 'सुबोध-पत्रिका' सांवरली, वामनराव सोहोनी यांनीं रात्रींच्या शाळा हातीं घेतल्या, कोरगांवकरांनीं जमाबंदीची काळजी केली आणि इतर नवीन नवीन तरुण स्वयंसेवक म्हणून पुढें आले. ह्याचा परिणाम पुढें कांहीं वर्षें समाजाच्या वार्षिक उत्सवाचे वेळीं स्पष्ट दिसूं लागला. दूर दूर राहणाऱ्या सर्व कुटुंबांचीं स्नेहसंमेलनें घडूं लागलीं. निरनिराळ्या दर्जांमध्यें परिचय वाढून निरनिराळ्या कुटुंबांमध्यें कौटुंबिक उपासना होऊं लागल्या. सगळा समाज म्हणजे एक कुटुंब ही भावना

रुजूं लागली. ह्यामुळें परकीयांचें लक्षहि समाज-जीवनाकडे अधिक वाढूं लागलें. हितचिंतक सभासद होऊं लागले; आणि सभासद कार्यवाहक होऊं लागले. गिरिजाशंकर त्रिवेदीसारखी गुजराथी मंडळी देखील सभासद होऊं लागली. कराचीचे डॉ. रुबेन ह्यांचा वरचेवर भजनाचा लाभ घडूं लागला. स्वामी स्वात्मानंदजी ह्या आर्यसमाजिष्ट प्रचारकाची जोड प्रचारकार्यामध्यें मिळूं लागली. मणिलाल परिखसारख्या भावनाशील भक्ताची भर पडली. सय्यद अबदुल कादर व त्यांची बहिण हाजराबाई हीं दोन भावंडें तर जमखिंडीपासूनच आमच्या घरांत नेहमींचींच असत. केरो रावजी भोसले ह्या मराठा तरुणानें नुसतें सभासदच होऊन न राहतां पंढरपूर येथील अनाथाश्रमाचें चालकत्व आपणाकडे घेऊन तो बराच नांवारूपास आणला. प्रार्थना समाजाचे उपाध्यक्ष शेठ दामोदरदास गोवर्धनदास यांचें मूक औदार्य या सर्व नवचैतन्यास पुष्टिदायक होऊन चिरस्मरणीय झालें. डॉ. भांडारकरांसारख्या पूज्य विभूतीचा समागम मुंबईकरांस वेळोवेळीं घडून आध्यात्मिक लाभांत भर पडूं लागली. शिवरामपंत गोखले या वृद्ध प्रचारकाचा बालबोध उपदेश बायकामुलांनाहि आवडूं लागला. पण ह्या सर्व घटनेचा मध्यबिंदु प्रार्थना समाजाचे अध्यक्ष सर नारायण चंदावरकर व त्यांची प्रेमळ पत्नी लेडी चंदावरकर यांनीं साधला, आणि ते एक मुंबईचे तोलदार नागरिक असल्यामुळें सरकार दरबारांत तसेंच प्रतिष्ठित लोकसमाजांत प्रार्थना समाजास एक अढळ भूमिका त्यांनीं मिळवून दिली. गत पिढींतल्या एकाहून एक महानुभाव श्रेष्ठ विभूतींनीं प्रार्थना समाजाला जें उच्च अधिष्ठान मिळवून दिलें तें अद्यापि मागें उरलेल्या दादासाहेब भांडारकरांनीं आणि नवीन मिळालेल्या चंदावरकरांनीं कायम राखिलें.

ह्या सर्वांचा एक दृश्य परिणाम समाजाच्या १९०५ च्या ३८ व्या वार्षिकोत्सवामध्यें स्पष्ट दिसून आला. स्त्रिया पुरुष, लहान थोर, तरुण

वृद्ध सभासद आणि हितचिंतक वगैरे सर्वांनींच ह्या उत्सवांत जोमानें भाग घेतला. ह्या वर्षाचें प्रीतिभोजन फारच थाटाचें झालें. त्यांत प्रो. गोपाळ कृष्ण गोखले, प्रिन्सिपाल रघुनाथराव परांजपे, रा. बंडोपंत भाजेकर अशा कितीतरी बाहेरच्या हितचिंतकांनीं भाग घेतला. इतकेंच नव्हे तर अस्पृश्य समाजांतील कांहीं मंडळी पंक्तीस हजर होती. त्यामुळें थोडीशी आंत-बाहेर खळबळ उडाली. पण ही नवी प्रथा लवकरच पचनीं पडून सामाजिक जीविताला भरपूरपणा आल्यावांचून राहिला नाहीं.

**उपासनापद्धति**

या क्रांतिकाळांत उपासनापद्धतीमध्यें एक महत्त्वाची भर पडली. सिंध आणि पंजाब या प्रांतांतून डॉ. रुबेन आणि लाहोराहून रामरखामलसारखी भजनाची रसिक मंडळी राममोहन आश्रमांत येऊन रहात. तसेंच बंगालहून तरुण विद्यार्थी, ब्राह्मसमाजाचे सभासद मुंबईत शिक्षणा-साठीं येऊन रहात. त्यांत प्रबोधकुमार दत्त या नांवाचे तरुण गृहस्थ कलकत्त्याकडील ब्राह्मसमाजांत प्रसिद्ध गायक होते. या सर्वांचा आमच्या घराशीं फार निकट संबंध आला. त्यांच्या सहवासामुळें प्रार्थना समाजाच्या साप्ताहिक उपासनेच्या पूर्वी वेदीखालीं बसून अर्धा तास भजन करण्याची प्रथा पडली. त्यांत विशेषेंकरून सिंध प्रांतांतील हिंदी भजनें आणि बंगाल-मधील रवीन्द्रनाथ टागोरकृत सुंदर पदें यांचा समावेश अधिकाधिक होऊं लागला. मुंबई समाजांतील उपासनेच्या वेळीं ब्राह्म-संगीत म्हणण्याचे बाब-तींत आमच्या सभासदांच्या भगिनी मंडळाकडून पुढाकार घेण्यांत येऊं लागला. त्यांत द्वा. गो. वैद्य यांच्या पत्नी व सीतारामपंत जव्हेरे यांची कन्या गुलबबाई व त्यांची बहिण कृष्णाबाई जव्हेरे आणि विशेषतः मराठी पद्यें म्हणण्यामध्यें तर माझी बहिण श्रीमती जनाक्का यांचा पुढाकार असे. प्रार्थना समाजांत बंगाली गाण्यांचा प्रवेश सीतारामपंत जव्हेरे यांच्या

कालापासून आहे. सत्येन्द्रनाथ टागोर साताऱ्याला डिस्ट्रिक्ट जज्ज होते. तेव्हां साताऱ्याला एक प्रार्थना समाज चालला होता. सीतारामपंतांच्या मुलींनीं–गुलाबबाई, कृष्णाबाई, इंदिराबाई यांनीं–तेव्हांपासून बंगाली गाणीं घेतलीं. सीतारामपंतांनीं त्यांचें मराठी भाषांतर करून प्रार्थना-संगीतांत त्यांचा समावेश केला. आम्ही राममोहन आश्रमांत राहायला लागल्यावर वरील प्रबोधकुमार दत्त यांचा आमच्या घरीं फार लळा पडला. त्यांचा गळा अत्यंत मधुर असून ब्राह्म-संगीतांत त्यांचें सुंदर प्रभुत्व असे. त्यांच्याकडून श्रीमती जनाबाईनीं बंगाली भाषेची आणि विशेषतः संगीताची बरीच माहिती करुन घेऊन आमच्याकडील संगीतांत त्यांचा प्रसार केला.

**सुलभ संगीत**

आमच्या इकडील प्रार्थना संगीताची सहावी आवृत्ति सन १९०१ मध्यें झाली. तेव्हांपासून हें पुस्तक बरेंच बोजड आणि किंमतीनें महाग झालें. रात्रींच्या शाळांच्या विद्यार्थ्यांसाठीं आणि बहुजनसमाजांत ब्रह्मोपासनेचा प्रसार करण्याचे कामीं संगीत पुस्तकें आटोपशीर व स्वस्त दराचीं असणें आवश्यक झालें. म्हणून ब्राह्मो पोस्टल मिशनच्याद्वारें सुलभ संगीत या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें. या कामीं माधवराव केळकर यांनीं बरीच मदत केली. डॉ. रुबेन यांच्या भजनामुळें सिंध प्रांतीय गाणीं इकडील मंडळींना विशेष आवडूं लागलीं. त्यामुळें प्रेमलहरी नांवाचें एक छोटेंसें पुस्तक प्रसिद्ध केलें. उपासनेच्या वेळचें संगीत भगिनी मंडळींनीं म्हणावें आणि उपासनेच्या पूर्वींच्या वेळचें भजन तरुणांनीं म्हणावें असा प्रघात पडूं लागला. या बाबतींत सय्यद अबदुल कादर यांनीं पुढाकार घेतला. त्या वेळीं त्यांची प्रथम पत्नी वारली असल्यामुळें त्यांच्या मनाची स्थिति विरक्त झाली होती. ‘अपने हरीकी मैं जोगन बनी’ हें पद म्हणतांना ते गहिंवरून जात. ह्या सुलभ संगीत पुस्तकाची

लोकप्रियता इतकी वाढली कीं, पुढें त्याच्या पांच आवृत्त्या निघाल्या; आणि बहुजनसमाजांतच नव्हे तर प्रत्यक्ष प्रार्थना समाजाचे उपासनेच्या वेळीं आतां हींच पुस्तकें उपासकांच्या हातीं बहुतेक दिसत आहेत. आतां हें भजनाचें काम व पोस्टल मिशनचें काम प्रार्थना समाजाचे चिटणीस व राममोहन राय हायस्कूलचे शिक्षक रा. वेलिनकर यांनीं चालवलें आहे. पूर्वींच्या पिढींत हें भजनाचें आणि गाण्याचें काम रा. गणपतराव आंजर्लेकर हरिकीर्तनाचें आणि उपासनेचे वेळीं दादासाहेब भांडारकरांचे मागें राहून चालवीत असत.

---

# प्रकरण ५ वें

## घरच्या अडचणी

**बहिण चंद्राक्का**

समाजाच्या स्थानिक कामाला अशा रीतीनें रंग चढला पण इकडे घरच्या मंडळींची हलाखीची स्थिति वाढत चालली. जमखिंडीसारख्या खुल्या हवेच्या आणि साध्या राहणीच्या बाहेर गांवाहून आलेल्या आमच्या मंडळींना मुंबईची दाट वस्ती व कोंदट हवा नीट मानवेना. माझी पत्नी सौ. रुक्मिणीबाई हिला १९०४ आक्टोबरचे सुमारास तिसरा मुलगा विश्वास झाला. ह्या बाळंतपणापासून तिची प्रकृति खालावली. आईबाप वृद्ध आणि बहिणी शाळेंत जाणाऱ्या किंवा सार्वजनिक कामांत पडणाऱ्या म्हणून घरकामावरचा सारा भार माझ्या पत्नीवरच पडल्यामुळें तिची तारां-

बळ उडालें. अशा स्थितींत माझी धाकटी बहिण चंद्राक्का हिला क्षयाची भावना जडली. १९०१ सालीं माझे मित्र वासुदेवराव सुखटणकर यांची बहिण शांताबाई ही माझे बहिणीसह पुण्याचे हुजुरपागेच्या हायस्कूलमध्यें शिकत होती. ती प्रकृतीनें फार अशक्त होती. सुखटणकरांची आई वारल्यामुळें तिची काळजी घेण्यास घरीं कोणी नव्हतें. पुढें तिला क्षयाची भावना झाली म्हणून आमचे घरीं जमखिंडी येथें हवापालटीसाठीं नेण्यांत आलें. पुढें ती त्याच रोगानें वारली. माझी बहिण चंद्राक्का ही नेहमीं तिच्या सहवासांत व शुश्रूषेंत असल्यामुळें आणि पुढें मुंबईतील कोंदट हवेचा तिच्यावर परिणाम झाल्यानें तिला तोच रोग जडला. माझ्या वृद्ध आईबापांस ही एक चिंता उपस्थित झाली. १९०५ च्या उन्हाळ्याचे आरंभीं माझे बाबा चंद्राक्काला घेऊन खंडाळ्याला हवाफेरीसाठीं राहूं लागले. तेथून पुण्यास वेताळ पेठेंतील भाजेकरांच्या वाड्यांत स्थानांतर केलें. मी मुंबईहून जाऊन येऊन रहात होतों. या वर्षीं मी पुण्यांतच जास्त राहून तेथील समाजाचे कामांत मदत करूं लागलों.

**रात्रींची शाळा**

ह्या सालांतील रामनवमीच्या दिवशीं पुणें येथील मीठगंज पेठेंत अस्पृश्यांसाठीं एक रात्रीची शाळा उघडली. त्यावेळीं जनाक्का व तान्याक्का उन्हाळ्याच्या सुटीनिमित्त घरीं आल्या होत्या. शाळा उघडण्याचा समारंभ झाला; त्यांत हुजुरपागेंतील बऱ्याच मुली हजर होत्या. भिजलेली डाळ व उसाचा रस वाटण्यांत आला. हा समारंभ भाजेकरांचे वाड्यांतच करण्यांत आला. समारंभास कांहीं ख्रिश्चन मुली हजर होत्या. त्यांतील एक मुलगी उसाच्या रसांत थुंकली आहे अशी खोटी हूल इतरांनीं उठविली. त्यामुळें समारंभाचा बराच विरस झाला. या अपशकुनामुळें या शाळेंत पुढें वेळोवेळीं अडचणी येऊं लागल्या. ही शाळा पुणें प्रार्थना समाजाच्या स्वाधीन करण्यांत आली आणि अखेरीस पुढें निघालेल्या डिप्रेस्ड क्लास मिशनमध्यें सामील करण्यांत आली.

सुबोध-पत्रिकेच्या ता. १९–३–१९०५ च्या अंकांत खालील इंग्रजी मजकूर आहे :

A friend writing from Poona says that the presence of Mr. V. R. Shinde there, is infusing a new spirit in the Prarthana Samaj of that town. He has within the short time that he has been there, organised a Sangat Sabha which meets on every Wednesday from 6 to 7 p. m. The Liberal Religious Reading Class which is conducted by him and where at present he is reading Armstrong's 'God and the Soul' with the pupils, meets in the Prarthana Samaj every Friday evening and is attended on an average by 16 students from the Fergusson, Deccan and Science colleges. Mr. Shinde has opened similar classes in the first two Colleges but they will have to be closed when the college classes break up for the Summer vacation. Besides this as a result of his labour the Tukaram Society, presided over by Dr. Bhandarkar has begun to meet regularly. Mr. Shinde is trying to open an Arya Mahila Samaj on the lines of Bombay. Altogether, Poona Prarthana Samaj affairs are showing a life which our friend hopes will continue for a long time to come.

**नियमांची गडबड**

चंद्राकाच्या प्रकृतींत कांहीं केल्या उतार पडेना तिला म्हणून तिला अहमदनगरच्या कोरड्या हवेंत न्यावें लागलें. वांसरामागील गाईप्रमाणें वृद्ध आईबाप बरोबर होतेच. नगरांत हा प्रकार तर मुंबईत सौभाग्यवतीची तब्येत अधिकाधिक बिघडत चालली होती. तशांत तिसरा मुलगा ऑक्टोबर महिन्यांत

बारला, म्हणून चि. जनाकास मुंबईस आणावें लागलें. तिलाहि त्याच वेळीं प्लुरसीची (Pleuricy) व्यथा जडली. अशा भौतिक अडचणींत माझें मन उद्विग्न होण्यास आणखी एक कारण घडलें. माझ्या प्रचारकार्यावर नियंत्रण पडावें म्हणून स्वतंत्र नियमांची एक रचना करण्याचें घाटूं लागलें. त्याचेसाठीं एक पोटकमिटी नेमून तिच्या तंत्रानें प्रचारकानें वागावें अशी घाटाघाट सुरू झाली. हें माझ्या स्वतंत्र प्रकृतीला पटेना. आधीं काम करावें मग अनुभव घ्यावा; आणि नंतर योग्य वेळीं नियम करावे हा स्वाभाविक क्रम मला बरा वाटूं लागला. एकीकडे पैशाची तरतूद नाहीं, दुसरीकडे कामाचा अंदाज नीट नाहीं अशा स्थितींत शाब्दिक नियमांची गडबड मला अवेळीं आहे असें वाटूं लागलें. सुखटणकरांचीं पत्रें याच बाबतींत अनुकूल अशीं जर्मनींतून येत असत. समतोल बुद्धीनें प्रत्येक नियमावर त्यांनीं अभिप्राय दिला. प्रचारकानें सभासदांच्या घरीं गृह्यसंहार चालविण्याचें काम समाजानें ठरविलेल्या संस्कारासंबंधानेंच करावें अशा अर्थाचा एक नियम होता. ब्राह्मसमाजाच्या स्वातंत्र्याला हा नियम बाधक होता, म्हणून तो वगळावा असें सुखटणकरांचें मत पडलें. मला हा सर्व घाटच अनवश्यक आणि उगाच चालू गाड्यांत खीळ घालणारा वाटून माझें मन उद्विग्न झालें. मीं माझ्या कामाची डायरीच ठेवावी, वरचेवर अहवाल द्यावा वगैरे पिरपिर सुरू झाली. माझ्या कामाच्या ओघांत मी हीं कामें स्वयं-स्फूर्तीनें प्रथमपासूनच करीत होतों, पण अमक्याच वेळीं व अमक्याच पद्धतीनें तीं व्हावींत ह्या नियमांमुळें माझ्यावर अनवश्यक कामाचा बोजा पडूं लागला. आणि पुढें पुढें हा मतभेद अधिक वाढीस लागला.

# प्रकरण ६ वें

## दक्षिण महाराष्ट्रांतील दौरा

**नाशीक**

अशा वेळीं माझ्या मुलाच्या मृत्यूमुळें मीं वैतागून मनःशांतीसाठीं महाराष्ट्रांत व कर्नाटकांत दौरा काढला. बरोबर डॉ. रुबेन व स्वामी स्वात्मानंदजी यांना घेतलें. प्रथम ठाण्यास उतरलों. तेथें डॉ. संतुजी रामजी लाड यांचे घरीं राहून उपासना चालविली. जाहीर व्याख्यान झालें. त्यांत तेथील सभासद रा. गुते यांनीं भाग घेतला. त्यानंतर नाशीक येथें तेथील सुप्रसिद्ध वकील माझे मित्र रा. निळकंठराव पाटणकर यांचेकडे उतरलों. जाहीर व्याख्यानें व खासगी संभाषणें सुरू झालीं. पण सर्वांत डॉ. रुबेनचें भजन लोकप्रिय ठरलें. भजनमार्गांत फारसा शुद्ध बुद्धिवाद किंवा रुक्ष प्रयत्नवाद आम्हा हिंदु लोकांना मानवत नाहीं. भक्तिरसाच्या पुरांत वहात जाणें आवडतें. रुबेननें एकतारीवरील भजनांत कांहींहि मत प्रतिपादलें तरी चालेल; एरव्ही खटखट नको असें एका पुढाऱ्यानें स्पष्ट सांगितलें. रा. पाटणकरांचे ओळखीनें व सूचनेवरून नाशीक जिल्ह्यांतील आसवले येथें राहणाऱ्या अस्पृश्यवर्गाच्या श्रीमंत पुढाऱ्याकडे गेलों. पण आम्हां तिघांचा हा विचित्र प्रवेश पाहून आम्ही कांहीं तरी मागावयाला भिकार बैरागीच आलों अशी समजूत करून घेऊन मुख्य मालक आम्हांस घराबाहेर भेटावयासच आला नाहीं. आम्हीं कंटाळून नदीवर जाऊन स्नान वगैरे उरकलें. खावयास वगैरे आमच्या जवळ उन्हाशिवाय कांहींच नव्हतें. मुकाट्यानें आम्हीं अहमद-

नगराची वाट धरली. पुढें रा. पाटणकरांनीं या गृहस्थाची चांगलीच हजेरी घेतली.

**पंढरपूर**

अहमदनगरचें काम आटोपून आम्ही बारामतीस आलों. डॉ. रुबेननीं अहमदनगराहूनच आमची रजा घेतली. आणि त्यांची जागा रा. लक्ष्मण मनकू सतूर यांनीं घेतली. बारामतीला ब्राह्मधर्माचा प्रसार अगदीं नवीन होता. बैलगाडीनें आम्ही तिथून पंढरपुरास गेलों. तेथें प्रार्थना समाजाच्या बालहत्या-प्रतिबंधक गृहांत उतरलों. तेथील हायस्कूलचे प्रमुख रा. मोडक आमच्या परिचयाचे होते. स्वात्मानंदजीचें व माझें अशीं दोन व्याख्यानें दोन दिवशीं स्वारीनें जाहिराती लावून आपल्या शाळेंत केलीं. पण आयत्यावेळीं पाहतों तों या स्वारीचा डाव भलताच होता. अर्धा तास उलटून गेला तरी शाळेंत एक चिटपाखरूंहि आलें नाहीं. हेडमास्तरांनीं आपल्या विद्यार्थ्यांकडून ठिकठिकाणीं नाकेबंदी केल्यामुळें आमचा हा कोंडमारा झाला. अक्षरशः रिकामीं बाकें आमच्या समोर दिसूं लागलीं. स्वामी स्वात्मानंदजी मोठे करारी. “ शिंदेजी, आज हम व्याख्यान करेंगे. आप सुनीये. कल आप कीजिये और मैं सुनोगा. ” असें म्हणून त्यांनीं संपूर्ण व्याख्यान दिलें. दुसरे दिवशीं मींहि तसेंच केलें. हें पंढरीमहात्म्य ! “ हा तो कांहीं नव्हे निराशेचा गांव। भले पोटीं वाव राखिलीया ॥ ” पुढें सोलापुरास सरकारी वकील रा. नागेश पै यांचेकडे उतरलों. तेथील रिपन क्लबांत व्याख्यान झालें. पंढरपूरच्या उलट प्रकार घडला. व्याख्यानावर चांगली चर्चा झाली. विजापुरांत रा. आजरेकर वकिलांच्याकडे उतरलों. तेथील एका थिएटरांत व्याख्यान झालें. आमच्या-बरोबर ब्राह्मो पोस्टल मिशनच्या पत्रिकांचा व पुस्तकांचा गठ्ठा होताच. ही सामुग्री आम्ही सढळ हातानें वाटीत चाललों. हुबळीस सर नारायण चंदावरकरांचे व्याही रा. नारायणराव शिरूर यांचा कळकळीचा पाहुणचार

घेतला. म्युनिसिपल हॉलमध्यें व्याख्यान झालें. धारवाडांत उतरण्याची विवंचना पडली. तेथील माझे बालमित्र रा. जनार्दन सखाराम करंदीकर यांची गांठ पडली. त्यांनीं उतरण्याची व कामाची उत्तम व्यवस्था केली. बेळगांवास आम्ही मणेरीकर यांचेकडे उतरून त्यानंतर पुण्याहून मुंबईस आलों.

**तांतडीची तार**

घरीं परत येईतोंपर्यंत मंडळींचा आजार वाढला होता. अशा घाईत काशी येथील भारतीय एकेश्वरी धर्मपरिषदेची कामगिरी अंगावर घ्यावीच लागली. पुढील नाताळांत तें काम आटोपून बंगाल, बिहार, आसामच्या लांब दौऱ्यावर निघालों. शेवटीं बारीसाल येथें जाहीर व्याख्यान करीत असतां घरून एक तांतडीची तार हातीं आली. मुंबईस सौ. रुक्मिणीबाई हिच्यावर कामा हॉस्पिटलमध्यें एक कठीण ऑपरेशन झालें, आणि अहमदनगर येथें बहिण चंद्राक्का मृत्युशय्येवर पडली आहे असा मजकूर होता. डॉ. वैकुंठ कामत यांनीं ही तार केली होती. जवळजवळ तीन हजार मैलांचा दौरा टाकून मी तांतडीनें घरीं निघालों. रात्रीं १२ वाजतां अहमदनगर येथें पोहोंचलों. प्रिय भगिनीचें शेवटचें दर्शन घेऊन मी पुन्हां येतों असें आश्वासन देऊन पत्नीच्या समाचारास मुंबईस गेलों. दुसरे दिवशीं चंद्राक्काच्या निधनाची बातमी आली. १९०६ चा फेब्रुवारी तारीख दोन हा दिवस. ह्याचें नांव प्रचारकार्य !

**उदार धर्मवाचन-वर्ग**

ता. १२ फेब्रुवारी १९०४ रोजीं ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरियन असोसिएशनचे सेक्रेटरी यांचेकडून पत्र आलें. त्यांत सेंट्रल पोस्टल मिशन, लंडन या संस्थेनें प्रार्थना समाजामार्फत ह्या मिशनचें कार्य यशस्वी रीतीनें चालविल्याबद्दल शिंदे आणि सुखटणकर यांचे अभि-

नंदनाचा ठराव पास केला. त्यानंतर ता. १८ ऑक्टोबर १९०४ रोजीं वरील संस्थेकडून दुसरें पत्र येऊन त्यांत ह्याच कामाचा विस्तार करण्यासाठीं उदार धर्मवाचक ग्रंथांचा एक विशेष वर्ग चालवून त्यांत विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना पारितोषिकें देण्याची व्यवस्था केल्यास तूर्त १०० रु.ची देणगी पाठवूं काय असें विचारलें होतें.

कलकत्त्यास हेमचंद्र सरकारनें असा वर्ग काढून त्यांना अशी देणगी देण्यांत आली होती. उदार धर्मवाङ्मयाचा प्रसार हिंदुस्थानांत अधिक प्रमाणावर करण्यासाठीं ब्रिटिश अँड फॉरेन युनिटेरियन असोसिएशनचा प्रतिनिधी या नात्यानें काम चालविण्यास माझीं इतर कामें संभाळून मी तयार आहें कीं नाहीं हें विचारलें होतें. तयार असल्यास वाङ्मयाचा अधिक सांठा गरजेप्रमाणें पुरविण्याची हमी घेतली होती. त्यासाठीं जो खर्च होईल तोहि वेळोवेळीं रोख पाठविण्याची कबुली दिली होती. त्यांना मीं उत्तरीं कळविलें कीं, 'मीं हा विशेष वर्ग चालविण्याचें कार्य आधींच सुरू केलें होतें. ह्या वर्गांतील हजेरीपटावर सुमारें ३० अंडर ग्रॅज्युएट्‌चीं नांवें होतीं. तूर्त विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत गुंतले असल्यामुळें हा वर्ग बंद ठेवण्यांत आला आहे. योग्य वेळीं सालोसाल तो पुढें चालू होईल.' ही व्यवस्था कित्येक वर्षें चालू ठेवण्यांत आली, त्यामुळें तरुणांचें लक्ष समाजाचे कामाकडे विशेष लागलें.

---

# प्रकरण ७ वें

## स्थानिक समाज

मुंबई शहराशिवाय महाराष्ट्रांत पुणें, सातारा, अहमदनगर, गुजराथेंत अहमदाबाद, बडोदें, आणि माळव्यांत इंदूर वगैरे ठिकाणीं प्रार्थना समाजाचे

स्थानिक समाज आहेत. ह्यांचे सालोसाल वार्षिक उत्सवाचे समारंभ होत असतात. ते जवळ जवळ आठवडाभर चालत असतात. त्यांत भाग घेण्यास मला जावें लागे.

**सातारा समाज**

१९०५ सालच्या उन्हाळ्यांत सातारा येथील उत्सवासाठीं मी गेलों. रा. सीतारामपंत जव्हेरे हे ह्या समाजाचें काम कळकळीनें चालवीत असत. रा. रा. काळे, रा. मोरोपंत जोशी व त्यांची कन्या मथुराबाई वगैरे मंडळी त्यांना मदत करीत असत. भजन, उपासना, व्याख्यानें हीं कार्य-क्रमांतील ठराविक कामें झाल्यावर तेथील लष्करांत अस्पृश्य लोकांच्या सैनिकांकरतां एक विशेष व्याख्यान झालें. गांवांत अस्पृश्यांसाठीं एक शाळा उघडण्यांत आली. साताऱ्याहून पांच मैलांवर वर्णे नांवाचें एक खेडें आहे. तेथील सबरजिस्ट्रार रा. बापुजी बचाजी शिंदे यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. गणपतराव शिंदे यांनीं मुद्दाम बोलावून नेलें. खेड्यांतील लोकांसाठीं भजन, उपासना करविल्या. लोकांमध्यें वाटण्यासाठीं पोस्टल मिशनचें वाङ्मय पाठविण्यांत आलें. पुढील एका वर्षी डॉ. भांडारकर, गणपतराव आंजर्लेकर, स्वामी स्वात्मानंद, गणपतराव कोटकर, श्रीमती जनाबाई शिंदे वगैरे मंडळींसह साताऱ्यास गेलों. उत्सव थाटाचा झाला. यवतेश्वराच्या डोंगरावर वनोपासना झाली.

**अहमदनगर समाज**

१९०६ सालीं अहमदनगर समाजांत उत्सवासाठीं गेलों. तेथील साळी समाजाचे प्रमुख पुढारी रा. सहदेवराव बागडे या समाजाचा पुढाकार घेऊन काम चालवीत. यांच्या वजनामुळें समाजांत बरेच साळी जातीचे लोक येत असत. शंकर पांडुरंग पंडित, लालशंकर उमियाशंकर वगैरे

विद्वानांच्या प्रोत्साहनानें नगर येथें स्वतंत्र मंदिर बांधण्यांत आलें होतें. इ. स. १९०५ सालापासून पुढें मी या समाजाला मधून मधून जाऊं लागलों. त्यावेळीं व पुढें संत, हिवरगांवकर, धनेश्वर, ऋषि वगैरे तरुण मंडळींनीं समाजाचें काम नेटानें चालविलें होतें. फ्रेंड्स लिबरल असोसिएशन नांवाची संस्था स्थापन होऊन तिच्या विद्यमानें समाजाबाहेरहि व्याख्यानें देण्याचा उपक्रम तेव्हां झाला. पण समाजाचा मुख्य भार त्यावेळीं प. वा. सहदेवराव बागडे यांच्यावरच पडला होता. त्यांच्या साह्यानें एक स्पृश्यांसाठीं व एक अस्पृश्यांसाठीं अशा दोन रात्रींच्या शाळा काढण्यांत आल्या. पुढें कांहीं वर्षांनीं त्या बंद पडल्या.

**सोनईची चळवळ**

पुढें १९०८ सालीं अहमदनगरास गेलों असतां सोनई येथें मोठी चळवळ झाली. तेथील खेड्यांतील लोकांचें एक शिष्टमंडळ मला तेथें नेण्यास आलें. ही सत्यशोधक मंडळी होती. तेथील स्थानिक ब्राह्मण मंडळीशीं कांहीं वाद माजून आसपासच्या बऱ्याच खेड्यांत असंतोष उत्पन्न झाला होता. जातीजातींत सामाजिक बाबतींत वैमनस्य माजलें असतां त्यांच्यांत सलोखा घडवून आणून उदार धर्माच्या चळवळीकडे लक्ष लावणें हें प्रार्थना समाजाचें ब्रीद आहे म्हणून मी सोनई येथें गेलों. तेथील ओढ्याच्या कांठीं वाळवंटांत प्रचंड जाहीर सभा भरली. निरनिराळ्या खेड्यांतून सर्व जातींची हजारों मंडळी जमली होती. प्रत्येक जातीचे दोन दोन प्रतिनिधी घेऊन एक साधारण समिती बनाविण्यांत आली. त्यांत ब्राह्मणांचेहि दोन प्रतिनिधी घेण्यांत आले. सत्यसमाज हें नांव ह्या नवीन चळवळीला देण्यांत आलें. एक दोन वर्षें काम चालल्यावर सोनई येथील दोन पाटील घराण्यांत वितुष्ट आल्यानें ह्या नवीन चळवळीचा लोप झाला.

**इंदूर**

१९०७ सालीं मी इंदूरास समाजाचे उत्सवास गेलों. बरोबर माझी पत्नी सौ. रुक्मिणीबाई आणि सहकारी स्वात्मानंद हे होते. इंदूर समाजाचें नांव मध्यभारतवर्षीय ब्राह्मसमाज असें आहे. डॉ. प्रभाकरपंत भांडारकर, होळकर कॉलेजचे प्रो. देसाई, तेथील प्रसिद्ध पाटकर-जाधव यांचें घराणें, चित्रकार मिटबावकर ह्यांचा या समाजांत मोठा पुढाकार असे. ही सर्व मंडळी अनुष्ठानिक असून समाजाचें कार्य जोरांत चाललें होतें. रा. सदाशिवराव केळकरहि तेथेंच होते. ह्या उत्सवांत नगरसंकीर्तनाचें कार्य थाटाचें झालें. शेवटीं नगराबाहेर वनोपासनेंत प्रीतिभोजनाचा समारंभहि गोड झाला. ता. २४ एप्रिल १९०७ रोजीं तेथील कांहीं पुढारी मंडळींच्या मदतीनें एक कमिटी स्थापन करून अस्पृश्यांसाठीं ता. ५ मे. १९०७ रोजीं एक संस्था उघडण्यांत आली. होळकर कॉलेजचे प्रो. गोखले हे व्हाइस प्रेसिडेन्ट, रामचंद्रराव मिटबावकर हे सेक्रेटरी होते. ह्या समाजाचें एक सुंदर ब्राह्ममंदिर आहे. तेथील पाटकर जाधव घराण्यांतील मंडळींची समाजाला फार मदत होती. त्यांचें होळकर दरबारांत वजन असल्यानें श्रीमंत तुकोजीराव महाराजांचें व विशेषतः सीताबाई होळकर यांचें समाजाकडे लक्ष लागलें. महाराजांकडून या समाजास दरमहा ३० रु. चें वर्षासनहि मिळत असतें.

**मांडवगड**

उत्सव आटोपल्यावर जाधव मंडळींनीं धार, मांडवगड, महू वगैरे प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठीं बैलगाडींतून सफर काढली. माझ्या पत्नीलाहि घेऊन मी त्या सफरीस गेलों. धार येथील प्रसिद्ध किल्ला आणि तेथील प्राचीन राज्याचे अवशेष पाहून आनंद झाला. विंध्याद्रीच्या शिखरावर मांडवगड ही मध्ययुगीन मुसलमान बादशहांची राजधानी होती. तेथें

दहा वीस मोठमोठ्या मशिदी, देवळें आणि राजमहाल हीं फार प्रेक्षणीय दिसलीं. मध्ययुगीन राजा बाझबहादूर व रूपमती यांच्या प्रेमाचीं स्थळें पाहण्यांत आलीं. यानंतर नार्सिंगचें शिक्षण घेण्यासाठीं सौ. रुक्मिणी-बाईस कांहीं महिने इंदूरास जाधव मंडळीकडे ठेवून मी मुंबईस आलों. तुकोजीराव महाराजांची दाई व बाळकृष्णपंत जाधव यांची पत्नी सौ. अहिल्याबाई या फार चारित्र्यवान व थोर मनाच्या बाई होत्या. त्यांच्या प्रेमळ सहवासांत रुक्मिणीबाईना मोठा लाभ घडला.

**नवसारी**

रा. ब. हरी रामचंद्र शिंदे, बडोदा स्टेट इंजिनियर यांनीं ३० ऑक्टोबर १८९८ रोजीं नवसारी येथें प्रार्थना समाज स्थापला. त्यांत रा. ब. शिंदे आणि रा. मोतीलाल ए. मुनशी, हायकोर्ट वकील यांनीं पुढाकार घेतला. प्रथम पंधरा सभासद होते. तें १९०४ सालीं चाळीस झाले. प्लेगमुळें या समाजाचे कामांत दरवर्षी चार चार महिने खंड पडतो. पहिला जाहीर उत्सव १९०० सालीं, दुसरा १९०३ सालीं झाला. चवथा १९०४ ऑगस्टमध्यें झाला व त्यांत मीं भाग घेतला होता. १९०३ सालांत श्रीमंत सयाजीराव महाराजांचे बंधु श्रीमंत संपतराव गायकवाड यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. १९०४ च्या उत्सवांत शनिवार-रविवारीं उपासना व व्याख्यानें मीं केलीं. समाजाचे हेतू व कार्याचें स्पष्टीकरण केलें. सुभासाहेब रा. ब. खासेराव जाधव यांनीं सुंदर भाषण करून धार्मिक शिक्षणाची आवश्यकता सांगितली. मीं समाजाला एक ग्रंथालय असावें अशी सूचना करून तिची सुरुवात म्हणून मुंबईहून कांहीं पुस्तकें पाठविलीं.

**सोनगड**

नवसारी प्रांतांतील जंगलामध्यें सोनगड म्हणून एक गांव आहे. तेथें एक समाज चांगला चालला होता. त्यांतील कित्येक प्रतिनिधि खास आमंत्रणावरून येथून नवसारीच्या उत्सवास आले होते. पुढील वर्षी सोनगड येथील समाजास मीं भेट दिली. येथें बडोदा संस्थानचे शेतकी खात्याचें एक केंद्र आहे. या प्रांतांतील ढाणके नांवाच्या जंगली जातीच्या लोकांच्या शिक्षणाची येथें सोय आहे. श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं कृपावंत होऊन ह्या जातीच्या मुलांसाठीं व मुलींसाठीं दोन नमुनेदार वसतिगृहें उघडलीं होतीं. तीं पाहून महाराजांच्या उदार अंतःकरणाची साक्ष पटली. प्रत्येक वसतिगृहांत ५० विद्यार्थ्यांची सोय केली होती. मागासलेल्या लोकांसाठीं शिक्षण देतांना मुलांप्रमाणेंच मुलींची व्यवस्था करण्याला महाराज कधीं विसरत नसत. मुलांना शिकवून मुलींना अडाणी ठेवण्यांत त्या त्या समाजाला धोका आहे हें महाराजांनीं प्रथमच जाणलें. या वसतिगृहाचे चालक रा. फत्तेखान नांवाचे मुसलमान गृहस्थ मोठ्या कळकळीनें काम करीत होते. हे प्रार्थना समाजाचे सभासद असून या गांवीं एक स्वतंत्र प्रार्थना समाजहि चालवीत होते. त्यांनीं या चळवळीचा कसा आरंभ झाला याविषयीं एक मनोरंजक गोष्ट कथन केली. श्रीमंत सरकार सर सयाजीराव महाराज या प्रांतांतील ढाणके नांवाच्या मागासलेल्या जातीची परिस्थिति स्वतः निरीक्षण्यास आले असतां ठिकठिकाणीं त्यांच्यापैकीं कोणीच महाराजांना दिसेनात. हें गूढ काय आहे याचा तपास केल्यावर पुरुष, बायका व मुलें हीं सर्व झाडावर उंच चढून बसलेलीं दिसलीं. महाराज आणि त्यांच्या परिवाराला पाहून ते आपल्यास धरून नेतील या भीतीनें, त्या बिचाऱ्यांनीं असें केलें होतें. हें दृश्य पाहून ह्या लोकांची सुधारणा अवश्य केली पाहिजे असा त्यांनीं निश्चय केला. त्याचें

फळ या संस्था आहेत असें फत्तेखानांनीं गर्हिवरून सांगितलें. धन्य महाराज !!

**बडोदें**

१९०३ सालीं मी विलायतेहून परत येण्यापूर्वीं श्रीमंत सयाजीराव महाराज यांचेकडून पत्र आलें होतें कीं, स्वदेशीं आल्यावर प्रथम त्यांना भेटावें. याप्रमाणें मी त्यांना स्वदेशीं आल्यावर १९०३ च्या आक्टोबरांत भेटण्यास गेलों. त्यावेळीं अस्पृश्यांसाठीं बडोद्यांत चार प्राथमिक शाळा होत्या. त्या मीं तपासून पाहण्यासाठीं तजवीज करावी असें महाराजांनीं विद्याधिकाऱ्यांस फर्मावलें. तपासून कांहीं सूचना करावयाच्या असल्यास महाराजांना समक्ष करावयास सांगितलें. सर्व शाळा जोरांत चालल्या होत्या. परंतु प्राथमिक शिक्षण संपल्यावर मुलांना पुढें वाव नसल्यानें तीं मोकळीं हिंडत होतीं. पुस्तकी शिक्षणामुळें तीं आपल्या वडिलांचे हलके धंदे करण्यास असमर्थ आणि नाखूष होतीं. मीं ही गोष्ट महाराजांचे कानीं घालून मुलांच्या नोकरीविषयीं कांहीं झाल्यास करावें, अशी सूचना केली. धोरणी महाराजांनीं लोकमत अनुकूल नसल्यानें तूर्त हें शक्य नाहीं असें सांगितलें. पण शिष्यवृत्त्या देऊन पुढील शिक्षणाची सोय करण्याचें कबूल केलें, आणि त्याप्रमाणें तशी व्यवस्था पण झाली.

**मराठ्यांकडून स्वागत**

बडोदें गांवांतील प्रमुख मराठे मंडळींनीं माझें स्वागत करून पानसुपारीचा एक जाहीर समारंभ केला. श्रीमंत खासेराव जाधव यांचा या बाबतींत पुढाकार होता. पण एकामागून एक जीं वक्त्यांचीं भाषणें झालीं त्यांतून प्रतिकूल सूरच निघूं लागले. माझें सर्व शिक्षण मराठा समाजाचे खर्चांतून झाल्यानें व विलायतेला जाण्यायेण्याचा खर्चहि महाराजांकडून मिळाला असतां मी मराठासमाजाच्या सेवेला हजर



१८२६९

न होतां प्रार्थना समाजांत शिरलों हें बरें केलें नाहीं. अशीं भाषणें करून माझ्या गळ्यांत माळ घालावयास मंडळी जेव्हां पुढें आली तेव्हां उत्तर देतांना मीं म्हटलें कीं, "असें जर आहे तर मी ही माळ घालण्यास लायक नाहीं, म्हणून ती हातांतच घेत आहे. प्रार्थना समाज सर्वांसाठींच आहे, आणि त्यासाठीं मला तयार केलें हें मराठ्यांस, विशेषतः महाराजांना भूषणावह आहे. स्वतः महाराज हेच जर केवळ मराठ्यां-करितां नाहींत तर त्यांचा अनुयायी मी निराळा कसा होऊं ?"

१९०४ सालीं कॉंग्रेसचें अधिवेशन मुंबईस ठरलें. सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान या वर्षीं महाराजांना द्यावयाचें ठरलें होतें. ह्याच वेळीं एके-श्वरी धर्माच्या परिषदेची पुनर्घटना करून तिचें अधिवेशन मुंबईस करण्याचे कामीं मीं पुढाकार घेतला होता. त्या वेळीं मुंबई प्रार्थना समाजास भेट द्यावी व समाजाच्या रात्रीच्या शाळांच्या बक्षिस-समारंभामध्यें अध्यक्षस्थान स्वीकारावें म्हणून महाराजांना आमंत्रण करण्यासाठीं मी बडोद्यास डिसेंबर १९०४ मध्यें गेलों. त्यावेळीं तेथील हायकोर्टचे जज्ज डॉ. भांडारकर यांचे बंधु श्री. वासुदेवराव गोपाळराव भांडारकर हे होते. त्यांचेकडे मी उत-रलों. हे प्रार्थना समाजाचे सभासद होते. शेठ हरगोविंददास कांटावाला वगैरे जुन्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं बडोद्यास एक प्रार्थना समाज चालविला होता. पण त्याचें काम हल्लीं बंद होतें. बडोद्यांतील जयसिंगराव स्टेट लायब्ररी-मध्यें महाराजांच्या आज्ञेनें माझें जाहीर व्याख्यान करविण्यांत आलें. महा-राजांनीं मुंबईस समाजाचे परिषदेच्या कामांत भाग घेण्याचें मान्य केलें.

**मंगळूर**

सन १९०७ च्या आक्टोबर अखेरीस हिंदुस्थानच्या नैऋत्य किनाऱ्या-वरील मंगळूर शहरांतील ब्राह्मसमाजाकडून मला तिकडे नेण्यासाठीं त्या समाजाचे एक सभासद रा. व्यंकटाप्पा कांताप्पा मुंबईस आले. मी व

चि. जनाक्का श्री. व्यंकटाप्पाबरोबर आगबोटीनें निघालों. मंगळूरला पोहोंचल्यावर समाजाचे अक्षरशः सर्व सभासद स्त्रीपुरुष आणि मुलें माझें स्वागत करण्यासाठीं बंदरावर आले होते. मंगळूर हें बंदर उतरण्यास कठीण असल्यामुळें आगबोट बंदरापासून लांब थांबते. लहानशा मचव्यांतून उतारूंना बंदरावर पोहोंचाविण्यांत येतें. ही सर्व मंडळी माझ्यासाठीं कितीतरी वेळ उन्हांत तिष्ठत होती. त्यांचें हार्दिक स्वागत पाहून आम्हांला गहिंवर आला. वृद्ध अध्यक्ष उल्लाळ रघुनाथय्या, चिटणीस के. रंगराव, खजिनदार कृष्णराव गांगुली, कर्नाड सदाशिवराव व आणखी कांहीं थोडीं सारस्वत ब्राह्मण घराणीं होतीं. बाकी सर्व तिकडील प्रांतांतील बिल्लव जातीचे सभासद होते. ही जात तिकडे अस्पृश्य मानलेली होती. पण तो आश्रम पालटून ब्राम्हसमाजांत प्रवेश झाल्यावर हे सर्व सभासद सर्रास वरिष्ठ वर्गांत मोडूं लागले. यामुळें ह्या ब्राह्मसमाजाचा पूर्वेतिहास फार मनोरंजक आणि उद्बोधक झाला आहे. ब्राह्मसमाजाच्या प्रसारामध्यें या प्रांतांतील कामानें फार वरचा नंबर पटकावला आहे.

ब्रह्मानंद केशवचंद्र सेनच्या अमदानींत त्यांचे पट्टशिष्य प्रतापचंद्र मुझुमदारांनीं ह्या कामीं पुढाकार घेतला होता. त्यावेळीं बिल्लव जातीचे पुढारी आलसाप्पा नांवाचे वजनदार गृहस्थ हे होते. पांच हजार बिल्लव ब्राह्मसमाजाची दीक्षा घेण्यास तयार आहेत अशी तार त्यांनीं केशवचंद्र सेन यांना केल्यामुळें प्रतापचंद्र यांना पाठविण्यांत आलें. त्यांचें स्वागत करण्यासाठीं बंदरावर ह्या जातीचा प्रचंड समुदाय जमला होता. पण प्रतापचंद्र मुझुमदार महाशय अस्सल इंग्रजी पोशाखांत जेव्हां मचव्यांतून बंदरावर उतरले तेव्हां त्यांना पाहून हा जमलेला समाज बिचकला. हे कुणीतरी खिस्ती मिशनरी आपणांस बाटाविण्यांस आले अशी धास्ती घेऊन सगळया गर्दीची

**समाजाची स्थापना**

पांगापांग झाली. आणि बिचाऱ्या आलसाप्पाजवळ कोणी उरला नाहीं. प्रतापचंद्रांनीं धीर सोडला नाहीं. आलसाप्पा यांच्या घरीं जाऊन उतरले. दुसरे दिवशीं सकाळीं ब्रह्मोपासनेस प्रतापबाबू बसले त्यावेळीं त्यांनीं आपली साधी शुद्ध बंगाली शाल अंगावर घेतली होती. ती त्यांची शुभ्र विपुल दाढी, मोकळ्या डोक्यावरील लांब आणि कुरळे केस हा अस्सल देशी देखावा पाहून आदले दिवशीं उधळून गेलेल्या लोकांस थोडा थोडा धीर येऊं लागला. आपलें इंग्रजींतील अमोघ वक्तृत्व आणि मायाळू प्रचाराचे जोरावर त्यांनीं लवकरच वरिष्ठ आणि कनिष्ठ वर्गांवर छाप बसविली. ब्राह्मसमाजाची स्थापना केली. त्यानंतर नवविधानसमाजाचे अनेक प्रचारक, विशेषतः अमृतलाल बोस, बलदेव नारायण, साधारण ब्राह्मसमाजाचे हेमचंद्र सरकार वगैरेंनीं अमोलिक कामगिरी केली. अमृतलालची शिस्त, बलदेव नारायणाचा भक्तिभाव, हेमचंद्रांचें घटनाकौशल्य ह्यांचे ठसे अद्याप दिसत आहेत.' या परंपरेंत मीं या पवित्र भूमीवर पाय ठेवला. सुमारें एक महिना अत्यंत सुखासमाधानानें आम्हीं या बालबोध समाजाची सेवा केली, आणि ती त्यानें गोड करून घेतली. विशेषतः आम्हां दोघां भावंडांना या प्रांताची कानडी भाषा येत असल्यानें या समाजांतील लहान थोर मंडळी आम्हाशीं अगदीं आपुलकीनें बिलगली. आम्हांपासून त्यांना लाभ झाला व त्यांच्यापासून आम्हाला झाला.

ह्या प्रांतीं कोंकणी या नांवाची ब्राह्मणांची एक पोट जात आहे. त्या जातीचे प्रतिनिधी विद्येंत, व्यापारांत व सरकारी नोकरींत पुढारलेले आहेत. त्यांना मराठी भाषेचा फार अभिमान वाटत असे. त्यांनीं माझीं मराठींत व्याख्यानें, उपासना व कीर्तनें मोठ्या आवडीनें करविलीं. रा. सुब्बराव पै या नांवाचे एका प्रेमळ गृहस्थानें एक लहानशी मराठी शाळा काढण्यांत पुढाकार घेतला.

समाजाचे उत्साही चिटणीस के. रंगराव ह्यांनीं अस्पृश्यांच्या उद्धारासाठीं मुंबईच्या निराश्रित मंडळींची सुरुवात होण्यापूर्वीच १८९७ सालीं सुरवात केली होती. मुंबईत गेल्या वर्षीं मी अखिल भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची (All India Depressed Classes Mission) सुरुवात केली होती. म्हणून के. रंगराव यांनीं विशेष उत्साहानें मला बोलावून नेले होते. आजपर्यंत ह्या कामीं ते एकटेच खपत होते. मीं ह्या कामाची पुनर्घटना केली. गांवांतील पांच प्रमुख पुढाऱ्यांची एक कमिटी नेमून के. रंगरावांच्या जोडीला दिली. आणि अखिल भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची ही मंगळूर शाखा म्हणून त्या मंडळीशीं ही संलग्न केली. पुढें हिची वाढ झपाट्यानें झाली. ह्या नैऋत्य किनाऱ्यावरील द्राविड संस्कृति, लोकरिवाज, आश्चर्यकारक इतिहास यांचें निरीक्षण करण्यास बरीच मोठी संधि मिळाली. बऱ्याच वेळां मी या प्रांतीं पुढें निरनिराळ्या कामानिमित्त येऊन गेलों.

**प्रेमाचें भांडण**

आम्हा दोघां भावंडांची उतरण्याची सोय या बिल्लव मंडळींनीं एका स्वतंत्र बंगल्यांत केली होती. तरुण स्वयंसेवक नेहमीं कामाला हजर असत. बिल्लव मंडळीची माझ्यावर अपूर्व भक्ति होती. मला ते आपले गुरु मानून ते आमच्या अर्ध्या वचनांत रहात असत. नरसाप्पा व नारायणाप्पा या नांवाचे दोघे बंधू आमच्या बंगल्यांत सहकुटुंब राहात असत. आमच्या पाहुणचाराची जबाबदारी त्यांच्यावर असे. तो करण्यामध्यें त्यांची केव्हां केव्हां अशी चुरशीची चढाई लागे कीं, "देवा आमचें ह्या शिष्यांपासून रक्षण कर" असें म्हणण्याची आम्हावर पाळी येई. एकदां आमचीं कामें करण्यासाठीं ह्या दोघां भावांचें अक्षरशः मल्लयुद्ध जुंपलें. मी तें सोडविण्यास गेलों असतां त्या दोघांचे आघात माझ्या पाठीवर

पडून ती बरीच तिंबून गेली. कारण ही वेळ पहाटेची असल्यानें अंधारांतच हा प्रकार चालला होता. त्या दिवशींचा स्वयंपाक कोणीं करावा याबद्दल वाद उपस्थित झाला होता. जो तो मी करणार असें अट्टाहासानें म्हणे. उजाडल्यावर माझ्या पाठीवरचे वळ पाहून दोघे भाऊ लहान मुलासारखे स्फुंदून स्फुंदून रडूं लागले. त्यांची समजूत घालण्यास बरीच शक्ति खर्च करावी लागली.

**बिल्लवांची गृहस्थिति**

मंगळूरभोंवतीं सृष्टिसौंदर्य अपूर्व आहे. नद्यांचीं रुंद पात्रें, दोन्ही बाजूला सुंदर रेती व त्यापलीकडे लाल मातीच्या टेकड्या, व त्यावरील गर्द झाडी वगैरे शोभा सर्व ऋतूंत अपूर्व दिसते. अड्यार नांवाच्या जवळच्या एका खेड्याला मीं बोटींतून सफर काढली. बिल्लव जातीचे पुढारी व समाजाचे सभासद व श्रीयुत व्यंकटाप्पा बोळार या नांवाचे पोलीस अधिकारी बरोबर होते. त्यांनीं ह्या सफरीची सर्व सोय केली होती. आम्ही जंगलांत राहणाऱ्या बिल्लव जातीच्या गृहस्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं एका घरांत शिरलों. मोठमोठ्या जमीनदारीच्या जमिनीवर राबण्यासाठीं हे लोक वंशपरंपरागत कुळें म्हणून खपत असत. ह्यांची स्थिति जवळ जवळ जनावरासारखीच असे. झाडाखालच्या क्षुद्र झोंपडींत राहणें, ताडीमाडीच्या लाकडांचीं कांहीं क्षुल्लक उपकरणें एवढीच यांची संपत्ती. अंगावरच्या पोशाखाशिवाय बदलावयाला कपडे नसत. मी एका म्हाताऱ्या स्त्रीला तिचें वय विचारलें. तिनें लाजून म्हटलें, "मला काय माहीत ? माझ्या जमिनीच्या मालकाला ठाऊक असेल." अशा लोकांसाठीं रा. रंगरावांनीं मिशन काढलें यांत काय नवल ? या लोकांचीं मुलें दिवसभर कुठें तरी झाडावरील चिंचा, बोरें व केव्हां झाडपाला खाऊन पोट भरीत. रात्रीं थोडीशी कांजी मिळाल्यास ती चाटून चाटून खात. औषध-

पाण्याची त्यांना गरजच लागत नसे. पुढें चार सहा आठवड्यांनीं आम्ही मुंबईस परत आलों.

**पनवेल**

१९०६–७ च्या सुमाराला चि. जनाक्का कोंकणांतील पनवेल या गांवीं तेथील म्युनिसिपल शाळेंत मुख्य शिक्षक या नात्यानें काम करीत होती. सुधारक म्हणून हिला तेथें फार विरोध होऊं लागला. तिचेबरोबर आई, बाबा आणि माझा मुलगा प्रताप हे रहात होते. प्रार्थनासमाजाचीं तत्त्वें तेथील लोकांस कळवून दिल्यास गैरसमजूत कमी होऊन विरोध कमी होईल या आशेनें स्वामी स्वात्मानंदजीला बरोबर घेऊन मी पनवेलास गेलों. ज्या द्रव्यामुळें प्रकृतींत बिघाड होतो तींच द्रव्यें शरीरांत लहान प्रमाणावर घालून रोग बरा करण्याच्या प्रकाराला होमीओपथी म्हणतात. सुधारणेमुळें लोकांना चीड आलेली होती. त्याच सुधारणेच्या लहान गुटिका लोकसमाजाला देण्यांत ही आमची आध्यात्मिक होमीओपथी होती. स्वात्मानंदजी हे मूळचे आर्यसमाजिस्ट असल्यानें साधकबाधक कोटिक्रम आणि जुन्या ग्रंथांचे आधार देऊन वाद करण्याच्या पद्धतींत स्वामिजींचा हातखंडा असे. वादाचे मुद्दे संपल्यावर स्वामिजी केव्हां केव्हां आपल्या हातांतला दंडाहि उगारीत. तुलनात्मक धर्मपद्धति, आधुनिक धर्मविवेचन, अखिल जगताचें हळू हळू पालटणारें लोकमत, राजकारणासारख्या ऐहिक प्रश्नावर होणारा त्याचा परिणाम वगैरे विषयावर माझें विवेचन होत असें. या जोडगोळीनें पनवेलच्या वरिष्ठ वर्गावर थोडाबहुत परिणाम झाला, आणि चिरंजीव जनाक्काच्या मुलींच्या शाळेंत मुलींची हजेरी पण सुधारली. अशा स्थितींत पनवेलचे गंगारामभाऊ सुभेदार हे महार गृहस्थ लष्करी पेन्शनर होते. त्यांना माझे बाबांनीं आपल्या घरीं चहाला बोलाविलें. त्यामुळें आम्ही मुंबईस परत आल्यावर लोकमताला पुन्हां ऊत आला.

बराच त्रास भोगावा लागला. इतका कीं आमचे घरची मोलकरीण काम सोडून गेली, बाबांना हजामतीची पंचाईत पडली. तेथील मामलेदार रा. बेंदूरकर नांवाचे एक प्रागतिक सज्जन गृहस्थ होते. म्युनिसिपालिटींत एक सभ्य व सज्जन मुसलमान होते. ह्या दोघांचें साहाय्य न मिळतें तर चिरंजीव जनाक्काला ही नोकरी सोडून मुंबईस परतावें लागलें असतें. ह्यापुढें कोंकणांत अलिबाग, मालवण, सावंतवाडी, गोवें, आंबोलीचा घाट, दापोली वगैरे ठिकाणीं प्रचारकार्यास मी वेळोवेळीं जाऊन आलों. मालवण ही डॉ. भांडारकरांची मायभूमि. त्यावेळीं तेथें इंदूर समाजाचे सभासद आत्माराम सदाशिव केळकर हे रहात असत. त्यांचे साहाय्यानें तेथील प्रार्थना सभेची पुनर्घटना केली आणि अस्पृश्यांसाठीं देखील बरींच महत्त्वाचीं अशीं कांहीं कामें केलीं.

**कोल्हापूर**

विलायतेला जाण्यापूर्वींपासूनच मी कोल्हापुरीं माझे मित्र गोविंदराव सासने, डॉ. कृष्णाबाई केळवकर यांचेकडे वेळोवेळीं जात होतों. त्यावेळीं तेथील ग्रंथालयांत माझीं व्याख्यानें होत असत. मी विलायतेला जाण्याच्या प्रवास-खर्चाबाबत श्रीमंत शाहू महाराजांकडून तीनशें रुपयांची मदत मिळाली होती. १९०९ सालच्या उन्हाळ्यांत कोल्हापूर येथें माझें एक महत्त्वाचें व्याख्यान झालें. त्यापूर्वीं मी मुंबईस अखिल भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची स्थापना केली होती. कोल्हापुरांत गणपत कृष्णाजी कदम, वकील यांचें लक्ष प्रार्थना समाजाच्या कार्याकडे लागलें होतें. प्रार्थना समाजाचे कांहीं प्रसिद्ध पुढारी घेऊन कोल्हापुरास प्रचारकार्यासाठीं यावें म्हणून त्यांचा आग्रह पडला. छत्रपति शाहू महाराजांचीहि तशी इच्छा दिसली. आर्यसमाजाला तर त्यांनीं भरपूर साहाय्य दिलेंच होतें; आणि आपल्या समाजकार्यांत प्रार्थना समाजाचाहि त्यांना प्रयोग करून पहावयाचा होता. सिंधचे प्रसिद्ध

प्रोफेसर टी. एल्. वास्वानी, भक्त डॉ. रुबेन, कलकत्त्याचे प्रमथलाल सेन, मुंबईचे प्रसिद्ध प्रो. वेलिनकर या चौघांना घेऊन मी १९०९ च्या ऑक्टोबरच्या अखेरीस पुणें, सातारा मार्गें कोल्हापुरास गेलों. मराठा वसतिगृहाची इमारत गांवाबाहेर होती. तिच्या जवळील एका स्वतंत्र बंगल्यांत सरकारी पाहुणे म्हणून आमची उतरण्याची सोय करण्यांत आली होती. तेथील राजाराम कॉलेजांतील दिवाणखान्यांत प्रो. वास्वानी व वेलिनकर यांचीं व्याख्यानें व बाबू प्रमथलाल सेन यांची उपासना आणि माझें हरिकीर्तन वगैरे प्रसंग करविण्यांत आले. पण सर्वांत अधिक लोकमताचें आकर्षण डॉ. रुबेन यांच्या एकतारीनें केलें. आम्ही पाहुणे मंडळी सरकारी गाडींतून बसून गांवांत निघालों असतां डॉ. रुबेनला एकदम स्फूर्ति येऊन त्यांनीं खाली उतरावें, आणि भर बाजारांत आपल्या एकतारींत तल्लीन व्हावें, भोंवताली प्रचंड गर्दी व्हावी, आमच्या गाडीला वाट मिळूं नये, असें वारंवार होऊं लागलें. डॉ. रुबेनला एकटें सोडावें तर आम्हाकडे कोण येणार! घेऊन जावें तर गर्दी वाटच सोडेना. असा वेळोवेळीं पेंच पडे. एकंदरींत कुणीकडून तरी प्रचाराचें कार्य होवो म्हणून आम्ही हा पेंच मुकाट्यानें सहन करीत असूं.

कोल्हापुरांत या भेटीमुळें एक नवीन प्रार्थना समाज सुरू करण्याची तयारी झाली आहे असें रा. कदम यांना वाटूं लागलें. बळवंत कृष्णाजी पिसाळ या नांवाच्या तरुण गृहस्थाला बरोबर घेऊन रा. कदम यांनीं ह्या कामास हळूहळू सुरुवात केली. रा. सावंत, रा. खंडेराव बागल, डॉ. कृष्णाबाई केळवकर, रा. गोविंदराव सासने वगैरे मंडळींचें या कामास प्रोत्साहन मिळालें.

पुढें सन १९११ सालच्या मे महिन्यांत पुण्याचे रा. गणपतराव कोटकर, गणपतराव आंजर्लेकर, चि. जनाक्का व तिच्या शाळेंतील मैत्रिणी श्रीमती सीताबाई मराठे व सौ. गुलाबबाई वैद्य या मंडळींसह मी कोल्हा-

बराच त्रास भोगावा लागला. इतका कीं आमचे घरची मोलकरीण काम सोडून गेली, बाबांना हजामतीची पंचाईत पडली. तेथील मामलेदार रा. बेंदूरकर नांवाचे एक प्रागतिक सज्जन गृहस्थ होते. म्युनिसिपालिटींत एक सभ्य व सज्जन मुसलमान होते. ह्या दोघांचें साहाय्य न मिळतें तर चिरंजीव जनाक्काला ही नोकरी सोडून मुंबईस परतावें लागलें असतें. ह्यापुढें कोंकणांत अलिबाग, मालवण, सावंतवाडी, गोवें, आंबोलीचा घाट, दापोली वगैरे ठिकाणीं प्रचारकार्यास मी वेळोवेळीं जाऊन आलों. मालवण ही डॉ. भांडारकरांची मायभूमि. त्यावेळीं तेथें इंदूर समाजाचे सभासद आत्माराम सदाशिव केळकर हे रहात असत. त्यांचे साहाय्यानें तेथील प्रार्थना सभेची पुनर्घटना केली आणि अस्पृश्यांसाठीं देखील बरींच महत्त्वाचीं अशीं कांहीं कामें केलीं.

**कोल्हापूर**

विलायतेला जाण्यापूर्वीपासूनच मी कोल्हापुरीं माझे मित्र गोविंदराव सासने, डॉ. कृष्णाबाई केळवकर यांचेकडे वेळोवेळीं जात होतों. त्यावेळीं तेथील ग्रंथालयांत माझीं व्याख्यानें होत असत. मी विलायतेला जाण्याच्या प्रवासखर्चाबाबत श्रीमंत शाहू महाराजांकडून तीनशें रुपयांची मदत मिळाली होती. १९०९ सालच्या उन्हाळयांत कोल्हापूर येथें माझें एक महत्त्वाचें व्याख्यान झालें. त्यापूर्वीं मी मुंबईस अखिल भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची स्थापना केली होती. कोल्हापुरांत गणपत कृष्णाजी कदम, वकील यांचें लक्ष प्रार्थना समाजाच्या कार्याकडे लागलें होतें. प्रार्थना समाजाचे कांहीं प्रसिद्ध पुढारी घेऊन कोल्हापुरास प्रचारकार्यासाठीं यावें म्हणून त्यांचा आग्रह पडला. छत्रपति शाहू महाराजांचीहि तशी इच्छा दिसली. आर्यसमाजाला तर त्यांनीं भरपूर साहाय्य दिलेंच होतें; आणि आपल्या समाजकार्यांत प्रार्थना समाजाचाहि त्यांना प्रयोग करून पहावयाचा होता. सिंधचे प्रसिद्ध

प्रोफेसर टी. एल्. वास्वानी, भक्त डॉ. रुबेन, कलकत्त्याचे प्रमथलाल सेन, मुंबईचे प्रसिद्ध प्रो. वेलिनकर या चौघांना घेऊन मी १९०९ च्या ऑक्टोबरच्या अखेरीस पुणें, सातारा मार्गें कोल्हापुरास गेलों. मराठा वसतिगृहाची इमारत गांवाबाहेर होती. तिच्या जवळील एका स्वतंत्र बंगल्यांत सरकारी पाहुणे म्हणून आमची उतरण्याची सोय करण्यांत आली होती. तेथील राजाराम कॉलेजांतील दिवाणखान्यांत प्रो. वास्वानी व वेलिनकर यांचीं व्याख्यानें व बाबू प्रमथलाल सेन यांची उपासना आणि माझें हरिकीर्तन वगैरे प्रसंग करविण्यांत आले. पण सर्वांत अधिक लोकमताचें आकर्षण डॉ. रुबेन यांच्या एकतारीनें केलें. आम्ही पाहुणे मंडळी सरकारी गाडींतून बसून गांवांत निघालों असतां डॉ. रुबेनला एकदम स्फूर्ति येऊन त्यांनीं खाली उतरावें, आणि भर बाजारांत आपल्या एकतारींत तल्लीन व्हावें, भोंवताली प्रचंड गर्दी व्हावी, आमच्या गाडीला वाट मिळूं नये, असें वारंवार होऊं लागलें. डॉ. रुबेनला एकटें सोडावें तर आम्हाकडे कोण येणार! घेऊन जावें तर गर्दी वाटच सोडेना. असा वेळोवेळीं पेंच पडे. एकंदरींत कुणीकडून तरी प्रचाराचें कार्य होवो म्हणून आम्ही हा पेंच मुकाट्यानें सहन करीत असूं.

कोल्हापुरांत या भेटीमुळें एक नवीन प्रार्थना समाज सुरू करण्याची तयारी झाली आहे असें रा. कदम यांना वाटूं लागलें. बळवंत कृष्णाजी पिसाळ या नांवाच्या तरुण गृहस्थाला बरोबर घेऊन रा. कदम यांनीं ह्या कामास हळूहळू सुरुवात केली. रा. सावंत, रा. खंडेराव बागल, डॉ. कृष्णाबाई केळवकर, रा. गोविंदराव सासने वगैरे मंडळींचें या कामास प्रोत्साहन मिळालें.

पुढें सन १९११ सालच्या मे महिन्यांत पुण्याचे रा. गणपतराव कोटकर, गणपतराव आंजर्लेकर, चि. जनाक्का व तिच्या शाळेंतील मैत्रिणी श्रीमती सीताबाई मराठे व सौ. गुलाबबाई वैद्य या मंडळींसह मी कोल्हा-

पुरास पुन्हां गेलों. मुंबईचे बलभीमराव केसकर हे आपल्या घरांतील मंडळींसह अगोदरच तेथें जाऊन राहिले होते. कोल्हापुरच्या समाजाचा त्या वेळीं कार्यक्रम ठरला होता, व त्यांत आम्हीं भाग घेतला. सरकारांतून योग्य ती मदत कोल्हापूर प्रार्थना समाजास मिळाली. याच प्रसंगीं करवीर मठाचे जुने शंकराचार्य (डॉ. कूर्तकोटींच्या पूर्वीचे) यांनीं माझें एक खास हरिकीर्तन आपल्या मठांत करविलें. श्री स्वतः श्रवणास हजर होते. रिवाजाप्रमाणें त्यांनीं नारळ आणि धोतरजोडा देऊन माझी यथोचित संभावना केली. याच भेटींत रा. बागल आणि त्यांचे नातेवाईक रा. बाबासाहेब सावंत वकील यांचे घरीं कौटुंबिक उपासना झाल्या. गांवाबाहेर एका सृष्टिसौंदर्याचे ठिकाणीं एक वनोपासना झाली. तींत डॉ. कृष्णाबाई केळवकर यांनीं पुढाकार घेतला होता. हा समाज पुढें कांहीं वर्षें चालून बंद पडला. रा. ब. कृ. पिसाळ यांनीं 'विश्वबंधु' या नांवाचें साप्ताहिक पत्र तसेंच कांहीं वर्षें चालविलें. पोस्टल मिशनचें कामहि तेच करीत होते.

---

# प्रकरण ८ वें

## भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद

येथवर माझ्या प्रचारकार्याचें स्थानिक आणि प्रांतिक स्वरूपाचें वर्णन केलें, पण प्रथम सांगितल्याप्रमाणें माझें लक्ष ब्राह्मधर्माच्या विश्वव्यापकत्वाकडे आणि त्या उच्च अधिष्ठानावरून ब्राह्मधर्माच्या भारतीय

कार्याकडे नेहमीं लागून राहिलेलें असें. या कार्याचें मुख्य अंग ही भारतीय एकेश्वरी धर्मपरिषद होती. सन १८८५ सालीं हिंदी राष्ट्रीय सभेचें पहिलें अधिवेशन मुंबई येथें भरलें, त्यांत न्या. रानडे यांचा अप्रत्यक्ष पुढाकार होता. त्यांची बुद्धि अष्टपैलू, भावना उदार व उच्च प्रतीची होती. पुढील दोन अधिवेशनें कलकत्ता व मद्रास शहरीं झाल्यावर अलाहाबादला चवथी बैठक भरली. आरंभापासूनच राजकारणास समाजसुधारणेचा बळकट पाठपुरावा होता. अर्थात् ह्या चौथ्या बैठकींत उदारधर्माचा पाठिंबा ह्या राष्ट्रीय चळवळीस मिळणें क्रमप्राप्तच होतें. ह्या एकेश्वरी बैठकीचे अध्यक्ष न्या. रानडे झाले. कलकत्त्याचे मिस्टर आणि मिसेस आनंदमोहन बोस, लखनौचे बिपिनबिहारी बोस, बिहारचे बलदेव नारायण, लाहोरचे पं. शिवनारायण अग्निहोत्री यांनीं आपापल्या प्रांतांतील ब्राह्मसमाजाच्या कार्यासंबंधीं भाषणें केलीं. पुढें सालोसालीं राष्ट्रीय सभा जेथें जेथें भरेल त्या वेळीं तेथें ही धर्मपरिषदहि भरविण्यांत यावी आणि पुढील वर्षाचे चिटणीस म्हणून पं. शिवनाथशास्त्री यांना नेमावें असा ठराव करण्यांत आला. १८८९ सालीं मुंबईला ही परिषद मुंबई प्रार्थना समाजांत भरली, आणि त्या वेळीं प्रांतोप्रांतींच्या पुढाऱ्यांनीं भाग घेतला.

कलकत्त्याहून नवविधान समाजाचे प्रतापचंद्र मुझुमदारहि हजर होते.

**ब्राह्मसंघ**

तेव्हां ब्राह्मसंघ (Theistic Union) या नांवाची एक मध्यवर्ती संस्था स्थापून पुढील कार्याचा प्रयत्न करण्यांत यावा असें ठरलें. नवीनचंद्र राय ह्यांना ह्या संघाचे चिटणीस नेमले. कलकत्त्यास साधारण ब्राह्मसमाज, नवविधान ब्राह्मसमाज व आदि ब्राह्मसमाज असे निरनिराळे पक्ष पडून ब्राह्मसमाजाच्या समाईक कार्यांत फूट पडली

होती. ह्या वरील नवीन संघामुळें ही फूट भरून येण्याचा बराच संभव होता. आणि त्यांत आम्ही मुंबईकडील पुढाऱ्यांनींच न्या. रानडे ह्यांच्या नेतृत्वाखालीं उचल खाल्ली असा तर्क करण्यास बरीच जागा आहे. कारण पुढील दोनतीन सालीं न्या. रानडे ह्यांनाच परिषदेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें. चवथी बैठक नागपुरास १८९१ सालीं भरली. तेथें ब्राह्मसमाज नसल्यामुळें काम फारसें झालें नाहीं. पुढील सालाकरतां वामन आबाजी मोडक, पांडुरंग सदाशिव केळकर यांस चिटणीस नेमण्यांत आले. १८९४ सालीं मद्रासच्या बैठकीस डॉ. भांडारकर हे अध्यक्ष होते व पुढील सालीं म्हणजे १८९५ सालीं पुण्याच्या कॉंग्रेसचे वेळीं बैठक पुणें प्रार्थना मंदिरांत भरली. त्यावेळीं अमेरिकेचे युनिटेरियन धर्माचे प्रसिद्ध प्रचारक रेव्हरंड जे. टी. संडरलंड हे हजर होते. ह्यापुढें मधून मधून १९०३ पर्यंत जरी ह्या परिषदेच्या बैठकी भरल्या तरी तिचें काम मंदावलें. पांचवी बैठक अलाहाबाद येथें भरली असतां मुंबईच्या 'सुबोध-पत्रिकेनें' लिहलें : "अशा प्रातिक बैठकीचें महत्त्व राष्ट्रीय सभेच्या धामधुमींत भरणाऱ्या भारतीय अधिवेशनापेक्षांहि किंबहुना अधिक आहे; कारण प्रांतिक बैठकीनें मिळविलेल्या माहितीवरून आणि अनुभवावरुन राष्ट्रीय बैठकीचें काम अधिक पायाशुद्ध व पद्धतशीर होण्याचा संभव आहे."

अशा मंदावलेल्या स्थितींत १९०३ च्या नाताळांत मद्रासेंत भरलेल्या अधिवेशनावरून ह्या परिषदेची झालेली विस्काळित स्थिति माझ्या मनांत भरली. आणि पुढील सालीं मुंबईला भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं धर्म-परिषद संघटित स्वरूपांत बोलाविण्याचा मीं निश्चय केला हें मीं वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें हीं पुनर्घटित एक दोन अधिवेशनें सोडून कराचींत भरलेल्या १९१३ सालच्या अखेरच्या बैठकीपर्यंत या कार्याचा सर्व भार, चिटणीस या नात्यानें मीं माझ्यावरच घेतला.

पुढील कोष्टकावरून ह्या एकेश्वरी धर्मपरिषदेच्या कार्याचें समालोचन नीट करण्यास बरें पडेल.

| वेळ | स्थळ | अध्यक्ष | चिटणीस |
|---|---|---|---|
| डिसें. १८८८ | अलाहाबाद | न्या. रानडे. | पं. शिवनाथशास्त्री. |
| ,, १८८९ | मुंबई | ......... | पं. नवीनचंद्र रॉय. |
| ,, १८९० | कलकत्ता | न्या. रानडे व हरदयाळ रॉय. | पं. शिवनाथशास्त्री. |
| ,, १८९१ | नागपूर | ......... | रा.वा.आ. मोडक, व रा. पां. स. केळकर |
| ,, १८९२ | अलाहाबाद | ......... | ,, ,, |
| ,, १८९३ | लाहोर | परिषद भरली नाहीं. | ............... |
| ,, १८९४ | मद्रास | डॉ. रा. गो. भांडारकर. | ............... |
| ,, १८९५ | पुणें | ......... | ............... |
| ,, १८९७ | कलकत्ता | न्या. रानडे. | ............... |
| ,, १८९७ | उमरावती | परिषद भरली नाहीं. | ............... |
| ,, १८९८ | मद्रास | न्या. रानडे | |
| ,, १८९९ | लखनौ | परिषद भरली नाहीं. | ............... |
| ,, १९०० | लाहोर | परिषद भरली नाहीं. | ............... |

| वेळ | स्थळ | अध्यक्ष | चिटणीस |
|---|---|---|---|
| डिसें. १९०१ | कलकत्ता | सर नारायण चंदावरकर. | ............... |
| ,, १९०२ | अहमदाबाद | डॉ. भांडारकर | रा. रमणभाई महिपतराव |
| ,, १९०३ | मद्रास | रा. पा. स. केळकर व रा. कैलासम् पिल्ले. | ............... |
| ,, १९०४ | मुंबई | डॉ. रा. गो भांडारकर. | श्री. वि. रा. शिंदे. |
| ,, १९०५ | बनारस | पं. शिवनाथ-शास्त्री. | श्रीयुत वि. रा. शिंदे. |
| ,, १९०६ | कलकत्ता | श्रीयुत व्यंकट-रत्नम् नायडू | श्री. हेमचंद सरकार आणि श्री. प्रमथलाल सेन |
| ,, १९०७ | सुरत | श्री. सत्येंद्रनाथ टागोर | श्री. वि. रा. शिंदे. |
| ,, १९०८ | मद्रास | श्री. अविनाश-चंद्र मुझुमदार | ,, ,, ,, |
| ,, १९०९ | लाहोर | प्रो. विनयेंद्र-नाथ सेन | ,, ,, ,, |

| वेळ | स्थळ | अध्यक्ष | चिटणीस |
|---|---|---|---|
| डिसें. १९१० | अलाहाबाद | पं. शिवनाथ-शास्त्री | श्री. वि. रा. शिंदे व अविनाशचंद्र मुझुमदार. |
| ,, १९११ | कलकत्ता | श्री. उल्लाल रघुनाथय्या | श्री. हेमचंद्र सरकार. |
| ,, १९१२ | बांकीपूर | सर नारायण चंदावरकर | ,, ,, ,, |
| ,, १९१३ | कराची | रेव्हरंड जे. टी. संडरलंड | श्री. वि. रा. शिंदे. |

**मुंबई**

१९०३ सालच्या मद्रास--बंगालच्या सफरीवरून हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ब्राह्मसमाजांची मला बरीच प्रत्यक्ष माहिती झाली होती. १९०४ साली मुंबईच्या परिषदेंत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून पुष्कळसे प्रमुख पुढारी मुंबईस आल्यानें त्यांच्या समक्ष परिचयाची तींत भर पडली. आणि त्यांच्यावर ह्या नवीन संघटित परिषदेचा परिणाम घडला. इतकेंच नव्हे तर मुंबई प्रार्थना समाजांतील पुढाऱ्यांनाहि ह्या नवीन प्रयत्नांचें महत्त्व कळून चुकलें. कलकत्त्याच्या खालोखाल मुंबई प्रार्थना समाजाचें महत्त्व असल्यानें येथील बैठक समाजाबाहेरील लोकांवरहि परिणामकारी झाली. यंदाच्या सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं स्वीकारल्यामुळें तो एक नवीनच विशेष घडला. म्हणून धर्म-

परिषदेंतहि महाराजांनीं प्रत्यक्ष भाग घ्यावा ही कल्पना मला सुचली. स्वतः मी त्यांस आमंत्रण करण्यास गेलों हें वर आलेंच आहे. स्वागताध्यक्षाचें काम सर नारायण चंदावरकरांनीं आणि अध्यक्षाचें काम गुरुवर्य डॉ. भांडारकरांनीं केल्यामुळें ह्या अधिवेशनास अधिक रंग चढला. रात्रीच्या शाळांचा बक्षिस समारंभ झाला. त्यांत अध्यक्षस्थान पत्करून त्याच रात्रीं राममोहन आश्रमांत जें थाटाचें प्रीतिभोजन झालें त्यांतहि महाराजांनीं प्रमुखपणें भाग घेतला. ह्या भोजनास मुंबईच्या आर्यसमाज आणि सामाजिक परिषदेचे प्रतिनिधी यांना आमंत्रण केलें होतें. आर्यसमाजाचे चिटणीसांनीं १५० सभासदांना घेऊन येण्याचें कबूलहि केलें होतें. प्रार्थना समाजाचे उपाध्यक्ष दानशूर दामोदरदास सुकडवाला यांनीं भोजनाचा सर्व खर्च भोगण्याची जबाबदारी घेतली होती, पण मुंबई प्रार्थना समाजानें कांहीं मुसलमान गृहस्थांना प्रार्थना समाजाची दीक्षा दिलेली होती म्हणून आयत्यावेळीं आर्यसमाजिस्टांनीं भोजनाला हजर राहण्याचें टाळलें. कृतीची बाजू आल्यावर केवळ ध्येयवादावर अकांडतांडव करणारे हे वाचीवीर कशी बगल मारतात ह्याचें हें स्पष्ट उदाहरण आहे. शिवाय तो काळ १९०५ सालचा होता. आर्यसमाजांत बहुतेक गुजराथ्यांचाच भरणा होता. कृतीच्या सुधारणेला गुजराथ प्रांत त्याकाळीं तयार नव्हता त्याचें हें उदाहरण! पण महाराज श्रीमंत सयाजीराव यांनीं गुजराथ्यांना हें उदाहरण घालून दिलें ही गोष्ट मोठी संस्मरणीय झाली. परिषदेंत निरनिराळ्या ब्राह्मो पुढाऱ्यांचीं भाषणें झालीं. तींहि नमुनेदार होतीं. पुढील परिषद बनारस येथें कॉंग्रेस भरत असल्यानें तेथें भरविण्याचें ठरलें. तेव्हांपासून अशा परिषदांच्या सरचिटणीसाचें काम मींच करावें असें सर्वानुमतें ठरविण्यांत आलें.

काशी येथें स्थानिक ब्राह्मसमाज नाहीं. गांव जुन्या मताचा व क्षेत्राचा असल्यामुळें तेथें स्वागत मंडळ स्थापणें फार जड गेलें. पण ह्या परिषदेचें महत्त्व प्रांतोप्रांतींच्या पुढाऱ्यांना कळलें असल्यानें मीं जें त्यांना उद्देशून पत्रक काढलें त्याला सर्वांकडून उत्तेजनपर उत्तर व वर्गणीची रक्कम पण आली. बांकीपूरचे गुरुदास चक्रवर्ती आणि कानपूरचे महेंद्रनाथ सरकार ह्या दोघां साधारण ब्राह्मसमाजाचे सभासदांनीं काशीला जाऊन परिषदेची पूर्वतयारी करण्याचे कामीं मला मोठी मदत केली.

**काशी**

ब्राह्मसमाजाचे तीन पक्ष म्हणजे ( १ ) राममोहन रायांनीं स्थापलेला आणि देवेंद्रनाथांनीं चालविलेला आदि ब्राह्मसमाज, ( २ ) त्यांतून फुटून निघालेला केशवचंद्र सेन यांचा नवविधान ब्राह्मसमाज, ( ३ ) आणि त्यालाहि विरोध करून विभक्त झालेला साधारण ब्राह्मसमाज. सध्यां कलकत्त्यांतील तीन वेगळ्या शाखांचा बरावाईट परिणाम अखिल भारतांतील ब्राह्मसमाजावर आणि त्याच्या प्रसारावर काय घडला हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे. मी तो परिणाम अभ्यासू या नात्यानें जाणून होतों. पण या तेढीचें स्वरूप ह्या तिन्ही पक्षाचे लोक काशी परिषदेंत हजर होते; म्हणून तें मला प्रत्यक्ष दिसलें. इतकेंच नव्हे पण पुढील कार्यांत पावलोंपावलीं नडूं लागलें. अध्यक्षाची निवड करण्यांतच मोठी नड आली. परिषद-कमिटीचे चेअरमन डॉ. भांडारकर व मुंबई समाजाचे अध्यक्ष नारायण चंदावरकर यांना काशीस येणें झालें नाहीं. वेळोवेळीं महाराष्ट्रीयानें पुढाकार घेणें हें इष्ट नव्हतें. काशी हें बंगालच्या सीमाप्रांतावर असल्यानें आणि पुढील अधिवेशन कलकत्त्यांत भरणार असल्यानें आणि उत्तरेकडील प्रांतांत बंगाली ब्राह्मणांचीच बहुसंख्या असल्यानें कलकत्त्यांतील कोणातरी

**तीन पक्ष**

सर्वमान्य पुढाऱ्यांना अध्यक्षस्थानीं बसविणें इष्ट होतें, म्हणून पं. शिवनाथ-शास्त्री यांना अध्यक्षस्थान देण्यांत आलें. आणि त्यांनीं अटकळीप्रमाणें काम देखील सुंदर रीतीनें केलें. परिषदेचें काम एखाद्या स्थानिक समाजाच्या वार्षिक उत्सवाप्रमाणें डिसेंबर ता. २४ पासून ३१ पर्यंत मोठ्या सोहळ्यानें पार पडलें. उपासना, भजनें, व्याख्यानें, नामसंकीर्तनें आणि शेवटीं प्रीतिभोजन इत्यादि तपशिलांत कोठेंच व्यत्यय आला नाहीं. निरनिराळ्या प्रांतांतून सुमारें ७५ ठिकाणांहून ब्राह्मसमाजाचे प्रतिनिधी आले होते. लंडन खिश्चन मिशनच्या प्रशस्त हायस्कुलाशिवाय काशी येथें दुसरी कोठेंहि जागा मिळाली नाहीं हेंहि ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. दोनतीन वर्षांच्या अनुभवामुळें या खंडवजा हिंदुस्थानांतील दूरदूरच्या ब्राह्मसमाजांची सर्व प्रकारची माहिती आणि त्यांची सूची तयार करण्याची आवश्यकता मला भासूं लागली होती. ब्राह्मधर्म-सूचीग्रंथ मींच तयार करून प्रसिद्ध करावा असा एक ठराव परिषदेनें एकमतानें पास केला. हा एक या परिषदेचा विशेष म्हणावयाचा. म्हणून परिषद संपल्यावर मी बंगाल, बिहार, आसाम या प्रांतांतून एक मोठा विस्तृत दौरा काढला. बऱ्याच दृष्टीनें हा दौरा महत्त्वाचा होता म्हणून त्याचा तपशील खालीं देणें मला जरूर आहे.

ह्या परिषदेंत बंगाल्यांतील तीनहि पक्षांची परस्पर सहानुभूति बरीच वाढली व शिवाय निराळ्या प्रांतांतील ब्राह्म समाजिस्टांचा स्नेह झाला. अशा हितकारक परिषदेची खबर अधिक पसरावी, मुंबई प्रार्थना समाजासारख्या तिऱ्हाइतांच्या कामाची इकडल्या दूरदूरच्या समाजांस माहिती कळावी (कारण प्रार्थनासमाज व आर्यसमाज ह्यांतीलहि भेद न जाणणारे कांहीं ब्राह्म समाजिस्ट इकडे भेटले). कांहीं प्रमुख सभासदांची प्रत्यक्ष ओळख करून

घ्यावी, मुख्य मुख्य स्थानिक समाज समक्ष पहावे वगैरे हेतूनें मी ह्या सफरीवर निघालों.

**बांकीपूर**

बिहार प्रांताची राजधानी बांकीपूर येथें ता. २ जाने. १९०६ रोजीं आलों. हा देश जरी बिहारी हिंदुस्थानी लोकांचा असला तरी येथें बंगाली लोकांची बरीच वस्ती असून सार्वजनिक बाबतींत त्यांचाच पुढाकार व सुळसुळाट दिसला. वायव्येकडील प्रांतांत ज्याप्रमाणें एकहि ब्राह्मण एतद्देशीय सांपडणें कठीण त्याप्रमाणें सबंध बिहार प्रांतांत बिहारी ब्राह्म समाजिस्टांची एकाच हाताच्या बोटावर मोजण्याइतकी संख्या आहे. मुख्य ब्राह्मसमाज नवविधान मताचा आहे. भाई प्रकाशचंद्र रॉय, हे त्याचे पुढारी सर्वांशीं मिळून मिसळून वागून सार्वजनिक कामांत पुढाकार घेणारे आहेत. राममोहन रॉय सेमिनरी ही साधारण ब्राह्म समाजाची असून त्या शाळेंत ह्या पक्षाच्या उपासनाहि होतात. ता. ४ रोजीं रॉय यांचे घरीं मीं प्रमुख मंडळी जमवून प्रथम मुंबईकडील हकीकत सांगितली. उत्सवांत एक-मेकांनीं मिळून कार्यक्रम ठरवावा, एकमेकांच्या उपासनेस पाळीपाळीनें जावें असें ठरलें. बॅ. दास यांचे घरीं ता. ५ रोजीं दोन्ही पक्षांच्या स्त्रियांची सभा भरली. पोस्टल मिशन, डोमेस्टिक मिशन, सामाजिक मेळा वगैरे कामें स्त्रियांनीं कशीं करावयाचीं हें सांगितलें. सिल्हेटहून काशी परिषदेस आलेल्या सौ. हेमंतकुमारी चौधरी ह्यांनीं हिंदींत भाषण केलें.

**मोंघीर**

ता. ६ रोजीं मोंघीर येथें आलों. हें रमणीय स्थान भागिरथीचे कांठीं आहे. पुराणांतील राजा दानशूर कर्ण ह्याची दान देण्याची जागा अद्यापि गंगेच्या तीरावर दाखवितात. ब्राह्म यात्रेकरूंस या स्थळाचें महत्त्व असें सांग-ण्यांत येतें कीं, ब्राह्म समाजांत पुढें जो भक्तिसंप्रदाय सुरू झाला तो मूळ

या ठिकाणीं. सन १८७२ सालीं हल्लींचें मंदिर बांधण्यांत आलें. मंदिरांत एकदां कांहीं वैष्णव मंडळीस भजनास बोलाविलें होतें. त्यांपैकीं एका चांडाळ जातीच्या भक्तानें इतकें सुश्राव्य व आवेशयुक्त भजन केलें कीं, त्याचा मंडळीवर विलक्षण परिणाम झाला. पुढें साधू अघोरनाथ ब्राह्म-प्रचारक यांचें भजनाविषयीं प्रेम अधिकाधिक वाढून शेवटीं स्वतः केशव-चंद्र सेन येथें असतां त्यांच्यावरहि भजनाचा परिणाम घडला व येथील कार्य बरेंच वाढलें. तरी हल्लींची येथील ओसाड व दीनवाणी स्थिति पाहून मन गहिंवरलें व मानवी मनाची अस्थिरता पाहून विस्मय पावलें. मंदिरापुढील पटांगणांत केशवचंद्र सेन, साधू अघोरनाथ, दीननाथ चक्रवर्ती यांच्या तीन समाधी मध्यभागीं एका चौथऱ्यावर बांधल्या आहेत. १९०२ सालीं या गांवीं आर्य समाजाची स्थापना झाली. पण तोहि नीट चालत नाहीं.

**भागलपूर**

भागलपूर येथें ता. ७ रोजीं पोहोंचलों. हा समाज ता. २२ फेब्रुवारी १८६४ रोजीं स्थापण्यांत आला. राजा शिवचंद्र बानर्जी नांवाच्या एका अत्यंत आस्थेवाईक हित-चिंतकानें स्वतः सर्व खर्च सोसून मंदिर बांधलें. केशवचंद्र सेन ह्यांच्या हस्तें हें मंदिर उघडण्यांत आलें. समाजांत थोडी कां होईना पण बडी बडी, प्रमुख व वृद्ध मंडळी आहेत. पण उपासने-शिवाय कांहीं काम होत नाहीं. ता. ९ रोजीं सुमारे ५।६ तरुण पदवीधर ब्राह्म मंडळीपुढें मुंबईच्या तरुण ब्राह्ममंडळाचे छापील नियम वाचून दाख-विले आणि तेथील पूर्वीची तरुण संस्था पुन्हां स्थापन करण्याचें ठरविलें. ह्यानंतर रात्रीं ७ वाजतां बाबू निवारणचंद्र मुकर्जी यांचे घरीं प्रमुख मंडळी जमली. त्यांच्यापुढें मुंबईकडील समाजाचें तिऱ्हाईतपणाचें काम ऐकून त्यांना फार समाधान झालें. दोघांनीं तर वारंवार अशी इच्छा प्रगट

केली कीं, मुंबई व बंगाल प्रांतांतील ब्राह्मांचे अधिक निकट संबंध जुळविणें फार इष्ट आहे. त्याकरितां परस्पर–विवाह–व्यवहार करणें अवश्य आहे. मीं म्हटलें कीं, निरनिराळ्या प्रांतांतील ऐपतदार ब्राह्मांनीं निरनिराळ्या प्रांतांत प्रवास केल्याशिवाय वरील व्यवहार कधींहि शक्य होणार नाहीं.

**काठीहार**

काठीहार हें रेल्वेचें एक मोठें जंक्शन आहे. बरीच चौकशी केल्यावर अर्धवट बांधलेल्या ब्राह्म मंदिराचा पत्ता लागला. पण तेथें समाज नाहीं. दारें व खिडक्या नसून, नुसत्या भिंतीच पाहून हें मुक्तद्वार गौडबंगाल काय आहे याचा तपास करण्यासाठीं तेथेंच राहिलों. शेजारच्या एका मुसलमान गृहस्थानें सांगितलें कीं, या अर्धवट इमारतीचा क्वचित् प्रसंगीं अत्यंत खेदजनक दुरुपयोग होतो. १८८७ सालीं रेल्वेंतील ब्राह्म नोकरांनीं विशेषतः जानकीनाथ गांगुली व रखलदर्शी चतर्जी यांच्या प्रयत्नानें येथें समाज स्थापन झाला. त्यावेळीं दहा सभासद होते. १८९९ सालीं ही अर्धवट इमारत उभी राहिली. पण इतक्यांत तेथील रेल्वे ऑफिस एकदम कलकत्त्यास गेल्यामुळें येथें एकहि ब्राह्मो उरला नाहीं.

**पूर्णिया**

येथून १८ मैलांवर पूर्णिया हें जिल्ह्याचें गांव आहे. येथें बाबू हजारीलाल हे आस्थेवाईक गृहस्थ होते त्यांचेकडे गेलों. तेथें मला तारकनाथ रॉय नांवाचे गृहस्थ भेटले. ह्या दोघांना काठीहारचें वर्तमान कळविलें. तेथील पूर्वींच्या फंडापैकीं २०० रु. अद्यापि शिल्लक आहेत असें कळलें. काठीहार येथें मंदिर आहे. पण समाज नाहीं. आणि पूर्णिया येथें समाज आहे पण मंदिर नाहीं. पूर्णिया येथील आस्थेवाईक सभासदांस घेऊन काठीहार येथें पुन्हां गेलों. सायंकाळीं माझें हायस्कुलांत व्याख्यान झालें. तेथील मुख्य

अधिकारी मुन्सफ एक उदार मताचे बॅरिस्टर मुसलमान होते. त्यांनीं आपल्या सहीच्या आमंत्रण चिठ्ठया लोकांना पाठविल्या व अध्यक्षस्थान पत्करलें. व्याख्यानानंतर बाबू हजारीलाल यांनीं येथील कांहीं मंडळींच्या सल्ल्यानें बाकी उरलेल्या शिलकेंतून मंदिर पुरें करून देण्याचें ठरविलें.

ह्या प्रकारें बिहार प्रांतांतील काम झाल्यावर मी श्रीगंगेचा निरोप घेऊन तिचा पिता जो पर्वतराज हिमाचल त्याचे चरणांगुलीवर विराजमान झालेली वनश्रीची जणूं माहेरकडची सखी जी कुचबिहार नगरी तिच्या आंत सायंकाळच्या शांत समयीं अत्यादरपूर्वक प्रवेश केला.

**कुचबिहार**

कुचबिहार संस्थानची हद्द भूतान संस्थानचे हद्दीस लागूनच आहे. येथील मूळचे रहिवासी–जे अर्धवट जंगली लोक (कोल=कोळी) शेतकी करून आहेत–त्यांची सांपत्तिक हद्दहि कंगालपणाच्या सीमेला लागून आहे. ह्यांच्या चेहऱ्यांत आर्यांपेक्षां मोंगली साम्य अधिक दिसतें. कुचबिहारचें राजघराणें ह्याच जंगली जातीचें आहे. राजा, प्रजा व मानकरी मंडळ हें सर्व एक जात असून यांचे दरम्यान अधिकारी वर्ग मात्र कारकुनापासून ते थेट दिवाणापर्यंत बंगाली बाबूंचा आहे. आणि मनुष्यस्वभाव अनुसरून यांचे एतद्देशीयांशीं अरेरावीचें वर्तन पाहून किंचित् कौतुकच वाटतें. उत्पन्नाचे मानानें हें संस्थान जवळ जवळ कोल्हापुराइतकें आहे. पण बंगाल्यांत हें पहिल्या प्रतीचें गणलें जाऊन शिवाय ब्रिटिश सरकारच्या मर्जींतलें असावें असें दिसतें. येथें एक एम्. ए. पर्यंतचें पूर्ण दर्जाचें कॉलेज आहे. त्यांत सुमारें ३०० विद्यार्थी असून फी पूर्णपणें माफ आहे. शिवाय एतद्देशीय विद्यार्थ्यांसाठीं मोफत वसतिगृह आहे. सुधारणेचीं हीं थोडीं चिन्हें सोडून दिल्यास कुचबिहार नगरावर व तेथील अस्सल प्रजेवर अद्यापि हिमालयाचेंच पुरातन वन्य साम्राज्य चालू आहे. राजमहाल व

चार बऱ्या लोकांचीं घरें, आणि कांहीं सरकारी इमारती सोडून दिल्यास बाकी सर्व लहान-मोठयांचीं घरें म्हणजे अक्षरशः झोंपड्याच.

गांवाकडे नजर फेंकल्यास असें वाटतें कीं, केळीं व पोफळीं यांच्या सुंदर बनांत एकांत जागा पाहून आधुनिक सुधारणेच्या प्लेगला कंटाळून जणूं एक सेग्रीगेशन कँपच बांधलें आहे. रुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं ह्या बांबूच्या झोपड्या, दरम्यान बरीच मोकळी जागा सोडून दाटीनें बांधलेल्या दिसतात. प्रथम जमिनीवर सुमारें तीन फूट उंचीच्या खांबावर ओटा बांधून तिची तक्तपोशी वेळूची, भिंती वेळूच्या, वरचें छत व छप्पर वेळूचें, आंतील सामान वेळूचें आणि बाहेरील कंपौंडहि वेळूचें. याचीं कारणें पुष्कळ आहेत. एक तर लोक गरीब आणि अल्पसंतुष्ट. दुसरें देश दलदलीचा, सर्द व अतिपावसाळा. तिसरें घरें बांधण्यास चिखल व दगड दोन्ही मिळत नाहीं. जमीन राखेच्या रंगाच्या मऊ व बारीक रेतीची. तिच्या विटाहि बनत नाहींत. बरें, इतक्यालाहि न जुमानतां आढ्यतेनें जर एखादें घर उभारलें तर हिमालयबुवा वरचेवर भूकंपाचे धक्के देऊन जागें करण्यास तयार आहेतच. राजाचा सुमारें १२ लाखांचा सुंदर व भव्य प्रासाद व भोंवतालचा विस्तीर्ण बाग पाहून प्रेक्षक बाहेर राजरस्त्यांत येतो तों दुतर्फा सेग्रीगेशन कँप पाहून त्याचा बराच हिरमोड होतो.

ब्राह्मधर्माचा दिग्विजय करण्याकरतां जी प्रचारकसेनेची अभेद्य फळी उभारली होती तिची दुफळी केली ती याच कोपऱ्यांतल्या कुचबिहारनें. बुद्धधर्माला जसा अशोक, खिस्ती धर्माला जसा कान्स्टंटाइन, तसा ब्राह्म-धर्माला एकादा राजबिंडा पुरस्कर्ता कुचबिहारपुरतां तरी मिळाला आहे काय ? आतांपर्यंत तरी नाहीं आणि पुढें आशा नाहीं.

कुचबिहारांत साधारण ब्राह्मसमाजपक्षाचे आणि नवविधानपक्षाचे असे दोन समाज व त्यांचीं मंदिरें आहेत. साधारण पक्षाचे अध्यक्ष स्वतः दिवाण

रायबहादूर कालिकादास दत्त हे आहेत. त्यांचे विचार पूर्णपणें उदार असूनहि त्यांची व्यवहारकुशलता त्याहूनहि परिपूर्ण असल्यामुळें ते अध्यक्ष होण्यापुरते केवळ हितचिंतकच आहेत. हा साधारण ब्राह्मसमाज विजयकृष्ण गोस्वामी यांनीं १८८४ सालीं स्थापन केला. १८९७ सालच्या भूकंपांत पूर्वींचें मंदिर पडल्यामुळें त्याच्याच पायावर हल्लींचें (१९०५) मंदिर नुकतेंच बांधलें आहे.

१८७८ सालीं केशवचंद्र सेन यांच्या ज्येष्ठ कन्येचा विवाह कुच-बिहारचा राजा सर नृपेंद्र नारायण भूपबहादूर यांच्याशीं झाला. राजेसाहेब आणि राणीसाहेबांना आपल्या नवविधान पक्षाचा निराळा समाज पाहिजे म्हणून १५ ऑगस्ट १८८६ रोजीं येथील नवविधान समाज स्थापण्यांत आला. त्यापूर्वी म्हणजे १८८४ सालींच केशवचंद्र सेन वारले होते. विवाहाचे वेळीं केशवचंद्रांचे कन्येचें वय १४ वर्षांहून कमी होतें म्हणून ब्राह्मसमाजांत दुफळी झाली हें सर्व विश्रुतच आहे. हल्लीं या समाजाचे प्रमुख स्वतः राजेसाहेब आहेत. पण खरी सर्व व्यवस्था राणीसाहेबांचे हातूनच होत असते. राजाचें कुटुंब धरून समाजांत एकंदर ११ अनुष्ठानिक कुटुंबें आहेत. त्यांत एकंदर ७० मुलें माणसें आहेत. शिवाय ४० हितचिंतक आहेत. समाजाच्या खर्चाकरतां सालीना ५००० रु. ची नेमणूक आहे. एक कायमचा मिशनरी व गायक यांचा खर्च त्यांतूनच होत असतो.

**मंदिर**

समाजाचें अर्थातच एक सुंदरसें मंदिर आहे. इतकें सुंदर ब्राह्म मंदिर निदान माझ्या तरी पाहण्यांत कुठें आलें नाहीं. डाका; कलकत्ता वगैरे ठिकाणीं यापेक्षां मोठमोठीं मंदिरें आहेत; पण तीं केवळ व्याख्यान मंदिरें. आत्म्याला जागृत करण्याकरतां त्यांत विशेष असा कांहीं सात्त्विक भाव नाहीं. तो ह्या मंदिरांत भरपूर आहे. ह्या मंदिरांत रविवारीं सायंकाळीं

उपासना झाली. ती फार गंभीर झाली. बराच धूप जळत असल्यानें चहुं-कडे सात्त्विक गंध सुटला होता. नियमित वेळीं घंटानाद झाल्यावर नेम-णुकीचे प्रचारक वेदीवर बसले. ते दुर्गानाथ राय हे केशवचंद्रांच्या प्रिय शिष्यांपैकीं एक असून फार साधे व सात्त्विक दिसले. गायन सुस्वर व भजन प्रेमळ झालें. भजनाचा रस जेव्हां दाटत असे व मृदंगाचा नाद जेव्हां घुमटांत घुमूं लागे तेव्हां पडद्यांतील अदृश्य स्त्रियांनीं आपल्या जव-ळचे मोठे शंख वाजवून त्यांच्या गंभीर ध्वनीचा मेळ असा मिळवून द्यावा कीं श्रोत्याचीं सर्व गात्रें बंद पडून तो कांहीं वेळ आत्मरूपा-नेंच उरावा.

माझी राहण्याची सुंदर सोय व थाटाचा पाहुणचार एका वसतिगृहांत केला होता. ता. १३ रोजीं टाऊन हॉलमध्यें Religion at the Basis of Life ह्यावर माझें इंग्रजींत व्याख्यान झालें. दिवाणसाहेब अध्यक्ष होते. कुचबिहार येथें दोन पक्षाचे समाज आहेत. एकाचे अध्यक्ष राजेसाहेब व व्यवस्थापक राणीसाहेब. शिवाय तत्त्वज्ञानाच्या अध्ययनाबद्दल सर्व बंगाल्यांत नांवाजलेले ब्रजेंद्रनाथ शील हे कॉलेजचे ब्राह्म प्रिन्सिपाल होते. मी तेथें असतांना तेथील कॉलेज कुमारांनीं दाखविलेली जिज्ञासा, तत्परता आणि तरुणांची सभा पुन्हां सुरू करण्याची उत्सुकता व त्यानंतर त्यांचीं आलेलीं पत्रें ह्या सर्वांवरून पाहतां कुचबिहार संस्थानांत एखादा ताज्या दमाचा प्रचारक पाठविल्यास पुष्कळ काम होण्यासारखें आहे. पण राजकारणामुळें तें होणार नाहीं ह्याचीहि खात्री आहे. म्हणून मी दोन दिवसांतच कार्य-क्रम आटोपून मुकाट्यानें १५ जानेवारी रोजीं ब्रह्मपुत्रेची वाट धरली.

**डूब्री**

"ब्राह्म धर्माचा प्रचारक होण्यांत मला जी धन्यता व सुख वाटत आहे त्यापुढें राजसुखहि तुच्छ होय." हें वाक्य जेव्हां मी बाबू उपेन्द्रनाथ बोस, डूब्री ब्राह्मसमा-जाचे एक वजनदार पुरस्कर्ते, यांच्यापुढें उच्चारलें

तेव्हां त्यांची मुद्रा सचिंत झाली. कोठें अरबी समुद्रावरील मुंबई बेट तर कोठें आसाम प्रांतांतील हा डूब्री गांव ? पण ज्या सनातन ब्राह्मसमाजाचा मी वार्ताहर होतों त्याचा शुभ महिमा असा आहे कीं त्यायोगें ह्या विशाल भरतखंडाचेच नव्हे तर ह्या विपुल पृथ्वीचींहि दूरदूरचीं टोकें पवित्र प्रेम-रज्जूनें एकत्र होणार आहेत व हल्लीं होतहि आहेत. तथापि वरील उद्गार ह्या विशिष्ट प्रसंगीं निघण्याचें कारण केवळ हें अंतरींचें सुखच होतें असें नव्हे तर त्यांत भोंवतालच्या शांत व गंभीर देखाव्याची जबर भर पडली होती. सायंकाळीं ता. १५ जनेवारी रोजीं आगगाडींतून उतरल्यावर बाबू मजकुरांबरोबर मी ब्रह्मपुत्रेच्या उंच व विस्तीर्ण तीरावर फिरावयास निघालों. प्रथम एका अक्षरशः एकांत व तटस्थ स्थळीं—जणूं प्रार्थनेंत मग्न झालेलें—ब्राह्म मंदिर पाहिलें. मंदिराच्या दाराशेजारींच एका गतब्राह्म बंधूची सुंदर संगमरवरी समाधि पाहिली. ह्या बंधूंच्या प्रार्थना फारच प्रेमळ व तन्मय होत असत. अशीच एकदां प्रार्थना करीत असतां तिच्या भरांत ह्यांचें देहावसान झालें. म्हणून त्या प्रसंगाच्या स्मारकार्थ समाजमंडळींनीं ही समाधी बांधली आहे, हें ऐकून व पाहून झाल्यावर मागें वळतों तोंच साक्षात् ब्रह्मपुत्रेनें आपलें विराट् दर्शन दिलें. "मृत्योर्मा अमृतं गमय" असें मनांत येतें न येतें तोंच अमृताची पताकाच माझ्यापुढें फडकूं लागली. हिमालयाच्या पलीकडे कैलास पर्वताच्या पूर्व पायथ्याशीं असलेल्या मानस सरोवरापासून निघून पित्यास प्रदक्षिणा घालून आलेली ही महाभाग ब्रह्मपुत्रा ! हिनें केवळ दर्शनहेळामात्रें करून किती दिवसांची वार्ता सांगितली ! किती कालाची साक्ष दिली ! डूब्री गांवच्या तिन्ही बाजूंनीं हिचा प्रवास असल्यानें हा गांव तिनें खांकेंत कवटाळून धरल्यासारखा दिसतो. महासागरास पाहून ईश्वराच्या अनंत स्वरूपाची व गंभीरतेची थोडी कल्पना येते खरी, पण

अशा महानदांच्या विभूती पाहिल्याशिवाय ईश्वराचें कार्य व संसाराची प्रगति याविषयींची प्रत्यक्षता ध्यानांत येण्यासारखी नाहीं. अस्तमान झपाट्यानें होऊं लागला, सर्व दृश्य जगावर रात्रींचा अभेद्य पडदा पडूं लागला. मातीच्या डोळ्याला जसजसें कमी दिसूं लागलें तसतसें स्मृतीच्या डोळ्यांस अधिकाधिक दूरदूरचा प्रदेश दिसूं लागला. किती देश! किती भाषा! किती जाती, किती रीति—पण सद्धर्माची किंचित् आंच लागल्याबरोबर हे सर्व भेद विरघळून जाऊन प्रेमरस कसा पाझरतो—धर्माची पताका धारण करून निघालों म्हणजे किती पाहुणचार! किती आदर! किती कळकळ! ही जणूं आपला शोध काढीत येतात आणि मग आलेल्या वाटेनें आपल्या मागें हें प्रेमसुताचें जाळें किती फैलावलेलें दिसतें—तशीच पुढील खांचखळग्यांची दिसणारी वाट जसजशी पायाखालीं येते तसतशी कशी सपाट होते, आजच्या चिंताच उद्यांच्या आनंदास कशा कारणीभूत होतात, काल भोगलेले क्षणिक शारीरिक कष्ट आज कसें अक्षय्य मानसिक सुख देतात —या प्रकारें आंतील मानस सरोवरांतून निघालेल्या या स्मृतिनदाचे सुखदायी तरंग बाहेरील ब्रह्मपुत्रा दिसेनाशी झाली तरी एकावर एक स्वप्नवेगानें सुटूं लागले असतां वरील धन्यतेचा उद्गार माझे तोंडून निघाला यांत काय नवल!

हा गांव लहान व येथील समाजहि अगदींच लहान होता. तरी समाजांतील मंडळींची जूट व एकमेकांविषयीं कळकळ पाहून संतोष झाला. विशेष करून स्त्रियांमध्यें उपासनेविषयीं अत्यंत आतुरता दिसली. त्याच रात्रीं मी घरीं परत येऊन पोषाख बदलून प्रार्थनेला गेलों तों स्त्रिया आधींच पडद्याआड बसल्या होत्या. बहुतेक सर्व उपासना त्यांच्यासाठीं हिंदी भाषेंत करणें भाग पडलें. दुसरे दिवशीं सायंकाळीं समाजांत Some Ideals for Modern India यावर माझें इंग्रजींत व्याख्यान

झालें. ता. १७ रोजीं सकाळीं तरुणांसाठीं शाळेंत व्याख्यान झालें. ता. १७ रोजीं तेथून निघून नदीवरून आगबोटीनें जगन्नाथगंज येथें गेलों. ता. १८ रोजीं मैमनसिंग येथें पोहोंचलों.

**मैमनसिंग**

येथें दोन्ही पक्षाचे दोन समाज आहेत. बाबू ईशानचंद्र विश्वास हे गृहस्थ कलकत्त्याहून येथें येऊन त्यांनीं १८५५ चे सुमारास ब्राह्मसमाजाची स्थापना केली. नंतर डॉ. जगदीशचंद्र बोस यांचे वडील भगवानचंद्र येथें आल्यापासून ह्या समाजाची भरभराट झाली. तथापि गांवांत ह्यांना फार हाल काढावे लागले. सबंध गांव येथील जमिनदाराचे ताब्यांत असल्यामुळें आणि तो विरुद्ध असल्यानें मंदिराकरतां जागाच मिळेना. प्रथम मंदिर १८६७ त बांधलें; पण तें १८८६ च्या भूकंपांत पडलें. म्हणून पुन्हां बांधण्यांत आलें. ह्यापूर्वींच कुचबिहारच्या लग्नामुळें झालेल्या दुफळीमुळें ह्या समाज मंदिराचे मालकीसंबंधीं तंटा होऊन विघ्नें उपस्थित झालीं. १८९७ सालच्या भूकंपांत हें नवीन मंदिरहि पडलें. ह्याच भूकंपांत पूर्वीं ज्या जमिनदारानें विरोध केला त्यांचाहि वाडा जमिनदोस्त झाला. हल्लीं ( १९०५ ) जें मंदिर बांधलें आहे त्याचे उंच व नकशीचे भारी दरवाजे, तुळया व इतर संगमरवरी दगडाचें सामान ज्याच्याकडून पूर्वीं जागाहि मिळाली नाहीं त्याच जमिनदाराकडून मिळालें आहे. समाजाला त्याची बरीच सहानुभूति आहे. नवविधान समाजांत एकंदर बायकामुलें मिळून २६ व साधारण समाजांत ७८ मंडळी आहेत. साधारण समाजाचे आचार्य श्रीनाथ चंदा यांनीं गांवाबाहेर बरीच जागा घेऊन तेथें ब्राह्म लोकांचें एक स्वतंत्र खेडें वसविलें आहे नि त्याचा कार्यक्रम आटोपून मी मैमनसिंगहून डाक्याच्या वाटेवर कौरेड म्हणून एका लहानशा खेडेगांवीं गेलों. हें खेडें नामदार के. जी. गुप्त यांच्या मालकीचें आहे. शेतांत

साहेब मजकुरांचें घर नदीचे कांठीं आहे. बाबू कालीनाथ गुप्त हे त्या कामिशनरांचे वडील असून भाविकपणाबद्दल सर्व ब्राह्मसमाजांत प्रसिद्ध आहेत. हें एकांत स्थल त्यांच्या आवडीचें आहे. कोणी अतिथी आल्यास नेमलेलीं नोकर माणसें त्याची सोय मोठ्या आदरानें करीत असतात. पण येथें समाज नाहीं. येथें एक दिवस एकांत व आत्मसमाधानांत भोगून ता. २१ रोजीं पूर्वबंगालची राजधानी डाक्का येथें गेलों.

येथील समाज कलकत्ता समाजाच्या खालोखाल महत्त्वाचा आहे. या

**डाक्का**

सफरीच्या प्रवासाचा ताण मजवर इतका पडला कीं, त्यामुळें माझी तब्येत किंचित् ढासळली होती. मद्रासच्या सफरींत अन्नांतील तिखटामुळें जसा परिणाम झाला तसाच उलट बाजूनें बंगालचे भोजनांत गोड फार असल्यामुळें व त्यांतील मोहरीच्या तेलाचा मला अत्यंत वीट आल्यामुळें प्रकृतीवर फार परिणाम झाला होता. डाक्का समाजांत माघोत्सवाचा समारंभ चालू होता. मँचेस्टर कॉलेजमधून उच्च धर्मशिक्षण घेऊन परत आलेला मी म्हणून माझ्या व्याख्यानाला अलोट गर्दी जमली होती. मी इंग्रजींत बोलावयास उठलों. १०।१५ मिनिटें बोललों नाहीं तोंच भोंवळ येऊन मी खुर्चीत गळून पडलों. सभेचा मोठा विरस झाला. मला उचलून घरीं पोंचविण्यांत आलें. एक दोन दिवस विश्रांति घेतल्यावर ब्रह्मपुत्रा नदीवरील बोटीनें प्रवास करून बंगालच्या उपसागरावरील बारीसाल या जिल्ह्याच्या गांवीं आलों. या जलप्रवासानें प्रकृतीवर चांगला परिणाम झाला. बारीसालमधील माझें व्याख्यान फार परिणामकारक झालें. पण व्याख्यान आटोपून मी खालीं उतरतों तोंच माझ्या हातांत प्रकरण चौथ्यांत सांगितल्याप्रमाणें एक तांतडीची तार देण्यांत आली. मुंबई येथें माझी पत्नी आजारी असल्यानें व अहमदनगर येथें माझी बहीण चंद्राक्का आसन्नमरण झाल्यानें मला मुंबईस परतावें लागलें.

झालें. ता. १७ रोजीं सकाळीं तरुणांसाठीं शाळेंत व्याख्यान झालें. ता. १७ रोजीं तेथून निघून नदीवरून आगबोटीनें जगन्नाथगंज येथें गेलों. ता. १८ रोजीं मैमनसिंग येथें पोहोंचलों.

**मैमनसिंग**

येथें दोन्ही पक्षाचे दोन समाज आहेत. बाबू ईशानचंद्र विश्वास हे गृहस्थ कलकत्त्याहून येथें येऊन त्यांनीं १८५५ चे सुमारास ब्राह्मसमाजाची स्थापना केली. नंतर डॉ. जगदीशचंद्र बोस यांचे वडील भगवानचंद्र येथें आल्यापासून ह्या समाजाची भरभराट झाली. तथापि गांवांत ह्यांना फार हाल काढावे लागले. सबंध गांव येथील जमिनदाराचे ताब्यांत असल्यामुळें आणि तो विरुद्ध असल्यानें मंदिराकरतां जागाच मिळेना. प्रथम मंदिर १८६७ त बांधलें; पण तें १८८६ च्या भूकंपांत पडलें. म्हणून पुन्हां बांधण्यांत आलें. ह्यापूर्वींच कुचबिहारच्या लग्नामुळें झालेल्या दुफळीमुळें ह्या समाज मंदिराचे मालकीसंबंधीं तंटा होऊन विघ्नें उपस्थित झालीं. १८९७ सालच्या भूकंपांत हें नवीन मंदिरहि पडलें. ह्याच भूकंपांत पूर्वीं ज्या जमिनदारानें विरोध केला त्यांचाहि वाडा जमिनदोस्त झाला. हल्लीं ( १९०५ ) जें मंदिर बांधलें आहे त्याचे उंच व नकशीचे भारी दरवाजे, तुळया व इतर संगमरवरी दगडाचें सामान ज्याच्याकडून पूर्वीं जागाहि मिळाली नाहीं त्याच जमिनदाराकडून मिळालें आहे. समाजाला त्याची बरीच सहानुभूति आहे. नवविधान समाजांत एकंदर बायकामुलें मिळून २६ व साधारण समाजांत ७८ मंडळी आहेत. साधारण समाजाचे आचार्य श्रीनाथ चंदा यांनीं गांवाबाहेर बरीच जागा घेऊन तेथें ब्राह्म लोकांचें एक स्वतंत्र खेडें वसविलें आहे नि त्याचा कार्यक्रम आटोपून मी मैमनसिंगहून डाक्याच्या वाटेवर कौरेड म्हणून एका लहानशा खेडेगांवीं गेलों. हें खेडें नामदार के. जी. गुप्त यांच्या मालकीचें आहे. शेतांत

साहेब मजकुरांचें घर नदीचे कांठीं आहे. बाबू कालीनाथ गुप्त हे त्या कामिशनरांचे वडील असून भाविकपणाबद्दल सर्व ब्राह्मसमाजांत प्रसिद्ध आहेत. हें एकांत स्थल त्यांच्या आवडीचें आहे. कोणी अतिथी आल्यास नेमलेलीं नोकर माणसें त्याची सोय मोठ्या आदरानें करीत असतात. पण येथें समाज नाहीं. येथें एक दिवस एकांत व आत्मसमाधानांत भोगून ता. २१ रोजीं पूर्वबंगालची राजधानी डाक्का येथें गेलों.

**डाक्का**

येथील समाज कलकत्ता समाजाच्या खालोखाल महत्त्वाचा आहे. या सफरीच्या प्रवासाचा ताण मजवर इतका पडला कीं, त्यामुळें माझी तब्येत किंचित् ढासळली होती. मद्रासच्या सफरींत अन्नांतील तिखटामुळें जसा परिणाम झाला तसाच उलट बाजूनें बंगालचे भोजनांत गोड फार असल्यामुळें व त्यांतील मोहरीच्या तेलाचा मला अत्यंत वीट आल्यामुळें प्रकृतीवर फार परिणाम झाला होता. डाक्का समाजांत माघोत्सवाचा समारंभ चालू होता. मँचेस्टर कॉलेजमधून उच्च धर्मशिक्षण घेऊन परत आलेला मी म्हणून माझ्या व्याख्यानाला अलोट गर्दी जमली होती. मी इंग्रजींत बोलावयास उठलों. १०।५ मिनिटें बोललों नाहीं तोंच भोंवळ येऊन मी खुर्चीत गळून पडलों. सभेचा मोठा विरस झाला. मला उचलून घरीं पोंचविण्यांत आलें. एक दोन दिवस विश्रांति घेतल्यावर ब्रह्मपुत्रा नदीवरील बोटीनें प्रवास करून बंगालच्या उपसागरावरील बारीसाल या जिल्ह्याच्या गांवीं आलों. या जलप्रवासानें प्रकृतीवर चांगला परिणाम झाला. बारीसालमधील माझें व्याख्यान फार परिणामकारक झालें. पण व्याख्यान आटोपून मी खालीं उतरतों तोंच माझ्या हातांत प्रकरण चौथ्यांत सांगितल्याप्रमाणें एक तांतडीची तार देण्यांत आली. मुंबई येथें माझी पत्नी आजारी असल्यानें व अहमदनगर येथें माझी बहीण चंद्राक्का आसन्नमरण झाल्यानें मला मुंबईस परतावें लागलें.

**कलकत्ता**

१९०६ सालच्या नाताळांत या परिषदेची कलकत्ता येथें मोठ्या थाटानें बैठक झाली. सर नारायण चंदावरकर यांनीं के. नटराजन्, बंडोपंत भाजेकर आणि मला कलकत्त्यास आपल्याबरोबर नेले. कोकोनाड्याचे डॉ. व्यंकटरत्नम् नायडू यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. ब्रिटिश अँड फॉरेन असोसिएशनचे एक प्रतिनिधि मि. जी. ब्राऊन हेहि हजर होते. सुरवातीच्या उपासना सिटी कॉलेजचे वृद्ध प्रिन्सिपाल बाबू उमेशचंद्र यांनीं चालविली. केशवचंद्र सेनचे शिष्य प्रसिद्ध गायक त्रैलोक्यनाथ संन्याल यांचें भजन झालें. या अधिवेशनाच्या सर्व सभा ब्राह्मसमाजाच्या सिटी कॉलेजच्या हॉलमध्यें यशस्वी रीतीनें पार पडल्या.

यावेळीं मी माझे मित्र प्रसिद्ध बिपिनचंद्र पाल यांचे घरीं उतरलों होतों. हे मँचेस्टर कॉलेजमधून ब्राह्मोप्रचारक होऊन आले होते. पण स्वदेशीं येतांच ते राजकारणाकडे वळले. तरी देखील ब्राह्मसमाजाच्या कार्यांत अत्यंत सहानुभूतीनें भाग घेत होते. ह्यावेळीं कलकत्त्यास समाजांत एका महत्त्वाच्या प्रश्नावर मोठा वाद माजला होता. तो विषय म्हणजे ब्राह्मसमाजांतील तरुणांनीं रंगभूमीवर नाटकांतील कामें करावीं किंवा नाहीं हा होय. ब्राह्मसमाजांतील तिन्ही पक्षांतील सर्व वृद्ध मंडळी विशेषतः कृष्णकुमार मित्र आणि हेरंबचंद्र मैत्र यांचा या कामीं फार विरोध होता. पण प्रसिद्ध कलाप्रिय रवीन्द्रनाथ टागोर हे या कामीं फार अनुकूल होते. बहुतेक सारा तरुण वर्ग त्यांच्याच मताचा होता. डॉ. रवींद्रनाथ टागोर यांना साधारण ब्राह्मसमाजाचे सन्मान्य सभासद करावें असा आग्रह तरुणांनीं घेतला. वृद्धांना याची फार चीड आली. बिपिनचंद्र पाल हे टागोर यांच्या मताचेच होते. त्यांच्याकडूनच मला ह्या रणसंग्रामाची बरीच हकीकत कळली. पुढें बरींच वर्षें हा तंटा विकोपाला गेला तरी रवीन्द्र बाबूंचाच

अखेर जय झाला. १९११ सालीं ब्राह्मसमाजाच्या माघोत्सवांत रविवारच्या नीति शाळेचा जो बक्षिस समारंभ झाला, त्यावेळीं तरुण मुलांमुलींनीं एक सुंदर नाट्यप्रयोग केला. पण तो पाहण्यास वृद्धांचीच अधिक गर्दी जमली होती. पुढें पुढें तर रवीन्द्रनाथ टागोर हे माघोत्सवाच्या वेळीं आपल्या घरीं आपल्या लेकी सुना नातवंडें यांना घेऊन आपण केलेल्या नाटकाचे प्रयोग जाहीरपणें करून दाखवीत आणि १९२३ च्या सुमारास मी कलकत्त्यास गेलों असतां डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांना साधारण ब्राह्मसमाजानें आपल्या वेदीवरून उपासना करण्यास बोलाविलें. तरुण वर्गाचा हा मोठा विजय; पण वृद्ध हेरंबचंद्र बाबूंना हा शेवटपर्यंत कधींच खपला नाहीं. त्यांचीच एक चमत्कारिक गोष्ट सांगतात कीं, बाबू महाशय एकदा रस्त्यानें जात असतां त्यांच्याकडे एक तरुण विद्यार्थी येऊन त्यानें अमूक एक नाटकगृह कोठें आहे म्हणून विचारलें. बाबूजींना अत्यंत संताप येऊन, "मला ठाऊक नाहीं जा" असें त्यांनीं रागारागानें सांगून त्याला झिडकारलें. विद्यार्थी गेला, पण बाबूजींना आपण खोटें बोललों याचा पश्चात्ताप होऊन त्यांनीं त्या विद्यार्थ्यास परत बोलाविलें, "अरे मला ठाऊक आहे, पण मी सांगत नाहीं जा" असें म्हणून पुन्हा झिडकारलें.

१९०७ च्या नाताळांत सुरतेस या परिषदेची बैठक झाली. रवीन्द्रनाथ टागोरांचे वडील बंधू व हिंदुस्थानांतील पहिले आय्. सी. एस्. सत्येंद्रनाथ टागोर हे त्या परिषदेचे अध्यक्ष होते. अहमदाबाद समाजाचे अध्यक्ष लालशंकर उमियाशंकर हे स्वागत मंडळाचे अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं प्रतिनिधींचें स्वागत केलें. सुरतेस समाज नसतांहि ही बैठक समाधानकारक रीतीनें तेथील टाऊन हॉलमध्यें पार पडली. पहिली उपासना मुंबई समाजाचे स्वामी स्वात्मानंदजी यांनीं हिंदींत चालविली. जाहीर सभेंत डॉ. भांडारकर,

**सुरत**

गुजराथचे प्रसिद्ध कवि नानालाल, लाहोरचे प्रो. रुचीराम सहानी यांचीं भाषणें झालीं. ठरावाचे वेळीं ह्या परिषदेचे मार्फत लाहोरचे अविनाशचंद्र मुझुमदार यांच्या नेतृत्वाखालीं दुष्काळ निवारणाचे कामीं घटना व्हावी असा एक विशिष्ट ठराव पास करण्यांत आला.

राष्ट्रीय सभेचा मात्र या वेळेस फारच गोंधळ उडाला. ही सभा आजपर्यंत मवाळांच्या हातांत होती. लोकमान्य टिळकांनीं ह्या वर्षीं ती उधळून लावून पुढें कित्येक वर्षें तिला आपल्या मुठींत ठेवलें होतें. गेल्या वर्षीं मुंबईत स्थापन झालेल्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनची एक जाहीर सभा याच वेळीं झाली.

**मद्रास**

१९०८ च्या नाताळांत मद्रास शहरीं ही परिषद भरली. मी मद्रासला निघालों त्या वेळीं माझी प्रकृति किंचित् नादुरुस्त होती म्हणून बंगलोरपर्यंत मीं सेकंड क्लासांतून प्रवास केला. वेळ नाताळची असल्यामुळें व्यापारी वगैरे मंडळींची डब्यांत बरीच गर्दी होती. गुंडकल स्टेशनवर तार करण्यासाठीं मी खालीं उतरून परत डब्यांत येऊन पाहतों तों तीन नवे आडदांड युरोपियन गृहस्थ बसले असून बाकीची सारी हिंदी मंडळी उतरून दुसरीकडे गेली होती. माझें सामान एकीकडे ठेवण्यांत आलें होतें. मी माझ्या जागेवर जाऊन बसलों व तेथून कांहीं हाललों नाहीं. उतरून गेलेल्या मंडळींत एक मोंगलाईतला मुसलमान आडमुठ्या अधिकारी होता. मी बसलेला पाहून थोडेसें धैर्य आल्यामुळें उतरून गेलेले व्यापारी परत येऊन बसले. युरोपियनांनीं मला कोणताहि त्रास दिला नाहीं. दारू पिणें, चिरूट ओढणें आणि पत्ते खेळणें ह्यांतच ते गुंग झाले होते. पण पुन्हां आलेले कानडीअप्पांनीं त्यांच्या खेळण्यांत मुद्दामच लक्ष घालून फाजील आगंतुकपणा दाखविल्यानें त्या युरोपियनांना तो असह्य होऊन त्यांना

फार चीड आली. त्यांचें इंग्रजी व ह्यांचें कानडी परस्परांस न कळल्यानें प्रकरण अधिक विकोपाला जाऊं नये म्हणून मला मध्यस्थी करणें भाग पडलें. प्रसंगविशेषीं आम्हां हिंदी एतद्देशियांना आपला आब राखून घेतां येत नाहीं म्हणून असले खटके उडतात.

लाहोरचे अविनाशचंद्र मुझुमदार हे या परिषदेचे अध्यक्ष होते. स्वागताध्यक्ष मंगळूर समाजाचे अध्यक्ष उल्लाल रघुनाथय्या यांनीं सुंदर भाषण केलें. ही जाहीर बैठक Anderson Memorial Hall मध्यें झाली. सौ. सरोजिनी नायडू, अहमदाबादचे रमणभाई नीलकंठ, लाहोरचे धर्मदास सूटी यांचीं व माझीं जाहीर भाषणें झालीं. ब्रिटिश अँड फॉरेन असोसिएशनचे प्रतिनिधि प्रो. टी. डेव्हिस हे कोलंबोहून मुद्दाम आले होते. डिप्रेस्ड क्लासेस मिशनची जाहीर सभा ३० डिसेंबर रोजीं करविण्यांत आली. त्या वेळीं रा.ब. एम्. आदिनारायणय्या यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. परिषदेंतील मुख्य प्रवचन करण्याचें काम मजकडे होतें. या परिषदेच्या खर्चाप्रीत्यर्थ ब्राह्मसमाजाचे प्रसिद्ध हितचिंतक पिठापुरचे महाराज यांनीं ५०० रु. दिल्यामुळें परिषदेच्या यशांत भर पडली. याच वेळीं डिप्रेस्ड क्लासेस मिशनची मद्रास शाखा उघडण्यांत आली. तिच्यासाठीं मला ५।६ दिवस मद्रासेंत राहावें लागलें. त्यानंतर कोइमतूर, कालिकत, फ्रेंचांचा गांव माही, कानानोरे या गांवीं भेट देऊन शेवटीं मंगलोर येथें दोनतीन दिवस थांबून मी मुंबईस परतलों.

**लाहोर**

१९०९ सालीं लाहोर येथें ही परिषद झाली. या परिषदेचे दुय्यम चिटणीस अविनाशचंद्र मुझुमदार यांनीं परिश्रम घेऊन स्वागताची जंगी तयारी ठेवली होती. कलकत्त्याचे विनयेंद्रनाथ सेन ह्यांचें अध्यक्षीय भाषण फारच परिणामकारक झालें. पंजाब येथील दोन्ही पक्षाच्या ब्राह्म-

समाजिस्टांनीं मिळूनमिसळून काम केलें. या परिषदेंतील एक विशेष म्हणजे बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं आपल्या संस्थानचे विद्वान् माणसांना प्रतिनिधी म्हणून लाहोरास पाठविलें होतें. परिषदेचें काम पाहून त्यांना आनंद झाला, आणि उदार धर्माच्या कार्याचें महत्त्व त्यांना कळलें. मुंबईचे गिरिजाशंकर त्रिवेदी हे लाहोरास जातांना व परत येतांना माझ्याच बरोबर प्रवास करीत होते. जातांना वाटेंत अहमदाबाद, पालनपूर, जयपूर, आग्रा, मथुरा, वृंदावन आणि दिल्ली हीं शहरें आम्हीं उतरून बारकाईनें पाहिलीं. परिषद आटोपल्यावर अमृतसर येथें जाऊन शीखांचें सुवर्णमंदिर पाहिलें. ह्या वेळीं कांहीं कारणांवरून पंजाबांतील आर्यसमाजावर पतियाळाच्या संस्थानाधिपतींचा फार रोष झाला होता. लाला मुनशीराम, स्वामी श्रद्धानंद यांचेवर या रोषाचा घाला पडला होता. पतियाळाच्या आर्यसमाज मंदिराचें रूपांतर संस्थानच्या घोडशाळेंत करण्यांत आलें होतें. लालाजींना आम्ही भेटण्यास गेलों तेव्हां ते खिन्न मुद्रेनें पण उदात्त वृत्तीनें या शाळेंत बसलेले दिसले. सौ. हेमंतकुमारी चौधरी या ब्राह्मभगिनीकडे आम्ही एक दिवस उतरलों. उपासना वगैरे आटोपून आम्ही निघालों. परत येतांना अजमीर जवळील अबूच्या पहाडांत आम्हीं दोन दिवस धर्मचिंतनांत घालविले. तेथील सुप्रसिद्ध जैन मंदिर, दिलवारा आणि प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. या मंदिराचें सर्व काम संगमरवरी दगडाचें असून तेथें कलाकुसरीची इतकी कमाल झाली आहे कीं, तशी सुबकता व साजुकता जगात इतरत्र क्वचित्च आढळेल. मोंगलांच्या तडाक्यांतून हें रत्न कसें वांचलें याचें आम्हांला मोठें आश्चर्य वाटलें. हें स्थळ इतकें अपूर्व असून त्या मानानें त्याची प्रसिद्धि कां नाहीं याचें अधिक आश्चर्य वाटलें. कदाचित् त्याच्या अप्रसिद्धपणामुळेंच हें सुरक्षित राहिलें असेल अशी भोळी समजूत आम्हीं करून घेतली.

**मातोश्रींचा अंत**

ह्या प्रवासास निघण्यापूर्वी माझी वृद्ध मातोश्री कॅन्सर (व्रण)च्या व्यथेनें अत्यवस्थ होती. तिला सोडून मला प्रवासास निघवेना आणि गेल्याशिवाय राहवेना असा पेंच घडला. पण मातोश्रींनीं मला धीर दिला. जावयास अनुज्ञा दिली आणि 'तूं परत येईपर्यंत मी तुला सोडून जात नाहीं' असें आश्वासनहि दिलें. हा जुन्या माणसांचा करारीपणा ! पण मी परत आल्यावर ता. ८ फेब्रुवारी १९१० रोजीं माझ्या प्रेमळ मातोश्री सुमारें ७० वर्षांच्या होऊन निवर्तल्या.

**अलाहाबाद**

१९१० सालीं ही परिषद अलाहाबाद येथें भरली. तेथें पूर्वी एक ब्राह्मसमाज होता; पण अलिकडे तो बंद पडला होता. लाहोरचे अविनाशचंद्र मुझुमदार या प्रांतांतील माहितगार होते म्हणून त्यांना माझ्या जोडीला चिटणीस म्हणून नेमण्यांत आलें होतें. परिषदेच्या पूर्वी तीन आठवडे जाऊन त्यांनीं पूर्वतयारी चालविली. जागा मिळण्यास कठिण जाऊं लागलें. कर्नल गंज, बंगाली स्कूलच्या अधिकाऱ्याला त्यांच्या शाळेला २०० रुपयांची मदत देऊन परिषदेसाठीं तेथें जागा मिळविली. अध्यक्ष कोणास नेमावें हाहि प्रश्न बिकट झाला. शेवटीं पं. शिवनाथशास्त्री यांनीं कबूल केल्यावर हा प्रश्न सुटला.

मी तेथें एक आठवड्यापूर्वी गेलों. प्रत्येक परिषदेपूर्वी सर्व ब्राह्म आणि प्रार्थना समाजांत सर्क्युलर काढून खर्चाची तरतूद करणें हें माझें काम असें. केव्हां पुरेसे पैसे मिळत आणि केव्हां मिळतहि नसत. माझ्या प्रवास खर्चाचीहि नेहमीं रडच असे. एकच महिन्यापूर्वी (नोव्हेंबर १९१० मध्यें) मुंबई प्रार्थना समाजाशीं प्रचारक या नात्यानें मीं संबंध सोडला होता. अर्थात् प्रवास खर्चच नव्हे तर घरखर्चाचाहि प्रश्न मजपुढें आ पसरून

उभा होता. नाताळचे थंडीचे दिवस, आगगाडींतून भयंकर गर्दी, थर्ड क्लासची दगदग अशा स्थितींत मध्यरात्रीं मी अलाहाबादेस उतरलों. प्रो. बाबू रामानंद चतर्जी यांचेकडे मी उतरणार होतों. पण गाडीवाल्याला तें ठिकाण माहीत नसल्यामुळें तास दोन तास अपरात्रीं इकडे तिकडे भटकल्यावर नाइलाज म्हणून त्यानें मला शेवटीं म्युइट कॉलेजच्या विस्तीर्ण पटांगणांत माझें सामान टाकून तो निघून गेला. थंडी भयंकर पडली होती. सामानाला डोकें टेकून त्या माळ्यावर ती रात्र मीं कशीबशी मोठ्या कष्टानें काढली. प्रवासांत हे सोहाळे माझ्या नित्याचेच असत. कलकत्त्याचे बाबू हेमचंद्र सरकार ह्या परिषदेला हजर होते. ह्या परिषदेचें विशेष काम म्हणजे परिषदेच्या संघटनेचा खलिता तयार करून मंजूर करून घेणें. हा मसुदा तयार करण्यासाठीं एक पोट समिती, हेमचंद्र सरकार, नृत्यगोपाळ राय, लाहोरचे लाला रघुनाथ सहाई आणि मी स्वतः यांची नेमण्यांत आली. खलित्यांत खालील मुद्दे होते : ( १ ) नांव थिइस्टिक कॉन्फरन्स असें असावें. ( २ ) उद्देश–एकेश्वरी धर्माचा प्रसार. ( ३ ) एकेश्वरी धर्माचे कोणीहि अनुयायी, रीतसर निवडून आलेले हे सभासद. (४) परिषदेचा तत्कालीन अध्यक्ष, चार सभासद, एक किंवा दोन चिटणीस यांची स्टँडिंग कमिटी. या सर्वांची निवडणूक दरवर्षी परिषदेंत होणें. वर्षभर काम करून शेवटीं अहवाल सादर करणें. ( ५ ) ठरावांचा अंमल करणें वगैरे स्टँडिंग कमिटीचीं कामें. (६) परिषदेच्या ठिकाणीं स्थानिक सभासदांची स्वागत कमिटी नेमून आपले अवश्य ते अधिकार स्टँडिंग कमिटीनें या कमिटीस तात्पुरते देणें. या नियमांत बदल करण्याचा असल्यास परिषदेच्या उघड्या जाहीर सभेंत दोनतृतीयांश सभासदांच्या अनुमतीची जरूरी. इत्यादि.

लवकर एकमत होईना म्हणून अध्यक्षानें हा खलिता निरनिराळ्या ब्राह्म आणि प्रार्थना समाजांच्या अभिप्रायासाठीं सर्व देशभर फिरविण्यांत

यावा आणि कलकत्त्यांत पुढच्या वर्षींच्या परिषदेंत हें सर्व प्रकरण सादर करावें, असा ठराव मांडल्यावर तो पास झाला.

प्रचाराचें काम चोहीकडे फार अव्यवस्थित रीतीनें चाललें होतें आणि तत्कालीन प्रचारक आपापलीं कामें सोडून बाहेरगांवीं फारसा संचार करीत नसत. म्हणून मीं एक ठराव आणला कीं, देशांतील मुख्य मुख्य ब्राह्मसमाजानें आपल्या प्रचारकाला निवडक प्रांतांतून निदान तीन महिने तरी संचारास पाठवावें. अर्थात् बंगाल्यांनीं हा ठराव हाणून पाडला. एकच काम करा म्हटलें कीं, त्यांचा मस्तकशूळ उठत असे. मीं दुसरा ठराव बहुजन-समाजांत ब्राह्मधर्माचा प्रचार करावा हा आणल्याबरोबर मात्र तात्काळ एकमत झालें. कारण ठरावच तसा मोघम होता. हेमचंद्र सरकारनें ठराव आणला कीं, सन १८७२ चा तिसरा कायदा मिश्रविवाहासंबंधीं होता तो सुधारावा. कलकत्त्यांतील ब्राह्मसमाज कमिटीनें या बाबतींत काय प्रयत्न केले ह्याची हकीकत त्यांनीं सांगितली. ठराव एकमतानें पास झाला. पुढील सालाकरितां वि. रा. शिंदे, बाबू अविनाशचंद्र मुझुमदार, विनयेंद्रनाथ सेन व्यंकटरत्नम् नायडू, गुरुदास चक्रवर्ती आणि नृत्य-गोपाळ राय ह्यांची स्टँडिंग कमिटी नेमण्यांत आली. हेमचंद्र सरकार ह्यांना मुख्य चिटणीस नेमण्यांत आलें.

**कलकत्ता**

१९११ च्या नाताळांत कलकत्त्यास सिटी कॉलेजमध्यें ही परिषद भरली. मंगळूर ब्राह्मसमाजाचे अध्यक्ष उल्लाल रघुनाथय्या यांना अध्यक्ष नेमण्यांत आलें. जर्मनींतील गॉटिंजन युनिव्हर्सिटीचे प्रख्यात प्रोफेसर डॉ. रुडॉल्फ ऑटो हे परिषदेसाठीं मुद्दाम आले होते. पहिली उपासना सत्येन्द्रनाथ टागोर यांनीं संस्कृतमध्यें चालविली. स्वागतमंडळाचे अध्यक्ष प्रिन्सिपाल हेरंबचंद्र मित्र यांनीं भाषण करून स्वागत केलें. निरनिराळ्या

ठिकाणच्या अनेक प्रसिद्ध सभासदांनीं महत्त्वाचीं भाषणें करून निबंध वाचले. बारा महत्त्वाचे ठराव पास झाले. तिसरा ठराव परिषदेच्या संघटनेबद्दल होता. मागल्या परिषदेंतील मसुदा आणि समाजांच्या अभिप्रायाचा अहवाल वाचल्यावर अविनाशचंद्र मुझुमदारांनीं तो ठराव पुढें मांडला. परिषदेच्या अध्यक्षांच्या नेमणुकीबद्दल एक जादा नियम घातला होता तो हा कीं, स्टँडिंग कमिटीनें स्वागत कमिटीचा अभिप्राय घेऊन अध्यक्ष निवडावा व तो परिपदेच्या बैठकींत मंजूर व्हावा. हा ठराव पास झाला. कलकत्ता ही देशाची राजधानी आणि ब्राह्मसमाजाचें मुख्य केंद्र असल्यानें हा सर्व समारंभ त्या मानानें थाटाचा झाला. नंतर एक सुंदर स्नेहसंमेलन मेरी कार्पेंटर हॉलमध्यें झालें. त्यांत जर्मन प्रोफेसर रुडॉल्फ ऑटो यांचें सहानुभूतिपर भाषण झालें.

**बांकीपूर**

१९१२ सालीं ही परिषद बांकीपूरला भरली. अध्यक्षस्थान सर नारायण चंदावरकर यांस देण्यांत आलें होतें. या ठिकाणीं कलकत्त्यांतील दोन्ही शाखेचे ( साधारण व नवविधान ) ब्राह्मसमाज असल्यानें आणि बाबू हेमचंद्र सरकार हे मुख्य चिटणीस असल्यानें पूर्वतयारीचा त्रास पडला नाहीं. माझ्याबरोबर डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे एक आस्थेवाईक कार्यकर्ते अमृतलाल ठक्कर हे बांकीपुरास आले होते. मिशनची एक जाहीर सभा झाली. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार आर. एन. मुधोळकर ह्यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. अमृतलाल ठक्करनीं माहितीचे आंकडे वगैरेंची जय्यत तयारी करून ही सभा यशस्वी रीतीनें पार पाडली. पुढील अधिवेशन कराची येथें ठरलें. तेथें नवविधान पक्षाचा फार जोर असल्यानें परिषदेचे जनरल सेक्रेटरी मलाच नेमण्यांत आलें.

**कराची**

१९१३ सालीं नाताळांत ही परिषद कराचीस नव्यानेंच भरविण्यांत आली. हैद्राबाद समाजाचे अध्यक्ष दिवाण कौरामल वगैरे पुढाऱ्यांनीं कराचीच्या सभासदांच्या मदतीनें कराचीच्या टाऊन हॉलमध्यें परिषदेच्या जाहीर बैठकीची सोय केली होती. अमेरिकेचे जे. टी. संडरलंड हे या परिषदेसाठीं मुद्दाम आले होते. त्यांनाच अध्यक्ष नेमण्यांत आलें. युनिटेरियन लोकांच्या नेतृत्वाखालीं एक उदार धर्ममतवादी लोकांची जागतिक परिषद आजपर्यंत युरोप आणि अमेरिकेंतील निरनिराळ्या ठिकाणीं करविण्यांत येत असे. १९०३ सालीं ॲम्स्टरडॅम येथें भरलेल्या परिषदेंत हिंदुस्थानचा प्रतिनिधि म्हणून हजर राहून मीं भाग घेतला होता. १९०५ सालीं जिनीव्हा येथें भरलेल्या परिषदेंत डॉ. सुखटणकर हे हजर होते. १९११ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या परिषदेंत ह्या आंतरराष्ट्रीय जागतिक परिषदेचें अधिवेशन लवकरच हिंदुस्थानांत भरावें असा ठराव पास करण्यांत आला होता. म्हणून अमेरिकेंतील युनिटेरियन असोसिएशननें डॉ. संडरलंड यांस जागतिक परिषद हिंदुस्थानांत भरविण्याची पूर्वतयारी करण्यास मुद्दाम पाठविलें होतें. डॉ. संडरलंड हे १८९५ सालीं कॉंग्रेस पुण्यांत भरली असतां तिला हजर होते आणि पुण्यांत भरलेल्या एकेश्वरी परिषदेंत त्यांनीं भागहि घेतला होता. शिकागो येथें १८९२ सालच्या सुमारास पार्लमेंट ऑफ रिलीजन ह्या पहिल्या परिषदेंत हिंदुस्थानच्या ब्राह्मसमाजाच्या वतीनें बाबू प्रतापचंद्र मुझुमदार, बळवंतराव नगरकर आणि हिंदुधर्माच्या वतीनें स्वामी विवेकानंद ह्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. म्हणून हिंदुस्थानाला ही जागतिक परिषद अगदीं अपरिचित होती असें नव्हे.

**मासलेवाईक प्रकार**

जे. टी. संडरलंडसाहेबाची व माझी पूर्वीपासून चांगली ओळख होती. कारण त्यांच्या शिफारशीनें ऑक्स्फर्ड येथील मँचेस्टर कॉलेजांत मला व अमेरिकेंतील मिडिव्हल थिऑलॉजिकल स्कूलमध्यें हिंदुस्थानांतील ब्राह्म विद्यार्थ्यांना पाठवून प्रचारक बनविण्याची योजना सुरू करण्यांत आली होती. संडरलंड यांनीं ह्यावेळीं आपल्याबरोबर आंपल्या मुलीस आणले होते. संडरलंडसाहेबांची सोय कराचींतील एका युरोपियन हॉटेलांत करण्यांत आली होती. ते परिषदेचे नियोजित अध्यक्ष आणि मी चिटणीस म्हणून कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं मी त्यांना हॉटेलांत भेटावयास गेलों असतां एक मासलेवाईक प्रकार घडला. नाताळच्या मोसमांत युरोपियन पाहुण्यांनीं हॉटेल गच्च भरलें होतें. हॉटेलच्या व्यवस्थापकांनीं संडरलंडसाहेबांस भेटण्यास मला मनाई केली. मला आंत जातां येत नसल्यास साहेब मजकुरांस मला भेटण्यास बाहेर आणले पाहिजे असा मीं आग्रह धरला. डॉ. संडरलंड बाहेर आले आणि घडलेल्या प्रकाराबद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित केला. मीं त्यांना स्पष्ट बजावलें कीं, कामानिमित्त मला वेळोवेळीं भेटावें लागणार, ह्या प्रकाराची पुनरावृत्ति झाल्यास येथील पाहुणचार सोडून आम्ही व्यवस्था करूं तेथें साहेबांना अवश्य जावें लागेल. साहेब सध्यां अमेरिकेच्या स्वतंत्र वातावरणांत नाहींत. आमच्या देशांत आमच्या इतकेच परतंत्र आहेत. साहेब मजकुरांना हा व्यावहारिक प्रकार पाहून खऱ्या उदार धर्माच्या प्रसाराबद्दल पुन्हां एकवार विचार करावा लागला. मग पुढें मात्र ब्राह्म परिषदेचीं सर्व कामें रीतसर पार पडलीं.

सर नारायण चंदावरकर आणि इतर प्रांतांतील बडी बडी मंडळी ह्या बैठकीस हजर होती. पुढील वर्षी जागतिक परिषद हिंदुस्थानांत भरावयाची तिच्या पूर्वतयारीचा विचारविनिमय करण्यासाठीं एक खासगी

सभा बोलावली. हिंदुस्थान देश म्हणजे एक छोटा खंड. एका अधिवेशनानें ह्या नवीन चळवळीचें काम भागणार नाहीं, म्हणून १९१४ सालीं कलकत्ता, मद्रास, मुंबई, लाहोर या चार मुख्य ठिकाणीं चार अधिवेशनें भरविण्याची योजना ठरली. अमेरिका, युरोप, आणि हिंदुस्थान या तीन देशांतील उदार धर्मवाद्यांनीं पैशाचा निधि जमविण्याची जबाबदारी घेतली. कलकत्त्यांत हेमचंद्र सरकार, मद्रासेंत डॉ. व्यंकटरत्नम् नायडू, मुंबईस वि. रा. शिंदे, लाहोरास प्रो. रुचीराम सहानी या चौघांना आपापल्या प्रांताच्या अधिवेशनाचे चिटणीस नेमण्यांत आलें.

**मदतीचें आश्वासन**

कराची येथील काम आटोपल्यावर बडोद्याचे श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड यांची डॉ. संडरलंडशीं समक्ष भेट करून देण्यासाठीं मीं महाराजांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीला आगाऊ भेटून तयारी केली. डॉ. संडरलंड, त्यांची कन्या व मी महाराजांचे पाहुणे म्हणून बडोद्यास दोन तीन दिवस होतों. अशा जागतिक परिषदेची महाराजांना हौस फार. त्यांची सहानुभूति आणि मदत मिळण्याची आम्हाला आशा होती. त्यांनीं मदतीचें आश्वासन दिलें. राजवाडयांत डॉ. संडरलंडचें एक व्याख्यान त्यांनीं करविलें. विषय "इमर्सन" हा होता. व्याख्यान संपल्यावर लक्ष्मीविलास राजवाडा संपूर्णपणें फिरून दाखविण्यांत आला. वाडयाचें एकंदर काम व मांडणी पाहून डॉ. साहेबांनीं संतोष व्यक्त केला आणि जगांतील उत्तमोत्तम वाडयांमध्यें ह्याचा नंबर बराच वर येतो असा अभिप्राय दिला. हिंदुस्थानातील प्रमुख शहरीं ह्या जागतिक परिषदेची ठरलेली योजना तेथील पुढाऱ्यांस समक्ष समजावून सांगून डॉ. मजकूर अमेरिकेस परत गेले.

लगेच मी ह्या नवीन कामास लागलों. एक जाहीर विनंतीचें लहानसें पुस्तक छापलें. आणि तें हिंदुस्थान, युरोप आणि अमेरिकेंतील परिचित गृहस्थांना पाठवून पत्रव्यवहार सुरू केला. बरींच समाधानकारक उत्तरें

**जागतिक होळी**

आलीं. युरोपांतील त्याकाळचे प्रसिद्ध व अग्रगण्य जर्मन तत्त्वज्ञानी प्रो. रुडॉल्फ ऑयकेन यांचें परिषदेस हजर राहून भाग घेतो अशा अर्थाचें पत्र आलें. प्रो. मजकूर पुढील वर्षी जपानला जाणार होते म्हणून वाटेंत हा कार्यभाग उरकून घेण्यास त्यांना कठीण पडणार नव्हतें. पूर्वतयारीची ही धामधूम चालली असतांना विधिघटना निराळीच चालू होती. १९१४ च्या ऑगस्ट महिन्यांत महायुद्ध अकस्मात सुरू झालें. त्यांत ही परिषदच काय पण अनेक जागतिक महत्त्वाच्या गोष्टींची होळी झाली. महायुद्धानें सर्व जगाला त्राहि त्राहि करून सोडलें. मग पुढें भरणाऱ्या परिषदेची काय कथा? गेल्या दहा वर्षांत अत्यंत श्रम करून ज्या एकेश्वरी धर्म परिषदेला आम्हीं नांवारूपाला आणलें होतें तिचासुद्धां ह्या खाईंत स्वाहा झाला.

---

# प्रकरण ९ वें

## ब्राह्मधर्म सूची ग्रंथ

या विषयाची रजा घेण्यापूर्वी या परिषदेच्या कामांतूनच निघालेला (Theistic Directory) ब्राह्मधर्म सूची ग्रंथ ह्याविषयीं थोडी

माहिती देऊन हा भाग पुरा करूं. भारतांतील निरनिराळ्या ब्राह्मसमाजांच्या कार्यांची आणि प्रगतीची माहिती जमा करून सालोसाल प्रसिद्ध करण्याचें काम कलकत्त्याचे भाई प्रतापचंद्र मुझुमदार यांनीं प्रथम १८७२ च्या सुमारास सुरू केलें आणि Theistic Annual या नांवाखालीं १८७९ पर्यंत चालूं ठेवलें. पुढील वर्षी एका त्रैमासिकाचें रूपानें त्यांनीं हेंच काम पुढें चालविलें. मिस्. एस्. डी. कॉलेट ह्या उत्साही इंग्रज स्त्रीनें १८७६–८७ पर्यंत Bramho Year Book या नांवानें हेंच काम अधिक पद्धतशीर चालविलें.

त्यापुढें १८८८ सालीं ब्राह्म परिषदेचें काम सुरू झालें. १९०५ सालीं काशीच्या परिषदेंत या सूची ग्रंथाच्या कामाची मीं पुन्हां उचल केली. परिषदेकडून एकमतानें ठराव पास करून घेतला. समक्ष माहिती करून घेण्यास बंगालची सफर काढली. जाहीर पत्रकें काढून व खासगी पत्रव्यवहार करून कित्येक वर्षें प्रयत्न करूनहि समाधानकारक माहिती मिळेना. म्हणून हा प्रयत्न मला दोनदां सोडून द्यावा लागला. शेवटीं १९१२ सालीं पुन्हां मीं हा प्रयत्न केला. ज्याअर्थीं निरनिराळ्या स्थानिक ब्राह्मसमाजाचा इतिहासाची मनोवेधक माहिती मला आधींच मिळाली होती व ती मीं छापूनहि काढली होती त्याअर्थीं हें काम असें अर्धवट टाकणें मला पसंत पडलें नाहीं. भारताच्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यांतील कार्यांची आणि धडपडीची माहिती, त्यांत कार्यवाहकांना मिळालेलें अपयश देखील उद्बोधक होतें. ही माहिती ठिकठिकाणच्या प्रत्यक्ष कार्य करणाऱ्यांनीं आणि डोळ्यापुढें घडलेल्या गोष्टींची साक्ष देणारांनीं लिहून पाठविली होती. समुद्रापलीकडील इतर देशांतील उदार धर्माची चळवळ करणारांनीं आपापली माहिती आणि संदेशाचीहि यांत भर टाकली. म्हणून मीं हें अत्यंत परिश्रमानें तयार केलेलें सुमारें ३७५ पानांचें इंग्रजी

पुस्तक १९१२ च्या डिसेंबर महिन्यांत प्रसिद्ध केलें. ह्याला सर नारायण चंदावरकरांनीं आपली सुंदर प्रस्तावना जोडली आहे. त्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, "भरतखंडांत ब्राह्म आणि प्रार्थना समाजानें चालविलेल्या एकेश्वरी धर्माची एकत्रित माहिती ह्या समाजाच्या सभासदांना व हित-चिंतकांनाच नव्हे तर ज्या कोणाला ह्या चळवळीकडे चिकित्सक दृष्टीनें पहावयाचें असेल अशा बाहेरच्यांना देखील ही माहिती अत्यत उपयोगी ठरेल. आधुनिक सुशिक्षित हिंदु लोक धर्माचे बाबतींत अत्यंत उदासीन आहेत असा आक्षेप वरचेवर करण्यांत येतो, पण तो सर्वांशीं खरा नाहीं. हिंदु महामंडळ, आर्यसमाज, थिऑसफी आणि इतर धर्मांच्या चळवळी यांचें कोणीं निरीक्षण केल्यास नवीन चैतन्याची साक्ष सहज पटण्यासारखी आहे. आधुनिक विचारी जगांत दोन भिन्न प्रमुख शक्तींचें कार्य चालू आहे. एक धर्मकारण व दुसरें अर्थकारण. ह्या दोन शक्ति सर्व सुधारलेल्या जगास हालवून सोडीत आहेत. नुसते अर्थाचे मागें लागलेला मनुष्य किंवा संस्था असणें शक्य नाहीं. जसजशी श्रीमंती वाढते तसा कंगालपणाहि त्याचबरोबर वाढतो अन् त्याच्या मागोमाग युद्ध हें ठेवलेलेंच. दुसरें सत्य हें कीं, मतमतांतरांचा गलबला चालला असतां त्यांतूनच एक मूलभूत सामान्य तत्त्व बाहेर डोकावतें. बंगाल्याकडील राममोहन राय, महर्षि देवेंद्रनाथ, ब्रह्मानंद केशवचंद्र आणि आमचेकडील सर रामकृष्णपंत भांडारकर यांनीं या सामान्य तत्त्वाचा स्वीकार करून त्याचा पुकारा आधुनिक जगास करीत आहेत. त्यांची जबाबदारी किती मोठी आहे हें हा सूची-ग्रंथ दाखवीत आहे. ह्या ग्रंथांत वर्णिलेली परिस्थिति वाचून नेहमीं आनंदच होईल असें नाहीं. तथापि ब्राह्मधर्माचा प्रचार अधिक नेटानें करणें कसें अवश्य आहे हें पटतें, आणि ब्राह्मधर्मानुयायी होणें सुखांतलें मोठें सुख आणि भाग्यांतलें मोठें भाग्य आहे याची खात्री पटते."

माझे मित्र द्वा. गो. वैद्य, वामनराव सोहोनी यांनीं या पुस्तक प्रकाशनाचे कामीं फार मदत केली. या पुस्तकाचे दोन निराळे भाग असून पहिल्या भागांत जगांतील निरनिराळ्या उदार धर्मांच्या ग्रंथांचें कार्य आणि परोपकारी प्रयत्न व त्या त्या चालकांकडून लिहून आलेल्या निबंधांचा समावेश करण्यांत आला आहे. अशा चालकांकडून जी माहिती मिळाली नाहीं अशीं प्रकरणें मीं स्वतःच लिहून काढलीं आहेत. पश्चिम हिंदुस्थानांतील प्रार्थना समाजाची चळवळ, एकेश्वरी धर्मपरिषद, भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी, इराणांतील बहाई धर्माची चळवळ, युरोप व अमेरिकेंतील युनिटेरियन आणि युनिव्हर्सॉलिस्ट समाज हीं प्रकरणें माझींच आहेत. बंगाल्यांतील ब्राह्म समाज ह्यावरील लेख प्रसिद्ध पं. शिवनाथशास्त्री यांनीं स्वतः लिहिला आहे. मँचेस्टर कॉलेजांतील माझे सहाध्यायी झेनो सूके टोया साकी यांनीं जपानमधील उदार धर्म हें प्रकरण तयार केलें आहे. दुसऱ्या भागांत बंगाल, बिहार आणि ओरिसा ह्या प्रांतांतील १०१ ब्राह्मसमाज, मद्रास प्रांतांतील ३२ ब्राह्मसमाज, मुंबई प्रांतांतील १६ प्रार्थनासमाज, पंजाब आणि संयुक्त प्रांतांतील १८ ब्राह्मसमाज आणि लंडन येथील चार्लस व्हायसे यांचे Theistic Church असे एकूण १६८ संस्थांची तपशीलवार माहिती आणि सविस्तर इतिहास याविषयीं माहिती आली आहे. चिटणीसाचें नांव आणि पत्ता, सभासदांची संख्या, अनुष्ठानिक किती व इतर किती यांचा निर्देश, हितचिंतकांची संख्या, आठवड्यांतून सभा किती वेळां भरते, पोटसंस्थांचा तपशील, स्वतंत्र मंदिर आहे कीं नाहीं, वर्तमानपत्रें-मासिकें कोणतीं आहेत, प्रचाराची तजवीज काय वगैरे इतर माहिती अत्यंत कसोशीनें गोळा केली आहे. एकंदरींत हें पुस्तक प्रत्यक्ष प्रचाराचें काम करणारासच नव्हे तर इतर जिज्ञासूंना देखील एक अमोलिक ठेवाच वाटण्यासारखा आहे.

पुस्तकाचा छपाई-खर्च, माझ्या प्रवासाचा आणि पत्रव्यवहाराचा खर्च अनुक्रमें ब्राह्मो पोस्टल मिशन व बनारस येथील परिषदेच्या शिलकेंतून भागविण्यांत आला. कोणच्याहि स्थानिक समाजावर ह्याचा बोजा पडलेला नाहीं. नुसती माहिती पुरविण्यांत ज्यांनीं विलंब केला किंवा मुळींच दिली नाहीं अशाकडून पैशाची मदत कोण अपेक्षिल? हीं पुस्तकें ब्राह्मधर्म प्रचारकांना फुकट वाटण्यांत येतील, टपालहंशील देखील पडणार नाहीं; फक्त त्यांनीं मागणी करावी असें वेळोवेळीं जाहिर करूनहि कोणा एकाकडून मागणी देखील आली नाहीं, हा अव्यावहारिपणा पाहून आश्चर्याचा धक्का बसला. पाश्चात्य कार्यकर्त्यांना मात्र ह्या प्रयत्नाचें महत्त्व फार वाटून त्यांनीं त्याची वेळोवेळीं मुक्तकंठानें प्रशंसा केली. ब्राह्म धर्म ही प्रार्थना करणारी संस्था आहे; प्रचार करणारी नव्हे असें केव्हां केव्हां विनोदानें सांगण्यांत येतें, त्यांत सत्याचा अंश बराच आहे असें हा ग्रंथ जोरानें पुकारीत आहे.

# भाग दुसरा : हरिजनसेवा व भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी

(THE DEPRESSED CLASSES MISSION SOCIETY, INDIA)

## प्रकरण १० वें

### विविध प्रयत्न

**पूर्वेतिहास**

अस्पृश्यतेचा इतिहास निदान हिंदुस्थानांत तरी आर्यन लोकांच्या आगमनाइतकाच जुना आहे. चांडाल हा शब्द वैदिक वाङ्मयांत आणि बौद्ध वाङ्मयांतून आढळतो. बुद्धाच्या वेळेच्यापूर्वीपासून तरी निदान चांडाल आणि इतर राष्ट्रें अस्पृश्य गणलीं जात होतीं, असे उल्लेख आढळतात. इराणांतील झरतुष्ट्रपंथी आर्य व हिंदुस्थानांतील देवयज्ञी आर्यांनाहि अस्पृश्य आणि तिरस्करणीय समजत असत, असें पारशी लोकांच्या जुन्या व नव्या ग्रंथांत पुरावे मिळतात. आर्यांचा हिंदुस्थानांत कायमचा जम बसल्यावर त्यांनीं येथील दस्यु ऊर्फ शूद्र नांवाच्या जित राष्ट्रांना आपल्या वस्तीजवळच पण बाहेर राहावयास लावून त्यांच्या व आपल्या संस्कृतींत भेसळ होऊं नये म्हणून त्यांना अस्पृश्य ठरविलें.

ज्याअर्थी जपानांत हैटा व हीना नांवाच्या अस्पृश्य जाती अद्यापि आहेत; त्याअर्थी अस्पृश्य जात ही संस्था आर्यांनींच निर्माण केली नसून तिचा प्रादुर्भाव पूर्वी मोंगल लोकांतहि होता हें सिद्ध होतें. हैटा किंवा ऐटा ही जात फिलिपाईन बेटांतून जपानांत गेली असावी. अथ्रवण ( ब्राह्मण ), रथेष्ट्र ( राजन्य ), वष्ट्र्य ( वैश्य ) आणि हुइटि ( शूद्र ) असे झरतुष्ट्रच्या वेळीं इराणांत चार भेद होते. वेदांत शूद्र हा भेद फारसा आढळत नाहीं. पण महाभारतांत अभीर आणि शूद्र यांचा उल्लेख असून सिंधू नदीच्या मुखाजवळील भागांत त्यांची वस्ती असावी असें दिसतें. ऋग्वेदांत पुरुष-सूक्तांत शूद्र शब्द आला आहे व शुक्ल यजुर्वेदांत आठ वेळां हा शब्द आला आहे. Castes of India ह्या पुस्तकांत विल्सननें म्हटलें आहे कीं, कंदाहार प्रांतात शूद्रोई नांवाचें प्राचीन राष्ट्र होतें आणि सिंधू नदीवर शूद्रोस नांवाचें शहर होतें. इराणांतील हुइटी अथवा शूद्रोई आणि फिलिपाईन बेटां-तील हैटा या जातींचा संबंध असल्याचें सिद्ध करतां आल्यास अस्पृश्य-तेच्या प्राचीन उत्पत्तीवर आणि प्रसारावर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे. इंग्रजी शिक्षणामुळें हिंदुस्थानांत जी आधुनिक सुधारणेची प्रवृत्ति झाली तिच्यामुळें वरील अस्पृश्यतेच्या निवारणार्थ जे ठिकठिकाणीं प्रयत्न झाले त्यांचा आतां विचार करूं.

**महात्मा फुले**

बंगाल्यांत १८२८ सालीं राजा राममोहन राय यानें ब्राह्मसमाज स्थापन करून आद्यप्रगतीची ध्वजा उभारली. तरी अस्पृश्यतानिवारणाचा अग्र आणि अंतिम मान महाराष्ट्रा-सच मिळाला. विशेषतः तो मान महात्मा ज्योतिबा फुले यांच्यामुळेंच प्राप्त झाला. महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म पुणें येथें फुलमाळी समाजांत झाला. १८४८ पर्यंत यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण मिशनरी शाळेंत झालें होतें. १८५२ सालीं मुंबई सरकारनें ज्योतिसाब

२०० रुपयांची शाल, मोठी जाहीर सभा भरवून, नजर केली. त्याचें कारण १८४८ सालीं ज्योतिबानें मुलींची पहिली शाळा स्थापन केली आणि १८५२ सालच्या आरंभीं महारमांगाच्या मुलांसाठीं पहिली शाळा स्थापन केली. ही शाळा मुंबई इलाख्यांतच नव्हे तर अखिल भारताच्या इतिहासांत अस्पृश्यांसाठीं हिंदु लोकांनीं उघडलेली पहिली शाळा होय. सरकारी इन्स्पेक्टर मेजर कँडीसाहिबांनीं ह्या शाळेची पहिली परीक्षा २१ मार्च १८५२ रोजीं शुक्रवार पेठेंतील शाळेंत घेतली असें त्या दिवशीं प्रसिद्ध झालेल्या ज्ञानप्रकाशच्या अंकांत नमूद झालेलें आहे. ह्यावेळेस शुद्ध लिहिणें व वाचणें वगैरे गोष्टींत ह्या शाळेंतील मुलांनीं विश्रामबागेंतील ( वरिष्ठ वर्गाच्या ) कित्येक मुलांपेक्षांहि उत्तम परीक्षा दिली असें मेजरसाहेबांनीं म्हणून दाखविलें. एक मुलींची शाळा आपल्या घराजवळ घातली त्या कालावधींत व पुढेंहि फुले यांस त्यांच्या जातीकडून फार त्रास सोसावा लागला. त्यांस शेवटीं त्यांच्या तीर्थरूपांनीं त्याच कारणावरून घरांतून बाहेर काढलें. आपल्या नीच मानलेल्या बंधुजनांस अज्ञानसागरांतून काढून ज्ञानामृताचें सेवन करण्याकरतां त्यांनीं संकटें भोगलीं हा त्यांचा त्या जातीवर मोठा उपकार आहे. ह्या शाळेंत चांभाराच्या मुलींना ज्योतिबा स्वतः व त्यांची पत्नी फार कळकळीनें शिकवीत असत. यांचे तीन मित्र मोरो विठ्ठल वाळवेकर, सदाशिव बल्लाळ गोवंडे, आणि सखाराम यशवंत परांजपे, यांची ज्योतिबांना बरीच मदत असे. महारामांगाच्या शाळांत बरीच गर्दी होत असे. ह्या लोकांस त्यांनीं आपल्या राहत्या घराच्या विहिरीवर पाणी भरण्यास परवानगी दिली होती.

भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीनें नानाच्या पेठेंत पुणें म्युनिसिपालिटीकडून सन १९१४ ता. १८ माहे जून रोजीं भोकरवाडीजवळील ७ एकर जागा आपल्या प्रशस्त इमारतीकरता नव्याण्णव वर्षांच्या

करारानें घेतली आहे. हीच ती ज्योतिबाची मिळकत होय. सरकाराकडून म्युनीसिपालिटीला जी शाळा मिळाली ती देखील हल्लीं या मंडळीच्या शाळांतच सामील झाली आहे.

**बाबू शशिपाद बंदोपाध्यायजी**

बंगाल्यांत अस्पृश्यता निवारणाचा प्रथम मान बाबू शशिपाद बंदोपाध्यायजी (बानर्जी) या गृहस्थांकडेच आहे. हे कलकत्त्याकडील बारानगर गांवीं सन १८४० त कुलीन ब्राह्मण जातींत जन्मले. सन १८६६ सालीं त्यांनीं ब्राह्म समाजाची दीक्षा घेतली. तेव्हांपासूनच ते खालच्या जातीशीं मिळून मिसळून जेवूंखाऊं लागले. १८६५ सालच्या नोव्हेंबरच्या १ ल्या तारखेस बारानगरच्या गिरणी मजुरांची त्यांनीं एक सभा भरविली. त्यांत ठराव होऊन त्यांनीं मजुरांकरितां रात्रींच्या व दिवसाच्या शाळा काढल्या. असा अनाचार टवाळ लोकांस न खपून त्यांनीं त्या शाळा उठविल्या. पण बाबूजींनीं स्वतःच्या खर्चानें इमारती बांधून त्या कायम केल्या. महाराष्ट्रांतील चोखामेळ्याप्रमाणें बंगाल्यांतील कर्ताभजापंथी चांडाळ वर्ग भजनाचा शोकी आहे. त्यांचा बिहालपारा गांवीं एक उत्तम सारंगी तयार करण्याचा कारखाना आहे. तेथें बाबूजी जाऊन चांडाळांचें कीर्तन ऐकत. १८७० सालच्या ऑगस्ट महिन्यात त्यांनीं अशा मजूर वर्गाचा एक संघ काढला. त्याच्या द्वारा त्यांना वाचनाची गोडी लागली आणि मद्यपानादि दुष्ट चाली सोडविल्या. वेडींवाकडीं अभद्र गाणीं सोडून ही मंडळी सात्त्विक कीर्तनें करूं लागली. १८७१ त जेव्हां बाबूजी विलायतेस निघाले तेव्हा ह्या गरीब मजुरांनीं त्यांना अत्यंत कृतज्ञतापूर्वक मानपत्र दिलें. या दीनांच्या सेवेबद्दलचा बाबूजींचा सत्कार ते विलायतेस गेल्यावर ब्रिस्टल शहरीं एका मिशनरी संस्थेनें मोठें मानपत्र देऊन केला. परत आल्यावर शशिपाद बाबूंनीं गरिबांसाठीं एक पैसा किंम-

तीचें एक मासिक पत्र काढलें. दरमहिन्यास त्याच्या १५००० प्रती खपूं लागल्या. त्यांत पं. शिवनाथ सारख्यांनीं लेख लिहिले. श्रीमंत वर्गाचीहि त्यांस चांगलीच मदत असे. ‘ बारानगर समाचार ’ नांवाचें साप्ताहिकहि त्यांनीं काढलें. ते चांडाळाबरोबर जेवीत. मेहेतरांच्या मुलांची शुश्रुषा करीत. सरकारनें नुकत्याच उघडलेल्या सेव्हिंग्ज बँकेंत त्यांचे पैसे ठेवून त्याना काटकसर शिकविली. बारानगरास पुढें ब्राह्म समाज स्थापन झाल्यावर बरेंच काम होऊं लागलें. कलकत्ता येथें ब्राह्म समाजाचा माघोत्सव होतो त्यावेळीं मोठया थाटाचें नगरसंकीर्तन निघतें. त्यांत बारानगरच्या मजुरांची एक दिंडी येऊन भजनांत भाग घेते. हल्लीं बंगाल्यांत जें Backward Classes Mission आहे त्याचें मूळ महाराष्ट्रांतील Depressed Classes Mission हें आहे.

**मुंबईतील एक प्रयत्न**

मुंबई शहरांत १८५५ सालीं एक मंडळी स्थापून तिच्या विद्यमानें कांहीं शाळा अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठीं स्थापल्या होत्या; पण त्यावेळीं काल अनुकूल नसल्यामुळें व चिकाटी धरून काम न झाल्यानें त्या शाळा बंद पडल्या. १८७० सालीं ब्रह्मानंद केशवचंद्र सेन विलायतेहून परत आले व त्यांनीं धोबी तलावावर फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूटमध्यें जें व्याख्यान दिलें त्यांत त्यांनीं खालच्या जातींच्या उन्नतीसाठीं मुंबई प्रार्थना समाजानें कांहीं कार्य करावें अशी सूचना केली. ह्या सूचनेस अनुसरून समाजानें रात्रींच्या कांहीं शाळा स्थापल्या. त्यांपैकीं दोन शाळा फक्त अस्पृश्य मानलेल्या जातींसाठीं होत्या. १८९१ सालीं समाजाचे एक सभासद जे पुढें उपाध्यक्ष होते त्या शेठ दामोदर-

दास सुखडवाला या उदार गृहस्थांनीं भायखळा येथें स्वखर्चानें अस्पृश्यांसाठीं शाळा चालविण्यासाठीं मदत केली. सर नारायणराव चंदावरकर यांनीं १९१० सालीं असें म्हटलें आहे कीं, अस्पृश्योद्धाराच्या एकंदर चळवळीचा त्यावेळपर्यंतचा इतिहास अवलोकन केला व आज अस्पृश्योद्धारार्थ चालू असलेलें कार्य ध्यानांत घेतलें तर बरेंचसें श्रेय ख्रिस्ती मिशनरी, ब्राह्म समाज, कर्नल अल्कॉट व इतर थिऑसाफिस्ट, स्वामी दयानंद सरस्वती व आर्य समाज यांकडे जातें यांत कांहीं संशय नाहीं.

**सर सयाजीराव महाराज**

भारतीय अस्पृश्यता ही एक स्वतंत्र संस्थाच आहे. बौद्ध, जैन, शीख, लिंगायत, वैष्णव धर्मपंथीयांनीं व इतर साधुसंतांनीं प्राचीन व मध्ययुगीन काळीं अस्पृश्यांच्या आत्मिक उद्धारासाठीं प्रयत्न केले आहेत. पण ते सर्व वैयक्तिक स्वरूपाचे होते. सामुदायिक अस्पृश्यता मुळांतच नष्ट करण्याचें आधुनिक अर्थानें निवारणाचें व त्या पुढचें भौतिक उद्धाराचें काम या पंथांनीं किंवा कुणी संतांनीं केलेलें इतिहासांत नमूद नाहीं. ह्या बाबतींतील चालू प्रयत्न म्हणजे आधुनिक युगाचेंच एक विशिष्ट लक्षण आहे. पाश्चात्यांची संस्कृति या पुरणप्रिय देशांत अंमल गाजवूं लागल्यावर १९ व्या शतकाच्या मध्यापासून अशा प्रयत्नांस सुरुवात झाली. केवळ कालानुक्रमाप्रमाणें पाहिल्यास श्रीमंत महाराज सरकार गायकवाडांचा नंबर तिसरा लागतो. महात्मा ज्योतिबा फुले यांचा प्रयत्न १८५२ सालीं, बाबू बानर्जी यांचा प्रयत्न १८६५ सालीं व श्रीमंत सर सयाजीराव महाराजांचा प्रयत्न १८८३ सालीं म्हणजे त्यांना राज्याधिकार मिळाल्याबरोबरच दुसऱ्या तिसऱ्या वर्षीं त्यांचे प्रयत्न सुरू झाले. या दृष्टीनें पाहतां श्रीमंत महाराज म्हणजे एका मोठ्या संस्थानचे मोठे अधिपति म्हणूनच नव्हे तर अखिल भारतांतील लोकमताचे नेते, समाजसुधारक, राजकारण-

कुशल मुत्सद्दी इतकेंच नव्हे तर आपल्या दोस्त इंग्रज सरकारालाहि पदोपदीं धडे शिकविणारे अनुभवी सत्ताधारी म्हणून जगापुढें झळकत आहेत. १८८२ सालीं ह्या कामास हात घालतांना महाराजांचें वय अवघें वीस वर्षांचेंहि नव्हतें. इतर संस्थानांतून जीं थोडीं बहुत अशीं अपूर्व कृत्यें होतात त्यांचें श्रेय एकाद्या प्रागतिक दिवाणाकडेच असतें. १९१८ सालीं आमच्या भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची मुंबईस एक खास अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक परिषद भरली होती. तिचें अध्यक्षीय भाषणांत महाराज म्हणाले, "मला या कामीं अनेक अडचणींशीं झगडावें लागलें. कितीहि मोठ्या पगाराचें आमिष दाखविलें तरी कित्येक वर्षीं हिंदु शिक्षकच मिळेनात. मुसलमानाकडून व नंतर आर्य समाजिस्टांकडून हें काम करवून घ्यावें लागलें." ह्या कठीण कार्याबद्दल १९२१ सालीं "परोपकारी सभा" या नांवाच्या सभेनें महाराजांना 'पतितपावन' अशी पदवी दिली. त्यावेळीं महाराज म्हणाले, "या पदवीला मी पात्र आहें असें मला तरी वाटत नाहीं. राज्याच्या काळजीमुळें व परिस्थितीमुळें ह्या कामीं मला जितकें करावयाचें होतें तितकें घडलें नाहीं. माझे अधिकारी मला जें सांगतात त्यावरच मला निमुटपणें अवलंबून रहावें लागतें. आणि ते जें करतात त्यावरच तृप्त रहावें लागतें. मानवी प्रयत्नाला मर्यादा असतात. विशेषतः हिंदुस्थानांतील राजे लोकांना ते सर्वाधिकारी असूनहि ह्या मर्यादा अधिकच भोंवतात."

१८८१–९२ सालीं बडोदें, अमरेली, पाटण आणि नवसारी येथें प्रत्येक ठिकाणीं अस्पृश्य मुलांसाठीं व मुलींसाठीं स्वतंत्र वसतिगृहें काढून त्यांच्या जेवण्याची व राहण्याची सोय केली. कपडेलत्ते, पाट्या, पेन्सिली वगैरेहि पुरविलीं. ह्यानंतर कित्येक वर्षें ह्या प्रयोगाला दुष्काळ व प्लेगचीं विघ्नें आलीं. मुलांना शाळेंत पाठविण्याला या कंगाल लोकांना त्राण उरेना.

हिंदु अधिकाऱ्यांच्या सहानुभूतीच्या अभावाचीहि त्यांत भर पडली. शेवटीं ह्यांतील कांहीं वसतिगृहें बंद ठेवावीं लागलीं. तरी देखील महाराजांनीं खर्चात ब्रचत न करतां बडोदें भागांत रु. ४० च्या व इतर भागांत रु. २५ च्या शिष्यवृत्त्या ठेवल्या व कसेंहि करून १९०० सालापासून पुढें कांहीं वर्षें शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या १००० पासून १५०० पर्यंत राहील असें केलें.

१९०३ सालच्या ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्यें मी विलायतेहून परत आल्याबरोबर महाराजसाहेबांनीं मला आपणांस भेटावयास बोलाविलें, आणि बडोदें शहरांतील चार शाळा तपासण्यास सांगितल्या वगैरे मजकूर मागें आलाच आहे. एकंदरींत ह्या थोर पुरुषाच्या अंतःकरणांत ह्या हतभागी लोकांचा ध्यास सतत लागला होता; हें माझ्या ध्यानांत तेव्हांच येऊन चुकलें. इतकेंच नव्हे तर ह्या महत्त्वाच्या विषयासंबंधीं माझ्या स्वतःच्या विचाराला नवीन प्रोत्साहन मिळून ब्राह्म समाजाच्या अखिल भारतांतील माझ्या प्रचारकार्याबरोबर ह्या लोकांची निरनिराळ्या प्रांतांतील स्थिति स्वतः डोळ्यांनीं नीट निरखून अजमाविण्याची मलाहि प्रेरणा झाली. १९०४ सालीं मुंबई येथें राष्ट्रीय परिषदेच्या अधिवेशनाबरोबर सामाजिक परिषदेचें अधिवेशन झालें. त्यावेळीं एकेश्वरी परिषद भरून राममोहन आश्रमांत श्रीमंत महाराजांनीं प्रीतिभोजनांत भाग घेऊन आमच्याशीं सहकार्य केलें, हें मागें सांगितलें आहे. या सामाजिक परिषदेचा महाराष्ट्रावर व विशेषतः पुण्यांतील कार्यकारी पुढाऱ्यांवर जसा शुभ परिणाम झाला तसाच महाराजांच्या उत्साहशक्तीवरहि झालेला दिसतो. लगेच दोन तीन वर्षांत पुणें, मुंबई येथें सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, सोशल सर्व्हिस लीग, सेवासदन, डिप्रेस्ड क्लासेस मिशन सारख्या अखिल हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनावर परिणाम करणाऱ्या संस्थांचा उद्भव झाला.

उलट पक्षीं याच सुमारास श्रीमंत महाराजांनींहि आपल्या राज्यांत सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास करून राष्ट्रीय शिक्षणाचा धडा इतर लहान मोठ्या संस्थानांसच नव्हे तर प्रत्यक्ष इंग्रज सरकारासहि घालून दिला. बडोद्याच्या इतिहासांत हें साल सोन्याच्या अक्षरांत लिहिलें जाईल. बडोद्यात सक्तीच्या शिक्षणाचें प्रस्थान मांडल्यावर उसळीसरशी अंत्यज शाळांची संख्या १८ ची २४७ आणि विद्यार्थ्यांची संख्या २००० ची ९२६९ झाली. बंद केलेल्या वसतिगृहाची पुन्हा गरज भासूं लागली. लौकरच अंत्यजांच्या सुदैवानें आर्यसमाजी पं. आत्माराम ह्या तरबेज आणि वाहून घेतलेल्या कार्यवाहकाची जोड मिळाली. १९०७–८ च्या सुमारास हल्लींचें नांवा-जलेलें बडोद्याचें अंत्यज विद्यार्थी वसतिगृह उघडण्यांत आलें. पंडितजींना त्याचे सुपरिंटेंडेंट व बडोदें राज्यांतील अंत्यजांच्या शिक्षणाचे इन्स्पेक्टर नेमण्यांत आले. याच सुमारास महाराजांनीं मला बडोद्यास पुन्हा बोलाविलें. न्यायमंदिराच्या भव्य दिवाणखान्यांत एक जंगी दरबारवजा जाहीर सभा बोलावून महाराजांनीं स्वतःच्या अध्यक्षत्वाखालीं माझें " अस्पृश्योद्धार " ह्या विषयावर व्याख्यान करविलें. हेंच व्याख्यान मला पुरें लिहून काढा-वयास सांगून ' बहिष्कृत भारत ' या नांवानें तें प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या १००० प्रती बडोदें दरबारनें विकत घेतल्या. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम बडोद्याच्या कार्यावर होऊन पंडित आत्मारामांच्या देखरेखीखालीं त्याला मोठा जोर आला.

डॉ. आंबेडकर ह्या अस्पृश्य वर्गाच्या प्रसिद्ध पुढाऱ्याला महाराजांचा मोठा आश्रय होता. बडोदा कॉलेजांतून ते बी. ए. झाल्यावर महाराजांनीं त्यांना अमेरिकेंत दरबारच्या खर्चानें कित्येक वर्षे ठेवून पीएच्. डी. करवून आणलें. बडोदें शहरांतील चार वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना शिक्षण देऊनच न थांबतां त्यांच्या धार्मिक शिक्षणाचीहि उत्तम सोय करण्यांत

आली आहे. गुजराथेंतील अंत्यज वर्ग आपापलीं धार्मिक गृहकृत्यें आपल्याच जातीच्या पुरोहिताकडून करवून घेत असतात. यांना गरोडा म्हणतात. या गरोड्याकडून धर्मकृत्यें योग्य रीतीनें व्हावींत म्हणून त्यांच्यासाठीं एक संस्कृत शाळा काढण्यांत आली आहे. आणि त्यांत २५ गरोडा विद्यार्थ्यांना दरमहा ८ रुपये शिष्यवृत्त्या देऊन तयार करण्यांत आलें. वसतिगृहांतील सर्व विद्यार्थ्यांना वेदमंत्रासह नित्याची उपासना करण्यास शिकविण्यांत येतें. शिवाय त्यांचीं दोन बालवीर पथकें आहेत.

पुढें दुमदुमत राहिलेल्या मंदिरप्रवेशाच्या दंगलींतहि ह्या पतितपावन महाराजांनीं आघाडी मारून सरशी मिळविली आहे. मंदिरप्रवेशाची चळवळ सुरू होण्यापूर्वीच महाराजांनीं आपलें खंडेराव मंदिर अस्पृश्यांस खुलें केलें आणि ही चळवळ सुरू झाल्यावर १९३२ च्या ऑक्टोबर महिन्यांत सर्व हिंदुधर्मियांस जातगोत मनांत न आणतां सरकारी देवळांत प्रवेश करूं द्यावा व तसें करण्यास खाजगी देवळांच्या मालकांचीं मनें वळवावीं, अशा आशयाचा महाराजांनीं युरोपांतील लोझानहून तारेनें हुकूम पाठविला. संकटें हीं कार्यसिद्धीचीं मापेंच होत अशी खूणगांठ मनात बांधून समाजधुरीणांनीं सतत वागलें पाहिजे. महाराजांनीं असें केलें म्हणूनच त्यांना अपूर्व यश लाभलें.

**थिऑसॉफिल सोसायटी**

कर्नल ऑल्कॉट, थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्ष, यांनीं अस्पृश्यतानिवारणाचा उत्तम उपाय म्हणून मद्रास शहरीं आपली पहिली शाळा १८९४ सालीं एका झोंपडींत काढली. दुसरी १८९८ त व तिसरी १८९९ त उघडली. या सर्व शाळांतून मिळून ३८४ मुलगे व १५० मुली आणि १६ शिक्षक होते. चवथ्या इयत्तेपर्यंत तालीम, हिशेब, व्यावहारिक इंग्रजी हे विषय शिकविण्यांत येत. त्यांच्या धर्मांत मुळींच

हात घालण्यांत येत नसे. १९०३ सालीं मीं स्वतः मद्रास शहरीं सोसायटीच्या ४ शाळा पाहिल्या. तेथें किंडरगार्टन पद्धतीचें नमुनेदार शिक्षण मीं पाहिलें. एक तज्ज्ञ स्त्रिस बाई फारच कळकळीनें देखरेखीचें काम खुशीनें करीत होती.

**के. रंगराव**

मद्रास इलाख्यांत विशेषतः पश्चिम किनाऱ्यावर मलाबारांत अस्पृश्यांचे हाल कल्पनातीत आहेत. अस्पृश्यतेची गोष्ट राहोच पण वरिष्ठ जातींच्या व्यक्तींपासून ६०–७० फुटाच्या अंतरावर येण्यास अद्यापि मनाई आहे. म्हणून ह्या प्रांतीं सर्वांच्या मागून ह्या कामास सुरवात झाली. मंगळूर ब्राह्मसमाजाचे चिटणीस रा. सा. के. रंगराव यांनीं मंगळूर येथें आपली पहिली शाळा १८९७ सालीं काढली. त्यापूर्वीं लोकमत तयार करण्यासाठीं "पंचम लोकांचीं गाऱ्हाणीं" ( Wrongs of The Panchamas ) ही लहानशी चोपडी इंग्रजींत त्यांनीं प्रसिद्ध केली. तींत त्यांनीं ह्या लोकांचीं हृदयद्रावक दुःखें वर्णिलीं आहेत. ह्या कामीं रंगरावांना आणि त्यांच्या कुटुंबाला लोकांकडून अनन्वित छळ सोसावा लागला. रंगराव हे स्वतः सारस्वत जातीचे असून त्यांच्या कुटुंबाला कुटाळ लोक "पंचमती" असें उल्लेखित. ह्या छळाला न जुमानतां १० वर्षांत त्यांनीं बरीच प्रगति केली. सरकारच्या मदतीनें त्यांना ह्या अवधींत ह्या संस्थेसाठीं विस्तीर्ण जागा व इमारत, उद्योग शाळा आणि वसाहतीसाठीं सुमारें २० एकर शेतकीची जागा इतकी सामुग्री संपादन करतां आली. १९०७ च्या सुमारास मी मंगळुरास ब्राह्म समाजाच्या कामासाठीं गेलों तेव्हां मीं ही मंगळूरची संस्था आमच्या भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळींत शाखा म्हणून संलग्न करून घेतली. तेव्हांपासून पुढें तिची बरीच भरभराट आणि विशेष प्रसिद्धि झाली.

**ब्रिटिश सरकार आणि खिस्ती मिशनें**

ब्रिटिश सरकार व खिस्ती मिशनें यांनीं अस्पृश्यांची स्थिति सुधारण्यासाठीं जे काहीं प्रयत्न केले ते प्रसिद्धच आहेत. यांच्या मार्गांत अडथळा काय तो नोकरशाहीची नबाबी पद्धति आणि मिशनऱ्यांचें धर्मांतराचें वेड एवढाच होता. बाकीं साधनें भरपूर होतीं. हे अडथळे नसते तर दोघांच्या हातून निदान हिंदुस्थान सरकारच्या एकाच्या हातून तरी हा अस्पृश्यतेचा प्रश्न लवकर सुटला असता. मद्रासेकडील खिस्ती मिशनाच्या विशेषतः रोमन कॅथॉलिक पंथाच्या पद्धतींत तर उघड उघड अक्षम्य दोष मला दिसले. ते हे कीं, जातिभेदाचें निर्मूलन करण्याचें त्यांचें धर्मांत सांगितलें असूनहि केवळ आपली संख्या वाढावी ह्या कावेबाज हेतूनें त्या लोकांना खिश्चन धर्मांत घेऊन पुन्हां त्यांना अति नीच अवस्थेंतच ठेवण्यांत आलें आहे. त्यामुळें त्यांना हिंदु धर्मास पारखे होऊन जातिभेदाचें व अस्पृश्यतेचें दुस्सह्य जुलूम सोसावे लागतात. ब्राह्मण खिस्ती लोकांशीं मिसळून वागतां येत नाहीं. उपासनेसाठीं खिस्ती देवळांतहि जाण्यास त्यांना मज्जाव आहे. मेरी माता, खिस्त इत्यादि मूर्तींची पूजा अस्पृश्यवाड्यांत सर्रास चालू आहे. त्याचे पुरावे मीं स्वतः दक्षिण देशीं त्रिचनापल्ली वगैरे ठिकाणीं हिंडत असतां पाहिले. खिस्ती लोकांत हल्लीं जी राष्ट्रीय चळवळ चालू आहे ती कायम राहिली आणि हिंदुमहासभेसारखी चळवळ शब्दापलिकडे जाऊन कृतींत उतरली तर लवकरच हे खिस्ती-अस्पृश्य पुन्हां धर्मांतर करून हिंदु धर्मांत येतील असें वाटतें.

इंग्रज सरकारनें सक्तीचें शिक्षण देऊन शिकलेल्यांना मोठमोठ्या जागा देऊन ह्या लोकांना वर आणण्यांत आजवर जी अक्षम्य ढिलाई केली आहे ती केली नसती तर अस्पृश्यतेला ताबडतोब ओहोटी लागली असती. तथापि अशा बाबतींत परकीय नोकरशाही आणि परधर्मी कावे-

बाजी यांना पोकळ नांवें ठेवण्यापेक्षां सर्व दोष स्वकीयांनींच पत्करावा हें योग्य आहे.

आर्य समाज, ब्राह्म समाज, हिंदु समाज ह्यांतील कित्येक उदार गृहस्थांनीं अस्पृश्यता निवारण्याचे लहानमोठ्या बऱ्याच संस्था काढून ह्या कामीं पुष्कळ स्तुत्य प्रयत्न केले. म्हैसूर, निजाम, हैद्राबाद आणि इंदूर वगैरे मोठमोठया संस्थानांनीं आपल्या विद्याखात्यामार्फत अस्पृश्य वर्गाची शिक्षणविषयक तरतूद पुष्कळ केली. पण हे सर्व प्रयत्न भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचे कामाचा बोलबाला झाल्यानंतर जी सहानुभूतीची व जागृतीची लाट देशावर पसरली, तिच्यामुळें झाले म्हणून त्यांचे उल्लेख पुढें योग्य स्थळीं करणें बरें.

---

# प्रकरण ११ वें

## भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची स्थापना

**पूर्वतयारी**

अमावास्येची काळोखी रात्र, १९०५ सालचे उन्हाळ्यांतले दिवस, अहमदनगरच्या समाजाच्या उत्सवासाठीं मी तेथें गेलों होतों. नेहमींचीं दगदगीचीं कामें करून मीं नुकतेंच कोठें जमिनीला अंग टेकलें होतें. अवचित् कांहीं अस्पृश्य वर्गाचें एक शिष्टमंडळ रात्रीं १२ वाजतां मला भेटण्यास आलें. भिंगार म्हणून अहमदनगराहून चार मैलांवर एक खेडेगांव आहे. तेथील स्थानिक अस्पृश्यांनीं अशा वेळीं एक मोठी जाहीर सभा

बोलाविली होती. तिचें अध्यक्षस्थान स्वीकारून मीं चार शब्द सांगावेत म्हणून आमंत्रण करण्यासाठीं हें शिष्टमंडळ अपरात्रीं आलें होतें. नित्या-प्रमाणें माझेबरोबर स्वामी स्वात्मानंद हेहि होते. " चला स्वामिजी, जाऊं या. " " कायहो, कोण हे लोक, काय ही सभा, अगाऊ तपास केल्या-खेरीज एकाएकीं कसें जावयाचें ? " स्वामिजी किंचित् त्रासून उद्गारले. " स्वामिजी, सत्कार्याला काळ वेळ मुहूर्त लागत नाहीं. सभेच्या ठिकाणीं गेल्याशिवाय तुमच्या शंकेला उत्तर मिळणार नाहीं. भलताच कांहीं प्रकार जर घडलाच तर तुमच्या हातात दंडा आहेच. आणखी मग काय पाहिजे."

स्वामिजींना चेव आला. " बेशक चलीये, " म्हणून ते टांग्यांत बसले. गांवाच्या हद्दीवर महारवाड्यांत उतरलों. मोठमोठे हिलाळ पेटलेले होते. लहान-थोर, बायकामुलें यांनीं गजबजलेली सभा वाट पहात बसली होती. आम्ही गेल्याबरोबर टाळ्यांच्या प्रचंड गजरांत स्वागत झालें. खेड्याचा गांव मागासलेल्या समाजाचा एवढा जमाव जमलेला पाहून स्वामिजी आश्चर्य पावले. ही सभा अशा अवेळीं कां बोलविली असें चालकांना विचारलें. " साहेब, आम्ही गरीब लोक, दिवसभर कष्टानें राबून बायकामुलांनीं यावें तर हिच्याशिवाय दुसरी वेळ कोणती ? तशांत आम्ही सर्व चालक मंडळी शेजारच्या जिल्ह्याच्या गांवच्या परकीय साहेबांच्या घरगुती कामांत गुंत-लेलों. आम्हांलाहि यावेळेपूर्वी हूं कां चूं करण्यास वेळ मिळत नाहीं. आपल्यास तसदी दिली याची माफी असावी. " माझ्या अंतःकरणांत चक्क उजेड पडला. ह्या लोकांची हजारों वर्षांची कहाणी अभ्यासून हिंदुस्थानां-तील प्रांतोप्रांतींची माहिती घेऊन सद्यःस्थिति स्वतः निरखून माझें मन हळुवार झालें होतें. अधिक खुलासा नको होता. स्वामिजींच्याहि सर्व शंका तत्काळ मिटल्या. आणि कामास सुरवात झाली.

## भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची स्थापना

किसन फागू बंदसोडे आणि वऱ्हाड नागपूरकडील इतर अस्पृश्य पुढारी यांनीं सोमवंशी हितचिंतक समाज ही संस्था त्या प्रांतीं काढली होती. त्यांच्या सूचनेवरून अहमदनगर येथील अस्पृश्यांचे पुढारी श्रीपतराव थोरात (बटलर), पांडुरंग लक्ष्मण डांगळे ( मुख्याध्यापक ), रावजी सदोबा गायकवाड ( शिक्षक ) वगैरेंनीं ही सभा बोलावली होती. ह्या मंडळींचे आत्मसुधारणेचे कामीं पुण्यांतील पुढारी शिवराम जानबा कांबळे यांच्या मदतीनें ठिकठिकाणीं अलिकडे चार पांच वर्षें प्रयत्न चालले होते. मोहपा (नागपूर) येथील मंडळींकडून आलेलें छापील जाहीर पत्रक जमलेल्या सभेस वाचून दाखविण्यासाठीं माझे हातीं दिलें. त्यांतील उद्देश मला फार बोधपर वाटले. हजारों वर्षें वरच्या जातीचा जुलूम सहन करूनही या पत्रकांत त्यांच्या उलट निंदा अथवा निषेधपर एक अवाक्षरहि काढलेलें आढळलें नाहीं. उलट वरिष्ठ वर्गांचीं मतें विनाकारण न दुखवता, किंबहुना कोणत्याहि प्रकारें त्यांच्या उलट वाटेस न जाता अस्पृश्यवर्गांनीं आपल्या स्वतःच्या हिताचे प्रयत्न करावे अशा अर्थाचा एक उद्देश वाचून माझी स्वतःची जागृति झाली. हा विशेष उद्देश सभेला मी नीट समजावून सांगत असतां स्वतः माझ्यामध्यें हें उद्धाराचें काम आपण स्वतः अंगावर घेऊन विशेषतः या कामांत स्वतःचें भावी चरित्र वाहून घ्यावें अशी प्रेरणा जोरानें होऊं लागली होती. इतर सर्व कामें टाकून एक घडीचाहि वेळ न दवडतां ह्या कार्यास लागावें असा संकल्प परमेश्वराला स्मरून ह्याच रात्रींच्या मुहूर्तावर केलेला मला पक्का आठवतो. ह्या अपूर्व सभेची आठवण मला ह्यापुढें वेळोवेळीं राहून मीं काढलेल्या मिशनचें धोरण आणि पद्धत सहिष्णुतेच्या जोरावर मीं पुढें चालविली. सूडबुद्धि आणि अत्याचार यापासून ह्या हताश झालेल्या लोकांना सतत

दूर ठेवावें आणि स्वतःही दूर रहावें या तपःश्चर्येला हें वरील जाहीरपत्रक नेहमीं मला ध्रुवाच्या ताऱ्यासारखें मार्गदर्शक झालें.

**लोकजागृति**

नगरहून परत आल्यावर मुंबई येथील सामाजिक मंडळापुढें (Social Reform Association) माझें एक इंग्रजींत व्याख्यान करविण्यांत आलें. त्यांत विशेषतः हिंदुस्थानांतील बहिष्कृत वर्गांच्या अडचणी, त्यांची प्रांतवार संख्या, त्यांच्या निवारणार्थ वरिष्ठ वर्गांकडून होणारे निरनिराळे प्रयत्न, आणि स्वतः त्या लोकांकडूनच स्वोद्धारार्थ होणारे प्रयत्न, ह्यांची मीं प्रथमच व्यवस्थेशीर मांडणी केली. हें व्याख्यान ह्या मंडळास विशेषतः त्या मंडळाचे अध्यक्ष सर नारायण चंदावरकर यांस इतकें आवडलें कीं 'इंडियन सोशल रिफॉर्मर' या पत्रामध्यें हें व्याख्यान प्रथम प्रसिद्ध करून, त्याच्या पुस्तकरूपानें स्वतंत्र प्रती काढून वांटण्यांत आल्या.

ह्याच विषयावर १९०६ सालच्या ऑगस्टमध्यें दुसरें एक लहानसें इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत एक एतद्देशीय स्वतंत्र मिशन स्थापावें अशी जोराची जाहीर विनंति केली. त्यांत म्हटलें कीं, "ह्या लोकांच्या उद्धारासाठीं नुसती शिक्षणसंस्था, मग ती कितीहि मोठ्या प्रमाणावर असो, स्थापून चालावयाचें नाहीं. तर ज्यामध्यें जिवंत व्यक्तिगत पुढाकार आहे असें एक मिशन तयार झालें पाहिजे. अशा मिशननें खिस्ती मिशनऱ्याप्रमाणें या लोकांच्या जीवितामध्यें क्रांति व विकास घडवून आणला पाहिजे. मुंबई शहर हें माझ्या मतें अशा कार्यासाठीं योग्य क्षेत्र आहे व मुंबई प्रार्थना समाज ही एकच संस्था अशा प्रकारचें मिशन चालविण्यास पात्र आहे.

१९०१ सालच्या खानेसुमारीवरून असें सिद्ध होतें कीं, हिंदु लोकांपैकीं एकचतुर्थांश लोकसंख्या हीन मानलेल्या अंत्यज लोकांची आहे; व मुसलमान लोकांपैकीं जवळजवळ एकसप्तमांश लोकसंख्या हीन मानलेल्या अर्जालू लोकांची आहे. ह्या हीन मानलेल्या मुसलमानांची संख्या विचारांत न घेतां नुसत्या हिंदु अंत्यजांची संख्या हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येशीं ताडून पाहिली तरी ही तिच्या एकषष्ठांशाहूनहि अधिक भरते. म्हणजे प्रत्येक सहा हिंदी माणसांत ( मग ते कोणत्याहि जातीचे, धर्माचे अगर रंगाचे असोत ) एक अगदीं टाकाऊ शिवून घेणेस देखील अयोग्य असा मनुष्यप्राणी सांपडतो.

**तिरपगडा**

पण मुख्य प्रश्न बाजूलाच राहिला आहे. तो हा कीं जवळजवळ साडेपांच कोटी प्रजेनें अशा हीन स्थितींत राहून चालेल काय ? हिंदु समाज तर आपला सोंवळेपणा सोडावयाला तयार नाहीं आणि तो सोंवळेपणा जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत ह्या हीन जातीला पुढें सरकावयाला जागा नाहीं. तर मग हें व्हावें कसें ! इतक्या सगळयांनीं एकदम ख्रिस्ती व्हावें ! यक्षिणीची कांडी फिरवून इतक्या लोकसमुदायाला एकदम कोणी ख्रिस्ती करील म्हणावें तर तें संभवनीय नाहीं. तथापि हिंदु लोकांची उदासीन विस्कळीतता शाश्वत राहिली तर मात्र वरील चमत्कारहि घडण्याचा संभव आहे. असा प्रकार खरोखरीच घडून आला तर राष्ट्रीय दृष्टया काय प्रकार होईल पहा. हल्लीं भारतीय साम्राज्यांत खालील प्रमाणें लोकसंख्या आहे:—

( इतर १५ + हीन ५॥ मिळून ) २०॥ कोटी हिंदु लोक.
( इतर ५ + हीन १ मिळून ) ६ कोटी मुसलमान.
३० लक्ष ख्रिस्ती.
१ कोटी जंगली.
१ कोटी बुद्ध, जैन, शीख वगैरे.

हिंदु समाजाची उदासीनता आणि खिस्ती समाजाची चळवळ आतां-प्रमाणेंच कायम राहील तर पुढें खालील प्रमाणें गणना होण्याचा संभव आहेः—

१५ कोटी हिंदु, ६ कोटी मुसलमान.
७ कोटी खिस्ती, १ कोटी बुद्ध, जैन, शीख.

म्हणजे राष्ट्रीय दृष्टया आतां जी हिंदु-मुसलमानांची दुही आहे तिच्या ऐवजी, वरील प्रकार घडलाच तर हिंदु, मुसलमान, खिस्ती यांचा तिर-पगडा होणार! १५ कोटी मवाळ हिंदु आणि जवळ जवळ तितकेच कडवे मुसलमान आणि खिस्ती मिळून, या तिघांचें सूत कसें जमणार ईश्वर जाणे!

**स्थापना**

ता. १८ ऑक्टोबर १९०६ रोजीं कार्तिकी वर्षप्रतिपदेचा शुभदिवस उगवला. दोनच दिवसांपूर्वी मुंबई प्रार्थना समाजाचे उदार उपाध्यक्ष शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांनीं अशा मंडळीची स्थापना होऊन काम सुरू व्हावें म्हणून १००० रु. दिले होते. दिवाळी—पाडव्याच्या शुभ दिवशीं सकाळीं ९ वाजतां मुंबई येथील एल्फिन्स्टन रोड लगतच्या मुरारजी वालजी यांच्या बंगल्यांत भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीची पहिली शाळा उघडून प्रार्थना समाजाचे अध्यक्ष न्या. चंदावरकर ह्यांनीं स्वतः जमलेल्या मुलांना पहिला धडा घालून दिला. त्यांनीं आपल्या भाषणांत पुढील सूत्रवाक्य सांगितलें. “ह्या नीच मानलेल्या लोकांना वर आणण्याचा प्रयत्न करण्यानें आम्ही स्वतःलाच वर आणीत आहोंत. हें पवित्र कार्य करीत असतां ह्या लोकांचा आम्ही उद्धार करणार हा घमेंडीचा विचार आमच्या अंतःकरणांत न शिरो. आणि आम्हां

सर्वांना ह्या घोर अन्यायामुळें जी अधोगती मिळाली आहे ती टळून सर्वांचा सारखाच उद्धार होणार आहे, असा साधा आणि सात्विक भाव आम्हांमध्यें निरंतर जागृत राहो." ह्यास अनुसरून मंडळीचें काम सुरू झालें.

मंडळीची पहिली कार्यकारी समितिः— अध्यक्ष—सर नारायण गणेश चंदावरकर, उपाध्यक्ष—शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला, जनरल सेक्रेटरी—श्री. विठ्ठल रामजी शिंदे, खजिनदार—रा. रा. नारायण भास्कर पंडित, सुपरिंटेंडेंट—डॉ. संतुजी रामजी लाड, पहिले शिक्षक—लक्ष्मणराव मल्कू सत्तूर.

पहिल्या तीन वर्षांच्या शेवटीं संस्थेच्या कार्याची खालीलप्रमाणें वाढ झाल्याचें आढळतें.

**त्रैवार्षिक अहवाल** मुंबईतील मध्यवर्ती शाखेच्या संस्थाः—

१. परळ येथील शाळा—मराठी ५ इयत्ता व इंग्रजी ४ इयत्ता. शिक्षक ७, पटावरील मुलांची संख्या १७५. मोफत दवाखाना, पुस्तक बांधणें आणि शिवण कामाचा वर्ग.

२. देवनार येथील प्राथमिक शाळा—२ शिक्षक, ४७ मुले, मराठी ४ इयत्ता.

३. मदनपुरा प्राथमिक शाळा—४ शिक्षक, १५० विद्यार्थी, मराठी ५ इयत्ता.

४. कामाठीपुरा गुजराथी शाळा—ही भंगी लोकांसाठीं मुंबईतील पहिली शाळा होय. शिक्षक मिळणें दुर्मिळ झालें, तरी देखील १ शिक्षक, आणि ५१ विद्यार्थी.

५. रविवारच्या शाळा—एक परळ येथें व दुसरी मदनपुरा येथें. धर्म आणि नीति शिक्षणाच्या शाळा.

६. भजनसमाज—एक परळ येथें व दुसरा मदनपुरा येथें. प्रोक्त मंडळी भजनासाठीं आणि उपदेशासाठीं जमत आणि उपासना चालवीत.

७. व्याख्यानें—वेळोवेळीं उपयुक्त विषयावर.

८. परस्पर सहाय्यक चामड्याचा कारखाना—शशिभूषण रथ व दुसऱ्या एका जर्मन तज्ज्ञाच्या नेतृत्वाखालीं नवीन तऱ्हेचे बूट करण्याचा कारखाना काढला. सुरवातीचें भांडवल २००० रु.

९. निराश्रित सेवासदन—दोन तरुण गृहस्थ आणि तीन स्त्रिया यांच्या सहाय्यानें हें सदन उघडण्यात आलें. या तीन स्त्रिया गरीब लोकांच्या घरीं समाचाराला जात. आजाऱ्यांची शुश्रूषा करीत, निराश्रितांना सदनांत आणीत, शिवण्याचा वर्ग आणि बायकांचा वर्ग चालवीत. तरुण गृहस्थ सर्व संस्थांची देखरेख करीत. परळ शाळेंतील सुमारें १२ विद्यार्थी यांची जेवण्याखाण्याची सोय सदनांतील वसतिगृहांत केली जाई.

१०. Purity Servant या नांवाचें इंग्रजी मासिक दर महिन्याच्या १५ तारखेला प्रसिद्ध होत असे. त्यांत मद्यपान निषेध व इतर सामाजिक विषयांवर लेख येत. आणि मिशनची सर्व बातमी प्रसिद्ध होई. ह्याचे संपादक श्री. वा. स. सोहोनी हे होते. ह्याशिवाय मुंबईबाहेर खालील शाखा होत्या.

१. पुणें:—(१) दिवसाची शाळा. (२) रात्रीची शाळा. (३) भजनसमाज. (४) चर्चामंडळ. शाळांतील पटावरील संख्या अनुक्रमें १४९, २५, ३३.

२. मनमाड:—१ रात्रीची शाळा, ४५ विद्यार्थी.

३. इगतपुरी:—१ दिवसाची शाळा, ६८ मुलें. ही शाळा दोन

महार तरुणांनीं चालविली होती. शिवाय रविवारची धर्मशिक्ष-णाची शाळा व धर्म समाज चालू होते.

४. इंदूरः—१ रात्रीची शाळा, २० विद्यार्थी.

५. अकोलाः—२ रात्रीच्या शाळा, ७२ विद्यार्थी, १ भजन समाज, १ विद्यार्थी वसतिगृह.

६. अमरावतीः—२ रात्रीच्या शाळा, ५३ विद्यार्थी.

७. दापोलीः—१ दिवसाची शाळा, ३७ विद्यार्थी. ह्याशिवाय मुलांना विद्यार्थी वेतनें मिळत.

८. मंगळूरः—१ दिवसाची शाळा, ४९ विद्यार्थी. हातमागाचा विणण्याचा कारखाना. सर्व मुलांना दुपारचें जेवण मिळे. ७ मुलें मोफत वसतिगृहांत रहात.

९. मद्रासः—१ पारिया जातीच्या अस्पृश्यांसाठीं दिवसाची शाळा, २३ विद्यार्थी, १ चांभारासाठीं दिवसाची शाळा, विद्यार्थी २९.

१०. महाबळेश्वरः—मे १९०९ सालीं गव्हर्नरच्या बंगल्यावर लेडी म्यूर मॅकेंझी यांच्या आश्रयाखालीं मिशनच्या हितचिंतकांची सभा भरली. महाबळेश्वरचे सुपरिंटेंडंट मेजर जेम्सन हे अध्यक्ष होते. पूर्वी जमलेला ९०० रु. चा फंड मिशनला देण्यांत आला आणि ही शाखा उघडली. दोरखंड तयार करणें, वेताचें विणकाम करणें वगैरे कामें होत.

११. नाशिकः—१९०९ सप्टेंबर मध्यें जनरल सेक्रेटरी ह्या जिल्ह्यांत दौऱ्यावर गेले असतांना नाशिक येथें जाहीर सभा होऊन जिल्ह्याची कमिटी नेमण्यांत आली. जिल्ह्याचे कलेक्टर मि. जॅक्सन ह्यांस अध्यक्ष नेमण्यांत आलें. येणें प्रमाणें तिसरे वर्षाच्या अखेरीस ह्या मिश-नच्या १२ शाखा, १६ दिवसांच्या प्राथमिक शाळा, १०१८

विद्यार्थी, सहा रविवारच्या शाळा, ५ भजन समाज, ४ उद्योग-शाळा, ७ मिशनरी—वाहून घेतलेले कार्यवाह आणि एक मासिक-पत्र इतकी वाढ झाली.

---

# प्रकरण १२ वें.

## सामान्य विचार

कोणत्याहि एका मोठ्या समाज-सुधारणेचें व्यापक कार्य हातीं घेतल्यावर कार्यपद्धतीचे ढोबळ दृष्ट्या दोन भिन्न प्रकार पडतात. विवक्षित आणि मर्यादित क्षेत्र घेऊन पद्धतीचें केंद्रीकरण आणि संघटन ही पहिली पद्धत. अमर्याद लोकसमाजाचें मत आणि वळण बदलणें व त्यासाठीं प्रचारकार्य करणें ही दुसरी पद्धत. पहिलीला सुवर्णकार पद्धति आणि दुसरीला मेघवृष्टि पद्धति असें संबोधितात. उदाहरणार्थ, सोनें, मोतीं, हिरे वगैरे अशोधित धातु घेऊन सुवर्णकार आपल्या कलाकुसरीनें त्यांचे अखेरीस उत्तम नग बनवितो तर दुसऱ्या पद्धतींत अमर्याद क्षेत्रावर मेघानें वर्षाव केल्यामुळें अखेरीस उत्तम पीक येतें. हा पद्धतीचा भेद केवळ आधुनिक आहे असें म्हणतां येणार नाहीं. पुरातन काळीं मोठमोठे धर्मप्रसार झाले, धर्मबुद्धीच्या घटना झाल्या, सुधारणा झाल्या, त्यांच्या चालकांना या दोन्ही पद्धती स्वीकाराव्या लागल्या; ठिकठिकाणीं गुरुकुलें स्थापून आचार्यांच्या द्वारा धर्मबुद्धीची शिकवण दिली, पुरोहित नेमून धर्माचीं अनुष्ठानें, गृह्य अथवा सामाजिक संस्कार यांच्या द्वारें धर्माची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली ही पहिली पद्धत. निःसंग परिव्राट, सतत संचार करणारे परमहंस संन्यासी

**दोन पद्धति**

नेमून त्यांच्या द्वारा वेळोवेळीं झोंपी जाणाऱ्या लहानथोर जनतेला जागें करणें आणि कार्यप्रवण राखणें ही दुसरी.

अस्पृश्यतानिवारण हें मोठें जागतिक कार्य ! खंडव्रजा भारतासारख्या विभूतिवाद देशसमूहावर ह्या कार्याचा प्रयोग करणें हें कांहीं लहानसहान कृत्य नव्हे. कार्य मोठें पण कार्यवाह लहान. पण विभूतीची वाट पहात बसण्याला अवसर कोठून आणणार. विभूतीची वाट पाहण्यांत बराच काळ अगोदरच लोटून गेला होता. लोकोत्तर विभूती आणि सामान्य माणसांची घटना ह्या दोहोंचें समाजशास्त्रदृष्ट्या विद्यार्थीदशेंत मीं थोडेबहुत आकलन केलें होतें. म्हणून विभूतिवादावरील माझा विश्वास किंचित् कमी होऊन सामान्य माणसांच्या घटनात्मक प्रयत्नाकडे माझा कल विद्यार्थीदशेंतच होऊं लागला होता. थॉमस कार्लाईलचा विभूतिवाद आणि हर्बर्ट स्पेन्सरचा सामान्य माणसांचा घटनात्मक प्रयत्नवाद ह्या दोहोंची तुलनात्मक मीमांसा मीं तरुणपणींच केलेली होती. म्हणून अस्पृश्यतानिवारणाचे कामीं आधुनिक काळांत कोणी विभूति पुढें येत नाहीं आणि मी तर स्वतः अत्यंत सामान्य माणूस ही वस्तुस्थिति पाहून मी हताश झालों नाहीं. श्रद्धेनें पर्वत हलतात ह्या खिस्तोक्तीची प्रचिती पाहण्याची वेळ आली होती. श्रद्धा मग ती एखाद्या विभूतीची असो वा सामान्य माणसाची असो श्रद्धा ती श्रद्धाच. तिनें ते पर्वत हललेच पाहिजेत. मात्र सामान्य माणसांची तशी घटना झाली पाहिजे. अपेक्षेप्रमाणें थोडाबहुत पैशाचा निधि जमल्यावर कामासाठीं योग्य माणसें जमा करूं लागलों. निधि जमवणें हें माणसाचें काम. पण माणसें मिळणें ही ईश्वरी देणगी. ह्या कामाला स्वार्थत्यागपूर्वक वाहून घेऊन काम करणारीं माणसें मिळणें कठीण जाऊं लागलें. वेतनाकडे लक्ष्य न देतां केवळ कार्यावर श्रद्धा ठेवून काम करणारीं माणसें पाहिजे होतीं.

**प्रचारकांचे दोन प्रकार**

अशा माणसांचेहि दोन प्रकार पडतात. सर्वसंगपरित्यागी हा संन्यासांचा पहिला प्रकार. घरादारांची जबाबदारी असलेलीं, अरण्यांत जाण्यापेक्षां समाजांतच राहून गृहस्थाश्रम चालविणारीं, सामान्य माणसें हा दुसरा प्रकार. संन्यासी कामाला मिळाले असते तरी ते शिस्तींत बसणारे व चालणारे नसतात. ज्यांना घर करण्याचा अनुभव नाहीं त्यांना समाज वळविण्याचा अनुभव कोठून येणार ? तो अनुभव असला तरी तसले अनुभवी संन्यासी कोठून आणावयाचे ? असल्या संन्याशांची गांठ पडली नाहीं हेंच मी माझें नशीब समजतों. प्रार्थनासमाजाचें प्रचारकार्य करीत असतां मला असले एक संन्यासी मिळाले होते. त्यांचें नांव स्वामी स्वात्मानंदजी. मेघवृष्टीनें उपदेश आणि प्रवचनें करण्यांत त्यांचा मला मोठा लाभहि झाला होता. त्यांतहि केव्हां केव्हां मतभेद झाल्यास स्वामीजी दंडा घेऊन उठत, हा अनुभव मला आलेला होता. म्हणून अशा संन्याशांची मला फार हळहळ लागली नाहीं. त्यांत मी स्वतः पडलों अगदीं सामान्य माणूस ! माझ्याबरोबर काम करण्याला असामान्य माणूस कशाला येईल ! नुसती बी. ए., एम्. ए. आणि परदेशविद्याभूषित माणसेंसुद्धां माझ्या भेदरट मनाला असामान्य दिसूं लागलीं. अशीं माणसें थोडा वेळ स्वार्थ-त्याग करतील पण तीं अखेरपर्यंत मिशनची शिस्त पाळतील याची खातरजमा कोण देणार ? मिळालींच असतीं तर मिशननें त्यांना टाकलें असतें असा प्रकार नाहीं. पण मिळालीं नाहींत; म्हणून मला तरी कधीं वाईट वाटलें नाहीं. "श्रद्धावान् लभते ज्ञानं" अशी म्हण आहे. 'ज्ञानवान् लभते श्रद्धां' अशी म्हण नाहीं. म्हणून फारशी इंग्रजी विद्या न मिळवलेलीं, गरजेमुळें व कामापुरतें आधुनिक विद्येचें चांगलें ज्ञान असलेलीं अशीं माणसें क्रमाक्रमानें मिळालीं त्यांनाच ह्या मिशनचें सारें श्रेय आहे.

**कार्याची घटना**

मिशनच्या कामाची खालील प्रमाणें मांडणी करण्यांत आली. एक मध्यवर्ती शाखा ठरवावयाची. तिचा हेतू आणि रचनेसंबंधीं जरूर तितकेच नियम करावयाचे. अशी मातृसंस्था मुंबई शहरांत स्थापण्यांत आली. प्राथमिक अथवा दुय्यम शिक्षणाची शाळा, उद्योगशाळा, विद्यार्थी वसतिगृहें, फुकट दवाखाना, धर्म आणि नीति शिक्षणाच्या साप्ताहिक शाळा, केवळ सार्वत्रिक धर्माला अनुसरून म्हणजे जातिभेद आणि मूर्तिपूजेला फाटा देऊन चालविण्यांत येणारीं उपासनालयें एवढीं तरी निदान ह्या मध्यवर्ती संस्थेचीं अंगें ठरलीं. ह्यासाठीं एक आश्रम स्थापण्यांत येऊन त्यांची सर्व जबाबदारी अंगावर घेणाऱ्या कुलगुरूची आवश्यकता भासली. ह्या मध्यवर्ती आश्रमाची नीट घडी बसल्यावर पुढें जसजसा अनुभव येईल तसतशा भाषावार निरनिराळ्या प्रांतांतून प्रांतिक शाखा आणि त्यांच्या जिल्हानिहाय व तालुकानिहाय पोट संस्था स्थापण्याचा विचार ठरला. सुवर्णकार पद्धतीनें हीं कामें चालू असतां मेघवृष्टीचें काम म्हणजे जाहीर व्याख्यानांच्या द्वारें परिषदा, प्रदर्शनें, प्रात्यक्षिकें, मिरवणुकी वगैरे साधनांच्या द्वारें लोकमत तयार करणें हें काम, आवश्यक होतें. ह्या दोन्ही पद्धतींचीं कामें परस्परावलंबी होतीं. ठिकठिकाणच्या केंद्रीकृत संस्था नसत्या आणि नुसतें प्रचाराचेंच काम चाललें असतें तर लोकमत कसें बनणार आणि मेघवृष्टिप्रचाराचें काम न चालवतां नुसत्या स्थानिक संस्थांना द्रव्याचें व सहानुभूतीचें सहाय्य तरी कसें मिळणार? म्हणून ह्या दोन पद्धतींचीं कामें मीं एकमेकांपासून भिन्न पण परस्परपोषक अशीं प्रथमपासून ठरविलीं होतीं. दुसरें काम म्हणजे प्रचाराचें काम मीं स्वतः अंगावर घेऊन करण्यासारखें होतें. पण पहिल्या कामासाठीं मात्र तज्ज्ञ आणि अधिकारी माणसें पाहिजे होतीं. ही तज्ज्ञता आणि अधिकार तरी काम करण्याच्या अनुभवानेंच मिळणार होता.

मिशनचें काम म्हणजे अस्सल धर्मयुद्धाचें काम होतें. नुसती मुलुखगिरी केल्यानें युद्धांत जय मिळत नाहीं. मिळाला तरी तो टिकत नाहीं. मिळालेल्या मुलखांत कोटकिल्ले स्थापणें आणि ते शिस्तीनें व बंदोबस्तानें टिकविणें ह्यावरच अखेरचा जय अवलंबून असतो. आणि ह्या दोन्ही कामाची रिक्रूटभरती देखील तीं तीं कामें करतां करतांच मिळवावयाची असते.

**पहिले कार्यवाहक**

कामासाठीं माणसें मिळविण्याचा प्रयोग स्वतःच्या घरापासून केला. कारण बोलून चालून मी वेडापीर ठरलों तर घराबाहेरच्या लोकांनीं मजवर विश्वास कसा ठेवावा. यशानेंच यश मिळतें. घरच्या लोकांना घेऊन थोडेसें काम करून दाखविल्यावर प्रार्थना समाज हें जें माझें अध्यात्मिक घर, त्यांतूनच माणसें मिळतील अशी मला बळकट श्रद्धा होती. मध्यवर्ती शाखेची मागें दिलेली जी समिति आहे ती सर्व प्रार्थनासमाजिस्टांचीच आहे. अध्यक्ष—सर नारायणराव चंदावरकर, उपाध्यक्ष—शेट दामोदरदास सुखडवाला, खजिनदार नारायणराव पंडित, सुपरिंटेंडंट डॉ. लाड, जनरल सेक्रेटरी मी स्वतः हे अनुक्रमें प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभासद आणि प्रचारक होतो. त्याच नात्यानें पुढील कार्यवाहकहि मला प्रथम माझ्या लहानशा घरांतून आणि पुढें माझ्या प्रार्थनासमाजाच्या अध्यात्मिक गृहांतून मिळावयाचे होते. म्हणून प्रथम माझी भगिनी श्रीमती जनाबाई, मातोश्री सौ. यमुनाबाई, पिताजी तीं. रामजीबुवा त्यांना कार्यास बोलाविलें. जनाबाई पनवेलीस म्युनिसिपालिटीच्या मुलींच्या शाळेंत मुख्याध्यापिका होत्या. मॅट्रिकपर्यंत त्यांचें इंग्रजी शिक्षण झालें होतें. उपासनेच्या वेळीं भजन करणें प्रसंगविशेषीं गोरगरिबांचा समाचार

घेणें वगैरे प्रार्थनासमाजाच्या कामीं मला त्या अगोदरच मदत करीत होत्या. तेंच काम ह्या मिशनमध्यें वाहून घेऊन करण्यासाठीं मीं त्यांना आपल्या कायमच्या नोकरीचा राजीनामा देण्याची विनंती केली. आणि ती त्यांनीं मान्य केली. ज्यांच्या कृपेनें व आशीर्वादानें मला ह्या सार्वजनिक कामाची प्रेरणा झाली ते माझ्या विनंतीची वाट कोठून पाहणार ! जिथें मुलें तिथें आम्ही ह्या अस्सल हिंदु नियमाप्रमाणें माझे आईबाप माझ्या मागें आले. आम्ही सांगू तें काम, ठेवूं तें स्थळ असा त्याचा निर्धार झाला. आमच्या घरोब्याचे सय्यद अब्दुल कादर या नांवाचे तरुण सद्‌गृहस्थ होते. तेही मॅट्रीक पास झालेले होते. मुंबईतील इस्लामिया स्कूलमध्यें त्यांना शिक्षकाची नोकरी होती. आमच्याप्रमाणेंच त्यांनींहि प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली होती. आमचें उदाहरण पाहून त्यांनींही आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि मिशनचे स्वार्थत्यागी कार्यवाहक बनले. हें दिव्य पाहून प्रार्थना समाजाचे दुसरे एक सभासद रा. वामनराव सदाशिवराव सोहोनी यांनाही ह्या अध्यात्मिक सांथीनें गांठले. मुंबईतील विल्सन हायस्कूलमध्यें ते एक प्रसिद्ध नामांकित शिक्षक होते. वामन आबाजी मोडक ह्या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञाच्या तालमींत शिकून ते त्या शास्त्रांत आणि कार्यांत चांगले तरबेज झाले होते. ते आम्हास येऊन मिळाल्यावर स्वीकृत कार्यांत परमेश्वराचा हात आहे असा जणूं साक्षात्कारच आम्हाला झाला. आणि अशारीतीनें आमचा आत्मविश्वास वाढला. या प्रकारें मुंबईतील मध्यवर्ती आश्रमाची व गुरुकुलाची तयारी झाली. "सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलः" अर्थात् जरूर त्या पैशाच्या कामीं मी लागलों.

# प्रकरण १३ वें

## कार्याची सुरवात

निराश्रित साह्यकारी मंडळीचें अशा रीतीनें एक वर्ष लोटल्यावर कामाचा चहुकडे बोलबाला होऊं लागला. ह्या नवीन कार्या-

**निराश्रित सेवासदन** बद्दल अनुकूल प्रतिकूल मतें प्रकट करण्यांत वृत्त-पत्रकारांची चढाओढ लागली. या राष्ट्रीय मुहूर्त कालांत मुंबईस बिनबोभाट परोपकारी कृत्य करणारे दोन दानशूर गृहस्थ होते. एक मलबारी नांवाचे पारशी गृहस्थ व दुसरे दयाराम गिडुमल, सुरतेचे डिस्ट्रिक्ट जज्ज, असे होते. पुण्याचे प्रो. धोंडोपंत कर्वे, अनाथ महिलाश्रमाचे संस्थापक; प्रो. गोपाळ कृष्ण गोखले, भारत सेवक मंडळाचे संस्थापक; राजकारणांत सारा हिंदुस्थान हलवून सोडणारे टिळक वगैरेंनीं महाराष्ट्राला तत्कालिन अग्रपद मिळवून दिलें होतें. अशा मुहूर्तकाळीं वरील दोन परोपकारी गृहस्थांना केवळ महिलांच्या उद्धारासाठीं निष्काम बुद्धीनें कांहीं तरी करावें ही तळमळ लागून राहिली होती. एके दिवशीं दयाराम गिडुमल ह्या थोर पुरुषाकडून मीं त्यांना समक्ष भेटून जावें अशी अत्यंत प्रेमळपणाची चिठ्ठी आली. ती भेट मी कधीं विसरणार नाहीं. त्यांनीं मला अत्यंत आपलेपणानें कवटाळून, डोळ्यांत आंसवें आणून विचारलें कीं, हें अपूर्व मिशन काढण्याची कल्पना मला कशी सुचली. ह्या कामीं अस्पृश्यवर्गीच्या महिलासाठीं मीं कांहीं तजवीज केली आहे काय असें विचारलें, मीं निर्भीडपणें सांगितलें कीं, ह्या हतभागी भारता-मध्यें पुरुषापेक्षां महिलांची स्थिति अत्यंत दुर्बळ व केविलवाणी आहे हें

मी जाणून आहें. माझ्याप्रमाणेंच माझ्या घरांतल्या मंडळींना हि ही जाणीव असल्यानें माझी त्यागी बहिण आणि पूज्य माता यांनीं आपलें पाठबळ दिलें आहे. याची वार्ता दयारामजींच्या कानावर अगोदरच आली होती. म्हणूनच त्यांनीं मला समक्ष भेटीला बोलावून असें कळकळीचें स्वागत केलें. त्यांनीं विचारलें, " ह्या अस्पृश्य महिलांच्या सेवेसाठीं तुम्ही काय करूं शकतां ? " मीं उत्तर दिलें, " आमच्या मध्यवर्ती आश्रमांत निराश्रित सेवासदन या नांवाखालीं एक स्वतंत्र शाखा आम्ही काढूं. " दयारामजींनीं ताबडतोब दरमहा १०० रु. ची मदत देऊं केली आणि हें सदन निघालें.

**पहिली शाळा**

मिशनची पहिली शाळा १८ ऑक्टोबर १९०६ सालीं मुरारजी वालजींच्या बंगल्यांत निघाली होती. पण कामाची वाढ झाल्यानें ही जागा पुरेना म्हणून एल्फिन्स्टन रोडवरील स्टेशनाचे पश्चिमेस ग्लोब मिलजवळ एका चाळींत अधिक प्रशस्त जागा घेतली. मिशनचा पहिल्यापासूनच एक दंडक ठरला होता कीं, मिशनमध्यें काम करणाऱ्यांनीं ज्या ठिकाणीं अस्पृश्य लोक रहातात तेथेंच त्यांच्यांत मिळून मिसळून रहावें, काम करणारांनीं आपल्या कुटुंबासह येऊन रहावें. मिशनऱ्यांच्या बायकामुलांनीं अस्पृश्य मानलेल्या बायकामुलांमध्यें मिळून मिसळून रहावें. ह्या उद्देशाला अनुसरून ग्लोब मिलजवळच्या एका चाळींत मिशननें आपलें ठाणें घातलें. खालच्या मजल्यांत शाळा, दवाखाना, उद्योगालय वगैरेची व्यवस्था करण्यांत आली आणि वरच्या मजल्यांत माझे वृद्ध आईबाप, रा. सय्यद अबदुल कादर व त्यांची बहिण आणि तिचा नवरा इतक्यांची राहण्याची सोय करण्यांत आली. तेथें वरील सदनाची संस्थापना २१ मे १९०७ रोजीं झाली. ग्लोब मिलच्या आसपास या चाळीला लागूनच मोठें पटांगण होतें. किंबहुना येथें ग्रह-

राची वस्ती संपली होती आणि उन्हाळ्याच्या दिवसांत मुलांना खेळावयास प्रशस्त जागा होती. पण पावसाळ्यांत ह्या जागेंत मोठी दलदल माजून दोन तीन महिने पाणी सांचून रहात होतें. त्यामुळें रहाण्याला जागा रोगराईची आणि गैरसोईची होती. म्हणून लवकरच ही जागा सोडून स्टेशनाला लागूनच नवीन प्रशस्त बंगला घेतला व तेथें या सदनाचें काम जोरांत चाललें.

**हेतू आणि कार्य**

मिशनचे हेतू पहिल्यापासूनच पुढीलप्रमाणें होते. ( १ ) शिक्षणप्रसार ( २ ) नोकऱ्या मिळवून देणें ( ३ ) सामाजिक अडचणींचें निवारण करणें आणि ( ४ ) सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील आणि नागरिकता वगैरे गुणांचा प्रसार ह्या गरीब लोकांत करणें. शेवटचे तीन हेतु वरील सदन निघेपर्यंत साधणें अशक्य होतें. म्हणून ह्या सदनाचे हेतू खालील प्रमाणें ठेवण्यांत आले. वरिष्ठ वर्गातील जे कोणी उत्साही स्त्री-पुरुष विशेषतः सुशिक्षित भगिनी आपल्यास वाहून घेऊन मिशनच्या कामास येण्यास तयार असतील त्यांच्यामध्यें कामाची पात्रता येण्यासाठीं त्यांना तयार करणें, आणि ते तयार झाल्यावर आणि होत असतांहि अस्पृश्य वर्गाच्या गरीब स्त्रियांमधून त्यांना कामें देणें. मिशनचें काम अत्यंत उदार धर्माच्या पायावर चाललें होतें. त्यासाठीं दर शनिवारीं व्याख्यानें आणि कीर्तनें होत. रविवारीं सकाळीं धार्मिक शिक्षणाचे वर्ग आणि सायंकाळीं उपासना होत. प्रथम प्रथम हें काम मी स्वतःच माझ्या बहिणीच्या सहाय्यानें करीत असे. सदन निघाल्यावर त्याची स्वतंत्र व्यवस्था चांगली झाली. सणाचे दिवशीं सामाजिक मेळे होत. त्यांत अस्पृश्यवर्गीय स्त्रीपुरुष वरिष्ठ वर्गाच्या स्त्रीपुरुषांत समानतेनें भाग घेत. पहिल्या वर्षी ९ जाहीर व्याख्यानें, ४ कीर्तनें, ५ पुराणवाचनें असे प्रसंग झाले.

भजनसमाज उघडण्याच्या दिवशीं परळ आणि देवनार शाळेच्या सर्व मुलांना व्हिक्टोरिया गार्डनमध्यें फिरवून आणून मिटाई वाटण्यांत आली. मोहरमचे सुट्टींत सर्व मुलांना आणखी कांहीं वाडिल माणसांना घारापुरी येथील लेणीं दाखवून आणण्यांत आलीं. त्यावेळीं तेथें प्रीतिभोजन झालें. गांवांतील लोकांपासून, जुने वा नवीन कपडे (सुमारें १५००) गोळा करून गरीब लोकांस वाटण्यांत आले. गरीब स्त्रियांसाठीं, विशेपतः कुमारी व विधवांच्या शिक्षणासाठीं शिवणकामाचा वर्ग सुरू करण्यांत आला. त्यांत तयार करण्यांत आलेले कपडेहि वाटण्यांत आले. ह्या लोकांत स्वच्छतेच्या संवयी वाढाव्या म्हणून दर शनिवारीं व रविवारीं शाळांतील मुलांना सदनांत स्नान घालण्याची सोय करण्यांत आली. ह्या साध्या गोष्टीचाहि प्रथम प्रथम गैरसमज होऊन बऱ्याच अडचणी येऊं लागल्या. अस्पृश्य वर्गांतील निरनिराळ्या जातींचीं मुलें एकमेकांत मिसळण्यास कचरत म्हणून बऱ्याच अडचणी येऊं लागल्या. चिकाटीनें आणि चतुराईनें काम चालवून त्यांतून पार व्हावें लागलें.

शाळा जरी काढल्या तरी त्यावेळीं अस्पृश्यवर्गीय मुलांना शाळेंत रोजच्या रोज जाण्याची सोय नसे व त्यांच्या पालकांना रोजच्या रोज पाठविण्याची आवड नसे. शिक्षणाची अभिरुचि लावून देण्यासाठीं सदनांतील स्त्री-प्रचारकांना घरोघरीं भेटी द्याव्या लागत असत. हें काम खिस्ती लोकांचें आहे असें समजून हें मिशनही खिस्ती असावें असा गैरसमज होऊं लागला. त्याचें निराकरण करण्यासाठीं प्रचारक स्त्रियांनीं भारत, भागवत, रामायण वगैरे हिन्दु ग्रंथांचें घरोघरीं वाचन सुरू केलें. एकादशी, शिवरात्री वगैरे हिन्दुसणाचे दिवशीं सदनामध्यें भक्तिविजया-सारखीं हिंदु संतांचीं चरित्रें वाचून दाखविण्यांत आलीं. आजाऱ्यांची शुश्रूषा करण्यासाठीं आणि बाळंतपणाची मदत देण्यासाठीं सदनांतील

स्त्रियांना शिक्षण देऊन तयार करण्यांत आलें. श्रीमती वेणूबाई, द्वारकाबाई आणि श्रीमती कल्याणीबाई सय्यद ह्या तीन स्त्रिया सदनांत राहून हीं कामें उत्कृष्ट रीतीनें करीत. या सदनांतील घरगुती सर्व कामें माझी बहीण जनाबाई पार पाडी व बाहेरच्या कामाचा सर्व बोजा रा. सय्यद अबदुल कादर यांनीं उचलला होता. या कामासाठीं निराश्रित महिला समाज ही निराळी संस्थाच जनाबाईनें काढली होती. या महिला समाजाचा पहिला वार्षिकोत्सव सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला होता. या महिला समाजाचीं कामें भायखळा व परळ येथें दोन ठिकाणीं स्वतंत्रपणें चालत असत.

भायखळा येथील शाळेंत शिवणकामाचा वर्ग शनिवार व रविवार खेरीज रोज भरे. ह्या वर्गामधून बाहेरूनहि कांहीं बायका आपले कपडे शिवून नेत. दोन शिवण्याचीं यंत्रें व एक विणकामाचें यंत्र सदनास मिळालें होतें.

**समाचार**

घरोघर भेटीला जाऊन समाचार घेण्याचें काम वर्षभर चालत होतें. त्या कामाचा फायदा आमच्या निराश्रित भगिनींना कितपत मिळाला हें आम्हांस सांगवत नाहीं. परंतु त्याचा आम्हाला मात्र निरीक्षणदृष्ट्या बराच फायदा मिळाला. घरांतील वर्ग सुमारे ६ महिने चालले. गेल्यावर्षी एकंदर १३ बायकांची प्रसूती करण्यांत आली. पुष्कळांना दवाखान्याचा लाभ देण्यांत आला. पोलीस कमिशनराकडून बेवारशी मुलें व बायकांमिळून ५ आलीं त्यांची निगा ठेवण्यांत आली.

**सोमवंशीय मित्रसमाज**

महिलांच्या समाजाप्रमाणेच पुरुषांचाहि सोमवंशीय समाज स्थापन करण्यांत आला. इंप्रूव्हमेंट ट्रस्टमधील चाळ नं. ३ मध्यें हा समाज ता. २४ मार्च १९०५ रोजीं स्थापन करण्यांत आला. ह्याचा हेतू अस्पृश्य लोकांकरवींच स्वोद्धारार्थ धार्मिक व सामाजिक सुधारणा करवून घ्यावी असा होता. १९१० अखेर पटावर ४० सभासद होते. ते दरमहा चार आणे वर्गणी देत. दर रविवारीं एकेश्वरी मताच्या उपासना त्यांचेसाठीं चालविण्यांत येत. १९१० सालीं ११ जाहीर सभा, अस्पृश्यांच्या निरनिराळ्या मोहल्ल्यांतून ह्या लोकांनीं घडवून आणल्या. अशाच एका सभेचे वेळीं, 'एकनाथ व अस्पृश्य जाती' या विषयावर माझें जाहीर व्याख्यान झालें. ह्या मंडळींचा उत्साह इतका वाढला कीं, या समाजासाठीं एक स्वतंत्र उपासना मंदिर बांधावें असा विचार १९०९ च्या नोव्हेंबरमध्यें ठरून वेळोवेळीं सभा होऊं लागल्या. ह्यासाठीं फंड जमा होऊन ६५० रुपये मुंबई बँकेंत ठेव पंचांच्या नांवें ठेवण्यांत आली. परंतु कोणत्याहि कामांत स्थावर मिळकत होऊं लागली म्हणजे वादाची मुळी पेरल्याप्रमाणें होतें. हा अनुभव ह्या लहानशा कामांतहि येऊन कांहीं वर्षांनें हें काम बंद पडलें.

ह्या निराश्रित सेवासदनाच्या खर्चासाठीं दयाराम गिडुमल यांनीं दरमहा १०० रु. ची देणगी दिली होती. ती तीन वर्षांसाठींच होती. सुरवातीचे अनुभव घेऊन पाहण्यासाठींच हे प्रयोग चालले होते. त्या दृष्टीनें पाहतां ह्या मिशनला फार लाभ झाला. प्रचारकांना अशा कामाचा आणि मनुष्यस्वभावाचा जो अनुभव आला तो प्रत्यक्ष कामापेक्षांहि अधिक महत्त्वाचा वाटला. लहान लहान आणि वयपरत्वें अंथरुणाला टेकलेलीं माणसें यांचे फार हाल होतात हें माझ्या नजरेस येत असे. गिरणींत बारा तास

काम करणाऱ्या माणसांना आपलीं पोटचीं मुलें आणि वृद्ध जराग्रस्त आईबापें यांच्या जोपासनेस वेळ मिळत नसे. म्हणून अशांची सेवा हेंच सदनाचें मुख्य काम असे.

अशा कामांतील अनुभवाचीं पुढील कांहीं उदाहरणें लक्षांत घेण्यासारखीं आहेत.

**एक प्रयोग**

मुलांना शाळेंत पाठविण्यासाठीं आमच्यावर विश्वास बसावा म्हणून कांहीं निवडक मुलांना सदनाच्या ठिकाणीं माझ्या आईबापाकडे मुलें आणून मातेचा लळा लावण्याचा प्रयोग करून पाहिला. लष्करांतून सेवानिवृत्त झालेले एक महार जमादार समजुतदार गृहस्थ होते. ८ वर्षांची एक मुलगी व ६ वर्षांचा एक मुलगा अशीं दोन अपत्यें त्यांना होतीं. आठ आठ दिवस त्या मुलांना आमच्या सदनांत ठेवण्यास ते कबूल झाले. अगदीं आपल्या पोटच्या पोराप्रमाणें त्यांना ठेवून घेण्यास माझी आई देखील कबूल झाली. चंद्राका नांवाची माझी धाकटी बहिण नुकतीच वारल्यामुळें विरहाचा मोठा धक्का बिचारीला बसला होता. त्यांतून थोडासा विरंगुळा मिळावा म्हणून तिनें हें संगोपनाचें कार्य पत्करलें. एके दिवशीं सदनांत कांहीं गोडधोड झालें होतें म्हणून लहानग्या गंगूनें (मुलीचें नांव) नेहमीपेक्षां जरा जास्त खाल्लें. गंगूला आपल्या स्वतःच्या बिछान्यांत घेऊन आई निजत असे. असा लळा लावल्याशिवाय मुलें घर सोडून राहण्यास तयार होण्यासारखीं नव्हतीं. मध्यरात्रीनंतर गंगूला अंथरुणांतच जुलाब होऊं लागले. बिचाऱ्या आईनें सर्व अंथरूण धुऊन काढलें. मुलीला साफसूफ करून ऊबदार उपचार करून उजाडण्याचे पूर्वीं नीटनेटकें केलें होतें. मी रागें भरेन म्हणून घडलेला प्रकार मला कळविला नाहीं; तरी तो मला पुढें कळलाच. मीं माझ्या आईचे पाय धरले. अशा गोष्टींनीं या लोकांचा विश्वास आमच्यावर हळू

हळू बसून पुढें लवकरच आमच्या प्राथमिक आणि दुय्यम शाळाच नव्हेत तर एक मोठे विद्यार्थी वसतिगृह देखील चांगलें नांवारूपास आलें.

**आणखी कांहीं प्रयोग**

माझी बहिण जनाबाई समाचारास घरोघरीं जात असतां त्यांना फार खडतर अनुभव आले. एका घरीं एक अगदीं वृद्ध बाई अंथरुणास खिळली होती. पडून पडून तिच्या पाठीला जखमा झाल्या होत्या. जनाबाई रोज तिची पाठ शेकण्यास जाई. तिच्या पाठीला शेकण्याला पाणी तापविण्याकरतां जनाबाई चुलीकडे जाऊं लागली. तेव्हां बाई म्हणते, "बाई तुमचे फार फार उपकार आहेत. पण माझ्या चुलीला शिवूं नका. तुम्हां खिस्ती लोकांनीं चूल बाटविल्यास लोक मला नांवें ठेवून वाळींत टाकतील." जनाबाईला आपल्या घरचा स्टोव्ह नेऊन आपलें स्वीकृत काम मुकाट्यानें करावें लागलें.

राही नांवाच्या दुसऱ्या एका वृद्ध बाईला असाध्य जखमा झाल्या होत्या. मोठ्या सायासानें ह्या बाईला जे. जे. हॉस्पिटलांत पोहोंचविण्यांत आलें. दुसरे दिवशीं तिचा समाचार घेण्यासाठीं जनाबाई जाऊन पाहाते तों तिच्या तरुण मुलानें तिला घरीं नेलेलें आढळलें. आणि हा उपद्व्याप केल्याबद्दल त्याच्याकडून बराच शिव्यांचा प्रसादहि मिळाला. घरीं नेऊन आपल्या वृद्ध आईच्या थोबाडांतहि त्यानें मारल्याचें कळलें. मुलगा दारूच्या निशेंत होता म्हणूनच हीं कृत्यें त्याच्याकडून पार पडलीं. तो कामावर गेल्यावर जनाबाई त्या बाईला भेटण्यास घरीं गेल्या. मुलगा रेल्वेंत मजूर होता. दारूच्या निशेंत रेल्वे ओलांडीत असतां दोन्ही डब्यांत चेंगरून जागच्याजागीं ठार झाला. तेव्हां त्याची आई 'बाळा, माझ्या तोंडांत मारायला तरी पुन्हां येरे' असे हंबरडे पुत्रशोकानें फोडूं लागली.

त्याच शोकांत म्हातारीचा त्या रात्रीं शेवट झाला आणि जनाबाईचें हें हृदयविदारक कामहि संपलें.

पुष्कळ बायांना गरोदरपणीं व बाळंतपणीं फार नाजुक उपचार करण्याची पाळी येई. मिशनचे हितचिंतक मोठमोठे स्त्रीडॉक्टर असत. ते औषधोपचार सांगत. पण शुश्रूषेचीं कामें सदनांतील स्त्रियांवर पडत. एनीमा देणें वगैरे नवीन उपचाराचें काम आल्यास जुन्या मताच्या रोग्यांना आवरणें फार कठीण होई. ते अत्यंत बीभत्स शिव्या देत निघून जात.

खालच्या वर्गांत मुरळी सोडण्याची चाल त्यावेळीं जारी असे. मदनपुऱ्यांत आमच्या शाळेंत येणाऱ्या एका मुलीला मुरळी सोडणार आहेत असें कळल्यावरून सदनांतील भगिनी चार समजुतीच्या गोष्टी सांगण्यास त्या मुलीच्या आईकडे गेल्या. आपल्या धर्मांत हात घातल्याबद्दल अत्यंत संताप येऊन पुन्हां आमच्या अंगणांत येऊं नका असें त्या मुलीच्या आईनें दरडावून सांगितलें आणि आपल्या मुलीला शाळेंतून काढून घेतलें.

एकदां पुण्याच्या डॉ. मॅनकडून मुरळी सोडलेली एक मुलगी सदनांत आली. तिला अंग भरून वाईट रोग जडला होता. तिची कोठेंहि व्यवस्था होत नसल्यानें निर्वाणीचा उपाय म्हणून ही मुलगी सदनांत पाठविली गेली. पण मुलाबाळांनीं भरलेल्या सदनांत ही मुलगी ठेवणें धोक्याचें होतें. म्हणून आमच्या भायखळा येथील शाळेजवळ एक स्वतंत्र खोली घेऊन जनाबाईला तिच्यासाठीं निराळें रहावें लागलें. मुलगी फार आडदांड स्वभावाची होती. बरेच दिवस तिनें फार त्रास दिला. पुढें बरी झाल्यानर आणि चांगली शिकल्यावर तिचा योग्य स्थळीं विवाह करून देण्यांत आला. ही मुलगी महाराची होती. ती हल्लीं निजाम

हैद्राबाद येथें शिक्षकीण आहे. वेळोवेळीं पोलीसांकडून अनाथ अर्भकें सदनांत पाठविलीं जात. अस्पृश्य म्हणून इतर अनाथालयांत त्यांचा शिरकाव होणें अशक्य होतें. अशा मुलांना पंढरपूरच्या आश्रमांत किंवा मालाड येथें काढलेल्या दयाराम शेठच्या आश्रमांत पाठविण्यांत येई.

अशा प्रकारचीं दयार्द्रतेचीं कामें करण्यास पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या अंतः-

**प्रतिष्ठित स्त्रियांची** करणाची जोड मिळविणें आवश्यक असतें. या सदनाच्या कामामुळें तेंहि लवकर घडून आलें.

**कमिटी** १९०८ सालीं खालील प्रतिष्ठित स्त्रियांची कमिटी नेमण्यांत आली. लेडी म्यूर मॅकेंझी, अध्यक्ष; सौ. चंदावरकर, उपाध्यक्ष; मिसेस स्टॅनले रीड, चेअरमन; सौ. सीताबाई सुखटनकर आणि सौ. लक्ष्मीबाई रानडे ह्या जॉईंट सेक्रेटरी; मिस् एस्. के. काब्राजी खजिनदार. ह्यांपैकीं डॉ. वासुदेवराव ह्यांची पत्नी सौ. सीताबाई सुखटनकर ह्या पूर्वाश्रमींच्या मँचेस्टर डोमेस्टिक मिशनचे चालक रेव्हरंड बिशप ह्यांची कन्या. ह्यांनीं इंग्लंडमध्यें असतांना ह्या मिशनला तेथील युनिटेरियन लोकांची सहानुभूति मिळवून एकंदर ७०० रु. पाठविले होते. त्या हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं ह्या स्त्रियांच्या कमिटीच्या चिटणीसाचें काम पत्करलें. पण पुढें डॉ. सुखटनकरांना लवकरच मुंबई सोडून लाहोरला जावें लागल्यानें ह्या बाईंचा मिशनशीं फारसा संबंध उरला नाहीं. ह्या कमिटीवरच्या मोठमोठ्या घराणदार बायकांनीं व्यक्तिशः मिशनची वेळोवेळीं फार काळजी घेतली आणि मोठमोठे निधि जमवून मिशनला दिले. लेडी म्यूर मॅकेंझी यानीं त्यांचे पती कांहीं दिवस ॲक्टिंग गव्हर्नर असतांना १९०९ सालीं महाबळेश्वर येथील शाखा उघडण्यास गव्हर्नरच्या बंगल्यावर सभा भरवून प्रत्यक्ष मदत केली. १९०९ सालच्या सप्टेंबर महिन्यांत पुण्याच्या शाळेच्या बक्षिस समारंभांत अध्यक्षस्थानावरून

लेडी म्यूर मॅकेंझीनें जोरदार भाषण करून श्रीमंत वर्गाचें लक्ष मिशन-कडे वळविलें. मलबार हिलवरील आपल्या बंगल्यांत आपल्या कमिटीची सभा भरवून निधि मिळविण्यास नाना प्रकारचे उपाय सुचविले. 'टाईम्स ऑफ इंडिया' कर्ते सर स्टॅनले रीड यांच्या पत्नीनीं १९०९ सालीं मिशन-मधील सर्व मुलांचा एक मेळा भरवून त्यांना खाऊ वाटला. सौ. लक्ष्मीबाई रानडे ह्या तर रात्रंदिवस मिशनचें काम करण्यांत चूर असत. सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर वरचेवर निराश्रित सदनांत समाचाराला येऊन खाऊच्या पाट्यांच्या पाट्या भरून विद्यार्थ्यांना वाटीत असत. प्रसिद्ध दादाभाई नौरोजी यांची नात मिसेस पी. कॅप्टन, (मुंबईचे असि. पोस्ट-मास्तर जनरल यांची पत्नी) ह्या प्रसिद्ध देशाभिमानी बाईनें मिसेस सुखटनकरांच्या पाठीमागें चिटणीसाचें काम पत्करलें. पुढें पुण्याची शाखा सुरू झाल्यावर तळेगांव दाभाडे येथें रात्रींची आणि दिवसाची शाळा मिशनेनें काढली. त्यांचा सर्व खर्च ह्या दंपतीनें दिला आणि पुण्याच्या शाखेला एक शिवण्याचें यंत्र व हार्मोनियन बक्षिस दिला.

ह्या सदनाच्या कार्यांतून मिशनच्या कामाच्या ज्या मुख्य मुख्य अंगाची निष्पत्ती झाली त्या सर्वांत महत्त्वाचें काम म्हणजे मुंबई शाखेचें परळ येथील वसतिगृह होय.

**विद्यार्थी वसतिगृह**

अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणासाठीं कितीहि शाळा आणि उद्योगालयें काढलीं तरी त्यांची खरी उन्नति येवढ्यानेंच होणें शक्य नाहीं. अशा शाळेंतून अस्पृश्यांचीं मुलें दिवसांतून फार तर पांच तास राहून बाकीचा सर्व काळ आपल्या घरगुती वातावरणातच आणि मागा-सलेल्या समाजस्थितींत घालवितात तोंपर्यंत त्यांच्या नैतिक जीवनाचा विकास होणार नाहीं याची जाणीव पूर्वीपासून चालकांना होती. त्याच्या-साठीं स्वच्छ ऐसपैस जागेंत ह्या कामांत तयार झालेल्या कुलगुरूंच्या वैय्य-

क्तिक नजरेखालीं दिवसांतून चोवीस तास विद्यार्थ्यांची राहाण्याची सोय व्हावी म्हणून वसतिगृहाची जरूरी होती. पण हें ध्येय सुरुवातीपासूनच कसें गांठतां यावें. नुसते दिवसाच्या शाळेंत येण्यास ज्यांची तयारी नाहीं ते आपल्या गांवाला व आईबापांना सोडून मुंबईसारख्या शहरांत कोठून राहायला येणार ! पण निराश्रित सदनाचें तीन वर्षें कार्य चालल्यानें हें ध्येय साध-ण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मिशनच्या शाळांची वाढ या तीन वर्षांत दुय्यम शाळा म्हणजे इंग्रजी ४ इयत्ता चालविण्यापर्यंत झाली. ह्या अव-धींत शाळांच्या आसपासच्या निवडक मुलांना फक्त जेवावयास घरीं दोनदां जाऊन बाकीचा वेळ सदनांतच घालविण्याची संवय करण्यांत आली. स्नानास घालणें, कपडेलत्ते, अभ्यासाचीं पुस्तकें, खेळांचीं उपकरणें आणि प्रशस्त पटांगण इत्यादि पुरवून घरापेक्षां शाळाच त्यांना अधिक प्रिय वाटेल असा हरएक प्रयत्न करण्यांत आला. शेवटीं ४ फेब्रुवारी १९०९ रोजीं रीतसर वसतिगृह उघडण्यांत येऊन पटावर ११ मुलें नमूद करण्यांत आलीं. सप्टेंबर १९०९ पासून त्यांच्या जेवण्याखाण्याची सुद्धां सोय करण्यांत आली. १९१० डिसेंबर अखेर पटावर ३६ मुलांची संख्या दाखल झाली. त्यांतून कांहीं जरी मुलें गेलीं तरी २१ मुलें कायमचीं शिल्लक उरलीं. त्यांपैकीं ३ मुली होत्या. मिशन जरी मुख्यतः अस्पृश्यां-साठीं काढलें आहे तरी पटावरील संख्येपैकीं निदान एक चतु-र्थांशाहून जास्त नाहीं इतकीं स्पृश्य वर्गीय मुलें घेण्याला मुभा ठेवली होती. ह्याचा उद्देश दुहेरी होता. स्पृश्य मुलांशीं मिळून मिसळून वागून त्यांच्याशीं अभ्यासांत चढाओढ करून त्यांच्या संवयींचें निरीक्षण करून अस्पृश्यांनीं आपला फायदा करून घ्यावा. उलटपक्षीं अस्पृश्यांविषयीं जो विनाकारण तिटकारा स्पृश्यामध्यें असतो तो निराधार आहे, हें त्यांच्याशीं प्रत्यक्ष मिसळून पाहण्याची संधी ह्या स्पृश्यांना मिळाली. केवळ मुलांशींच

वागण्यांतच नव्हे तर मोठ्या माणसांमध्यें प्रचार करतांनाहि पुढारलेल्या आणि मागासलेल्या समाजाशीं वागतांना व्यासपीठावरून बोलतांना प्रचारकांना हा दुहेरी हेतू सांभाळावा लागे. इतकेंच नव्हे तर अस्पृश्यांपेक्षां स्पृश्यांनाच शिक्षण देण्याचें काम कित्येक वेळां अधिक अवघड होत असे. वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचा दैनिक कार्यक्रम येणेंप्रमाणें—

| | |
|---|---|
| ५—० | सकाळीं उठणें. |
| ५—३० | सकाळची प्रार्थना. |
| ६—० | कांजी. |
| ६—३० | बुक-बाईंडिंगचें काम. |
| ७—३० | शालेय अभ्यास. |
| ९—० | स्नान व न्याहारी. |
| १०—० | बुक-बाईंडिंगचें काम. |
| ११ — १—० | दिवसाची शाळा. |
| १—१—३० | भोजन. |
| १—३०—५ | दिवसाची शाळा. |
| ५—६ | व्यायाम. |
| ६—० | भोजन. |
| ७—३० | शालेय अभ्यास किंवा रात्रीची शाळा. |
| १०—० | झोंपणें. |

याखेरीज रविवारीं सकाळीं नैतिक शिक्षण, तिसरे प्रहरीं विद्यार्थ्यांचें चर्चा मंडळ व सायंकाळीं साप्ताहिक उपासना होत असत. स्वयंपाका-करतां एक बाई नेमलेली असे. घरकामाकरतां एकहि नोकर नसे. आपापलीं कामें करून सामान्य कामाची वांटणी मुलेंच बिनबोभाट करीत असत. कोणत्याहि प्रकारें कोणत्याहि प्रसंगीं जातिभेद पाळला जात नसे. याबाबतींत कोणीं कधीं तक्रारहि केली नाहीं. अन्न नेहमीं शाकाहारी असे आणि तें विद्यार्थ्यांना मानवलेंहि. स्वच्छता आणि नैतिक बंधनें ह्या दृष्टीनें विद्यार्थ्यांच्या वर्तनाकडे कसोशीनें पाहण्यांत येई. पुरेशा जागेची मोठी उणीव भासत असे.

मोफत औषध देण्याचें कामहि प्रयोगादाखल १९०६ नोव्हेंबरपासून १९०८ अखेर चाललें. उद्देश हा होता कीं, औष-
**मोफत दवाखाना** धाचे द्वारें मिशनचा संबंध या लोकांशीं जडावा. नवीन औषधोपचाराची या लोकांस संवय लागावी. नोव्हेंबर १९०६ पासून डिसेंबर १९०८ अखेर पर्यंत दोन वर्षें दवाखाना खुला राहून त्यांत १२३९ रोग्यांना दाखल करण्यांत आलें व ३४४४ वेळां औषधोपचार देण्यांत आले.

| जाती | पुरुष. | स्त्रिया. | मुलें. | | एकूण. |
|---|---|---|---|---|---|
| मराठा | १६१ | ९६ | ८१ | = | ३३८ |
| महार | २२२ | ६४ | १६० | = | ४४६ |
| मोची | ४८ | २२ | ७५ | = | १४५ |
| मांग | १७ | २२ | ३ | = | ४२ |
| भंगी | ९ | १ | ६ | = | १६ |
| सुरती | २७ | २६ | ८६ | = | १३९ |
| मुसलमान | ३५ | ४१ | २१ | = | ९७ |
| ख्रिस्ती | ११ | १२ | ९ | = | ३२ |
| ज्यू | ५ | १२ | १ | = | १८ |
| एकूण | ५३५ | २९६ | ४४२ | | १२७३ |

ह्या सर्व कामाचा खर्च २३३ रु. ९ आ. ९ पै. आला त्यावरून किती काटकसरीनें काम करण्यांत येत होतें हें दिसून येतें.

वागण्यांतच नव्हे तर मोठ्या माणसांमध्यें प्रचार करतांनाहि पुढारलेल्या आणि मागासलेल्या समाजाशीं वागतांना व्यासपीठावरून बोलतांना प्रचारकांना हा दुहेरी हेतू सांभाळावा लागे. इतकेंच नव्हे तर अस्पृश्यांपेक्षां स्पृश्यांनाच शिक्षण देण्याचें काम कित्येक वेळां अधिक अवघड होत असे. वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचा दैनिक कार्यक्रम येणेंप्रमाणें—

| | | | |
|---|---|---|---|
| ५—० | सकाळीं उठणें. | १—१—३० | भोजन. |
| ५—३० | सकाळची प्रार्थना. | १—३०—५ | दिवसाची शाळा. |
| ६—० | कांजी. | ५—६ | व्यायाम. |
| ६—३० | बुक-बाईंडिंगचें काम. | ६—० | भोजन. |
| ७—३० | शालेय अभ्यास. | ७—३० | शालेय अभ्यास किंवा रात्रीची शाळा. |
| ९—० | स्नान व न्याहारी. | | |
| १०—० | बुक-बाईंडिंगचें काम. | | |
| ११ — १—० | दिवसाची शाळा. | १०—० | झोंपणें. |

याखेरीज रविवारीं सकाळीं नैतिक शिक्षण, तिसरे प्रहरीं विद्यार्थ्यांचें चर्चा मंडळ व सायंकाळीं साप्ताहिक उपासना होत असत. स्वयंपाका-करतां एक बाई नेमलेली असे. घरकामाकरतां एकहि नोकर नसे. आपा-पलीं कामें करून सामान्य कामाची वांटणी मुलेंच बिनबोभाट करीत असत. कोणत्याहि प्रकारें कोणत्याहि प्रसंगीं जातिभेद पाळला जात नसे. याबाबतींत कोणीं कधीं तक्रारहि केली नाहीं. अन्न नेहमीं शाकाहारी असे आणि तें विद्यार्थ्यांना मानवलेंहि. स्वच्छता आणि नैतिक बंधनें ह्या दृष्टीनें विद्यार्थ्यांच्या वर्तनाकडे कसोशीनें पाहण्यांत येई. पुरेशा जागेची मोठी उणीव भासत असे.

मोफत औषध देण्याचें कामहि प्रयोगादाखल १९०६ नोव्हेंबरपासून १९०८ अखेर चाललें. उद्देश हा होता कीं, औष-

**मोफत दवाखाना** धाचे द्वारें मिशनचा संबंध या लोकांशीं जडावा. नवीन औषधोपचाराची या लोकांस संवय लागावी.

नोव्हेंबर १९०६ पासून डिसेंबर १९०८ अखेर पर्यंत दोन वर्षे दवाखाना खुला राहून त्यांत १२३९ रोग्यांना दाखल करण्यांत आलें व ३४४४ वेळां औषधोपचार देण्यांत आले.

| जाती | पुरुष. | स्त्रिया. | मुलें. | | एकूण. |
|---|---|---|---|---|---|
| मराठा | १६१ | ९६ | ८१ | = | ३३८ |
| महार | २२२ | ६४ | १६० | = | ४४६ |
| मोची | ४८ | २२ | ७५ | = | १४५ |
| मांग | १७ | २२ | ३ | = | ४२ |
| भंगी | ९ | १ | ६ | = | १६ |
| सुरती | २७ | २६ | ८६ | = | १३९ |
| मुसलमान | ३५ | ४१ | २१ | = | ९७ |
| ख्रिस्ती | ११ | १२ | ९ | = | ३२ |
| ज्यू | ५ | १२ | १ | = | १८ |
| एकूण | ५३५ | २९६ | ४४२ | | १२७३ |

ह्या सर्व कामाचा खर्च २३३ रु. ९ आ. ९ पै. आला त्यावरून किती काटकसरीनें काम करण्यांत येत होतें हें दिसून येतें.

राहतां राहिलेलें महत्त्वाचें काम म्हणजे शाळाखात्यान्वयें शिक्षणाचें काम. यासाठीं शाळाखातें पसंत करील अशा तज्ज्ञाची मोठी जरुरी होती. निराश्रित सेवासदनाचें हें चाललेलें काम पाहून आणि त्यासाठीं मिळालेल्या स्वार्थत्यागी माणसांची तयारी पाहून रा. वामनराव सोहोनी या प्रार्थना समाजाच्या सभासदाला आपल्याला वाहून घेऊन काम करण्याची प्रेरणा झाली. ते ह्या कामाला सर्वतोपरी पात्र होते. सदनांतील प्रचारक मंडळी सदनांतील कामें करूनच तयार झाली. रा. सोहोनी अगोदर बाहेर तयार होऊनच मिशनला १९०८ सालच्या आरंभीं येऊन मिळाले. ते आल्याबरोबर मिशनच्या परळ येथील शाळेचा दर्जा प्राथमिक शाळेंतून दुय्यम शाळांत वाढला. रा. सोहोनींचें काम मागें सांगितलेल्या दोन पद्धतींपैकीं सुवर्णकार पद्धतीचें ( intensive ) होतें. शाळाखात्याचे सर्व नियम सांभाळून त्यांनीं फार चोखपणें हें काम केलें.

**शाळाखातें**

शाळाखात्याच्या इन्स्पेक्टरकडूनच नव्हे तर सर जमशेटजी जीजीभाई, बॅ. एच्. डी. वाडीया, मि. सुरेंद्रनाथ टागोर, मि. एफ्. अंडरसन, मि. व मिसेस सेंट निहालसिंग अशा प्रसिद्ध व्यक्तींकडून त्यांनीं उत्तम शेरे मिळविले.

ही शाळा ठाणें जिल्ह्यांतील चेंबूर येथें उघडण्यांत आली. ह्या शाळेचे कामीं रा. अमृतलाल ठक्कर, मुंबई कार्पोरेशनमधील इंजिनियर, यांचे अविश्रांत श्रम फार उपयोगी पडले. ( १ ) मदनपुरा--दिवसाची शाळा-पटावरील संख्या १२२ पैकीं ९७ मुलें आणि २५ मुली. ( २ ) कामाठीपुरा--भंगी लोकांसाठीं दिवसाची शाळा-ही एका गुजराथी गृहस्थाच्या उदार आश्रयानें चालू होती. हिला प्रथम जागाच मिळेनाशी झाली. भंगी लोकांचा तिरस्कार इतर अस्पृश्यांनाहि वाटत असे. शिक्षक मिळण्याची मारामार पडूं लागली. त्यामुळें शाळा बंद पडते कीं काय असें वाटूं लागलें.

शेवटीं बडोद्यास तयार झालेले एक धेड जातीचे गृहस्थ मिळाले. पटावरील संख्या ७६ होती. रोजची हजेरी ६६ होती. मराठी ४ थ्या इयत्तेपर्यंत शिक्षण दिलें जाई.

---

# प्रकरण १४ वें

## मिशनची घटना

येणेंप्रमाणें मुंबई येथील मध्यवर्ती संस्थांचीं कामें होऊं लागून एका नमुनेदार मातृसंस्थेची उभारणी झाली. यापुढें या संस्थेच्या प्रत्यक्ष शासनाखालीं प्रांतिक मुख्य शाखांची घटना करावयाला जनरल सेक्रेटरी लागले. ह्या मिशनच्या शाखांचे तीन प्रकार ठरले होते. पहिला प्रकार अंगभूत शाखांचा. ह्या शाखा मिशनची जी मध्यवर्ती कार्यवाहक कमिटी होती तिच्या प्रत्यक्ष अंमलाखालीं चालावयाच्या होत्या. जमाखर्चाची सर्व जबाबदारी आणि इतर कारभार मध्यवर्ती कमिटीच्या संमतीनें चालवावयाचा होता. प्रांतिक शाखांचे मुख्य चालक आणि त्यांचा मदतनीस कमिटीचे सभासद हे मध्यवर्ती कमिटीच्या संमतीनें नेमले जात. हा चालक स्वतःला वाहून घेऊन काम करणारा असल्यास त्याच्या पगाराची जबाबदारी ह्या मुख्य चालकांवर आणि त्याच्या कमिटीवर असे. वर्षअखेर जमाखर्चाचा खर्डा स्थानिक ऑडिटरनें मंजूर केल्यावर तो खर्डा आणि वार्षिक अहवाल मध्यवर्ती कमिटीच्या पसंतीला मुंबईस पाठविण्यांत येई. वेळो-

वेळीं या शाखांची आणि त्यांच्या आश्रयाखालीं चाललेल्या इतर संस्थांची तपासणी जनरल सेक्रेटरीकडून होत असे. ह्या शाखांची वर्षाअखेर जी शिल्लक राही त्यांपैकीं जास्तींत जास्त १००० रु. बाकी ठेवून मध्यवर्ती कामिटीच्या द्वारें मातृसंस्थाकडे येत असे. याशिवाय विशिष्ट हेतूनें दिलेले कायमचे निधि असतील तर ट्रस्टफंड या नात्यानें वरील ट्रस्टीकडे येत.

दुसरा प्रकार संलग्न शाखांचा. ह्या शाखांची जमाखर्चाची आणि कामाची जबाबदारी प्रत्यक्षपणें मध्यवर्ती कामिटीकडे नसे. मात्र कामाचें धोरण मिशनच्या हेतूला धरून चाललें आहे कीं नाही हें जनरल सेक्रेटरी वेळोवेळीं तपासून पहात. मिशनच्या वार्षिक सर्वसाधारण अहवालांत सामील करण्यासाठीं अशा शाखांचा जमाखर्चाचा तक्ता आणि कामाचा अहवाल जनरल सेक्रेटरीच्या ऑफिसांत वेळेवर येत असे.

तिसरा प्रकार सहकारी शाखांचा. ह्या बहुतेक स्वतंत्रपणें चालत. धोरण आणि परस्पर सहानुभूति असली कीं अशा शाखा मिशन मान्य करीत असे.

मातृसंस्थेचे आद्य ट्रस्टी—नामदार गोकुळदास कहानदास पारेख, बी.ए., एल्एल्.बी. (२) शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला (३) श्री. विठ्ठल रामजी शिंदे, बी. ए. ता. १ जानेवारीपासून ३१ डिसेंबरपर्यंत मिशनचें दप्तरी वर्ष ठरलेलें असे.

**पुणें शाखा**

१९०८ सालच्या एप्रिलमध्यें पुणें येथील कांहीं अस्पृश्य पुढाऱ्यांच्या कळकळीच्या विनंतीवरून मिशनचे जनरल सेक्रेटरी या नात्यानें मीं पुण्यास भेट दिली. मिशनची पहिली अंगभूत शाखा पुण्यांत असावी असा माझा विचार ठरला. पुढें दोन महिन्यांनीं मीं माझे मदतनीस

रा. सय्यद अबदुल कादर यांस पुण्यास पाठविले. त्यांनीं २२ जून १९०८ रोजीं पुणें, सेंटर स्ट्रीट, लष्कर येथील एका घरांत या शाखेची पहिली दिवसाची शाळा उघडली. पैशाची व्यवस्था तात्पुरतीच होती. शाळेचें सामान कांहींच नव्हतें. अस्पृश्यवर्गीय एका पुढाऱ्याकडून टेबल व खुर्ची तात्पुरती मिळाली होती. पुढील सर्व व्यवस्था करण्याचें काम रा० ए. के. मुदलियार यांचेवर सोपवून रा. सय्यद मुंबईस परत गेले. वर्तमानपत्रांतून जाहिराती वगैरे देऊन पाहिल्या. महिन्यांत ५७७ रु. जमविण्यांत आले. बॅ. एच्. ए. वाडीया या उदार गृहस्थानें १०० रु. ची पहिली देणगी दिली. नंतर मि. डब्ल्यू. टी. मॉरिसन, आय. सी. एस., मध्यभाग कमिशनर व डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर वुडहाऊस यांनीं प्रत्येकीं ३० रु. देऊन सुरुवातीच्या अडचणी भागविल्या. पण शिकविण्यास शिक्षक कोणी मिळेना म्हणून मातृसंस्थेंतून मुंबईहून श्री. ए. व्ही. गुर्जर या नांवाच्या गृहस्थास पाठवावें लागलें. खर्चाची रात्रंदिवस तळमळ लागली असतां मुंबईचे त्यावेळचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांजकडे पुणें शाखेचे चिटणीस रा. मुदलियार यांनीं एक विनंतिपत्रक पाठविण्याचें धाडस केलें. मिशनचे चालक कोण आहेत आणि त्यांचें कार्य कसें चालू आहे याची योग्य ती चौकशी केल्यावर गव्हर्नरसाहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडून रा. मुदलियार यांस ता. १८-८-१९०८ रोजीं पुढील उत्तर आलें— " आपल्या गेल्या महिन्याच्या १९ व्या तारखेच्या पत्रास नामदार गव्हर्नरसाहेबांच्या आज्ञेनें कळविण्यांत येतें कीं, आपलें मिशन मदतीला लायक आहे आणि तें यशस्वी होवो अशी गव्हर्नरसाहेबांची इच्छा आहे. मदतीसंबंधानें आपणांस कळविण्यांत येतें कीं, गव्हर्नरसाहेबांनीं आपली कन्या मिस् व्हायोलेट क्लार्क यांना पुढील महिन्यांत एक जाहीर गायनाचा जलसा करण्याची परवानगी दिली आहे. जलशाच्या उत्पन्नांतून बरीचशी शिल्लक उरेल अशी आशा आहे. "

हा प्रसिद्ध गायनवादनाचा जलसा पुणें येथें सप्टेंबर महिन्यांत करण्यांत आला. प्रत्यक्ष गव्हर्नरसाहेबांचा आणि पुणें येथील सैन्य विभागाचे कमांडर मेजर जनरल आल्डरसन यांचा आश्रय होता म्हणून या इलाख्यांतील बरेच

**मदतीसाठीं जलसा**

राजेरजवाड्यांनीं आणि शेठ सावकारांनीं मोठ्या रिक्त हस्तें उदार आश्रय दिला. सर्व खर्च वजा जातां ३,४६७ रु. १३ आणे ६ पै ही शिल्लक ह्या मिशनला मिळाली. ती मातृसंस्थेच्या अध्यक्षांकडे मुंबईस पाठविण्यांत आली. केवळ पैशाच्या दृष्टीनेंच नव्हे तर राजेरजवाडे आणि प्रसिद्ध पुढारी गृहस्थांच्या नजरेला ह्या मिशनचें कार्य आल्यामुळें ह्या प्रसंगाचें महत्त्व दिसून येण्यासारखें आहे. हें खालील आंकड्यावरून कळून येईल.

या जलशाच्या कांहीं देणगीदारांचीं नांवें—

| | |
|---|---|
| श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड | रु. ५०० |
| श्रीमंत सर शाहू छत्रपति महाराज | २०० |
| आमोदचे ठाकूरसाहेब | १०० |
| साचीनचे नबाबसाहेब | १०१ |
| नामदार आगाखान | ५०० |
| भोरचे अधिपति | २०० |
| केरवाडचे ठाकूरसाहेब | १०० |
| इचलकरंजीचे अधिपति | २५ |
| धरमपूरचे अधिपति | १० |

यानंतरहि श्रीमंत लोकांकडून कांहीं देणग्या येऊं लागल्या. त्यांत सर जेकब ससून यांजकडून रुपये ५०० आणि मुधोळच्या अधिपतींकडून रु. १०० आले. १९१८ अखेर ह्या शाखेच्या खालील संस्था होत्या. (१) पुणें, लष्कर, दिवसाची शाळा, (२) पुणें, लष्कर, रात्रीची शाळा (३) पुणें, लष्कर, वाचनालय. (४) गंजपेठ, रात्रीची शाळा (५) मंगळवार पेठ, रात्रीची

शाळा. शेवटची शाळा माझे हस्तें १९०५ सालीं उघडून पुणें प्रार्थना समाजाकडे नंतर चालविण्यास दिली होती. ती आतां मंगळवार पेठेंत नेऊन मिशनच्या कार्यांत सामील करून घेण्यांत आली.

शिक्षणाखेरीज इतर कामें झालीं त्यांत शिमग्यांतील ओंगळ प्रकार बंद व्हावेत म्हणून ठिकठिकाणीं जाहीर सभा करून प्रयत्न करण्यांत आले. त्यांत प्रसिद्ध समाजसेवक श्री. गोपाळ कृष्ण देवधर ह्यांनीं प्रमुख भाग घेतला. ह्या प्रकाराविरुद्ध प्रचारार्थ कांहीं गाणीं श्री. मुदलियार यांची कन्या कु. ठकूताई हिनें केलीं होतीं.

**पहिला बक्षिस समारंभ**

२६ सप्टेंबर १९०९ रोजीं श्रीमंत सर सयाजीराव महाराज यांच्या हस्तें आणि अध्यक्षतेखालीं हा समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. इडारचे अधिपति श्रीमंत प्रतापसिंग, लेडी म्यूर मॅकेंझी, भोरचे अधिपति रावसाहेब, नामदार गोखले, डॉ. भांडारकर, सरदार नौरोजी पदमजी वगैरे थोर मंडळी प्रमुख स्थानीं बसली होती. इस्लामिया स्कूल हॉलमध्यें चिक्कार गर्दी भरली होती. कमिटीचे अध्यक्ष डॉ. मॅन यांनीं पाहुण्यांचें स्वागत केलें. ह्यावेळीं एक वादग्रस्त प्रश्न उद्भवला. महार जातीचे पुढारी शिवराम जानबा कांबळे यांचे नेतृत्वाखालीं एक मानपत्र महाराजांना देण्याचा विचार ठरला. पण हें मानपत्र महार जातीकडूनच दिलें जावें असा त्यांचा आग्रह पडला. इतर अस्पृश्य जातींनाहि त्यांत भाग घ्यावासा वाटला. हा वाद लवकर मिटेना आणि समारंभाचा तर दिवस जवळ आला म्हणून मुंबईहून मला बोलाविण्यांत आलें. सर्व वर्गांच्या पुढाऱ्यांना बोलावून त्यांना मीं सांगितलें कीं, मिशनचें रजिस्टर्ड ट्रस्ट डीड आहे; त्याबरहुकूम मिशनला अशा प्रकारचें जातिविशिष्ट काम करण्याचा

अधिकार नाहीं. मिशनचे कार्यामध्यें जीं वरिष्ठवर्गीय माणसें आहेत तीं सर्व जातींचीं व धर्मांचीं आहेत. पण त्यांनाहि सार्वत्रिक उदार-धर्माच्या पायावरच मिशनचें कार्य करावें लागत आहे. स्वतः महाराज सरकारांनाही जातिविशिष्ट मानपत्र रुचणार नाहीं. ह्या उपर महार लोकांचा आग्रहच असेल तर आणि महाराज असें मानपत्र स्वीकारीत असतील तर ह्या मंडपाचे बाहेर अन्य ठिकाणीं व अन्य वेळीं कुणीहि मानपत्र द्यावें. येथेंच आणि आतांच द्यावयाचें असेल तर सर्व अस्पृश्यवर्गानें एकत्र होऊन द्यावें. त्यांनीं हा एकत्रपणा दाखविला नाहीं तर त्यांच्यासाठीं काम करण्यामध्यें वरिष्ठ वर्गालाहि विघ्नें येऊं लागतील. सर्वांची समजूत पटून मिळून मिसळून मानपत्र समारंभ झाला. ह्यानंतर सेक्रेटरी मुदलियार यांनीं अहवाल वाचला. लेडी म्यूर मॅकेंझी यांचें सुंदर व जोरदार भाषण झालें. शेवटीं महाराजांनीं यथोचित भाषण करून १००० रु. ची देणगी दिली. तो कायम निधि समजून दमाजीराव गायकवाड स्कॉलरशिप या नांवानें होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याचें ठरलें. श्रीमंत सयाजीराव महाराजांना ह्या प्रसंगीं मानपत्र देण्यांत आल्यावर महार, मांग व चांभार जातींच्या तीन स्त्रियांनीं महाराजांना आरती ओवाळली. तेव्हा महाराजांनीं प्रत्येक आरतींत एक सोन्याची गिनी टाकली.

**पुण्याचा पाठिंबा**

ता. १८ ऑक्टोबर १९०९ रोजीं हा डिप्रेस्ड् क्लास मिशन डे साजरा करण्यासाठीं पुणें शहरीं किर्लोस्कर थिएटरांत एक प्रचंड जाहीर सभा भरविण्यांत आली. पुणें शहरांत अशा प्रकारची ही पहिलीच सभा होती. मिशनला चोहींकडून मदत जरी मिळाली तरी पुण्यासारख्या जुन्या वळणाच्या शहराची मदत अद्याप मिळावयाचीच होती; म्हणून हा समारंभ घडवून आणला. प्रि. र. पु. परांजपे ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. महारांचे पुढारी श्रीपत-

राव थोरात, सुप्रसिद्ध वकील ल. ब. भोपटकर, मुसलमानांचे पुढारी इस्माइल बहादूर, हंपी येथील शंकराचार्यांचे एजंट रा. हरकारे, रा. न. चिं. केळकर, प्रो. धर्मानंद कोसांबी वगैरेंनीं जोरदार भाषणें केलीं. अध्यक्षांचे आभार मानतांना प्रो. धोंडो केशव कर्वे वगैरेंनीं आपली १०० रु.ची देणगी जाहीर केली. रा. हरकारे यांनीं आपल्या भाषणाचे शेवटीं हंपीचे शंकराचार्योचें प्रत्यक्ष सहानुभूतीचें द्योतक म्हणून त्यांचे आज्ञेनुसार ३०० रु. ची देणगी दिली. ह्या सभेमुळें ह्या इतिहासप्रसिद्ध शहराचें हृदयकपाट उघडलें.

**मुरळी--प्रतिबंधक सभा**

२५ एप्रिल १९१० रोजीं जेजुरीच्या यात्रेत मुरळी-प्रतिबंधक जाहीर सभा पुणें शाखेकडून भरविण्यांत आली. खडकीचे लक्ष्मणराव सत्तूर, मुंबईहून मी स्वतः व एस. के. नाईक ह्या सभेस मुद्दाम हजर होते. मुरळी सोडण्याची दुष्ट चाल महाराष्ट्रांत प्रसिद्धच आहे. मुरळी सोडण्याचा धार्मिक विधि आणि तिचा प्रसार ह्या खंडोबाचे देवळांतूनच होतो. ही चाल बंद पाडण्यांत यावी असा ह्या सभेचा हेतू होता; पण अस्पृश्यवर्गीय जनतेला मान्य होण्यासारखा तो काळ नव्हता. कित्येक लोक दारूनें झिंगून सभेला विरोध करूं लागले. सभा चालविणें अशक्य झालें. मिशनमधील भजन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून गाणीं म्हणविण्यांत आलीं तेव्हां सभेला नवीन रंग येऊन ती यशस्वी रीतीनें पार पडली. पुढें जी मुरळी-प्रतिबंधक चळवळ मोठ्या प्रमाणावर झाली तिचें मूळ ह्या सभेंत आहे.

**मेघवृष्टीनें प्रचार**

येथपर्यंत अंगभूत शाखांतील केंद्रीभूत कार्याचें वर्णन केलें. आतां मेघवृष्टीनें सर्व देशभर जें कार्य झालें त्याचें कथन करतों. हीं दोन भिन्न कार्यें समांतर आणि सारखीं चालू ठेवणें अवश्य असतें. १९१० सालीं

या कार्यांत मुंबई सोशल रिफॉर्म असोसिएशनचें सहकार्य लाभलें. मिशनच्या संस्थापनेचा दिवस ता. १८ ऑक्टोबर १९०६ हा होता. ह्याचें स्मरण सर्व देशभर व्हावें म्हणून हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांतून ठिकठिकाणीं जाहीर मोठमोठ्या विभूतींच्या अध्यक्षतेखालीं सभा भरविण्यांत आल्या. त्याचा परिणाम फार मोठा झाला. अस्पृश्यांत जागृत झाली; त्यांच्यांत ऐक्य वाढीस लागलें. स्पृश्य लोकांत कळकळीचा प्रादुर्भाव होऊन तो जोमास लागला. अनेक देणग्या मिळाल्या. देशामध्यें चोंहिकडे मिशनच्या कामाबद्दल हार्दिक सहानुभूति भरपूर मिळत आहे हें सिद्ध झालें. पुढच्या वर्षी पुन्हा एकवार चोंहिकडे जाऊन वरील सहानुभूतीचा व्यावहारिक फायदा घ्यावा म्हणून मीं प्रतिनिधि या नात्यानें निरनिराळे चार दौरे काढले. त्यावेळीं बरोबर माझी बहीण जनाबाई, सन्माननीय कार्यकर्ते अमृतलाल ठक्कर आणि मदतनीस अबदुल कादर हेहि होते. वऱ्हाड, काठेवाड, कर्नाटक प्रांत, पश्चिम किनारा या ठिकाणीं अनेक व्याख्यानें दिलीं. निरनिराळ्या संस्थांना भेटी दिल्या. स्थानिक कार्याचा परिचय करून घेतला आणि देणग्या व वर्गणीहि जमा केली. जुन्या संस्थांना उपयुक्त सूचना दिल्या आणि नव्या संस्था निर्माण केल्या.

**वसतिगृहाची स्थापना**

या दौऱ्याशिवाय भगिनी जनाबाई ह्या ३ नोव्हेंबर १९१२ रोजीं वऱ्हाडांत हिंडून तेथील परिस्थिति पाहून फंड जमविण्यासाठीं दौऱ्यावर निघाल्या. अमरावती, यवतमाळ, यूगांव, रामसौर, खामगांव, मलकापूर, धुळें वगैरे ठिकाणीं फंड जमवून त्या मुंबईस परत आल्या. खर्च वजा जाऊन त्यांनीं सुमारें ६०० रु. फंड जमविला होता. त्यानंतर मी स्वतः पुन्हां अमरावती, यवतमाळ येथें जाऊन व्याख्यानें देऊन यवतमाळ येथें एक अस्पृश्य वसतिगृह काढण्याची तयारी करून

आलें. यवतमाळचे रा.ब.मुंडले वकील, जमीनदार लांडगे, जिनिंग फॅक्टरीचे मालक द्रवीड यांचे सहाय्यानें तेथें एक वसतिगृह स्थापण्यांत आलें. याची व्यवस्था भगिनी जनाबाई यांच्याकडे सोंपवून त्यांना तिकडे पाठविण्यांत आलें. कोल्हापूरचे रा. जी. के. कदम, वकील यांनाहि त्यांच्या मदतीला देण्यांत आले होते.

**चंदावरकर यांचा दौरा**

१९१४ च्या डिसेंबरपासून १९१५ च्या एप्रिल अखेर निराश्रित साह्य-कारी मंडळीचे अध्यक्ष सर नारायण चंदावरकर यांनीं दक्षिण हिंदुस्थानांतील अस्पृश्यांची कठिण स्थिति शहरांतून आणि खेड्यांतून फिरून स्वतः नजरेनें पाहण्यासाठीं, व्याख्यानें आणि मुलाखतींचे द्वारा सदर मंडळीचे कार्यांत हातभार लावण्यासाठीं विस्तृत दौरा काढला. मद्रासच्या डी. सी. एम.च्या शाखेनें अखिल भारतीय मिशनच्या वतीनें डिसेंबरमध्यें १९१४ सालीं अँडरसन हॉलमध्यें एक परिषद भरविली. तिचें अध्यक्षस्थान चंदावरकरांनीं पतकरलें. पुढें त्याच महिन्यांत मद्रासचे गव्हर्नरांचे अध्यक्षतेखालीं एक मोठी जाहीर सभा भरविण्यांत आली. त्यावेळीं सर नारायण चंदावरकरांनीं भाषण करून मिशनच्या मुंबईकडील कार्यासंबंधीं माहिती कळविली. गव्हर्नरसाहेबांनीं मिशनच्या कार्याचा गौरव करून मदतीचें आश्वासन दिलें. त्यानंतर सर नारायणराव यांनीं कोईमतूर, पालघाट, तेलीचेरी इत्यादि ठिकाणीं हिंडून, गोरगरिबांत मिसळून बारकाईनें त्यांची स्थिति निरखिली. आणि परत आल्यावर आपल्या निरीक्षणासंबंधींचीं पत्रें 'टाइम्स ऑफ इंडिया' व 'सोशल रिफॉर्मर'मध्यें प्रसिद्ध केलीं. मंगळूरचे के. रंगराव, पालघाटचे श्री. शेषय्या आणि वल्लभराजा, कालिकतचे मि. रामप्पी, मि. मोमन, मि. मंजेरी रामय्या, तेलीचेरीचे मि. केळू वगैरे कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांना उत्तेजन दिलें. ही सर्व उत्साही

मंडळी जरी थोडी असली तरी त्यांच्या कार्याचें महत्त्व फार होतें. ह्या दौऱ्याचा परिणाम दक्षिणेंतील कार्यावर फार मोठा झाला.

**वेड्याचें इस्पितळ**

अस्पृश्यांनीं ठराविक रस्त्यावरून चालावयाचें नाहीं, व इतर रस्त्यावरून चालतांना आपल्या जातीचा पुकारा करीत चालावयाचें, हा प्रकार मलबारखेरीजइतर कोणत्याही प्रांतांत नाहीं. मलबारांत जातीजातीच्या सूक्ष्म भेदाचें अवडंबर फार असून कडक नियम पाळण्यांत येतात. हें पाहून स्वामी विवेकानंदांनीं मलबार हें एक वेड्याचें इस्पितळ आहे असें म्हटलें आहे. अस्पृश्यांस भीक मागण्याची परवानगी नाहीं, प्रामाणिकपणें काम करण्याचीहि मुभा नाहीं. याबद्दल सर नारायणरावांनीं कडक टीका करून त्यांना उद्योग करण्याची तरी परवानगी देण्यांत यावी अशी करुणा भाकली. मलबारांत नायादी म्हणून नीचतम मानलेली एक जात आहे. त्यांच्याशीं सर नारायणरावांनीं भाषण केलें. त्यांच्या भाषणांत पुष्कळ संस्कृत शब्द आलेले पाहून सर नारायणरावांना फार आश्चर्य वाटलें. नीचांतला नीच, अक्षरशत्रू, चांभारापासूनहीं शंभर यार्ड दूर रहावें हा त्याचा अधिकार. आपली अस्पृश्यता पुकारीत भीत भीत जो गांवांत येतो, त्याच्या तोंडीं इतके संस्कृत शब्द, त्यांचीं नांवें उच्चवर्णीयांसारखीं हें कसें, ह्याचें सर नारायणराव ह्यांस फार आश्चर्य वाटलें. चौकशीअंतीं त्यांस असें कळून आलें कीं, नायादी लोकांचें मूळ नंबुद्री ब्राह्मणापर्यंत पोचलें ! नंबुद्री ब्राह्मण कुटुंबांचे हातून कांहीं प्रमाद घडले म्हणून त्यांस बहिष्कृत करण्यांत आलें. त्यांचें पतन होत होत त्यांस आज नायादी जातीची स्थिति प्राप्त झाली. सर नारायणराव ह्यांनीं मलबारांत केलेला प्रवास अस्पृश्योद्धाराचे बाबतींत बराच जागृतीस कारण झाला.

---

# प्रकरण १५ वें

## निधि योजना

**निधीची टंचाई**

मिशनच्या सुरुवातीस निराश्रित सेवासदन चालू करण्यासाठीं दरमहा १०० रु. ची देणगी दयाराम गिडुमल यांनीं दिली हें मागें सांगितलेंच आहे. ही देणगी ३ वर्षांसाठींच होती. ह्या तीन वर्षांत मिशनची बरीच वाढ झाली. पण १९१० जून अखेर ही देणगी बंद झाली. काम वाढलें पण मदत नाहीं, अशी पंचाईत पडली. निराश्रित सेवासदन बंद पडल्यामुळें त्यांतील कार्यकर्त्यांची इतर कामाकडे वांटणी करण्यांत आली. श्रीमती वेणूबाईस पुण्याच्या शाखेंत पाठविलें. भगिनी जनाबाईस प्रचारकार्यासाठीं बरोबर नेण्यांत आलें. भगिनी तान्याबाईस परळच्या शाळेंत शिक्षकीण म्हणून ठेवण्यांत आलें. सय्यद अबदुल कादर यांस बाहेरच्या शाखांची पूर्वतयारी करण्यास पाठविण्यांत आलें. पण ह्या सर्व कामास निधीची फार जरूर लागली.

पुण्यास ना. गव्हर्नर सर जार्ज क्लार्क ह्यांच्या कन्येनें जलसा करून जी शिल्लक उरली त्यांत थोड्या रकमेची भर घालून २००० रु.ची रक्कम मुंबईतील ट्रस्टीकडे पाठविण्यांत आली. पण ती कायम निधि म्हणून राखून ठेवण्यांत आल्यानें चालू खर्चास त्याचा उपयोग करतां येईना.

**गोड कैद**

ता. १८ आक्टोबर १९०९ रोजीं मिशनचा संस्थापनेचा दिवस साजरा करण्यासाठीं मुंबईच्या टाऊन हॉलमध्यें एक अपूर्व जाहीर सभा भरविण्यांत आली. तिचें अध्यक्षस्थान श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं

मंडळी जरी थोडी असली तरी त्यांच्या कार्याचें महत्त्व फार होतें. ह्या दौऱ्याचा परिणाम दक्षिणेंतील कार्यावर फार मोठा झाला.

**वेड्याचें इस्पितळ**

अस्पृश्यांनीं ठराविक रस्त्यावरून चालावयाचें नाहीं, व इतर रस्त्यावरून चालतांना आपल्या जातीचा पुकारा करीत चालावयाचें, हा प्रकार मलबारखेरीजइतर कोणत्याहीं प्रांतांत नाहीं. मलबारांत जातीजातींच्या सूक्ष्म भेदाचें अवडंबर फार असून कडक नियम पाळण्यांत येतात. हें पाहून स्वामी विवेकानंदांनीं मलबार हें एक वेड्याचें इस्पितळ आहे असें म्हटलें आहे. अस्पृश्यांस भीक मागण्याची परवानगी नाहीं, प्रामाणिकपणें काम करण्याचीहि मुभा नाहीं. याबद्दल सर नारायणरावांनीं कडक टीका करून त्यांना उद्योग करण्याची तरी परवानगी देण्यांत यावी अशी करुणा भाकली. मलबारांत नायादी म्हणून नीचतम मानलेली एक जात आहे. त्यांच्याशीं सर नारायणरावांनीं भाषण केलें. त्यांच्या भाषणांत पुष्कळ संस्कृत शब्द आलेले पाहून सर नारायणरावांना फार आश्चर्य वाटलें. नीचांतला नीच, अक्षरशत्रू, चांभारापासूनही शंभर यार्ड दूर रहावें हा त्याचा अधिकार. आपली अस्पृश्यता पुकारीत भीत भीत जो गांवांत येतो, त्याच्या तोंडीं इतके संस्कृत शब्द, त्यांचीं नांवें उच्चवर्णीयांसारखीं हें कसें, ह्याचें सर नारायणराव ह्यांस फार आश्चर्य वाटलें. चौकशीअंतीं त्यांस असें कळून आलें कीं, नायादी लोकांचें मूळ नंबुद्री ब्राह्मणापर्यंत पोचलें ! नंबुद्री ब्राह्मण कुटुंबांचे हातून कांहीं प्रमाद घडले म्हणून त्यांस बहिष्कृत करण्यांत आलें. त्यांचें पतन होत होत त्यांस आज नायादी जातीची स्थिति प्राप्त झाली. सर नारायणराव ह्यांनीं मलबारांत केलेला प्रवास अस्पृश्योद्धाराचे बाबतींत बराच जागृतीस कारण झाला.

# प्रकरण १५ वें

## निधि योजना

**निधीची टंचाई**

मिशनच्या सुरुवातीस निराश्रित सेवासदन चालू करण्यासाठीं दरमहा १०० रु. ची देणगी दयाराम गिडुमल यांनीं दिली हें मागें सांगितलेंच आहे. ही देणगी ३ वर्षांसाठींच होती. ह्या तीन वर्षांत मिशनची बरीच वाढ झाली. पण १९१० जून अखेर ही देणगी बंद झाली. काम वाढलें पण मदत नाहीं, अशी पंचाईत पडली. निराश्रित सेवासदन बंद पडल्यामुळें त्यांतील कार्यकर्त्यांची इतर कामाकडे वांटणी करण्यांत आली. श्रीमती वेणूबाईस पुण्याच्या शाखेंत पाठविलें. भगिनी जनाबाईस प्रचार-कार्यासाठीं बरोबर नेण्यांत आलें. भगिनी तान्याबाईस परळच्या शाळेंत शिक्षकीण म्हणून ठेवण्यांत आलें. सय्यद अबदुल कादर यांस बाहेरच्या शाखांची पूर्वतयारी करण्यास पाठविण्यांत आलें. पण ह्या सर्व कामास निधीची फार जरूर लागली.

पुण्यास ना. गव्हर्नर सर जार्ज क्लार्क ह्यांच्या कन्येनें जलसा करून जी शिल्लक उरली त्यांत थोड्या रकमेची भर घालून ५००० रु.ची रक्कम मुंबईतील ट्रस्टीकडे पाठविण्यांत आली. पण तो कायम निधि म्हणून राखून ठेवण्यांत आल्यानें चालू खर्चास त्याचा उपयोग करतां येईना.

**गोड कैद**

ता. १८ आक्टोबर १९०९ रोजीं मिशनचा संस्थापनेचा दिवस साजरा करण्यासाठीं मुंबईच्या टाऊन हॉलमध्यें एक अपूर्व जाहीर सभा भरविण्यांत आली. तिचें अध्यक्षस्थान श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं

मंडीत केलें. महाराजांनीं आपलें अध्यक्षीय भाषण संपवून आपली १००० रु. ची देणगी दमाजीराव गायकवाड शिष्यवृत्ति या नांवानें देऊं केली. मिशनचे उपाध्यक्ष शेठ दामोदरदास सुखडवाला ह्यांनी ५००० रु. ची देणगी दिली. मिशनच्या घटनेच्या नियमाप्रमाणें त्यांना आश्रयदाते करण्यांत आलें. ह्याप्रमाणें ह्या मोठ्या रकमा कायम निधीकडे गेल्यामुळें चालू खर्चाची हळहळ उरलीच. समारंभास महिला समाजाच्या सभासद व इतर प्रतिष्ठित स्त्रिया हजर होत्या. त्यांपैकीं कांहीं चालू संधीचा फायदा घेऊन, निधि जमविण्यास पुढें आल्या. टाऊन हॉलचे पुढचे तीन दरवाजे त्यांनीं रोखले. एकेका दरवाज्यांत दोघां दोघां भगिनींनीं आपली शाल पसरून ह्या प्रचंड समुदायांतील बाहेर जाणाऱ्या प्रत्येकास कांहींतरी देणगी टाकण्यास आग्रह करूं लागल्या. या बाबतींत सौ. लक्ष्मीबाई रानडे ह्यांनीं पुढाकार घेतला होता. सारा जमाव जणूं काय कैद झाल्यासारखा दिसत होता. पण कोणीहि तक्रार न करतां उलट या स्त्रियांचें कौतुक करून आपखुशीनें शालींत देणग्या टाकूं लागले. ह्या कैदेंत मुंबईचे पोलीस कमिशनर सांपडले होते. खिसे चांचपल्यावर आपल्या खिशांत कांहीं न सांपडल्यामुळें कमिशनरसाहेब गयावया करूं लागले. लक्ष्मीबाईंनीं एक शिसपेन्सिल आणि कागदाचा तुकडा त्यांच्या हातीं देऊन, "झोळींत आंकडा टाका म्हणजे सुटका होईल; एरवी नाहीं." असें सांगितलें. कमिशनरसाहेबांनीं दुसरे दिवशीं देणगीची रोकड सेक्रेटरीकडे पाठविली तेव्हां 'ही माझी खंडणी घेऊन माझी मुक्तता करा' अशी विनंति केली होती. देणगीचा आंकडा अशाप्रकारें बराच मोठा झाला होता.

ह्या मिशनचा बोलबाला लवकरच हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज व त्यांची पत्नी लेडी हार्डिंज यांचे कानीं गेला. न मागतां लेडी हार्डिंज यांनीं मोठ्या उदारपणें २००० रु. रोख पाठविले.

खर्चांत येणारी तूट भरून काढण्यास वेळोवेळीं धडपड करूनहि तूट भरून येईना म्हणून डी. सी. एम. रुपी फंड नांवाची एक नवीन योजना १९११ च्या जुलै महिन्यांत आंखण्यांत आली. त्या फंडाच्या उभारणीसाठीं सुमारे दहा स्वयंसेवक आणि त्यावर एक कॅप्टन व असे दहा कॅप्टन अशी योजना करण्यांत आली. प्रत्येक स्वयंसेवकानें १ रुपया वर्गणी गोळा करून वर्षांखेर १०० रुपये जमवावेत.

**रुपी फंड**

फंडाच्या बोर्डावर खालील ६ कॅप्टन्स मिळाले. ( १ ) सौ. लक्ष्मीबाई रानडे ह्यांच्या हाताखालीं १५ स्वयंसेवक, ( २ ) पी. बी. गोठस्कर ह्यांचे हाताखालीं १६ स्वयंसेवक, ( ३ ) अमृतलाल व्ही. ठक्कर–११ स्वयंसेवक, ( ४ ) वि. रा. शिंदे–११ स्वयंसेवक, ( ५ ) सय्यद अब्दुल कादर--१७ स्वयंसेवक, ( ६ ) एल. बी. नायक--१० स्वयंसेवक.

येणेप्रमाणें ८० स्वयंसेवकांनीं ३१ डिसेंबर १९११ रोजीं संपणाऱ्या सहामाहीच्या आंत प्रत्येकीं १०० रु. जमविण्याचें पत्करलें. पण ऑगस्ट १२ पासून ३१ डिसेंबर १९११ च्या आंत ह्या स्वयंसेवकांनीं १४७१ रु. जमविले. आकांक्षित ४००० रु. च्या मानानें हा आंकडा फारच कमी झाला. बोर्डाची एक साधारण सभा आणि दोन सामाजिक मेळे ह्या सहामाहींत भरविण्यांत आले. स्वयंसेवकांचा परस्पर परिचय होऊन स्नेहसंबंध वाढण्याला ह्या सभांचा फार उपयोग झाला. मिशनला चालू सालीं १३१६ रु. १५ आ. १ पै तूट आलेली आहे. आणि उत्पन्नाच्या बाबी निश्चित नसल्यामुळें पुढील सालीं अधिक तूट येणार हें स्वयंसेवकांना पटवून देण्यांत आलें.

१९१२ सालच्या अखेरीस १२ महिन्यांत एकंदर १०१६ रु. जमा झाले. आकांक्षित ५००० रु. पेक्षां ही रक्कम फारच कमी होती. स्वयंसेवकाची संख्या

६० होती. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं जनरल सेक्रेटरींची पत्नी सौ. रुक्मिणीबाई शिंदे ह्यांनीं स्वयंसेविका म्हणून एकंदर ५६० रु. जमविले. त्यांच्या कॅप्टन भगिनी जनाबाईनीं ह्या कामीं सौ. रुक्मिणी-बाईंना बरीच मदत केली होती. एकच रुपाया जमविण्याच्या उद्देशांत तें देणाऱ्या व्यक्तीचें हृदय असतें हीच भावना ह्या फंड जमवितांना होती. अशा दृष्टीनें पाहतां फंड जरी कमी झाला तरी सहानुभूतीचें वलय वाढलें ही गोष्ट समाधानकारक होती.

निराश्रित सेवासदन या संस्थेंतून मिशनचें परळ येथें विद्यार्थी वसतिगृह निघालें होतें. जेवून राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९१२ मध्यें ४० होती.

**तांदूळ फंड**

मुंबईसारख्या शहरामध्यें ह्या संस्थेचा फार खर्च येऊं लागला. रोखीनें निधि मिळाविण्याचें काम पुरें पडेना. त्यामुळें तांदूळ फंड म्हणून एक युक्ति काढली. गृहिणीनें रोज मूठभर तांदूळ टाकण्यासाठीं घरोघरीं तांदूळ व इतर धान्याच्या पिशव्या ठेवण्यांत आल्या. दर आठवड्यांत स्वयंसेवकांमार्फत विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन हें धान्य वसतिगृहामध्यें आणण्यांत येई. १९१२ सालीं ३४ फरे तांदूळ, २॥ फरे गहूं आणि ८ फरे डाळ गोळा करण्यांत आली. किंमतीच्या दृष्टीनें ही मदत फार नसली तरी प्रत्येक मूठभर तांदुळाच्या मागें एकेक स्त्रीचें मानवी हृदय होतें. ह्या दृष्टीनें पाहतां रुपी फंडापेक्षांही या फंडानें सहानुभूतीचें वलय कितीतरी वाढविलें. अस्पृश्यता निवारण्याचे कामीं लोकमत तयार करण्याचें मिशनचें सर्वांत मुख्य काम अशा युक्त्या प्रयुक्त्यांनीं बिनबोभाट चाललें होतें.

विद्यार्थ्यांना जेवणाशिवाय नवे जुने कपडे, बिछाने, भांडीं, साबण, औषधें, पुस्तकें वगैरे अनेक घरगुती वस्तूंची जरुरी

**कापड फंड व पेटी फंड**

लागे. ती गरज ह्या कापड फंडानें भागविली जात असे. सीलबंद केलेल्या लहान लहान लाकडी पेट्या, मुख्य मुख्य कचेऱ्या, खासगी दवाखाने, वकिलांचीं घरें आणि इतर माणसांची जा–ये पुष्कळ आहे अशा ठिकाणीं ठेवण्यांत आल्या. त्या ठिकाणीं नेहमीं असणाऱ्या मिशनच्या हितचिंतकाला ह्या पेटीची जबाबदारी देण्यांत आली. दर महिन्याच्या शेवटीं स्वयंसेवकानें जाऊन जबाबदार हितचिंतकाचे समोर ती उघडून आंतील रकमेची पावती देऊन स्वयंसेवक मिशनच्या खजिनदाराकडे हा हिशेब देई. खजिनदाराची पावती अखेरची समजली जाई.

ह्या निरनिराळ्या फंडांची योजना मिशनच्या निरनिराळ्या शाखांतून सुरू करण्यांत आली. तांदूळ आणि कापड फंड जमविण्याचे कामीं रुपी फंडाप्रमाणेंच सौ. रुक्मिणीबाई शिंदे यांनीं मोठें यश मिळविलें. त्या जेथें जात तेथें कनवाळू स्त्रिया मुठीनें तांदूळ न देतां सुपानें तांदूळ भरभरून इतके देत असत कीं विद्यार्थ्यांना ते उचलून आणणें देखील जड जात असे.

विद्यार्थी वसतिगृहें आणि उद्योग शाळा हीं मिशनचीं स्वीकृत कामें फार खर्चाचीं आणि दगदगीचीं होतीं. मुंबईतील परळ

**औद्योगिक शिक्षण**

शाळेंत बुक-बाईंडिंग व शिवण्याचें काम, मंगळूर येथें हातमागावर विणण्याचें काम, महाबळेश्वर येथें काथ्याचे दोरखंड आणि वेताच्या टोपल्या वगैरे करण्याचें काम, अशीं औद्योगिक कामें प्रथमपासून चाललीं होतींच. १९१२ सालीं मुंबईच्या परळ येथील शाळेला, एक स्वतंत्र उद्योग शाळा जोडण्याची आवश्यकता भासूं लागली. औद्योगिक शिक्षणाची मुख्य कल्पना ही आहे कीं विद्या-

र्थ्यांच्या हाताला आणि डोळ्याला व्यावहारिक वळण लागावें आणि तद्वारा विद्यार्थ्यांला भावी आयुष्यामध्यें कोणता तरी हस्तकौशल्याचा धंदा करतां यावा. बहुतेक अस्पृश्य वर्ग असा कोणता ना कोणता धंदा करून आपलें पोट भरीत असतो. म्हणून अशा धंद्याची तयारी लहानपणापासूनच केली नाहीं तर ते पुढें नुसते पोकळ पंडित बनून आईबापांच्या आणि स्वतःच्या निराशेला कारणीभूत होतील.

**वाडिया ट्रस्टींची मदत**

ह्या कामीं पुरेसा निधि मिळावा म्हणून मुंबईच्या एन्. एम. वाडिया ट्रस्टीकडे अर्ज करण्यांत आला. त्या फंडाचे प्रमुख ट्रस्टी सर जमशेटजी जीजीभाई आणि बॅ. एन्. ए. वाडिया यांना मिशनची परळ येथील दुय्यम शाळा समक्ष दाखविण्यांत आली. सर्व कामें बारकाईनें पाहिल्यावर औद्योगिक शाळा चालविण्यास मिशन पात्र आहे अशी या ट्रस्टींची खात्री झाली. आणि दरसाल ६०००रु. ची देणगी याप्रमाणें तीन वर्षांपर्यंत एकूण १८,०००रु. देण्याचें त्यांनीं कबूल केलें. त्याप्रमाणें ही नवीन उद्योगशाळा निघाली. ह्या शाळेंत सुतार काम, चित्रकला व रंगकाम, शिवणकाम, पुस्तकें बांधण्याचें काम असे चार निरनिराळे वर्ग योग्य शिक्षकांच्या नजरेखालीं उघडण्यांत आले. कोणत्या ना कोणत्या वर्गांत तरी शाळेंतील सर्व मुलांनीं विशेषतः वसतिगृहांतल्या सर्व विद्यार्थ्यांनीं दिवसांतून दोन तास हें औद्योगिक शिक्षण अवश्य घ्यावें अशी योजना करण्यांत आली. पुणें शाळेंत विद्यार्थी वसतिगृहाची पूर्वतयारी १९१२ अखेर करण्यांत आल्यावर तेथेंहि अशा शिक्षणाची तरतूद करण्यांत आली.

---

# प्रकरण १६ वें

## महाराष्ट्र परिषद

मेघवृष्टीनें प्रचार करण्याचे तीन प्रकार आहेत—( १ ) ठिकठिकाणच्या हितचिंतक पुढाऱ्यांचें मन वळवून त्यांच्याकडून लोकमत तयार करण्यासाठीं त्यांच्या त्यांच्य गांवीं प्रचंड सभा भरविणें. ( २ ) अशा रीतीनें

**मिशनच्या परिषदा**

लोकमत अजमाविल्यावर जनरल सेक्रेटरीनें ( मुख्य प्रचारकानें ) प्रांताच्या एका मुख्य ठिकाणीं अंगभूत शाखा स्थापून तिच्या नियंत्रणाखालीं जिल्ह्याच्या ठिकाणीं उपशाखा स्थापण्यासाठीं प्रांताचें निरीक्षण करून आणि निधि मिळविण्यासाठीं दौरे काढणें. ( ३ ) तिसरा प्रकार मिशनचा खास परिषदा भरविणें. भारतीय राष्ट्रीय सभेची बैठक नाताळांत जेथें जेथें होत असे तेथें तेथें एकेश्वरी धर्माची परिषद भरविण्यास मला जावें लागत असे. त्याचवेळीं मी ह्या मिशनच्याहि परिषदा संघटित रूपानें भरवीत असें. १९०६ मध्यें मिशन स्थापल्यावर १९०७ मध्यें सुरत, १९०८ मध्यें मद्रास, १९०९ लाहोर, १९१० अलाहाबाद, १९१२ बांकीपूर, १९१३ कराची येथें कॉंग्रेसच्या वेळीं या परिषदा भरविण्यांत आल्या. बांकीपूर येथें कॉंग्रेसचे अध्यक्ष, अमरावतीचे नामदार मुधोळकर वकील हेच मिशनच्या परिषदेचे अध्यक्ष होते. कराचीच्या परिषदेंत लाला लजपतराय हे अध्यक्ष होते. ह्या परिषदांमुळें प्रांतांप्रांतांतून आलेल्या पुढाऱ्यांचें लक्ष ह्या मिशनच्या कार्याकडे लागत असे. त्या त्या प्रांतांत ह्या मिशनच्या कार्यांची उभारणी करण्यासाठीं माहिती आणि मदत मिळत असे. पण

प्रत्यक्ष कॉंग्रेसच्या कार्यांत ह्या अस्पृश्यांच्या प्रश्नाला शिरकाव होण्याला त्यावेळीं अनुकूलता मुळींच नव्हती. हा प्रश्न धर्माचा आहे त्याची भेसळ राजकारणांत नको अशी सबब सांगून त्यावेळचे जहाल अथवा मवाळ राजकीय पुरुष हा प्रश्न सफाईदारपणें टाळीत असत.

**परिषदेची तयारी**

१९०६ सालीं हें मिशन निघून त्याचें अर्धें तप १९१२ अखेर संपूर्ण झालें. ह्या राष्ट्रीय प्रश्नाच्या बाबतींत ह्या अर्ध्या तपांत महाराष्ट्रीयांनीं उचल खाऊन सर्व प्रांतांत आघाडी मारली. मुंबई, मद्रास, मध्यप्रांत ह्या हिंदुस्थानांतील तीन इलाख्यांत ह्या मिशनच्या द्वारें व शासनाखालीं ह्या प्रश्नाची अपूर्व घटना केली. म्हणून मला असें वाटूं लागलें कीं, ह्या मिशनची खास महाराष्ट्रीय परिषद भरवून लोकमताचा आढावा घ्यावा. ह्या प्रयोगासाठीं पुणें शहर हेंच योग्य ठिकाण असें ठरविलें. मुंबई हें पैशाचें केंद्र आणि पुणें हें चळवळीचें केंद्र हा आधुनिक महाराष्ट्राचा अनुभव आहे. पुणें शाखेचें वसतिगृह स्थापावें, सर्व मिशनचा एक मध्यवर्ती आश्रम स्थापावा, सनातनी पक्षाला हालवून पाहावें, भिन्न जातीय व भिन्न धर्मीय पुढाऱ्यांची सक्रिय सहानुभूति कसोटीस लावून पहावी वगैरे इतर अनेक हेतू होतेच. ही परिषद वरिष्ठ वर्ग आणि अस्पृश्यवर्ग ह्यांच्या सहकार्यावर घडवून आणण्यांत आली.

परिषद फर्ग्युसन कॉलेजच्या ॲंफि–थिएटरमध्यें सर रामकृष्णपंत भांडारकर यांचे अध्यक्षतेखालीं सन १९१२ ऑक्टोबर ता. ५, ६, ७ ह्या तीन दिवशीं भरली. परिषदेच्या कामाकरितां स्वयंसेवकांची जोरदार घटना केली. त्यांत विशेषतः पुणें येथील शेतकी कॉलेजचे व इतर कॉलेजांतील बऱ्याच तरुण स्वयंसेवकांनीं ऊन, वारा, पाऊस यांना न जुमानतां एकसारखी मेहनत केली. सर्व्हंट्स ऑफ इंडिया

सोसायटीचे सभासद रा. वझे आणि इतरांनीं फारच श्रम घेतले. परिषदेकरतां आलेल्या सर्व जातींच्या दूरदूरच्या पाहुण्याची जेवण्याची व राहण्याची सोय मिशनच्या लष्करांतील शाळेंत करण्यांत आली. जेवणासाठीं भव्य मंडप घालण्यांत आला होता. सर्व जातींचे मिळून २६० पाहुणे आले होते. त्यांचीं एकत्र भोजनें तीन दिवस मिळून मिसळून होत होतीं. परिषदेच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे रविवारीं परिषदेचे स्वसंसेवक, वरिष्ठ जातींचे हितचिंतक आणि निरनिराळ्या अस्पृश्य जातींचे पाहुणे मिळून सुमारें ४०० पानांचें थाटाचें प्रीतिभोजन झालें. ह्या भोजनांत ५० वरिष्ठ जातीच्या लोकांनीं भाग घेतला. कमिटीचे स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. मॅन यांनीं प्रीतिभोजनांत सर्वांत मिसळून भोजन केलें.

सर्व पाहुणेमंडळी पुण्यास आल्यावर त्यांचें नांव, गांव, जात ह्यांची नोंद होई. सकाळचा चहा झाल्यावर परस्पर परिचय होऊन भोजन होई. सभेचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणें उरकण्यांत येई. सर्व कार्यक्रमाला भजनानें व उपासनेनें आरंभ होई. पहिले दिवशीं रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांनीं उपासना चालविली. दुसरे दिवशीं परिषदेसाठीं प्रार्थना समाजाच्या हरिमंदिरांत परिषदेचे अध्यक्ष डॉ. भांडारकर यांनीं उपासना चालविली. त्यावेळीं परिषदेचे बाहेरगांवचे २५० पाहुणे हजर होते. तिसऱ्या दिवशीं मिशनचे शाळेंत मीं स्वतः उपासना चालविली. त्यावेळीं मुंबईहून आलेल्या परळ मिशनच्या मुलांनीं निरनिराळ्या व्यक्तिप्रार्थना केल्या.

**पुढाऱ्यांचा मेळावा**

दोनप्रहरीं अध्यक्ष भांडारकर स्थानापन्न झाले. जमलेल्या थोर मंडळींत सर चंदावरकर, डॉ. मॅन, भावनगर संस्थानचे दिवाण पट्टणी, नामदार मौलवी रफिउद्दीन, इचलकरंजीचे अधिपति श्रीमंत बाबा-

साहेब घोरपडे, कोल्हापूरचे भास्करराव जाधव, गोपाळराव देवधर, बी.एस्. कामत, प्रो. धोंडोपंत कर्वे, रेव्हरंड रॉबर्टन्, तेलगू समाजाचे पुढारी डॉ. कोरेज, अस्पृश्यांपैकीं सुभेदार मेजर भाटणकर, नगरचे डांगळे, पुण्याचे कांबळे, भंग्यांचे पुढारी नाथामहाराज, सातारचे मातंग पुढारी श्रीपतराव नांदणे वगैरे अनेक पुढारी होते.

**कार्याचें क्षेत्र**

प्रथम मीं माझ्या भाषणांत ह्या चळवळीचा थोडक्यांत इतिहास सांगून मिशनच्या हल्लींच्या कार्याचा विस्तार पुढील कोष्टक देऊन सांगितला.

| ठिकाणें | संस्था |
| --- | --- |
| १ मुंबई | ५ दिवसाच्या शाळा व १ रात्रीची शाळा. ५०० विद्यार्थी. १ वसतिगृह व त्यांतील २६ मुलें, २ भजनसमाज १ धंदेशिक्षणाची शाळा. |
| २ पुणें | एक २०० मुलांची शाळा, १ भजनसमाज, १ वाचनालय. क्रिकेट क्लब वगैरे. |
| ३ हुबळी | १ दिवसाची शाळा, १ रात्रीची शाळा, १ वसतिगृह. |
| ४ सातारा | १ रात्रीची शाळा, १ भजनसमाज. |
| ५ ठाणें | गरीब विद्यार्थ्यांना मदत करणारी स्थानिक मंडळी. |
| ६ दापोली | ,, ,, ,, |
| ७ मालवण | ,, ,, ,, |
| ८ मंगलोर | १ दिवसाची शाळा, १ रात्रीची शाळा, १ वसतिगृह, १ हातमागाचा वर्ग. |
| ९ मद्रास | २ दिवसाच्या व २ रात्रीच्या शाळा, एकंदर मुलें १३० |
| १० अकोला | ३ रात्रीच्या शाळा, १ वसतिगृह. |

| ठिकाणें | संस्था |
|---|---|
| ११ उमरावती— | २ रात्रीच्या शाळा. |
| १२ इंदूर— | १ रात्रीची शाळा. |
| १३ भावनगर— | १ दिवसाची शाळा. |
| १४ कोल्हापूर— | १ वसतिगृह. |

सध्या एकंदर १४ ठिकाणीं २३ शाळा, ५५ शिक्षक, ११०० मुलें, ५ वसतिगृहें, इतर १२ संस्था, ५ प्रचारक असून खर्च एकंदर रु. २४४८५ आहे.

वरील विस्ताराचें निरीक्षण केल्यावर असें दिसून येईल कीं निरनिराळ्या ४ भाषा चालू असलेल्या ७ प्रांतांत मंडळीला आपले प्रयत्न करावयाचे आहेत; म्हणूनच तिला हल्लीं भरलेल्या परिषदेसारख्या निरनिराळ्या ठिकाणीं प्रांतिक परिषदा भरविण्याची जरूरी आहे. अशा परिषदेशिवाय मंडळीला आपल्या कार्याचा विस्तार व दृढीकरण करण्यास दुसरा मार्ग नाहीं.

सरकार, संस्थानिक, म्युनिसिपालिट्या आणि परोपकारी संस्था, सर्व जाती आणि सर्व धर्म—एकूण ह्या प्रचंड देशांतील सर्व शुभ शक्ति—ह्यांचें केंद्र ह्या कार्यांत जितक्या अंशानें जास्त साधेल तितक्याच अंशानें अधिक यश येईल हें ध्यानांत वागवून परिषदेचे सर्व सभासद सात्त्विक-वृत्तीनें विचार करतील अशी उमेद आहे.

**भाषणें**

अध्यक्ष डॉ. भांडारकर यांचें विद्वत्ताप्रचुर आणि संशोधनात्मक असें भाषण झालें. अस्पृश्यतेचें मूळ आणि मीमांसा वेद, उपनिषदें, पाली ग्रंथ, मराठी संतकवी यांच्या आधारें व प्राचीन व अर्वाचीन इतिहासाला धरून मोठ्या अधिकारयुक्तवाणीनें केली.

यानंतर पुढीलप्रमाणें निरनिराळ्या व्यक्तींनीं त्या त्या विषयांवर विद्वत्ता-पूर्ण अशीं व्याख्यानें दिलीं.

| | वक्ता | विषय |
|---|---|---|
| १ | गणेश अक्काजी गवई | ... वऱ्हाडांत ख्रिश्चन मिशननें अस्पृश्यांसंबंधीं केलेलें काम व त्याची मिशनच्या कार्याशीं तुलना. |
| २ | श्री. एस्. कामत | ... गुरुकुलाची आवश्यकता. |
| ३ | सौ० लक्ष्मीबाई रानडे | ... सदर. |
| ४ | रा. गोपाळराव देवधर | ... उपदेशकाची जरूरी. |

यानंतर वसतिगृहासाठीं भिक्षापात्र फिरविण्यांत आलें.

| | | |
|---|---|---|
| ५ | रा. केशव रामचंद्र कानिटकर | ... औद्योगिक शिक्षणाची दिशा. |
| ६ | रा. भास्करराव जाधव | ... सदर. |
| ७ | रा. नाथामहाराज (भंगी पुढारी) | सदर. |

## दिवस दुसरा

| | | |
|---|---|---|
| ८ | नामदार बाबासाहेब इचलकरंजीकर | ... उद्धाराच्या कामीं अस्पृश्यांनीं वरिष्ठ वर्गांशीं मिळून मिसळून वागावें. यांनीं ५० रु. देणगी जाहीर केली. |
| ९ | प्रो. गो. चि. भाटे | ...सर्वांस अवश्य शिक्षण द्यावें. |
| १० | न. चिं. केळकर | ...म्युनिसिपालिट्या लोकनियुक्त व्हाव्यात व त्यांत अस्पृश्य प्रतिनिधी असावेत. |
| ११ | रा. आर. जी. प्रधान | —सदर— |

| वक्ता | विषय |
| --- | --- |
| १२ प्रो. हरिभाऊ लिमये | ...म्युनिसिपालिटींत अस्पृश्य प्रतिनिधी येण्याची वाट न पाहतां त्यांच्या उन्नतीची सोय करावी. |
| १३ रा. भास्करराव जाधव | ...अस्पृश्यांनीं सरकारी नोकरींत शिरण्याची आवश्यकता व कोल्हापूर संस्थानांतील प्रयत्न. महाराजांनीं हत्तीवर अस्पृश्य माहूत नेमल्याचें उदाहरण. |
| १४ रा. जोग इचलकरंजीकरांचे चिटणीस | ...इचलकरंजी संस्थानांतील प्रयत्न. |
| १५ रा. वि. रा. शिंदे | ...मुंबई, पुणें येथें मिशनचे स्वतःचे इमारतीची जरूरी. |
| १६ रा. एल्. बी. नायडू | —सदर— |
| १७ श्री. महाभागवत, (भावी शंकराचार्य) | ...संस्कृतमध्यें. मिशनच्या धार्मिक प्रयत्नांची योग्यता. हे प्रयत्न समन्वयाच्याच पायावर झाले पाहिजेत. त्याबद्दल मिशनचे आधार. |
| १८ प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले | ...वेदोपनिषदांतील उतारे. वेदकाळीं अशी अस्पृश्यता नव्हती. हल्लींचें विकृत स्वरूप गेलें पाहिजे. |
| १९ अध्यक्ष भांडारकर | ...समारोप व रा. वि. रा. शिंदे यांचे आभार. |

तिसऱ्या दिवशीं श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्या अध्यक्षतेखालीं स्त्रियांची सभा लष्कर येथील शाळेंत भरली. सुमारें

**स्त्रियांची सभा**

५० वरिष्ठ वर्गांतील व सुमारें २०० अस्पृश्य समाजांतील स्त्रिया हजर होत्या. सौ. लक्ष्मीबाई रानडे, सौ. सीताबाई भांडारकर, सौ. काशीबाई कानिटकर प्रमुखस्थानीं बसल्या होत्या. अध्यक्षीणबाई म्हणाल्या, " अशीं कामें आम्हा बायकांच्या अंगवळणीं पडलीं नाहींत, पण तीं पडेपर्यंत कामाला खरा जोर येणार नाहीं. निराश्रित वर्गाच्या स्त्रियांची सुधारणा करण्यासंबंधानें पुणें, मुंबई, यवतमाळ, अकोला, अमरावती वगैरे ठिकाणीं जे प्रयत्न होत आहेत ते सर्व मीं पाहिले आहेत. अकोला येथें श्रीमती ब्रेन्द्राबाई यांनीं आपल्या महार जातींतील १४।१५ मुलांचें एक स्वतंत्र वसतिगृह चालविलें आहे. त्यांत इतकी स्वच्छता व टापटीप दिसली कीं, हीं मुलें निकृष्ट जातीचीं आहेत असें कोणालाहि ओळखता येत नाहीं. " नंतर मिशनच्या शाळेंतील शिक्षिका पार्वतीबाई जाधव या महारबाईचें भाषण झालें. ह्या बाई मिरजे-हून आल्या होत्या. त्या म्हणाल्या— " ह्या परिषदेस येण्यापूर्वीं आमची उतरण्याची सोय होईल काय याची पंचाईत आम्हास पडली होती. पण येथें आल्यावर ब्राह्मणादि वरिष्ठ जातीच्या बायकांनीं आमची उत्तम बडदास्त ठेवली. उलट महार, मांग, चांभार वगैरे आम्ही लोकच एकमेकांच्या पंक्तीस बसण्यास कुरकुरूं लागलों. तेव्हां तुम्हांस ( महारांस ) ब्राह्मणांच्या पंक्तीस बसण्याची हौस वाटते आणि मांगास पंक्तीस येऊं देण्यास तुम्ही नाराज होता ! हें कसें ? " असें विचारलें. ह्यावर सर्वांची समजूत पटून सुमारे ३०० महार-मांग एकत्र बसलेले पाहून सर्वांना मोठा आनंद झाला.

नंतर कु. शिंगणे व पुणें येथील अस्पृश्य पुढारी श्रीपतराव थोरात यांची कन्या कु. लक्ष्मीबाई यांचें निबंधवाचन झालें. अकोल्याच्या श्रीमती इंदिराबाई परचुरे यांचें भाषण झालें. सौ. लक्ष्मीबाई रानडे ह्यांनीं अध्यक्षीणबाईंचे आभार मानले आणि सभेचा शेवट झाला.

महाराष्ट्र परिषदेस एकूण १७ जिल्ह्यांतील ५४ गांवच्या निरनिराळया २० जातींच्या २३० पाहुण्यांची सर्व तऱ्हेची सोय परिषद कमिटीमार्फत करण्यांत आली होती. ह्याखेरीज इतर सभासद पुणें शहरांतील स्थानिक रहिवासी होते.

**दोन विघ्नें**

ह्या परिषदेचीं सर्व कामें अत्यंत उत्साहानें पार पडलीं; तरी दोन प्रकारें विघ्नें आल्यानें परिषदेला मोठी मनोरंजकता आली. दुसऱ्या दिवशीं रविवारीं मोठ्या थाटाचें ४०० लोकांचें सहभोजन ठरलें होतें. परिषदेंतील पाहुण्यांचें तीन दिवस सहभोजन चाललेलें होतेंच ! दोन दिवस ब्राह्मण आचारी खुशीनें स्वयंपाक करीत होते. पण रविवारच्या मोठ्या सहभोजनाचे दिवशीं पुणें शहरांतील बरीच ब्राह्मण-मंडळी जेवण्यास येणार होती, हें ऐकून सकाळीं दहा वाजतां स्वयंपाक्यांनीं संप करून मोठा अडथळा आणला. चालकांनीं लगेच त्यांना मंडपांतून जाण्यास सांगितलें. बाहेरून आलेल्या पाहुण्यामंडळींपैकीं ब्राह्मण बायकांनीं आणि स्वागत कमिटींतील अस्पृश्य सभासदांच्या बायकांनीं स्वयंपाकाचें सर्व काम एकदम अंगावर घेऊन ठरल्याप्रमाणें बरोबर १२ वाजतां सर्व तयारी केली. सौ. रुक्मिणीबाई शिंदे यांच्या नेतृत्वाखालीं बिनबोभाट सर्व तयारी झालेली पाहून सर्व पाहुण्यांना आश्चर्य व आनंद वाटला. दोन तासांत दोन पंक्ती उठून सर्व भोजनसमारंभ आटोपल्याबरोबर जोराची पर्जन्यवृष्टि एक तासभर झाली. लष्करांतील शाळेंतील पाहुणे मंडळींच्या उतरलेल्या ठिकाणाहून

फर्ग्युसन कॉलेजचें सभागृह २ मैल लांब होतें. तरी स्वयंसेवकांनीं अपूर्व तसदी घेऊन सभेच्या कामांत कोणत्याहि प्रकारची उणीव भासूं दिली नाहीं. एक तासाच्या विलंबानें सभेचें काम सुरळीतपणें पार पडलें. देव तारी त्याला कोण मारी !

**अपूर्व कामगिरी**

परिषदेकरितां जवळ जवळ २००० पत्रें बाहेर पाठवून त्यांचीं उत्तरेंहि आलीं. हें एक दीड महिन्याच्या आंतच करावें लागलें. बाहेर गांवांहून परिषदेसाठीं येणाऱ्या मंडळींना रेल्वे तिकिटाची सवलत मिळावी म्हणून निरनिराळ्या रेल्वे कंपन्या व आगबोट कंपन्या यांच्याशीं मीं पुनः पुनः पत्रव्यवहार केला. तरी सर्वांकडून शेवटीं नकारार्थीच उत्तर आलें. स्वागत कमिटीचे दुय्यम चिटणीस रा. दा. ना. पटवर्धन ह्यांनीं ही परिषद घडवून आणण्याचे जे अविश्रांत श्रम केले त्याचें वर्णन शब्दानें करवत नाहीं. रा. ए. के. मुदलियार यांचे हाताखालीं त्यांना दक्षतेचें आणि तत्परतेचें वळण लागलें होतें. परिषदेचें बहुतेक श्रेय त्यांनाच आहे. सुमारे पाऊणशें पानांचा परिषदेचा अहवाल पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून परिषदेच्या वाङ्मयांत त्यांनीं एक संस्मरणीय भर टाकली.

**उदार देणगी**

ही परिषद पुणें येथील इमारत फंडासाठीं मुख्यत्वेंकरून भरविण्यांत आली होती. परिषदेंत तो फंड न मिळतां उलट खर्चांतच २५९ रु. १४ आ. ३ पै तूट आली. पुणें शहराच्या दारिद्र्याचें याहून सुंदर प्रदर्शन दुसरीकडे कोठें दिसणार ! पण चिटणीस रा. पटवर्धनांचे सात्त्विक परिश्रमाला दुसरीकडूनच यश येणार होतें. परिषदेचा सुंदर अहवाल वाचून इंदूरचे महाराज श्रीमंत तुकोजीराव होळकर याना दयेचा पाझर फुटला आणि त्यांनीं पुढील महिन्यांतच जनरल सेक्रेटरी म्हणून मला ताजमहाल

हॉटेलमध्यें बोलावून २०,००० रु.चा चेक माझे हातीं दिला. ह्यांतच पुढें मुंबई सरकारच्या ८७,००० रु.ची भर पडून पुणें शाखेसाठीं भोकरवाडींत 'अहिल्याश्रम' या नांवाच्या सुंदर इमारतीचा आश्रम उघडण्यांत आला.

---

# प्रकरण १७ वें

## अंतर्बाह्य खळबळ

**एक प्रश्न** :

पहिल्या सहा वर्षांत मिशनची वरील वाढ झाली हें खरें ! पण ती होत असतांना अनेक अडचणी, विघ्नें, गैरसमज आणि परीक्षेचे प्रसंग आले हेंहि खरेंच. वाढ झपाट्यानें होऊं लागली असतां पहिला प्रश्न असा उद्भवला कीं हें मिशन मुंबई प्रार्थना समाजानें आपल्या ताब्यांत आणि जबाबदारी-खालीं आपलेंच एक अंगभूत काम अशा दृष्टीनें चालवावें कीं तें सर्व राष्ट्राचें काम आहे म्हणून सर्वांचें सहकार्य मिळवून शक्य तेवढी त्याला बाहेरूनच मदत करावी ? डॉ. भांडारकरांचें मत पहिल्या बाजूनें पडलें. आरंभीं मिशनच्या मध्यवर्ती कमिटीवर सर्व अधिकारी आणि सभासद प्रार्थना समाजाचेच पुढारी होते. अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या प्रोत्साहनानें आणि बळावरच मीं हें काम काढलें होतें. पुढें बरींच वर्षे समाजाची सहानुभूति आणि मदत मिशनला बिनतक्रार व आनंदानें मिळत होती. मिशनचा सामाजिक हेतू समाजाला पूर्णपणें मान्य होता.

इतकेंच नव्हे तर मिशनचें कार्य धर्माच्या पायावरच चालवावयाचें होतें. तो पायाहि समाजाला मान्य होता. मात्र अस्पृश्य वर्गांतून समाजाला सभासद मिळावे असा हेतू समाजानें कधींच बाळगला नाहीं आणि तशी तक्रारहि कधीं कोणी बाहेरच्यांनीं केली नाहीं. म्हणून साहजिकच डॉ. भांडारकरांना वाटूं लागलें कीं, प्रार्थना समाजानें हें काम आपल्याच जबाबदारीवर चालवावें. बंगाल्यांत ब्राह्म समाजानें आणि पंजाबांत आर्य-समाजानें ह्या मिशनचें काम इतरांची मदत घेऊन पण स्वतःच्याच नियंत्रणाखालीं चालविलें होतें. म्हणून डॉ० भांडारकरांचे मतांत कांहीं वावगें होतें असें नाहीं. पण ह्या मिशनचें काम नेहमीं वाढतें राहणार. प्रश्न जरी हिंदुपुरता असला तरी अस्पृश्यतानिवारण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानांत राहणाऱ्या प्रत्येक जातींच्या आणि धर्मांच्या माणसांवर पडते, हें आम्हीं वेळोवेळीं सर्वांना बजावूनच काम चालविलें होतें. पैशाची मदत जर सर्वांकडून घ्यावयाची तर त्याचा विनियोग आणि सर्व कामाच्या जबाबदारीचा वांटा खुशीनें घेतील त्यांना देण्यांतच शहाणपणा आहे, हें आम्ही जाणूनच होतों. म्हणूनच सर नारायणराव आणि इतर कमिटीचे सभासदांना मिशनच्या कामांत सर्वांना मोकळीक ठेवावी असें वाटलें. डॉ. भांडारकरांनाहि लवकरच तें पटलें आणि हा वाद फारसा माजला नाहीं.

**माझी स्थिति**

काम झपाट्यानें वाढूं लागल्यामुळें अर्थातच माझा वेळहि ह्या कामांत अधिक अधिक जाऊं लागला. मीं मूळ प्रांतिक समाजाच्या कामाला वाहिलेला. अल्प कां होईना पण माझ्या योगक्षेमाची तरतूद समाजानें केलेली. अर्थातच समाजाच्या कळकळीच्या सभासदांना विशेषतः ज्यांनीं मला मदत केली होती त्यांना सहाजिकपणें ह्या बाबतींत वैषम्य वाटूं लागलें.

हळू हळू हा विषय वादग्रस्त होऊं लागला. आणि त्यांत कोणाचा काय इलाज ! जनतेची सेवा हीच ईश्वराची सेवा असें ब्राह्म आणि प्रार्थना समाज नेहमीं ओरडून सांगत आहे. हरिजनसेवा करण्यांत प्रार्थना समाजाची सेवा मी विशेष उत्कटतेनें करीत आहे असेंहि मनःपूर्वक वाटत होतें. पण मी मिशनमध्यें वेळ न खर्चतां समाजालाच चिकटून रहावें असा व्यक्तिशः मजसंबंधीं वाद सुरू झाला; तेव्हां माझी स्थिति नाजूक झाली. मला दगदग, चिंता पडत होती; त्यांत आत्मसमर्थनाचा बोजा माझ्यावर येऊं लागला. तो जड वाटूं लागला. मिशनाचीं आणि समाजाचीं दोन्हीं कामें मी सांभाळीतच होतों.

माझ्या पाठीमागें माझे परमामित्र वासुदेवराव सुखटणकर हे मॅंचेस्टर कॉलेजांत धर्मशिक्षणार्थ गेले. इंग्लंडांत दोन वर्षें राहून व जर्मनींत आणखी अधिक दोन वर्षें राहून १९०७ सालीं ते मुंबईस परत आले आणि प्रार्थना समाजाच्या प्रचाराची जबाबदारी त्यांनीं अंगावर घेतली. पण योगायोग असा आला कीं त्यांनीं हें काम वर्ष सहा महिन्यांतच सोडून दिलें. म्हणून माझ्यावर प्रार्थना समाजाच्या कामाचा बोजा पडल्यानें मीं तिकडे अधिक लक्ष पुरवावें हें म्हणणें सकृद्दर्शनीं सयुक्तिक होतें. तरी पण समाजांतील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि बहुतेक सभासद यांना कळून चुकलें होतें कीं, मिशनच्या कामांतून माझी सुटका होणें केवळ अशक्य होतें. म्हणून त्यांनीं कोणत्याहि प्रकारची हरकत घेतली नाहीं. इतकेच नव्हे तर सालोसाल अधिक नेटानें सहकार्य केलें.

**टिळकांस शिक्षा**

वादाचें तिसरें एक कारण उद्भवलें. हिंदुस्थानच्या राजकारणांत राष्ट्रीय पक्ष आणि प्रागतिक पक्ष असे दोन भेद पडून एकाचें लक्ष समाजसुधारणेकडे आणि सरकारशीं जुळतें घेऊन काम करण्याकडे अधिक तर दुसऱ्याचें

लक्ष राजकीय यशाकडे आणि तेंही सरकारशीं विरोध करून, निदान फटकून राहून, मिळण्याकडे होतें. आणि मला तर माझ्या कामांत मग तें प्रार्थना समाजाचें असो, मिशनचें असो कीं इतर कोणतेंही असो होतां होईल तों सर्वांचें सहकार्य मिळविणें अवश्य होतें. इतकेंच नव्हे तर माझेंहि मतस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य कोणतीहि आपत्ति आली तरी पूर्ण राखून ठेवण्याच्या हक्काला मीं कधींहि बाधा येऊं दिली नाहीं. पडेल तो त्याग करणें, येतील त्या संकटांना तोंड देणें, ह्या बाबतींत घरादाराचाही मुलाहिजा न राखणें हीं गोष्ट वेगळी. पण स्वतःचें व्यक्तिस्वातंत्र्य घालवून घेऊन, आपलें व्यक्तित्वच नष्ट करून घेणें ही गोष्ट वेगळी. राजकारणांत माझें मत आणि कल पूर्णतः राष्ट्रीय बाजूकडे होता. तथापि मी कोणत्याहि पक्षाशीं तादात्म्य पावलों नाहीं. पण मत स्पष्ट सांगावयाला आणि तदनुरूप वागायला मी कधींहि कचरलों नाहीं. माझीं मतें प्रार्थना समाजावर लादण्याचा आणि प्रार्थना समाजाचीं राजकारणांतील प्रागतिक बाजूचीं मतें इतरांवर लादण्याचा मीं प्रयत्न कदापिही केला नाहीं.

पण एकदां एक चमत्कारिक योग आला. १९०७ च्या सुमारास लोकमान्य टिळकांनीं मद्यपाननिषेधाची प्रचंड धामधूम उठविली. तींत सर्व पक्षाचे आणि कांहीं ख्रिश्चन मिशनरीसारख्या लोकांनीं भाग घेतला. अशाच वेळीं सुरत येथें झालेलें कॉंग्रेस अधिवेशन लोकमान्यांनीं उधळून लावून कॉंग्रेसला आपल्या कक्षेंत खेंचले. त्यामुळें ते सरकारच्या विशेष डोळ्यावर आले. लवकरच त्यांच्यावर खटला होऊन सहा वर्षे कारावासाची त्यांना जबर शिक्षा झाली. शिक्षा फार निष्ठुर झाली म्हणून पुष्कळांना तिचा फार चटका लागला. मद्यपाननिषेधाची चळवळ आणि त्यांत कुठें कमीजास्त बोलल्याबद्दल ही शिक्षा. त्याबद्दल मलाहि फार वाईट वाटत होतें. शिक्षा झाल्यावर लवकरच रविवारचा दिवस आला.

त्या दिवशींच साप्ताहिक उपासना चालविण्याची माझी पाळी होती. प्रार्थनेच्या वेळीं मीं गेहिवरून लोकमान्यांचा उल्लेख केला. एवढ्या मोठ्या कारावासांत ह्या जनतेच्या पुढाऱ्याला आयुरारोग्य लाभो, शरीराला विश्रांति आणि मनाला शांति मिळो, इतकेंच नव्हे तर त्याचें कोठें कांहीं चुकत असलें तर उच्च सत्याचा त्याला मार्ग दिसो अशी मीं स्पष्ट शब्दांत प्रार्थना केली. ह्याबद्दल समाजांत खळबळ उडाली. सर नारायणराव चंदावरकर व डॉ. भांडारकर वगैरे गुरुजनांनीं मला समक्ष बोलावून घेऊन खुलासा मागितला. मीं जबाबदारपूर्वक आणि नम्रतापूर्वक सांगितलें कीं, "मला आपण विश्वासानें आचार्य आणि प्रचारक नेमलें आहे. समाजांत सर्व प्रकारचीं, सर्व मताचीं आणि सर्व दर्जाचीं माणसें आहेत, हें मी पूर्ण जाणून आहें. ईश्वरापुढें उभा राहून प्रार्थना करीत असतां भारताचें संकलित भवितव्य ओळखून प्रार्थना करणें माझें जरूर आणि पवित्र कर्तव्य आहे. ह्यांत ब्रिटिश सरकारची कदर ओळखून माझें आध्यात्मिक कर्तव्य करणें भाग आहे. ह्यांत मीं कच खाल्ली तर मी स्वतःशींच अपात्र ठरेन. आपला विश्वास असेल तर मला ह्या जागेवर ठेवा. पण माझ्या कामांत स्वतः मला आणि माझ्या ईश्वराला जबाबदार राहूं द्या." हें निर्वाणीचें उत्तर ऐकून गुरुजनांनीं चांगला विचार केला आणि हें संकट तात्पुरतें मिटलें ह्याबद्दल मी गुरुजनांचा निरंतर आभारी राहिलों.

**एक काहूर**

पण ह्यानंतर दुसरेंच एक प्रचंड काहूर अकस्मात् उठलें. १९०७ सालीं महाराष्ट्रांत एक अशांतीची वावटळ सुटली. ती वर्ष दोन वर्षे चालली. तींत १९०८ सालीं नाशिक जिल्ह्यांत एक अत्यंत खेदजनक प्रकार घडला. त्या जिल्ह्याचे उदार अंतःकरणाचे लोकप्रिय कलेक्टर जॅक्सन ह्यांचा खून एका माथेफिरूनें केला. सरकारी अधिकाऱ्यांना आणि समंजस लोक-

पुढाऱ्यांना मोठा धक्का बसला. थोड्याच महिन्यापूर्वीं ह्याच कलेक्टरांच्या उदार सहाय्यानें नाशिक येथें आमच्या मिशनची स्थानिक कमिटी स्थापिली गेली होती. अमरावतीचे तरुण महार पुढारी यांनीं ह्या कमिटीच्या स्थापनेसाठीं नाशिक जिल्ह्यांत हिंडून व्याख्यानें देऊन लोकमत तयार केलें होतें. ह्यापूर्वीं नामदार गव्हर्नरसाहेब सर जॉर्ज क्लार्क यांनीं आपली कन्या मिस् व्हायोलेट क्लार्क यांच्याकरवीं मोठा जाहीर जलसा भरवून मिशनला मोठी देणगी देऊन आपली सक्रीय सहानुभूति दाखविली होती. मोठमोठे संस्थानिक, हिंदु, पारशी, ख्रिस्ती वगैरे लोकांचे पुढारी ह्यांचें लक्ष मिशननें वेधलें होतें. इतकेंच नव्हे तर जिल्ह्याचे कलेक्टर, असिस्टंट कलेक्टर वगैरे युरोपियन अधिकारी मिशनला मदत करूं लागले होते. डॉ. हॅरोल्ड एच. मॅन, कर्नल स्टीन, मिस्टर सेज्वीक वगैरे सारखे मुलकी आणि लष्करी अधिकारी पुणें शाखेच्या कमिटीवर सभासद होऊन निधी जमविण्याच्या कामीं मदत करीत होते. अशा शुभवेळीं ह्या भयंकर खुनामुळें मोठा अपशकून झाला. वस्तुतः ह्या खुनाचा मिशनच्या कार्याशीं काडीमात्र संबंध नव्हता. तथापि स्थानिक अधिकाऱ्यांत खळबळ उडणें साहजिक होतें. पुणें शाखेकडून मला आणि अध्यक्ष चंदावरकरांना तांतडीचीं पत्रें आलीं. साहजिकच चंदावरकरांना चिंता लागली. त्यांना मीं समक्ष भेटून ताबडतोब पुण्यास जाऊन सर्व संशय निवारण करून येतों असें आश्वासन देऊन मी पुण्यास गेलों. त्यावेळीं सर जॉन म्यूर मॅकेंझी मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचे मुख्य सभासद होते. पुढें ते कांहीं वेळ तात्पुरते गव्हर्नरहि झाले. त्यांची पत्नी लेडी म्यूर मॅकेंझी या आमच्या मिशनच्या महिला कमिटीच्या अध्यक्ष होत्या. मी मिशनच्या सोज्वळ-पणाबद्दल ह्या दोघा नवराबायकोंची खात्री पटविली होती. माझ्या मुला-खतींत सर जॉन यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, सर नारायण चंदावरकरांचे

नांवामुळें आणि तुमच्या कामाच्या तपशीलवार माहितीमुळें तुमच्याबद्दल तिळमात्रहि संदेह आमच्या मनांत येणार नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेवा आणि तुमचें काम निर्वेधपणें पुढें चालवा. झालेल्या गुन्ह्याबद्दल सरकार योग्य तो बंदोबस्त करील. त्याची झळ तुम्हाला लागणार नाहीं. माझा जीव खालीं पडला. पुणें शाखेच्या कामिटीला नवीन धीर आणि नवीन जोम आला. कामिटीचे अध्यक्ष डॉ. मॅन हे दमदार कार्यकर्ते. सर नारायण-रावप्रमाणेंच ते मिशनच्या कामीं जातीनें लक्ष्य घालीत. त्यांना कोणत्याच प्रकारचा संशय आला नव्हता. पण मी मुंबईस परत येऊन पाहतों तों सर नारायणराव यांच्या राजीनाम्याचें पत्र माझ्या टेबलावर आढळलें. मीं ताबड-तोब त्यांच्याकडे जाऊन घडलेला सर्व प्रकार सांगितला. अशा धामधुमीच्या वेळीं नामदार गव्हर्नरांची भेट घेणें उचित नव्हे; ही लाट उसळून गेल्या-वर त्यांच्याकडे एक शिष्टमंडळ नेऊन घडलेल्या शोचनीय प्रकारचा त्यांत संबंध न दाखवतां मिशनच्या अनेक गरजा त्यांचेपुढें ठेवून सरकारीरित्या त्यांची सहानुभूति मिळविण्याचा आम्हीं प्रयत्न करावा असा प्रेमळ आणि पोक्त सल्ला सर जॉन म्यूर मॅकेंझी यांनीं दिला वगैरे मजकूरहि मीं सर नारायणरावांस सांगितला. मग त्यांनीं राजीनाम्याचा आग्रह धरला नाहीं.

**दुष्ट वार्ता**

पुढें १९०९ सालच्या आरंभीं मी मुंबईस असतांना मिस व्हायोलेट् क्लार्क ह्यांच्याकडून एक खाजगी पत्र आलें. ह्या उदार स्त्रीनें जलसा करून मिशनला देणगी दिल्या-पासून मिशनचें कार्य प्रत्यक्ष पाहावें अशी इच्छा धरली होती. प्रतिष्ठित स्त्रियांच्या कमिटीकडून आणि निराश्रित सेवासद-नाच्या प्रचारकांकडून अस्पृश्यवर्गांच्या कंगालखान्यांतून या गरीब लोकांची जी प्रेमळ शुश्रूषा व निस्वार्थ सेवा चालली होती तिचा तपशील ह्या उदार स्त्रीचे कानांवर गेला असला पाहिजे. म्हणूनच तिनें मजला खाजगी

पत्र लिहून गरिबांच्या बरोबर जाऊन हीं सेवेचीं कामें आपल्या समक्ष पाहाण्यास मिळतील काय असा प्रश्न केला होता. अर्थात् मीं अनुकूल उत्तर दिलें. लवकरच १९०९ च्या मार्चमध्यें मिशनच्या शाळेचा बक्षिस-समारंभाचा बेत ठरविण्यांत आला. एल्फिन्स्टन रोड जवळील मिशनच्या ठिकाणाच्या बाजूस एक विस्तीर्ण पटांगण होतें; तेथें भव्य मांडव घालण्यांत आला. सामाजिक मेळा, स्त्रियांची सभा, प्रीतिभोजन वगैरे पूर्वींचीं कामें देखील आटोपून घेण्यांत आलीं. मुख्य बक्षिससमारंभाचे दिवशीं अध्यक्षस्थान स्वीकारून आपल्या कन्येच्या हस्तें मुलांना बक्षिसें वाटण्याचें गव्हर्नरसाहेबांनीं कबूल केलें होतें. पण दैवदुर्विलास कांहीं निराळाच होता. आम्ही ह्या समारंभाची वाट पहात असतां त्याच दिवशीं एक अचानकपणें भयंकर व्याधी होऊन ही प्रेमळ तरुण कुमारी खिस्तवासी झाली अशी दुष्ट वार्ता गांवभर पसरली. आश्चर्य आणि दुःख यांनीं आम्हां सर्वांस घेरलें आणि ईश्वरी इच्छेस मुकाट्यानें मान द्यावा लागला. अर्थात् मिस क्लार्क यांना गरिबांचीं दुःखें समक्ष बघण्यास संधी मिळाली नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं सर जॉर्ज यांच्या पत्नीहि निवर्तल्या म्हणून रजा घेऊन कांहीं दिवस ते एडन येथें रहावयास गेले. रीतसर त्यांच्याकडे मिशनचे दुखवटे गेले. त्यांच्या जागीं सर जॉन म्यूर हे तात्पुरते गव्हर्नर झाले. पुढें ढकलण्यांत आलेला बक्षिससमारंभ ता. १२ आक्टोबर १९०९ रोजीं श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड यांच्या हस्तें मुंबई येथील टाऊन हॉलमध्यें टोलेजंग सभा भरवून उरकण्यांत आला. त्याचें वर्णन मागें आलेंच आहे.

पुढें ना. गव्हर्नरसाहेब एडनहून आल्यावर त्यांचें पुन्हा लग्न झालें. त्यानिमित्त मुंबईच्या भायखळा येथील इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या पटांगणांत मुंबई अस्पृश्यवर्गीय स्त्रियांची जाहीर सभा भरली. ही सभा ता. ५ नोव्हेंबर १९१० रोजीं भरली. तिचें अध्यक्षस्थान मुंबईच्या सेवासदनाच्या कार्य-

कर्त्या सौ. यशोदाबाई ठाकूर यांनीं मंडित केलें होतें. ना. गव्हर्नरसाहेबांच्या लग्नाचा अभिनंदनपर ठराव पास होऊन त्यांच्याकडे पाठविण्यांत आला.

**शिष्टमंडळ**

सर जॉन म्यूर मॅकेंझींनीं सुचविल्याप्रमाणें मिशनचें एक वजनदार शिष्टमंडळ ता. २५ ऑगस्ट १९१० रोजीं मुंबईचे गर्व्हनर सर जॉर्ज क्लार्क यांचेकडे पुण्यांतील गव्हर्नमेंट हाऊसमध्यें गेलें. त्यांत सौ. सईबाई परांजपे—प्रि. र. पु. परांजपे यांच्या पत्नी, डॉ. हॅरोल्ड एच्. मॅन, बॅ. एच्. ए. वाडिया, दि. ब. गोडबोले, प्रो. धों. के. कर्वे, आणि मी इतकी मंडळी हजर होती. प्रथम सौ. सईबाईनीं भाषण करून शिष्टमंडळाचे मुख्य सभासद लेडी म्यूर मॅकेंझी ह्या विलायतेला गेल्यानें त्यांना हजर राहतां आलें नाहीं याबद्दल खेद व्यक्त केला. नंतर मीं भाषण करून मिशनचा सविस्तर लेखी अर्ज सादर केला.

त्या अर्जामध्यें पुढील विशेष मागण्या करण्यांत आल्याः (१) ना. गर्व्हनरांनीं मिशनच्या घटनात्मक नियमाप्रमाणें मिशनचे पेट्रन म्हणून पांच हजार रुपये देऊन उदार आश्रयदाते व्हावें. (२) मुंबई सरकारनें मातृसंस्थेला उदार ग्रँट-इन्–एड (वर्षासन) द्यावी. (३) मिशनचा ५००० रु. फंड वेगळा काढून ठेवला आहे. त्यापासून मुंबई इलाख्याच्या मध्यभागाच्या ३ जिल्ह्यांतून सरकारी मान्यता दिलेल्या शाळांतून अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठीं शिष्यवृत्त्या देण्याचें ठरविलें आहे. ह्या खर्चाचा $\frac{1}{3}$ खर्च मुंबई सरकारनें ग्रँट म्हणून दरसाल द्यावा. (४) ह्या फंडाला मिस् व्हायोलेट क्लार्क मेमोरियल शिष्यवृत्त्या फंड हें नांव देण्याला परवानगी असावी. (५) मुंबई इलाख्याच्या शिक्षण खात्यानें इलाख्यांतील दुय्यम शाळांतून अस्पृश्य विद्यार्थ्यांचा अधिक प्रवेश व्हावा आणि त्याविषयींचे सविस्तर अहवाल शिक्षण खात्यानें प्रसिद्ध करावे असें त्या खात्याला हुकूम सुटावे. (६) इलाख्यांतील म्युनिसिपालिट्यांना आणि

इतर स्थानिक संस्थांना अस्पृश्यांसाठींही नवीन शाळा काढण्यासाठीं आणि जुन्या शाळांतून हजेरीची संख्या वाढविण्यासाठीं सूचना देण्यांत याव्यात.

वरील मागण्यांना नामदार गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या मगदुराप्रमाणें उत्तरें दिलीं. सूचना केली कीं, लोकमतावर परिणाम करण्याचें मिशनचें काम सर्वांत महत्त्वाचें आहे आणि शिक्षणाचे बाबतींत नुसतें वाङ्मयीन शिक्षण देऊन न राहतां औद्योगिक शिक्षणाकडे मिशननें लक्ष्य पुरवावें. ह्यानंतर डेप्युटेशनच्या सभासदांना गव्हर्नरसाहेबांनीं अल्पोपाहार दिला आणि प्रत्येक सभासदाचें प्रेमळपणें स्वागत केलें.

**गौरवपूर्ण उल्लेख**

मिशनच्या मागण्यांचा अर्ज आणि त्याला गव्हर्नरनें दिलेलें समर्पक उत्तर ह्यांच्या निराळ्या प्रती छापून प्रत्येक जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांकडे पाठवून द्याव्यात आणि मिशनच्या मागण्यांकडे जिल्ह्यांतील म्युनिसिपालिट्यांचें लक्ष्य वेधावें असा मुंबई सरकारनें लवकरच ठराव पास केला. इतकेंच नव्हें तर स्वतः गव्हर्नरसाहेबांनीं पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजास भेट दिली त्यावेळीं जें भाषण केलें त्यांत कॉलेजच्या तरुण विद्यार्थ्यांचें लक्ष्य ह्या मिशनच्या कार्याकडे वळविलें. ते म्हणाले, " हिंदुस्थानांतील निरनिराळ्या मिश्र जातींना एकत्र करून लवकरच हिंदुस्थानांत एक राष्ट्राची उभारणी करावी हा सरकारचा हेतू आणि कर्तव्य आहे. हें कार्य सर्वत्र चालू झाल्याचीं लक्षणें हल्लीं दिसत आहेत. त्यांत भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळीचे कार्यामुळें हिंदुस्थानांत विश्वबंधुत्व निर्माण होत आहे. त्याचा मी येथें विशेष उल्लेख करतों. इंग्लंडांतील पुष्कळ कॉलेजांकडून अशा मिशनसाठीं मिशनऱ्यांचा पुरवठा होत आहे. तुम्ही देखील ह्या बाबतींत आपला शक्य तो वेळ पुरवून पुणें येथील कार्याला मदत कराल तर बरें होईल. "

**मिशनचा बक्षिस-समारंभ**

मिशनच्या ४ थ्या बक्षिस-समारंभानिमित्त ५ दिवस उत्सव करण्यांत आला. त्यांत चोखामेळ्याचे प्रसिद्ध हरिदास धोंडीबा सासवडकरांची कन्या प्रसिद्ध कीर्तनकार सौ० बायजाबाई हिचीं तीन कीर्तनें करण्यांत आलीं. भायखळा येथील मदनपुरा मोटारस्टँडवर भव्य मंडप घालण्यांत आला होता. त्यांत मुंबई येथील सर्व जातीचे गिरणी कामगार आणि अस्पृश्यवर्ग ह्यांच्या स्त्रीपुरुषांची अलोट गर्दी जमली होती. बाईचीं कीर्तनें बहुजनसमाजांस इतकीं आवडलीं कीं तिसरे दिवशींची रात्रीची गर्दी अनावर झाली. मांडवाचे खांब पाडून गर्दी आंत शिरूं लागली. मांडव जमीनदोस्त झाल्यानें कीर्तन बंद करावें लागलें. दुसरेच दिवशीं मुख्य समारंभाचा दिवस असून ना. गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क हे अध्यक्ष-स्थान स्वीकारणार होते. आयत्यावेळीं त्यांची कन्या वारल्यामुळें गेल्या वर्षी विरस झाला होता. त्याची पुनरावृत्ति ह्या वर्षी हा मंडप पडल्यामुळें होते कीं काय अशी भीति वाटूं लागली. मिशनचे उत्साही कार्यकर्ते रा. अमृतलाल ठक्कर, त्यावेळचे मुंबई कार्पोरेशनचे इंजिनियर ह्यांनीं रात्रीचा दिवस करून शेंकडों मजूर लावून पहिल्यापेक्षांहि चांगला मंडप दुसरे दिवशीं दुपारचे आंत उभा करून बैठकीची जय्यत तयारी करून दिली. गांवांतील नामांकित लोकांची गर्दी उसळली होती. सर नारायणराव यांनीं गव्हर्नरसाहेबांचें योग्य स्वागत केलें.

**संशयाचें निराकरण**

नामदार गव्हर्नरांनीं यावेळीं केलेल्या सहानुभूतिपर भाषणाचे खालील उद्गार चिरकाल संस्मरणीय राहतील. "ह्या मिशनचें काम दुहेरी. एका बाजूस वरिष्ठ वर्गाचें लक्ष्य अस्पृश्य वर्गाच्या दुःखांच्या कहाणीकडे वेधणें, दुसऱ्या बाजूला ह्या अस्पृश्यांना शिक्षण देऊन वर आणणें. माझ्यापूर्वीचे

एक प्रसिद्ध गव्हर्नर मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यांनीं आपल्या मार्च १८२४ च्या खलित्यांत अस्पृश्यांविषयीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, ह्या अस्पृश्य वर्गाचे लोक संख्येनें अत्यंत मोठें आणि अत्यंत तिरस्कृत गणले गेले आहेत. ब्रिटिश सरकारनें जर ह्यांना शिक्षण दिलें तर ते उपयुक्त ज्ञानामध्ये सर्वांच्या शिखरावर बसतील; पण इतर वरिष्ठ वर्गाचा त्यांच्याबद्दलचा तिरस्कार कायम राहील आणि शिक्षण घेऊन हे ज्ञानसंपन्न झाले असतां ह्यांचा तिरस्कार करणाऱ्या बहुजनसमाजाला एका बाजूस ठेवून ह्या तिरस्कृत पण नवीन सुशिक्षितांना आम्हाला हाताशीं धरावें लागेल. ८७ वर्षांपूर्वींच्या मोठ्या मुत्सद्याचे हे उद्गार आहेत. ह्या तिरस्कृत वर्गास जर आम्ही शिक्षण देऊं तर प्रत्यक्ष शिक्षणाचाच वरिष्ठ लोक तिरस्कार करूं लागतील. अशी भीति ह्या मुत्सद्याला पडली होती. आतां भारतांत किती बदल झाला आहे. तेव्हां भारतीयांच्या मनांत कोणत्याही प्रकारचा किंतू येऊं न देतां त्यांना शिक्षण द्यावें लागत होतें. आतां कांहीं झालें तरी शिक्षणाचा मगदूर आणि पात्रता न पाहतां शिक्षण द्या अशी एकच ओरड सुरू झाली आहे. आतां तुमच्या मिशनची अशी इच्छा आहे कीं, ह्या अस्पृश्यवर्गांनाही त्या शिक्षणाचा पूर्ण वांटा मिळावा."

ह्यानंतर नामदार गव्हर्नरसाहेबांनीं आपली पूर्ण सहानुभूति व्यक्त करून भाषण संपविलें. गेल्या वर्षीं मि. जॅक्सन साहेबांच्या खुनामुळें मिशनसंबंधीं कांहीं सरकारी अधिकाऱ्यांच्या मनांत जो व्यर्थ गैरसमज पसरला होता, त्यांच्या कानावर प्रांताधिपतींचे हे रोखठोक उद्गार जाऊन त्यांच्या संशयाचा निरास झाला अशी मिशनच्या चालकांची अखेरची खात्री झाली.

**कठीण परीक्षा**

ह्याच वेळीं प्रचारकांनीं अमक्या अमक्या नियमाप्रमाणें वागावें, वेळोवेळीं कामाचे अहवाल पाठवावेंत, रोजनिशी ठेवावी वगैरे किरकोळ वाद धुमसतच होता. अहवाल तर वर्षाकाठीं मी लिहितच होतो आणि वेळोवेळीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करीत होतो. माझ्या कार्यास अशा प्रसिद्धीची जरुरीच असे. पण हीं कामें लेखी नियमांच्या चौकटींत बसावेणें आणि त्यावर आग्रह धरणें हें मला केव्हां केव्हां परवडत नसे. ह्यामुळें मी वेळोवेळीं रंजीस येऊं लागलों. समाजाचें काम मीं माझें आध्यात्मिक काम म्हणून पत्करलें होतें. एकाद्या ऐहिक नोकरीप्रमाणें लेखी राजीनामा देऊन तींतून सुटून जाणें मला इष्ट वाटेना. ज्या नोकरीचा मीं अर्ज केला नव्हता ती कशी संपणार? विश्वासानें मला हांक मारली होती ती मी तितक्याच विश्वासानें कसल्याहि ऐहिक अटी न घालतां स्वीकारली होती. म्हणून हा प्रसंग अंतस्थ खळबळीचा होऊन राहिला. ह्यांतून मला एकच मार्ग दिसूं लागला. तो हाच कीं, समाजानें मला जें अल्पसें वेतन देऊं केलें तें बंद करावें; पण समाजाची नोकरी सोडूं नये. मीं नेहमीं फिरतीवर हिंडत होतो. घरीं पत्र लिहिलें कीं माझ्या पश्चात् कोणी हें वेतन आणून दिल्यास घरच्या मंडळींनीं तें स्वीकारूं नये. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे १९१० सालच्या नोव्हेंबर महिन्यांत समाजाचा व माझा प्रचारक या नात्यानें संबंध सुटला, असा समाजाच्या कमिटीनें ठराव करून मला कळविलें. माझें मन शांत झालें. मिशनची निराश्रित सेवासदनाची दयाराम गिडूमल यांची देणगी ह्याच सालीं दीड महिना अगोदर बंद झाली होती. म्हणून माझी बहिण जनाबाई यांचेंहि वेतन बंद झालें. तरी त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच काम चालूं ठेवलें. समाजाचे प्रचारक या नात्यानें मीं आपलें काम १९०३ नोव्हेंबरपासून १९१० नोव्हें-

बर अखेर सतत ७ वर्षें केलें. त्यांत मीं मोठी पात्रता दाखविली असें मला मुळींच वाटत नव्हते. कामच असें होतें कीं, त्यांत आत्मसंतोषाला जागाच नाहीं.

माझ्या घरीं मी आणि जनाबाई येवढींच काय तीं मिळवतीं माणसें. काम अमर्याद आणि मिळकत मात्र अत्यंत मर्यादित आणि अनिश्चित. अशा स्थितींत घरच्या माणसांचे हाल होणें हें साहजिकच होतें. आम्ही बाहेरगांवीं मोकळ्या हवेंत राहिलेलों. मुंबईसारख्या दाट वस्तीमध्यें घरच्या मंडळींची प्रकृति नीट राहीना. १९०६ सालीं धाकटी बहीण चंद्राबाई नगर येथें वारली. माझ्या पत्नीवर बाळंतपणांत अत्यंत कठिण शस्त्रक्रिया करावी लागली. पांच सहा महिन्यांनीं, नवीन जन्मलेलें मूल वारलें. माझ्या मातोश्रीला कॅन्सरचा असाध्य रोग जडला. १९१० सालीं माझ्या पत्नीचा आजार बळावून अस्थि-क्षय (Bone Tuberculosis) झाल्यानें त्यांना सुमारे ६ महिने खाटेशीं जखडून ठेवावें लागल्यानें, १९१० सालीं फेब्रुवारी ८ ला माझ्या मातोश्रीचा अंत होऊन तिची अत्यंत कठिण व्याधींतून मुक्तता झाली. तिचा ध्यास घेऊन माझे बाबाहि त्याच सालच्या जून २७ तारखेस कालवश झाले.

**मातापित्याचा अंत**

वार्धक्यांतील दुर्बलता आणि व्याधीच्या वेतना सोसूनही माझे आई व बाबा महारवाड्यांत घाणेरड्या वस्तींत स्वतः राहून मला मदत करीत असत. मला मात्र प्रार्थना समाजाच्या कामासाठीं राममोहनराय आश्रमांत राहावें लागे. पुढें मिशनची आर्थिक स्थिति सुधारून सुसंघटित वसतिगृहें सुरू झाली. पण त्यापूर्वी अस्पृश्यांची पोरकी आणि होतकरू मुलें आमच्या निराश्रित सेवासदनांत येत. ती वयानें लहान असत. त्यांचें संगोपन

**मातापित्याचें कार्य**

करण्याचें काम माझ्या आईनें आनंदानें पत्करलें होतें. मिशनच्या विद्यार्थ्यांसाठीं हितचिंतकांकडून जे जुने कपडे येत त्यांत कांहीं चांगली चांगली लुगडीं येत. तीं कापून त्याचे लहान लहान परकर, पोलकीं, अंगडीं, टोपडीं वगैरे करण्याचें काम आई काटकसरीनें करीत असे. टायपिस्ट आणि कारकून हे पुढें मिशनला मिळाले. पण त्यापूर्वी मिशनच्या सन्माननीय खजिनदाराच्या हाताखालीं पद्धतशीर हिशोब लिहिणें, ऑडीटसाठीं पावत्यांची जंत्री करून ठेवणें वगैरे तपशीलाचें व दगदगीचें काम माझे बाबा चोख करीत. ह्या कामांत जमखंडी संस्थानांत त्यांची ख्याति चांगली असे. हीं कामें करीत असतांना ह्या दोघांच्या पवित्र मनाला वेतनाच्या विचाराचा स्पर्शही झाला नाहीं. पण ह्यापेक्षां विशेष म्हणजे मिशनच्या कामीं माझ्या सत्त्वाची एकसारखी पारख चालली असतां मला माझ्या आईबापांचा मोठा आश्रय असे. तो असा एकदम तुटल्यामुळें मी एकाद्या पोरक्याप्रमाणें हवालदिल झालों.

अशी ही अंतरबाह्य खळबळ उडून मी वर सांगितल्याप्रमाणें १९१० नोव्हेंबरांत प्रार्थना समाजाच्या वेतनाच्या बंधनांतून सुटलों. त्यावेळपर्यंत मी राममोहन आश्रमांत राहात होतो. मी होऊनच वेतन नाकारलें; आश्रमाचा फायदाहि मी होऊनच नाकारावा हें स्पष्ट दिसलें. आश्रम ज्या उदार गृहस्थानें समाजाला दिला त्या शेठ दामोदरदासांनीं मी आश्रम सोडून जाऊं नये अशी मला मोठी गळ घातली. पण शरीराच्या स्वास्थाला, मानसिक शांतीचीच अधिक जरूरी असते. म्हणून मी वांद्रा येथें मोकळ्या हवेंत एक लहानशी जागा भाड्यानें घेतली आणि आश्रमाला रामराम ठोकला. परंतु समाजांतील सलोखा बिघडला नाहीं. समाजाचे चिटणीस माझे मित्र रा. द्वा. गो. वैद्य ह्यांनीं माझ्या योगक्षेमाची जबाबदारी आपल्यावर व्यक्तिशः घेतली. समाजांतील आणि बाहेरच्या कांहीं थोड्या चाहत्या

मंडळीकडून खासगी रीतीनें वर्गणी जमा करून माझ्या मित्रानें पुढें दोन वर्षे माझी तरतूद राखली. कोणाकडून वर्गणी जमविली हे त्यानें मला मुळींच कळूं दिलें नाहीं. मात्र माझ्या स्वातंत्र्याला आणि सुधारणा-कार्याला बाध न येईल अशा करारानें ही मदत करावी अशी अट मी घातली होती. ती ह्या भल्या मित्रानें पूर्णपणें पाळली. अशा रीतीनें माझ्या संसाराचे गाडे चालले आणि ६०० रु. दरमहा नियमानें येऊं लागले.

१९२५१

॥ समाप्त ॥

REFBK-0019261